■ अर्थसंकल्प : २०२२-२३ ■ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष

मार्च-एप्रिल २०२२/पाने १००/किंमत ₹१०

लोकराज्य

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य

एकात्मिक बाल विकास सेवा योजना

६ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या बाळासाठी वरचा पूरक आहार :

- सहा महिन्यांच्या बाळाला दुधासोबत भात, मसूर, हिरव्या भाज्या, खिचडी, पिवळी आणि केशरी फळे, दही, तूप आणि तेल असा पौष्टिक आहारही खाऊ घालावा.
- सुरुवातीला ३ ते ४ चमचे कुस्करुन बारीक करुन खायला द्या, नंतर हळूहळू प्रमाण वाढवा आणि १ वाटी दिवसातून दोनदा खायला द्या.
- ७ ते ८ महिन्यांच्या बाळाला २ वाट्या, ९ ते १२ महिन्यांच्या बाळाला ३ वाट्या आणि १२ ते २४ महिन्यांच्या बाळाला ४ ते ५ वाट्या आहार खायला द्या.

श्री. उध्दव ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री महसूल

श्रीमती ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर
मा. मंत्री, महिला व बाल विकास विभाग

श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग

६ सक्षमीकरणास प्राधान्य

महाराष्ट्र देशात प्रगतशील व पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या विकासकामात सहभागी व्हाव्यात, यासाठी शासन अनेक योजना राबवते.

३५ 'ती'च्यासाठी योजना

महाराष्ट्र हे देशातील लोकसंख्येबाबत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून, यामध्ये ११.२ कोटी नागरिक वास्तव्य करत आहेत. महिलांची संख्या साधारण ५.४१ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ४८% आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने लोकसंख्येचा अर्धा भाग असलेल्या महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण करण्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून सातत्याने नवनवीन उपक्रम व योजना राबवण्यात येत आहेत.

८२ ऐतिहासिक दस्तऐवज

महाराष्ट्र शासनाने जानेवारी २०२१ मध्ये 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद : संघर्ष आणि संकल्प' हा जवळपास ५७० पानांचा ग्रंथ प्रसिद्ध केला. शासनाच्या सीमा कक्षाचे तत्कालीन प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे यांच्या पुढाकाराने हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.



२४ घेऊ उंच भरारी...

महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद आदींच्या माध्यमातून महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यावर राज्य शासनाचा नेहमीच भर राहिला आहे. यामुळे महिलांमध्ये स्वत:चे विश्व निर्माण करण्याची उर्मी निर्माण झाली आहे. काही महिलांनी, तरुणींनी शासनाच्या मदतीने, तर काहींनी मदतीची वाट न पाहता उंच भरारी घेतली आहे.

६४ विकासाची पंचसूत्री

कोरोना संकटावर मात करून राज्याच्या सर्वांगीण विकासाची मोठी भरारी घेणारा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात सादर केला. यात निश्चित केलेल्या विकासाच्या पंचसुत्रीमुळे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे राज्याचे उद्दिष्ट पूर्णत्वाला जाईल. राज्यातील सर्व घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे.

९१ महामानवाला विनम्र अभिवादन...

१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. या प्रज्ञासूर्यामुळे देशाला सर्वसमावेशक संविधान मिळाले. ज्यामुळे सर्वांना व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य मिळाले, समान न्यायाची हमी मिळाली, वंचितांना शिक्षण मिळाले, मागासवर्गीयांना आरक्षण मिळाले. देशाची घडी नीट बसवण्याचे काम संविधानाने केले.

सक्षमीकरणास प्राधान्य	६
शिक्षणातही महिलांची सरशी	८
आर्थिक सबलीकरण	१०
शाश्वत भविष्यासाठी अग्रेसर	१२
महिलांच्या न्याय हक्कासाठी...	१४
माविम : एक सक्षम व्यवस्था	१६
आवडीचं करिअर निवडावं...	१८
कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख	१९
'ती'ला सक्षम बनवू या	२०
कलाद्रयींचा सन्मान...	२१
सन्मान अद्वितीय प्रतिभेचा	२२
गानसरस्वतीचे स्मरण	२३
घेऊ उंच भरारी...	२४–३४
'ती'च्यासाठी योजना	३५–३८
व्यापक व आश्वासक 'उमेद'	३९
शिवरायांना अनोखे वंदन!	४१
पाऊल पडते पुढे	४२–५५
मंत्रिमंडळात ठरले	५६–५८
सतरा विधेयकांना मंजुरी	५९–६२
विकासाची पंचसूत्री	६४
विकासासाठी भक्कम तरतूद	६५
सर्वसमावेशक अर्थसंकल्प	६६
आश्वासक अर्थसंकल्प	६७–८१
ऐतिहासिक दस्तऐवज	८२
कालिदास आम्ही आभारी आहोत!	८४
दृष्टिकोन वैधमापनशास्त्राचे	८६
शासन संवाद	८८
महामानवाला विनम्र अभिवादन...	९१
डॉ. बाबासाहेबांची जलनीती	९२
बाबासाहेबांचा न्यायिक लढा	९४
विश्वनीती बाबासाहेबांची	९६

वर्ष ७३ वे | अंक ८ | मार्च – एप्रिल २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण — मीनल जोगळेकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

नारीशक्ती पुरस्कार

देशभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २८ महिलांचा राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'नारीशक्ती पुरस्कार' प्रदान करून सन्मान करण्यात आला. यामध्ये पुण्यातील डाऊन सिंड्रोम प्रभावित कथ्थक नृत्यांगणा सायली अगावणे, बुलडाणा जिल्ह्यातील सर्पमित्र वनिता बोराडे आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील सामाजिक उद्योजिका कमल कुंभार या तीन महिलांचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत केंद्रीय महिला व बाल कल्याण मंत्रालयाच्या वतीने 'नारीशक्ती पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन राष्ट्रपती भवन येथे करण्यात आले. या कार्यक्रमास केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती ईराणी, अन्य केंद्रीय मंत्रिगण तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी डाऊन सिंड्रोम प्रभावित कथ्थक नृत्यांगणा सायली अगावणे, वनिता बोराडे या भारतातील पहिल्या महिला सर्पमित्र यांना वर्ष २०२० साठी नारीशक्ती पुरस्काराने गौरवण्यात आले. वर्ष २०२१ साठी सामाजिक उद्योजिका कमल कुंभार यांना नारीशक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कथ्थक नृत्यांगणा सायली अगावणे

पुण्याची असणारी डाऊन सिंड्रोम प्रभावित सायली अगावणे ही प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगणा आहे. शारीरिक आणि बौद्धिक कमतरता असूनदेखील सायलीने कथ्थक या भारतीय शास्त्रीय नृत्यात आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. सायली हिने आतापर्यंत १००० पेक्षा अधिक सार्वजनिक कार्यक्रम सादर केलेले आहेत. वर्ष २०१२ मध्ये सायलीला केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

सर्पमित्र महिला वनिता बोराडे

बुलडाणा जिल्ह्याच्या असणाऱ्या भारतातील प्रथम सर्पमित्र महिला अशी वनिता जगदेव बोराडे यांची ओळख आहे. त्यांनी आतापर्यंत ५१ हजारांपेक्षा जास्त सापांना लोकवस्तीतून पकडून जंगलात, नैसर्गिक अधिवासात सुरक्षित सोडल्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. भारत सरकारच्या डाक विभागाने त्यांच्या नावे तिकिट काढून त्यांच्या कार्याचा सन्मान केला. महाराष्ट्र शासनाने त्यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्काराने सन्मानित केले.

सामाजिक उद्योजिका कमल कुंभार

उस्मानाबाद जिल्ह्यातील हिंगळजवाडी येथील सामाजिक उद्योजिका कमल कुंभार यांना त्यांच्या स्वयंरोजगारातील नवकल्पना आणि हजारो महिलांना प्रशिक्षित केल्याबद्दल तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करून दिल्याबद्दल राष्ट्रपती यांच्या हस्ते वर्ष २०२१ च्या नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्रीमती कुंभार यांनी १९९८ मध्ये कमल कुक्कुटपालन आणि एकता सखी प्रोड्युसर कंपनी सुरू केली. ज्याअंतर्गत त्यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील जवळपास ३००० हजार महिलांना मदत केलेली आहे. त्यांना वर्ष २०१७ मध्ये नीती आयोगाच्या 'वुमेन ट्रांसफॉर्मिंग इंडिया' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

‘ती’ कणखर आणि सक्षम

आपल्या देशात महिलेला देवीचे रूप मानले जाते. ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः’ या प्राचीन साहित्यातील श्लोकात ‘ती’चे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. ज्या ठिकाणी नारीचे पूजन केले जाते, त्या ठिकाणी देव निवास करतो, असा याचा श्लोक अर्थ. यातील दैववाद बाजूला ठेवला तरी ‘ती’चे महत्त्व किंचितही कमी होत नाही. प्रत्येकाचे आयुष्य ‘ती’ने व्यापून गेलेले असते. आई, बहीण, पत्नी, काकू, मावशी अशा कितीतरी रूपांनी ‘ती’ आपल्या पाठीशी शक्तीचे रूप म्हणून सदैव उभी असते. त्याचे प्रत्यंतर आपल्याला वेळोवेळी येतच गेले आहे. अगदी अलीकडच्या काळापुरते बोलायचे झाले तर कोविड-१९च्या सुरुवातीच्या काळात प्रचंड भीतीच्या वातावरणात महिला नर्स, डॉक्टरांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत संसाराचाही गाडा हाकून कणखरपणाचे दर्शन घडवले.

महिलांचा कणखरपणा, बाणेदारपणा आणि त्यांच्या नेतृत्वगुणांचे दर्शन आपल्याला वेळोवेळी घडतच असते. नुकतेच आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी राज्यातील तीन महिलांचा नारीशक्ती पुरस्कार देऊन गौरव केला. त्यातील वनिता बोराडे या सर्पमित्र, कमल कुंभार या उद्योजिका, तर सायली अगावणे या डाऊन सिंड्रोम कथ्थक नृत्यांगणा आहेत. त्याचबरोबर प्रभा अत्रे यांना पद्मविभूषण, ज्येष्ठ लावणी गायिका सुलोचना चव्हाण यांना पद्मश्री या प्रतिष्ठित नागरी पुरस्काराने गौरवण्यात आले. शिवाय नीती आयोगातर्फे विविध क्षेत्रांत उत्तुंग कार्य करणाऱ्या देशातल्या ७५ महिलांचा ‘भारत बदलणाऱ्या महिला’ या पुरस्काराने गौरव करण्यात आला असून, त्यामध्ये राज्यातील ११ महिलांचा समावेश आहे. नारीशक्तीच्या अष्टपैलू गुणांची ही प्रातिनिधिक उदाहरणे. खरेतर अष्टपैलू हा शब्दही ‘ती’च्या गुणांचे कौतुक करण्यासाठी अगदी तोकडाच म्हणावा लागेल.

देशातील सर्व क्षेत्रांत आणि सर्व सर्वोच्च पदांवरही महिलाशक्ती विराजमान होऊन त्यांनी नवे कीर्तिमान स्थापन केले आहेत. त्यामध्ये राज्यातील महिला शक्तीचेही मोठे योगदान आहे. वात्सल्य, मांगल्य आणि मातृत्वाचे मूर्तिमंत रूप असलेली ‘ती’ साहित्य, क्रीडा, उद्योग, शिक्षण आदी क्षेत्रांसह अगदी राजकारणातही सर्व आव्हानांना जिद्दीने सामोरे जात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या औचित्याने मार्च-एप्रिलचा लोकराज्यचा अंक महिला विशेषांक म्हणून आम्ही प्रकाशित करत आहोत. स्वकर्तृत्वाने आपले विश्व निर्माण करणाऱ्या महिलांच्या यशकथा, अनुभव हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

महिला दिनाच्या तीनच दिवसानंतर ११ मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतिदिनी राज्याचा २०२२-२३ चा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करण्यात आला. हा अर्थसंकल्प कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण आणि उद्योग या पंचसुत्रीवर आधारित आहे. केवळ या क्षेत्रांसाठी तब्बल १ लाख १५ हजार कोटींहून अधिकची तरतूद करण्यात आली असून इतर क्षेत्रांसाठीही भरीव तरतूद या अर्थसंकल्पात केली गेली असल्याने हा अर्थसंकल्प शाश्वत विकासाची हमी देणारा अर्थसंकल्प ठरला आहे. या सर्वसमावेशक अर्थसंकल्पाची ओळख या अंकात करून देण्यात आली आहे.

१४ एप्रिल भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान देत देशाला संविधान दिले. परंतु त्यापलीकडेही बाबासाहेबांची कामगिरी खूप मोठी आहे. कृषी, जलव्यवस्थापन सारख्या क्षेत्रातही त्यांची भरीव कामगिरी राहिली आहे. त्यामुळे देशाच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे. बाबासाहेबांच्या अशा वेगळ्या पैलूंची ओळखही या अंकात विविध लेखांच्या माध्यमातून करून देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

महिला विशेष, अर्थसंकल्प २०२२-२३ व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष विभाग हे मार्च-एप्रिल २०२२ च्या लोकराज्यचे मुख्य आकर्षण असून मंत्रिमंडळ निर्णय व महत्त्वपूर्ण घडामोडी ही नेहमीची सदरेही अंकात समाविष्ट आहेत. हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

दीपक कपूर
(मुख्य संपादक)

महाराष्ट्र हे देशात प्रगतशील व पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या विकासकामात सहभागी व्हाव्यात, यासाठी शासन अनेक योजना राबवते. महिलांच्या विकासाची, सक्षमीकरणाची जबाबदारी आपली सर्वांची आहे.

सक्षमीकरणास प्राधान्य

ॲड. यशोमती ठाकूर
महिला आणि बालविकास मंत्री

महिलांचे सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक सक्षमीकरण नसून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक सक्षमीकरण झाले पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत, यशस्वी होत आहेत, हा सक्षमीकरणातील मोठा टप्पा आहे.

राज्याच्या महिला व बालविकास विभागाची जबाबदारी माझ्यावर असून महिलांचा विकास आणि बालकांचे योग्य पोषण हे उद्दिष्ट ठेवून या विभागाची मंत्री म्हणून मी सतत कार्यरत आहे. कोविड काळात जेव्हा सर्व जग थांबले होते. त्या वेळी महिलांनी आरोग्य, पोषण, लसीकरण, साफसफाई इथपासून संशोधनाची जबाबदारीही आपल्या खांद्यावर घेतली. कोविड महामारीच्या गेल्या दोन वर्षांच्या काळात आपल्या जिवाची कसलीही पर्वा न करता राज्यातल्या प्रत्येक गावात माझ्या सर्व अंगणवाडी ताईंनी अविरत काम केले आहे.

महत्त्वाचे निर्णय

महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ३० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय सर्वात प्रथम महाराष्ट्राने घेतला. २०११ मध्ये हे प्रमाण ५० टक्के केले. आज ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेपर्यंत तसेच नगरपालिका व महानगरपालिकेत, महिला लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने दिसत आहेत. राज्य महिला आयोग पहिल्यांदा आपल्या राज्यात स्थापन केला गेला. वडिलांच्या संपत्तीत, मुलींना समान वाटा देण्याचा कायदा पहिल्यांदा महाराष्ट्राने केला. देशात पहिले महिला धोरण आपल्या राज्यात १९९४ मध्ये लागू केले. महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी आपण शक्ती कायदा आणतोय. या कायद्यामुळे महिलांना सुरक्षितपणे जगण्यासाठी न्यायाची शक्ती मिळणार आहे. हे राज्यातील महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने घेतलेले महत्त्वाचे निर्णय आहेत. राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिला व बाल सशक्तीकरण या योजनेकरिता जिल्हा नियोजन समितीस नियोजन विभागाकडून मिळणाऱ्या एकूण निधीच्या किमान ३% इतका निधी कायमस्वरूपी महिला व बालविकास विभागाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्मार्ट व बोलकी अंगणवाडी व बाला (बिल्डिंग ॲज लर्निंग एड) उपक्रमात नांदगावपेठ व माउली जहांगीर येथे बाला अंगणवाडीचा शुभारंभ प्रसंगी अंगणवाडी सेविकांसोबत महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर.

सक्षमीकरण आणि सशक्तीकरण

महिलांच्या क्षमता विकसित करणे त्यांच्यात आत्मविश्वास वाढवणे व उद्योजकीय विकास घडवून आणणे तसेच रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे. महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढवणे. स्थायी विकासासाठी स्वयंसाहाय्य बचतगटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकटीकरण करणे याबरोबरच महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि सशक्तीकरणाचे काम आपण करत आहोत.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक उन्नती ही व्हायला हवी. महिलांना समानतेची संधी मिळायला हवी. यासाठी राज्य शासन लवकरच नवीन महिला धोरण घेऊन येत आहे. या वर्षीचे धोरण हे केवळ मार्गदर्शक सूचनांच्या स्वरूपात मर्यादित न राहता त्याला कृतिआराखड्याची व संनियंत्रणाची जोड पहिल्यांदाच देण्यात येत आहे. यात धोरणाच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे.

बचतगटांना प्रोत्साहन

विभागाच्या जिल्हास्तरीय विविध कार्यालयांना एकाच छताखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यातून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अमृतमहोत्सवी महिला व बालभवन उभारण्यात येणार आहे. तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला बचतगट मोहिमेचे बळकटीकरण करणे व महिला बचतगट भवन निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला बचतगट चळवळीमुळे महिलांचे एक जाळे निर्माण झाले असून त्यांच्यातील आत्मविश्वासामुळे कुटुंबात त्यांच्या मताला मान दिला जातो. या बचतगटांना अधिक सक्षम करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी मी महत्त्वाचे निर्णय घेत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटासारख्या माध्यमांचा उपयोग केला आहे. माविम ही राज्यातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी काम करणारी त्यांना सक्षम करणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. महिला बचतगटाच्या शेतमालाला बाजारपेठ व उत्कृष्ट दर मिळवून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे. माविम आपल्या ई-बिझनेस प्लॅटफॉर्मद्वारे महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहे.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नवतेजस्विनी अंतर्गत महिला बचतगटांना ५२३ कोटींचा निधी दिला आहे. सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे. नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पात अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत. या प्रकल्पाच्या उपक्रमाना सुरुवात झालेली असून यामध्ये प्रामुख्याने प्रकल्पासाठी बेसलाईन सर्वे पूर्ण करण्यात आला आहे. २४१ सबप्रोजेक्टना मंजुरी देण्यात आलेली आहे.

मिशन वात्सल्य

कोविडमुळे अनाथ झालेल्या बालकांना व कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन विधवा झालेल्या महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेवर आधारित 'मिशन वात्सल्य' हे मिशन आम्ही हाती घेतले आहे. कोविड प्रादुर्भावामुळे घरातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन विधवा झालेल्या महिलांचे योग्य पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने व त्यांचे न्याय्य हक्क अबाधित राखण्याच्या अनुषंगाने जिल्हा कृती दलाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. अत्याचारांना बळी पडलेल्या महिला व बालकांना मानसिक आघातातून सावरणे तसेच त्यांचे पुनर्वसन करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. त्यासाठी 'मनोधैर्य योजना' राबवत आहोत.

राज्य महिला आयोग

महिला आयोग महिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या अडचणी सोडवण्याचा नेहमीच प्रयत्न करते. महिलांचे अत्याचारांपासून संरक्षण करण्यासाठी विविध कायदे आहेत. महिलांना उदभवणाऱ्या कौटुंबिक समस्या व त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायासंदर्भात त्यांना वेळोवेळी समुपदेशन व कायदेविषयक मार्गदर्शनासाठी महिला आयोग नेहमीच महिलांच्या पाठीशी असतो. राज्यातील पीडित महिलांना आपल्या तक्रारीनंतर जलद न्याय मिळणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. राज्यभरातील महिलांना आपल्या तक्रारी घेऊन मुंबईला येणे सोयीचे नाही, हे लक्षात घेऊन राज्य महिला आयोगाची कार्यालये सर्व विभागीय आयुक्तालयांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी सुरू करण्यात आली आहेत.

महिलांच्या आरोग्यासाठी उपक्रम

संपूर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता महिलांचे आरोग्य या घटकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशातील महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर त्याचा परिणाम निश्चितपणे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी होऊ शकेल. या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाने सप्टेंबर हा महिना पोषण माह म्हणून घोषित केला आहे. अंगणवाड्यांमधून योग्य आहार गरोदर व स्तनदा माता, मुले यांना पुरवण्यात येत आहे. कोरोना काळातही यात खंड पडू दिला गेलेला नाही. राज्याच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत परसबाग ही संकल्पना राबवण्यात आली. अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून अंगणवाडीच्या परिसरात परसबागांचा उपक्रम हाती घेण्यात आला. यामध्ये विविध पालेभाज्या आणि फळभाज्या यांची पिके घेतली जातात.

महिला सुरक्षेसाठी...

सध्या सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. महिलांनी सायबर साक्षर असणे काळाची गरज आहे. मुलींना सायबर विश्वातील सुरक्षित वापर याकरिता प्रशिक्षित करण्यासाठी 'डिजिटल स्त्री शक्ती' उपक्रम अंतर्गत १६ ते २५ वयोगटातील महाविद्यालयीन तरुणींना इंटरनेटचा सुरक्षित उपयोग, गैरप्रकार झाल्यास कायदेशीर बाबी, मानसिक परिणाम, तांत्रिक फसवणूक आदीबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल.

महिलांसाठी विविध योजना

कोविड काळात बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करण्यासोबत विविध उपाययोजना करण्यात आल्या. बालविवाहांना प्रतिबंध करण्यासाठी बालविवाह प्रतिबंध नियम २००८ मध्ये सुधारणा करण्याचे ठरवण्यात येऊन त्यासाठी तज्ज्ञांची मसुदा समिती गठित करण्यात आली आहे. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह ही सुधारित योजनामुळे नोकरीच्या ठिकाणी सुरक्षित निवासाची सोय होणार आहे.

वंचित, पीडित महिलांच्या साहाय्यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये विविध प्रकारच्या निवारा योजना, राज्य महिला गृहे, आधारगृहे, अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान, देवदासींना निर्वाहाकरिता आणि त्यांना व त्यांच्या मुलींना विवाहाकरिता अनुदान देण्याची 'देवदासी कल्याण योजना', महिला समुपदेशन केंद्र, अत्याचारग्रस्त पीडित महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र आदी योजना राबवण्यात येतात. वंचित, पीडितांपर्यंत या योजनांच्या माध्यमातून मदत पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट असून त्यासाठी काही महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत आहेत.

या वर्षी 'शाश्वत उद्यासाठी आज स्त्री पुरुष समानता' ही संकल्पना समोर ठेवून महिला दिवस जगभरात साजरा करण्यात आला. यानुसार लिंगसमभावाचे तत्त्व समाजात रुळावे, ही अपेक्षा आहे. महिलांचे सक्षमीकरण आणि स्त्री-पुरुष समानतेतून उद्याचे शाश्वत भविष्य आपल्याला घडवायचे आहे, त्या दृष्टीने विभागाची वाटचाल सुरू आहे.

शब्दांकन : शैलजा पाटील
विभागीय संपर्क अधिकारी

राज्य स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत प्रागतिक राज्य आहे. एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये, याकडे शासनामार्फत जाणीवपूर्वक लक्ष दिले जात आहे. बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण, मुलींसाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृहे, शाळेला ये-जा करण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना आदी उपाययोजनांच्या माध्यमातून स्त्री शिक्षणावर भर देण्यात येत आहे.

शिक्षणातही महिलांची सरशी

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

राजमाता जिजाऊ यांना आई म्हणून, सावित्रीबाई फुले यांना शिक्षिका म्हणून, पुण्यश्लोक अहिल्याबाई यांना राज्यकर्ती म्हणून, रमाबाई आंबेडकर यांना त्यागमूर्ती पत्नी म्हणून अशा ज्या ज्या महिलांनी आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे नाव जगभर नेले, त्या सर्व महिलांना मी मानाचा मुजरा करते. स्त्रीशिक्षणाची सुरुवात सावित्रीबाई फुलेंनी केली. त्यासाठी लोकांनी मारलेले दगड, शेण त्यांनी झेलले, म्हणून एक वर्षा गायकवाड निर्माण झाली, असे मी मानते.

सावित्रीबाई फुले यांनी म्हटले होते की, शिक्षणाने मनुष्यत्व येते. खरंतर माणसाचा मनुष्यत्वाकडे जाणारा प्रवास हाच शिक्षणाचा उद्देश आहे. शाळा-महाविद्यालयांतून जसे शिक्षण मिळते, त्याप्रमाणेच आपली समाज व्यवस्था, न्याय व्यवस्था, प्रशासन व्यवस्था कोणत्या दृष्टीने विचार करते यावरही शिक्षणाची इमारत उभी असते. महाराष्ट्रात परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. आजची विद्यार्थिनी उद्याची सक्षम व कर्तृत्ववान महिला बनण्यासाठी तिच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे ही आपल्या पिढीची जबाबदारीच नव्हे, तर कर्तव्यही आहे. यासाठी शासनासोबतच समाजानेही पुढाकार घेणे आवश्यक आहे.

मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न

शालेय शिक्षण मंत्री म्हणून मी जेव्हा ग्रामीण भागात जाते, तेव्हा तेथील मुलींना चांगले शिक्षण मिळते का याची आवर्जून चौकशी करते. काही कमतरता असतील तर त्या दूर करण्यावर आमचा भर असतो. शिक्षणाबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देणे तसेच केवळ पुस्तकी शिक्षण न देता कृतिशील पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवणे यावर भर देण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार देण्याचाही प्रयत्न करण्यात येत आहे. मराठीसह इंग्रजी भाषेचे ज्ञानही मिळावे, यासाठी द्वैभाषिक पुस्तके अमलात आणली जात आहेत.

एका कार्यक्रमाप्रसंगी मुलींसोबत संवाद साधताना शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड.

नावीन्यपूर्ण उपक्रमांवर भर

महाराष्ट्र हे स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत प्रागतिक राज्य असून बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण देण्याचे धोरण राज्यात राबवले गेले. मुलींसाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृहे बांधण्याचा कार्यक्रम राज्याने हाती घेतला. सावित्रीबाई फुले दत्तक योजनेची अभिनव कल्पना, उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत गणवेश, मोफत पुस्तके, मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन, शाळेला ये-जा करण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना, एसटीने मोफत प्रवास करण्यासाठी अहिल्याबाई होळकर योजना तसेच लेक वाचवा लेक शिकवा यांसारख्या अनेक योजना कार्यान्वित केल्या.

याबरोबरच शहरी व ग्रामीण भागातील सर्व मुलामुलींना कोणताही भेदभाव न करता शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. याव्यतिरिक्तही विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

'माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी' अभियानाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण अध्ययन आराखड्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी 'आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती' स्थापन करण्यात आली आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस राज्यात महिला शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. याबरोबरच अल्पसंख्याक समाजातील मुलींना शालेय प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी सवलती लागू

करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

संवाद

राज्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५व्या स्मृतिदिनानिमित्त नुकताच एक उपक्रम राबवण्यात आला. प्रत्येक शाळेत एक समिती स्थापन करण्यात येत आहे. यात त्या ठिकाणचे आरोग्य व्यवस्थापन, अंगणवाडी सेविका, शिक्षक, शाळा व्यवस्थापन, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या मनातील गोष्टी व त्यांची मानसिकता जाणण्याचा प्रयत्न करतील.

नुकत्याच साजऱ्या झालेल्या महिला दिनानिमित्त माझ्या उपस्थितीत विद्यार्थिनींसाठी काही उपक्रम सुरू केले गेले. यामध्ये प्रथितयश उद्योजिकांच्या मार्गदर्शनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकसन प्रशिक्षण, आदर्श शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृहांची बांधणी, सॅनिटरी नॅपकिन वेंडिग मशीन वितरण, मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत राज्यभर मार्गदर्शन शिबिर व तयार करण्यात आलेल्या साहित्याचे वितरण, आदर्श शाळांमध्ये ग्रंथालय, विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्यकांक्षिणी योजना, 'चला सजग होऊ या' हा संदेश घेऊन शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना गुड टच, बॅड टच, स्वसंरक्षण याबाबत सजग करण्यासाठी व्याख्यानमाला तसेच प्रशिक्षण वर्ग अशा उपक्रमांचा यात समावेश आहे. याद्वारे विद्यार्थिनींना समाजात वावरताना बळ लाभेल, असा विश्वास आहे.

एका गोष्टीचा मला नेहमी त्रास होतो, महिलांवर, विद्यार्थिनींवर आजही अत्याचार होत आहेत, ही शरमेची बाब आहे. नुकतीच पुणे जिल्ह्यात दहावीच्या एका विद्यार्थिनीवर एकतर्फी प्रेमातून एका माथेफिरूने शाळेत घुसून हल्ला केला. मुलींच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकल्याच्या घटना अधुनमधून आपण वाचतो. मन सुन्न होते हे सगळे वाचून. मुलींसाठी आपण समुपदेशन आयोजित करतो, त्याचप्रमाणे मुलांसाठी देखील ते गरजेचे आहे. मुलींना जसे गुड टच, बॅड टच ओळखणे शिकवतो, त्याचप्रमाणे मुलांनादेखील प्रत्येक मुलीसोबत सौजन्याने कसे वागावे याचे बाळकडू मिळाले पाहिजे, असे मला वाटते.

अभिमान या स्त्रीशक्तीचा

आपल्या देशातील महिलांनी सर्वच क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. याची परंपरा जुनी आहे. साहित्य क्षेत्रातील जनाबाई, बहिणाबाई, शांता शेळके, शिवरायांना घडवणाऱ्या राजमाता माता जिजाऊ, राजकर्त्या अहिल्यादेवी, स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या सावित्रीबाई, डॉ. बाबासाहेबांना खंबीरपणे साथ देणाऱ्या माता रमाबाई, पहिल्या डॉक्टर आनंदीबाई, शिक्षण क्षेत्रातल्या तपस्विनी अनुताई वाघ, सामाजिक क्षेत्रातील मेधा पाटकर, सिंधुताई सपकाळ, राजकीय क्षेत्र गाजवणाऱ्या पहिल्या महिला प्रधानमंत्री इंदिरा गांधी, पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, अनेक वर्षे काँग्रेसच्या अध्यक्ष असलेल्या सोनिया गांधी, पहिली भारतीय महिला अंतराळ संशोधक कल्पना चावला, पोलीस क्षेत्र गाजवणाऱ्या किरण बेदी, कलाक्षेत्रातील गानसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, नायिका दुर्गा खोटे, निर्मात्या सई परांजपे, लावणीसम्राज्ञी विठाबाई, क्रीडाक्षेत्र गाजवणाऱ्या तेजस्विनी सावंत, राही सरनोबत अशी कितीतरी नावे घेता येतील, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राची आणि देशाची मान उंचावली आहे.

एका महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थिनीचा गौरव करताना शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड.

महिला शिक्षणातून बदल

हल्ली परिवर्तनामध्ये अनेक कायदे, योजना आल्या. संविधानातही स्त्री समानतेची तरतूद झाली. त्यातून महिला सक्षम झाल्या. तरीही सातत्याने 'आम्ही महिला आहोत पण सक्षम आहोत' हे महिलांना सिद्ध करावे लागत आहे. जोपर्यंत महिला आणि पुरुष समानतेची जाणीव प्रत्येकाच्या मनात रुजणार नाही, तोपर्यंत हे सुरूच राहील. ही समानता येईल, तो दिवस महिलांसाठी खऱ्या अर्थाने सार्थकतेचा दिवस असेल, आणि हे सर्व शक्य होईल केवळ आणि केवळ शिक्षणामुळेच.

पुढील आव्हाने

२१व्या शतकातील स्त्री कुणापेक्षाही कमी नाही. याचे मूळ शिक्षणात आहे, हे मान्यच करावे लागेल. आज सर्वच क्षेत्रात महिलांची सरशी झाली आहे. समाधानाची बाब म्हणजे स्त्री-पुरूष भेद कमी झाला आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी यावरच थांबता येणार नाही. समाजातील सर्व घटकांमध्ये स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढवणे, शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे, कौशल्ये आणि रोजगारक्षमता विकसित करणे आणि त्याचबरोबर एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्यांचा दृष्टिकोन विकसित करणे ही आपल्यासमोरील आव्हाने आहेत.

शासन विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करत आहे. विद्यार्थिनींनीही गुरुजनांचे ऐकावे, अभ्यास करावा, उज्ज्वल भविष्य घडवावे आणि राज्याचा लौकिक जगात वाढवावा. महिला ही 'सामान्यातही, असामान्य 'ती' अशीच आहे', हे मनावर बिंबवून त्यांनी जग पादाक्रांत करावे, हीच अपेक्षा आहे.

शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील विशेषत: ग्रामीण महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याबरोबरच दिव्यांग महिला, निराधार महिला, शेतकरी आत्महत्येत विधवा झालेल्या महिला यांचे आर्थिक तसेच सामाजिक सक्षमीकरण करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांना उदरनिर्वाह करण्यासाठी रोजगारांच्या संधी निर्माण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून महिलांचे जीवनमान उंचवून त्यांना सामाजिक व आर्थिक सक्षमता देण्याकडे वाटचाल सुरू आहे.

आर्थिक सबलीकरण

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
महिला व बालविकास राज्यमंत्री

महाराष्ट्राला सामाजिक सुधारणांचा, विशेषत: महिला आणि मुलींच्या उत्थानाचा मोठा इतिहास आहे. सामाजिक आर्थिक आणि राजकीय विकासात महिलांची भूमिका आणि सहभाग वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत आहेत. तसेच महाराष्ट्राने १९९४ मध्ये महिला सक्षमीकरणाचे पहिले धोरण जाहीर केले तसेच बदलत्या काळानुसार अधिक महिला सक्षमीकरणाची गरज लक्षात घेऊन त्यात आवश्यकतेनुसार सुधारणा करून नवीन महिला धोरण प्रस्तावित केले आहे. यात महिला व मुलींसाठी उपजीविकेची साधने वाढवण्याबरोबरच रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास तसेच महिलांचा राजकीय सहभाग वाढणार आहे. महिलांच्या भूमिकेची ओळख म्हणजे त्यांचे श्रम, मजुरी, व्यावसायिक सुरक्षितता, सुरक्षा आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आता पुरेसा निधी मिळणार आहे. एकंदरीत येणारे महिला धोरण हे ग्रामीण महिलांच्या आर्थिक तसेच सामाजिक सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

संघटनात्मक विकास

घरगुती कामगार महिलांच्या आर्थिक सक्षमतेसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), कामगार कल्याण विभाग तसेच सामाजिक-स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून बचतगट तयार करण्याचे काम आजमितीसही सुरू आहे. बचतगटाच्या माध्यमाद्वारे संघटनात्मक विकास व आरोग्यासाठी विविध योजना राबवण्यात येत असून अशा प्रकारची योजना राज्यात प्रथम अकोला जिल्ह्यात राबवली जात आहे. घरगुती काम करणाऱ्या महिलांची नोंदणी करण्याचे काम होत आहे. त्या काम करत असलेल्या ठिकाणी त्यांना पूर्ण सुरक्षा मिळायला हवी, त्यांची नियमित आरोग्य तपासणी व्हायला हवी. स्त्रियांना त्वचेचे किंवा अन्य कर्करोगाच्या समस्या भेडसावत असल्याचे निदर्शनास आल्याबरोबर त्यांची तपासणी वारंवार व्हायला पाहिजे. महिला आरोग्यदायी तर घर सुखमयी असते. स्त्रियांनी स्वबळावर आर्थिक उन्नती साधावी, यासाठी ज्या स्त्रियांना शिलाईची आवड आहे, त्यांच्याकरिता स्वत: पुढाकार घेऊन शिलाई मशीन केंद्र उभारून त्यांना औद्योगिक बनावटीच्या शिलाई मशीनवर प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे. यातून महिलांना रोजगारही मिळाला आणि त्यांचे सक्षमीकरण होण्यास खूप मदत मिळत आहे. कामगार महिलांना या कामी काही आर्थिक साहाय्याकरिता कर्ज सहज उपलब्ध व्हावे, त्यांच्या मुलींना चांगले शिक्षण मिळावे, यासाठी शासनाचा पुढाकार आहे.

चाळीसगाव, जि. जळगाव येथे दिव्यांग बांधवांना विविध साहित्याचे वितरण.

दिव्यांगांना रोजगार

राज्यातील दिव्यांग व्यक्तींना न्याय्य हक्क मिळालाच पाहिजे, त्याचे आर्थिक कल्याण व्हावे आणि त्यांनी स्वरोजगारातून स्वत: सक्षम व्हावे, असे माझे ठाम मत आहे. या दृष्टीने सर्वसमावेशक कृतिआराखडा तयार करण्यात आला असून प्राथमिक आरोग्य केंद्रावर दिव्यांगांकरिता सर्व सुविधा देण्यात येत आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक दिव्यांग कल्याण भवन सुरू करण्याचा मानस आहे. प्रत्येक दिव्यांग व्यक्ती ही कमावती असलीच पाहिजे, यासाठी त्याच्या शारीरिक मर्यादा लक्षात घेऊन त्यांना फिरते केंद्र देण्यात आले आहे. यासाठी त्यांना आर्थिक सहकार्याबरोबर प्रशिक्षण देण्यात येत आहे. अकोला येथे दिव्यांगांना स्वयंचलित सायकलचे वाटप करण्यात आले. या

सूर्योदय महिला गृहउद्योगास राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांची भेट.

सायकलमुळे दिव्यांगांना रोजगार उपलब्धतेची मोठी मदत होऊन त्यांची सक्षमीकरणाकडे वाटचाल सुरू झाली. दिव्यांगांना स्वबळावर उभे करण्याच्या या प्रयत्नांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कौतुक केले आहे.

आर्थिक मदतीचे धोरण

राज्यातील विशेषत: कोविड-१९ काळात विधवा झालेल्या महिला, शेतकरी आत्महत्याने विधवा झालेल्या महिलांचे आर्थिक परिपोषण होणे गरजेचे आहे. शासनाचे त्यांच्याकरिता आर्थिक मदतीचे धोरण जाहीर केले आहे. परंतु घरची कमावती व्यक्ती गेल्याने त्या स्त्रीवर खूप मोठा आघात होतो. पैसा कमी आणि शेतीवर पोट असल्याने शेतीची मशागत कोण करणार, यासाठी मी स्वत: पुढाकार घेऊन त्यांच्या शेतीची मशागत स्व:खर्चाने करून दिली. त्यामुळे अशा महिलांना आर्थिक मदतीबरोबरच त्यांच्या उदरनिर्वाहास नवीन दिशा ही मिळते. अशा प्रकारच्या मदतीस आता सर्वांनी पुढे येण्याची गरज आहे, असेही माझे मत आहे. आजही खेड्यापाड्यांत महिला तसेच दिव्यांग व्यक्ती अगरबत्ती तयार करण्याचे काम करतात. त्यांना अगरबत्ती तयार करण्याची मशीन उपलब्ध करून त्यांनाही हक्काची बाजारपेठ उपलबध करून त्यांचे सक्षमीकरणाचे काम सुरू आहे.

विविध योजनांची अंमलबजावणी

ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलींना उच्च शिक्षणांबरोबर त्यांना स्पर्धा परीक्षेकरिता मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता भासते. होतकरू आणि स्वत:हून पुढे येणाऱ्या मुलींसाठी मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षांची केंद्रे स्थापन केल्यास त्यांना शासकीय नोकरीत निवड होऊन त्यांची प्रगती नक्की होईल, याबाबत दूमत नाही. यासाठी मी स्वत: पुढाकार घेऊन अशा होतकरू विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा सल्ला दिला. यातून ग्रामीण भागात राहणाऱ्या महिलांचे सक्षमीकरणास होऊन गावाचा कायापालट होण्यासही नक्कीच मदत होईल.

मोफत श्रवणयंत्र वाटप कार्यक्रम.

राज्य शासनानेही राज्यातील सर्व महिलांना समान हक्क, रोजगार, सुरक्षा आदींबाबत वेळोवेळी निर्णय घेतले आहे. या निर्णयामुळेच ग्रामीण भागात राहणाऱ्या महिलांना पुढे येण्याचा मार्ग मिळाला. महिला व बालविकास विभागाने अनाथ बालकांना शासकीस सेवेत १ टक्का आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या अनाथ बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तर्पण फाऊंडेशनसोबत करार केला. महाराष्ट्र राज्य हे भिक्षेकरी मुक्त होण्यासाठी विविध कार्यशाळा आयोजित केल्या. केंद्र सरकार पुरस्कृत नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह लागू केले. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेनुसार मिशन वात्सल्य योजनेची राज्यात अंमलबजावणी केली. कोविड-१९मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना एकरकमी ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेऊन १८ वर्षांखालील बालकांना बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला. त्याचबरोबर कोविड-१९मुळे दोन्ही पालक गमावून अनाथ झालेल्या बालकांचे प्रशिक्षण शासकीय संस्थेमध्ये झाल्यास त्यांचे शैक्षणिक शुल्क शासनाने माफ केले.

आर्थिक समृद्धीसाठी बचतगट

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिला पुढे यायला पाहिजे, त्यांची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी माझे नियमित प्रयत्न सुरू आहेत. महिलांच्या आर्थिक समृद्धीसाठी बचतगट हा अत्यंत चांगला उपक्रम आहे. गावातील महिला या बचतगटामार्फत आपली उन्नती साधत आहेत. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वयंसेवी संस्था आहेतच; पण महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्याचबरोबर महिलांची समृद्धी ही शिक्षणापासून प्रेरित असते. याकरिता मुलीचा शिक्षणाचा पाया भक्कम करणे, मुलींना पायाभूत शिक्षणाबरोबर स्पर्धा परीक्षेच्या तयारीपासून त्यांची नोकरीच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था सहज होणे आवश्यक आहे. दिव्यांग महिलांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देणे या बाबी जर आपण कटाक्षाने केल्या, तर महिलांचे सक्षमीकरण नक्कीच पूर्ण होईल.

शब्दांकन : संजय डी. ओरके
विभागीय संपर्क अधिकारी

आज महिला प्रत्येक क्षेत्रांमध्ये स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करत आहेत. शिक्षण, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, सहकार, मनोरंजन, प्रशासन, अर्थकारण, सामाजिक कार्य यांसारख्या विविधांगी क्षेत्रात आपल्या क्षमतेला न्याय देत आहेत. महिला सक्षमीकरण हा विषय केवळ बोलण्यापुरता अथवा चर्चा करण्याइतपत मर्यादित न ठेवता खऱ्या अर्थाने वास्तविकपणे याकडे पाहून प्रत्यक्ष कृतीतून अधिक महिला सक्षमीकरणासाठी काम करण्याची आणखी गरज आहे.

शाश्वत भविष्यासाठी अग्रेसर

कु. आदिती तटकरे
उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री

८ मार्च हा दिवस आपण जागतिक महिला दिन म्हणून साजरा करतो. यंदाच्या जागतिक महिला दिनाची थिम 'Gender Equality today for a sustainable tomorrow' म्हणजेच 'आजची लैंगिक समानता ही उद्याची शाश्वती' अशी होती. २१ व्या शतकातील महिला अधिक शाश्वत भविष्य निर्माण करण्याकरिता तसेच जबाबदारीचे नेतृत्व पार पाडण्याकरिता महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात महिला या पर्यटनाबरोबरच इतर उद्योगांमधील एक महत्त्वाचा घटक आहेत. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून अगदी जल, वायू आणि स्थळ या क्षेत्रांमध्ये अग्रेसरपणे आणि खंबीरपणे सामना करणाऱ्या महिलांना अधिक सक्षम करण्याकरिता तसेच त्यांच्याप्रती असलेला आदर, सन्मान व्यक्त करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आपली भूमिका बजावत आहे.

महिलांना विशेष सवलत

महिला दिनाचे औचित्य साधत व सर्व महिला वर्गाला पर्यटनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सर्व पर्यटन निवासांमध्ये वास्तव्यास येणाऱ्या महिला अतिथींना आणि त्यांच्यासमवेत असलेल्या परिवारास रविवार ६ मार्च ते गुरुवार १० मार्च २०२२ या कालावधीत कक्ष आरक्षणावर ५० टक्के सवलत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. महिलांना रोजच्या धावपळीच्या जीवनातून, त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून थोडी विश्रांती मिळावी म्हणून आरामदायी सुट्टीचा आनंद अनुभवण्यासाठी हे आरक्षण ठेवण्यात आले होते.

सुधागड-पाली येथे महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंचे विक्री प्रदर्शनादरम्यान महिलांसमवेत राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे.

गो-गर्ल-गो मोहीम

शालेय स्तरावर मुलांचे आणि मुलींचे क्रीडा क्षेत्रातील योगदान जवळपास सारखेच आहे. शालेय स्तरावर खेळात मुलांपेक्षा मुली जिद्दीने व गांभीर्याने खेळतात. शालेय स्तरावर प्रगती केल्यानंतर महाविद्यालयीन जीवनापासून मुलींचा खेळण्यातील सहभाग कमी होत जातो. तिची खेळण्याची इच्छा असूनही आर्थिक, सामाजिक वा कौटुंबिक आघाड्यांवर येणाऱ्या अडचणींमुळे तिला खेळ थांबवावा लागतो. यासाठी महाविकास आघाडी सरकारने 'गो-गर्ल-गो' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेद्वारे मुलींना खेळात टिकवून ठेवण्यावर भर दिला जात आहे. या मोहिमेत पारंपरिक खेळांबरोबरच इतर खेळांनाही प्रोत्साहन देण्याची योजना आहे. महाराष्ट्रात सध्या ६ ते १४ वयोगटातील मुलींची संख्या ७३ लाख ८४ हजार ५९ इतकी आहे. या मुलींना लहानपणापासूनच खेळाची गोडी लागावी तसेच खेळात सातत्य राहावे, यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. सुरुवातीला छोट्या खेळांच्या स्पर्धा घेण्यात येतील. मुलींना खेळाची गोडी लागल्यानंतर तिचा कोणत्या खेळाकडे कल आहे हे पाहून, ठराविक एका खेळाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुलींच्या खेळामुळे तिच्या कुटुंबाचीही प्रगती होऊन आरोग्य चांगले राहण्यास मदत होणार आहे. यामुळे पुढची पिढी आरोग्यदायी होण्यास हातभार लागणार आहे आणि अप्रत्यक्षपणे मुलींमध्ये असलेल्या सुप्त क्रीडागुणांचा शोध घेणे सोपे होणार आहे.

विशेष जलदगती न्यायालये

महिला अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी 'नॅशनल मिशन फॉर सेफ्टी ऑफ वुमेन'अंतर्गत महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पॉक्सो कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यामध्ये मौजे रानवली, ता. श्रीवर्धन येथे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठामार्फत महिला महाविद्यालय स्थापन करण्याबाबत निर्णय घेतला आहे. प्रशासकीय इमारत व वसतिगृह बांधकामासाठी वित्तीय तरतूद

एका महिला मेळाव्यादरम्यान ग्रामीण महिलांसमवेत राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे.

करण्यात आली आहे.

महिलांसाठी उद्योग धोरण

केवळ महिलांसाठी धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्याला सर्वात जास्त महिला उपक्रम असलेले राज्य बनवणे, महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे, तांत्रिक, परिचालनात्मक व आर्थिक साहाय्य पुरवून राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सर्वंकष महिला उद्योजक धोरणासह इतर योजनांमधूनही महिलांना आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी शासनाचे सहकार्य घेता येते.

महिला उद्योजिकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना म्हणून हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांतर्गत बाजारपेठ विकास व विपणनासाठी साहाय्य पुरवले जाते. व्यावसायिक जागांची उपलब्धता करून दिली जाते. स्पर्धात्मकता वाढवून महिलांच्या उपक्रमांना निधी पुरवला जातो आणि उद्योग वाढीसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास साधण्यास मदत केली जाते. या योजनेंतर्गत सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना विविध प्रोत्साहनांसाठी अनुदान वितरित करण्यात येते.

महिला उद्योजकांसाठी

एकल मालकी घटकासाठी महिला उद्योजकाचे १०० टक्के भागभांडवल असावे. भागीदारी घटकासाठी भागीदारी घटक ज्यामध्ये महिला उद्योजकांचे १०० टक्के भागभांडवल असावे. सहकारी क्षेत्रासाठी सहकारी कायद्यानुसार त्या सहकारी संस्थेमध्ये १०० टक्के महिला उद्योजकांचाच समावेश असलेली संस्था पात्र राहील. खासगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक, ज्या घटकांमध्ये महिला उद्योजकांचे १०० टक्के भागभांडवल असेल, अशी कंपनी पात्र राहील. स्वयंसाहाय्यता बचतगट जे नोंदणीकृत असतील आणि ज्यात वरील प्रमाणे निकषपूर्ण केले असतील. त्याच प्रमाणे ज्या उद्योगांमध्ये किमान ५० टक्के महिला कामगार असतील अशा उपक्रमांना योजनेंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र समजण्यात येते.

ठळक वैशिष्ट्ये : सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अतिरिक्त सवलती, भांडवली अनुदान, वीजदर अनुदान, व्याजदर अनुदान, साहसभांडवल निधी, कौशल्य विकास, सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत उच्च प्रमाणात सवलती

कामगार कल्याण साहाय्य : पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार कल्याण योजनेतील कंपनीच्या योगदानाच्या ५० टक्के रक्कम अनुदानास पात्र आहे.

प्रदर्शनांसाठी प्रोत्साहन : प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ०.५० लाख रुपये किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५ टक्के रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी ५ लाख रुपये एवढ्या मर्यादेत सवलत देण्यात येते.

जागांचे आरक्षण : मॉल/व्यावसायिक केंद्र/बाजार पेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी तसेच रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, चित्रपटगृहे, मंड्या इत्यादी ठिकाणी जागा आरक्षित ठेवणे. २५ टक्के अधिमूल्य घेऊन ते १० ते १५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव ठेवण्यात येईल.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात होत असणाऱ्या व्यापक गुंतवणुकीमुळे सूक्ष्म व लघू उद्योजकांसाठी पुरक उद्योग व्यवसायाच्या अनेक संधी विविध क्षेत्रात उपलब्ध होत आहेत. यास अनुसरून राज्यातील होतकरु युवक/युवतींसाठी राज्याच्या सर्वसमावेशक स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेस राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या अंतर्गत सेवा क्षेत्रातील व कृषिपूरक उद्योग प्रकल्पांसाठी प्रकल्प मर्यादा दहा लाख रुपये तसेच उत्पादन क्षेत्रांतील प्रकल्पासाठी प्रकल्प मर्यादा ५० लाख रुपये इतक्या गुंतवणुकीसाठी पात्र आहेत. राज्य शासनाकडून प्रकल्प मंजूरीच्या १५ ते ३५ टक्के इतके आर्थिक साहाय्य हे अनुदान स्वरूपात उपलब्ध करण्यात येते. मुख्यमंत्री राजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेत लाभार्थ्यांचे स्व:गुंतवणूक ५ ते १० टक्के, बँक कर्ज ६० ते ८० टक्के व राज्य शासनाने अनुदान १५ ते ३५ टक्के याप्रमाणे सहभाग असतो. यात किमान ३० टक्के महिला लाभार्थी असावेत, असे योजनेचे स्वरूप आहे.

शासनाच्या वतीने महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येते. महिला उद्योग धोरणातून शेकडो उद्योग उभे राहिले आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून हजारो महिलांनी फायदा घेतला आहे. अनेक समूह प्रकल्प महिला उद्योजिकांनी उभे केले आहेत. कोरोनासारख्या संकटामुळे अनेक उद्योगांवर परिणाम झाला आहे. यात महिला उद्योजिकांच्या व्यवसायावरही परिणाम झाले आहेत. महाराष्ट्र हे उद्योगांसाठी सातत्याने आघाडीवर असलेले राज्य आहे. असे असले तरी महिला उद्योजकांचा प्रतिसाद अजुनही अल्प आहे. महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी उद्योग धोरणात काही बदल प्रस्तावित करण्यात येत आहेत. प्रशिक्षणाचे प्रमाण वाढवण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती घेऊन जास्तीत जास्त महिलांनी पुढे येणे आवश्यक आहे.

शब्दांकन : काशिबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील महिलांचे समाजातील स्थान अधिक बळकट करण्यासाठी तसेच त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार विरोधात लढण्यासाठी त्यांना सक्षम बनवणे, त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे, महिलांसाठी संविधानात असणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करून वेगवेगळे कार्यक्रम राबवून त्यांच्यामध्ये सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन तयार करणे, महिलांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देण्यात राज्य महिला आयोग आपली भूमिका तत्परतेने पार पाडत आहेत.

महिलांच्या न्याय हक्कासाठी...

रुपाली चाकणकर
अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असलेल्या राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९९३ रोजी करण्यात आली. आयोगाच्या स्थापनेपासून आयोगाकडे मोठ्या प्रमाणात महिला कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी येऊ लागल्या. बदलत्या काळानुसार महिलांच्या तक्रारींच्या स्वरूपात बदल झाला असून कामाच्या ठिकाणी होणारा छळ, लैंगिक छळ, सामाजिक समस्या, मालमत्ताविषयक तक्रारींपासून ते समाजमाध्यमातून महिलांना होणारा त्रास असे तक्रारींच्या स्वरूपात काळानुरूप बदल होत गेले. त्यासाठी महिलांना आयोगातील समुपदेशक, विधी सल्लागार यांच्या सहकार्याने वेळप्रसंगी पोलिसांच्या मदतीने न्याय मिळवून देण्यासाठी आयोग कार्यरत असतो.

आदिशक्ती अभियान

सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी आणि घरी महिलांच्या सुरक्षिततेसाठी पुढाकार घेणे आणि महिलांना सक्षम करण्यासाठी १६ डिसेंबर २०२१ रोजी आदिशक्ती अभियानाचा प्रारंभ राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान 'महिला सुरक्षा : काल, आज आणि उद्या' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा या जबाबदारीने मी महिलांच्या सुरक्षा, समस्या व सुविधांसाठी कार्यरत असलेल्या निर्भया पथक, भरोसा सेल, दामिनी पथक, विशाखा कमिटी, भरारीपथक, बिट मार्शल यांची माहिती घेण्यासाठी नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा,चंद्रपूर, गडचिरोली येथील पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच पोलीस आयुक्त कार्यालयांना भेटी दिल्या. महिलांचे विविध प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीने पुढील काळात राज्यातील सर्व प्रमुख पोलीस कार्यालयांना भेटी देण्याचे नियोजन केले आहे. महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाचा प्रारंभ चंद्रपूर व गडचिरोली येथे करण्यात आलेला असून हा उपक्रम पुढील काळात संपूर्ण राज्यभरात राबवला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत महिलांच्या तक्रारी व समस्यांची जनसुनावणी घेतली जाते आणि त्या सोडवण्यासाठी तत्काळ कार्यवाही केली जाते.

'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जळगाव येथे जनसुनावणीदरम्यान महिलांच्या समस्या जाणून घेताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर.

टोल फ्री क्रमांक कार्यान्वित

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील कोणत्याही महिलेस कौटुंबिक हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक किंवा मानसिक छळ, सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड अशा कोणत्याही बाबतीत आपली तक्रार मांडायची असल्यास महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा टोल-फ्री क्रमांक १५५२०९ हा कार्यान्वित झाला असून महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदैव कटिबद्ध आहे. विविध वयोगटातील महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याबरोबरच त्यांना वेगवेगळ्या कायद्यांची माहिती मिळावी, त्यांना हक्काची जाणीव व्हावी, यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम आयोगामार्फत होत असतात. आयोगाच्या माध्यमातून 'महिला आयोग आपल्या दारी' यासारख्या ऊपक्रमांमधून महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच संबंधित जिल्ह्याच्या मुख्य पोलीस कार्यालयांना भेटी देऊन महिलांच्या सुरक्षा, समस्या व सुविधांसाठी कार्यरत असलेल्या निर्भया पथक, भरोसा सेल, दामिनी पथक, विशाखा कमिटी, भरारीपथक, बीट मार्शल यांची माहिती घेतली जाते. तसेच आयोगाच्या वतीने महिलांच्या प्रश्नांसंबंधी शासनाला विविध शिफारसी केल्या जातात.

महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत धुळे येथे जनसुनावणीदरम्यान महिलांच्या समस्या जाणून घेताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर.

कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

राज्यात महिलांच्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा बसवण्यासाठी २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा पारित करण्यात आला. या कायद्यामध्ये कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. महिलेचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ, शारीरिक, लैंगिक छळ, मानसिक आणि आर्थिक छळ तसेच हुंड्याची मागणी किंवा त्यासाठी बायकोचा किंवा तिच्या नातेवाइकांचा छळ या बाबी कौटुंबिक हिंसाचारात येतात असे घोषित करण्यात आले आहे. या कायद्यान्वये आरोप सिद्ध झाल्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. संबंधित संरक्षण अधिकाऱ्याने आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडली नाही, तर त्यांनाही तेवढ्याच शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

लग्नामध्ये हुंडा मागणे किंवा त्यासाठी बायकोसह तिच्या नातेवाइकांचा शारीरिक व मानसिक छळ करणे दंडनीय गुन्हा मानला जातो. यामध्ये आरोप सिद्ध झाल्यास ५ वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. याशिवाय १५ हजार रुपये दंड होऊ शकतो. हुंड्याच्या छळापायी संबंधित पीडितेचा मृत्यू झाल्यास किमान ७ वर्षे तुरुंगवास किंवा कमाल जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. भा. दं. वि. कलम ४९८ (अ) नुसार हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळाद्वारे आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे हे अजामीनपात्र गुन्हे आहेत. त्यासाठी कमाल तीन वर्षे शिक्षेची तरतूद आहे.

महिला आयोगाची सक्रियता

महाराष्ट्रामध्ये ज्या ठिकाणी बालविवाह झाल्याचे आढळल्यास तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी जसे की, सरपंच किंवा तत्सम अधिकारी जसे की ग्रामसेवक, तलाठी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून बालविवाह झाल्याचे सिद्ध झाल्यास त्यांचे पद रद्द करण्यात यावे, अशी दुरुस्ती बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मध्ये करण्याची शिफारस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे आयोगातर्फे करण्यात आली आहे.

कोणत्याही रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी गेल्यास तृतीयपंथीयांची कुचंबना होते. यावर पर्याय म्हणून पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये वेगळा वॉर्ड असावा किंवा २५ खाटा राखीव ठेवाव्यात, अशी शिफारस आयोगातर्फे करण्यात आली असून लवकरच याची अंमलबजावणी होईल. या प्रकारची सुविधा महाराष्ट्रातील प्रमुख सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध व्हावी, यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील कोविड-१९मुळे विधवा झालेल्या महिलांच्या बाबतीत धोरण तयार व्हावे, वात्सल्य समितीचे कामकाज सुरळीत चालावे, विधवांना एकरकमी आर्थिक मदत मिळावी, त्यांना सुलभ कर्जपुरवठा व्हावा, मालमत्तेच्या वाट्याचा प्रश्न सोडवला जावा या आणि इतर अनेक प्रश्नांवर राज्य महिला आयोग सक्रियपणे काम करत आहे.

कामाच्या ठिकणी संरक्षण

बदलत्या जीवनशैलीनुसार महिला चूल आणि मूल या जोखडातून बाहेर पडून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या आहेत. त्यांची कामाच्या ठिकाणी होणारी कुचंबना, लैंगिक छळ या गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी २०१३ मध्ये लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा अंमलात आणला. कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध त्यांना संरक्षण देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला. या कायद्यान्वये कामाच्या ठिकाणी अंतर्गत समिती नेमणे बंधनकारक आहे. या समितीमध्ये महिला कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. स्वयंसेवी संस्था किंवा सामाजिक संघटनांमधून एक सदस्य घेण्यात येतो. या समितीचा कालावधी तीन वर्ष असतो. समितीकडे आलेल्या तक्रारीची शहानिशा करून योग्य ते पुरावे संबंधित आरोपींच्या विरोधात गोळा करून महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न या समितीमार्फत केला जातो. समितीच्या कारवाई विरुद्ध सक्षम न्यायालयाकडे ९० दिवसांच्या आत अपील करता येईल. महिलांसाठीचे असणाऱ्या विविध कायद्यांची जनजागृती करण्यासाठी आयोगाकडून येणाऱ्या काळामध्ये राज्यभर विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत. महिलांना समाजात निर्भयपणे आणि आत्मविश्वासपूर्वक जगता यावे, महिला सुरक्षिततेसाठी एक प्रभावी चळवळ उभी राहावी, स्त्रियांच्या प्रश्नांबाबत समाजात जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदैव कटिबद्ध आहे.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

शब्दांकन : शंभुराजे ढवळे

महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम) मार्केटिंगसाठी नाबार्डच्या सहकार्याने जिल्हास्तरावर रुरल मार्टची स्थापना केली असून विविध प्रदर्शनांतून महिलांना उत्पादन विक्रीची संधी दिली जात आहे. त्यांचे उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'शेत ते थेट ग्राहक' या उपक्रमाची मोठ्या शहरांत माविमने सुरुवात केली आहे. महिला विकास हा महामंडळाचा केंद्रबिंदू असला तरी महिलेच्या माध्यमातून कुटुंबाचा विकास ही महामंडळाची भूमिका आहे.

माविम : एक सक्षम व्यवस्था

ज्योती ठाकरे
अध्यक्षा, महिला आर्थिक विकास महामंडळ

ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे, महिलांच्या क्षमता विकसित करणे, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, उद्योजकीय विकास घडवून आणणे, रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे, महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढवणे, स्थायी विकासासाठी स्वयंसाहाय्य बचतगटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकट करणे, चिरंतर विकास प्रक्रियेतून महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे ही महिला आर्थिक विकास महामंडळ 'माविम'ची उद्दिष्टे आहेत.

स्वयंसाहाय्यता बचतगट

महामंडळाने स्वयंसाहाय्य बचतगट ही संकल्पना केवळ एक उपक्रम म्हणून कधीच मानली नाही. स्वयंसाहाय्य बचतगट हे महिला सक्षमीकरणासाठीचे सक्षम असे माध्यम किंवा साधन आहे असे महामंडळ मानते. म्हणूनच स्वयंसाहाय्य बचतगटाच्या बांधणीसोबतच विविध प्रकारच्या प्रशिक्षणातून त्याची क्षमतावृद्धी केली जाते. यामध्ये स्वयंसाहाय्य बचतगटाची संकल्पना व व्यवस्थापन, लेखा व हिशोब व्यवस्थापन, नेतृत्व, कार्यात्मक साक्षरता, आर्थिक साक्षरता, लिंगसमभाव यांसारख्या प्रशिक्षणाचा समावेश असतो. नियमित बचत, अंतर्गत कर्ज व्यवहार, गटाची बैठक, लेखा हिशोब गटाला आर्थिक शिस्त लावत असतात. ज्याचा उपयोग गटांना बँकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी आणि मिळालेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी उपयुक्त ठरतो. आजपर्यंत माविमने विविध बँकांसोबत सामंजस्य करार (MOU) करून सुमारे पाच हजार कोटींपेक्षा अधिक कर्जे उपलब्ध करून दिली आहेत, ज्याची परतफेड ९९% इतकी आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)च्या साहाय्याने मोत्यांची शेती करणाऱ्या महिला.

उत्पादनांचे मार्केटिंग

स्वयंसाहाय्य बचतगटातील महिलांनी तयार केलेली उत्पादने ही चांगल्या प्रतीची/गुणवत्तेची असतात. परंतु अनेकदा त्यांची पॅकिंग, लेबलिंग किंमत यासोबतच मार्केटचा प्रश्न असतो. यासाठी माविम पॅकिंग, लेबलिंग, किंमत यावर विशेष लक्ष देत आहे. यासाठी प्रशिक्षण, तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेतले जाते. या प्रयत्नांसोबतच माविमने मार्केटिंगसाठी नाबार्डच्या सहकार्याने जिल्हास्तरावर रुरल मार्टची स्थापना केली असून विविध प्रदर्शनातून महिलांना उत्पादन विक्रीची संधी दिली जाते. ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'शेत ते थेट ग्राहक' या उपक्रमाची मोठ्या शहरात सुरुवात माविमने केली आहे.

उत्पादनांची ऑनलाईन विक्री

माविमने स्वतःचे ई-बिझनेससारखे सॉफ्टवेअर तयार केले असून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात माल विक्रीसाठी ॲमेझॉन, फ्लिपकार्ट यांसारख्या वेगवेगळ्या भागीदारांसोबत भागीदारी केली जात आहे. जगभरात व देशात हाहाकार माजवलेल्या कोविड-१९ काळातही महामंडळाचे

अधिकारी-कर्मचारी आणि माविमने बांधणी केलेल्या लोकसंस्थांनी सामाजिक सुरक्षा, अन्न सुरक्षा व आर्थिक सुरक्षा या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले.

आर्थिक मदत

कोविड-१९ काळात आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या महिलांनी त्यांचे पती गमाविले आहेत, अशा २०२४ महिलांची व ज्या मुलांनी आपले दोन्ही पालक गमावले आहेत, अशा १७६ मुलांची यादी तयार केली आहे. त्यांना शासनाच्या योजनेचा किंवा इतर योजनेचा लाभ मिळवून देण्यात माविम अग्रेसर राहिले असून सह्याद्री, सक्षम या सारख्या संस्थांच्या सहकार्याने त्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून देऊन त्यातून त्यांच्या रोजगार निर्मितीवर माविमने भर दिला आहे.

महिला विकास हाच केंद्रबिंदू

महामंडळाची कार्यपद्धती ही इतर महामंडळांपेक्षा वेगळी आहे. महिला व त्यांच्या संस्थांच्या क्षमता विकसित करण्यासाठी प्रशिक्षण देणे, नियमित मार्गदर्शन करणे, महिला विकासासाठी आवश्यक वातावरण निर्मिती करणे यावर भर देत असते. महामंडळाकडे निधीची तरतूद नसल्याने आर्थिक साहाय्याची कोणतीही योजना नसली तरी स्वयंसाहाय्य बचतगटाच्या माध्यमातून बँकांकडून कर्ज उपलब्ध केले जाते. सातत्याने कर्ज परतफेडीचा दर ९९ टक्क्यांपर्यंत राखण्यात माविमला यश मिळाले असून हा महिला सक्षमीकरणाचा एक उत्तम पैलू आहे, तर दुसरीकडे वेगवेगळ्या विभागांसोबत समन्वय साधून त्या त्या विभागाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात माविम यशस्वी झाले आहे. योजना राबवताना लाभार्थ्यांचा निधिस्वरूपात लोकसहभाग असावा या संकल्पनेची अंमलबजावणी माविमने प्रत्यक्षात करून उपक्रमांची यशस्विता वाढवली आहे. या सर्व माध्यमांतून आज सुमारे ७ लाख महिला विविध प्रकारचे स्वव्यवसाय करतात, तर सुमारे ९ लाख महिला शेतीविषयक पूरक उपक्रमात गुंतलेल्या आहेत. महिला विकास हा महामंडळाचा केंद्रबिंदू असला तरी महिलेच्या माध्यमातून कुटुंबाचा विकास ही महामंडळाची भूमिका आहे.

माविमचे महत्त्वपूर्ण उपक्रम/योजना

नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प : राज्यातील १० लाखांहून अधिक गरीब व गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासन व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) साहाय्याने नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जानेवारी २०२१ पासून राबवण्यात येत आहे. या प्रकल्पात उद्योजकता विकासावर विशेष भर देण्यात येणार आहे.

तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस : समाजातील अतिगरीब महिलांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणणे, तसेच कर्जाच्या विळख्यामध्ये अडकलेल्या कुटुंबांना त्यामधून बाहेर काढण्यासाठी व शाश्वत विकासाचा मार्ग अवलंबण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या साहाय्याने तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस हा नवीन कार्यक्रम १ फेब्रुवारी २०१९ मंजूर करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम २०२० पासून राज्यातील मानव विकास मिशन अंतर्गत समाविष्ट निवडक १२५ तालुक्यांत राबवण्यात येत आहे.

अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम : राज्यातील अल्पसंख्याक समाजातील महिलांच्या विकासासाठी, अल्पसंख्याक विकास विभागाने माविममार्फत पहिल्या टप्प्यातील निवडक १० जिल्ह्यांत राबवलेल्या प्रायोगिक कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन हा कार्यक्रम पुढील ५ वर्षांसाठी विस्तारित करण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यात अल्पसंख्याक विभागाने नवीन १४ जिल्ह्यांसाठी एकूण २८०० गट निर्मितीचा नवीन कार्यक्रम मंजूर केला आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) :- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ठाणे (भिवंडी, शहापूर), सोलापूर (माळशिरस, मोहोळ) व गोंदिया (सालेकसा, तिरोडा) या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण सहा तालुक्यांकरिता तीन वर्षांसाठी तांत्रिक तज्ज्ञ व अंमलबजावणी संस्था म्हणून निवड करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी माहे मार्च २०२३ पर्यंत राहील.

कापडी पिशव्या शिलाई उपक्रम : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माविमला एकूण पाच कोटी रुपये रकमेच्या कापडी पिशव्या तयार करण्याची जबाबदारी माविमला दिली होती. या उपक्रमात बचतगटातील महिलांच्या माध्यमातून प्रथम टप्प्यात वर्ष २०१९-२० मध्ये ११.४१ लाख व दुसऱ्या टप्प्यात वर्ष २०२०-२१ मध्ये ९.५५ लाख कापडी पिशव्या शिवून संपूर्ण राज्यामधील महानगरपालिका/नगरपालिका शाळांमध्ये विनामूल्य वाटप करून प्लास्टिक विरोधात जाणीवजागृती करण्याचे काम माविमने यशस्वीपणे पूर्ण केले आहे.

'माविम'विषयी...

महिला आर्थिक विकास महामंडळ हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम आहे. या महामंडळाची स्थापना सन १९७५ मध्ये महिला सक्षमीकरण हे ध्येय नजरेसमोर ठेवून करण्यात आली. २० जानेवारी २००३ मध्ये या महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखर संस्था' म्हणून घोषित केले आहे. महामंडळ हे महिला व बालविकास विभागाच्या आधिपत्याखाली राज्यातील १० हजारांहून अधिक गावे व २५९ शहरांत कार्यरत आहे. डिसेंबर २०२१ पर्यंत विविध योजनेंतर्गत दीड लाख स्वयंसाहाय्य बचतगटांची निर्मिती करून १७.५१ लाख महिलांना संघटित केले. या महिलांना विविध बँकांकडून पाच हजार कोटी रुपये इतके बँक कर्ज उपलब्ध करून दिले असून त्याची परतफेडीची टक्केवारी ९९.५% इतकी आहे. माविमअंतर्गत ८.५० लाख महिला शेती व बिगर शेतीवर आधारित उद्योग व्यवसायात गुंतलेल्या आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबईतील बांद्रा येथे स्थित आहे. मुंबईसह ग्रामीण भागात ३६ जिल्हा कार्यालये असून सर्व योजनांची अंमलबजावणी माविम जिल्हा कार्यालयामार्फत होत असते. या महामंडळाचे पहिले अध्यक्षपद भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी भूषवले आहे.

शब्दांकन : महेंद्र गमरे

व्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ

सर्व क्षेत्रांत आता महिलांना करिअर करण्याच्या संधी उपलब्ध असल्याने महिलांनी आपल्या आवडीचे करिअर निवडून ते मिळवण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले की हमखास यश मिळते. मग कामही एन्जॉय करता येत असल्याचे सांगताहेत पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर सिंह. त्यांनीदेखील आवडीचे क्षेत्र करिअर म्हणून निवडून त्यात यश संपादन केले. कर्तव्यपूर्तीचे समाधान आणि त्यांचा यशस्वी प्रवास त्यांच्याच शब्दांत...

आवडीचं करिअर निवडावं...

मी प्रशासकीय सेवेत यायचे हे लहानपणीच ठरवले होते. माझे वडील आयपीएस होते. त्यांचा माझ्यावरील प्रभाव हा निर्णय घेण्यामागची प्रेरणा होता. त्यामुळे प्रशासकीय सेवेत येण्याच्या दृष्टीनेच अभ्यासाचे विषय निवडले. सुदैवाने घरूनही पाठबळ मिळाले. ध्येय निश्चित असल्याने आणि त्याच दिशेने प्रयत्न केल्याने हमखास यश मिळाले आणि १९९१ मध्ये मी उत्तर प्रदेश केडरमधून प्रशासकीय सेवेत आले. मला आनंद आहे की, माझ्या पहिल्या पोस्टिंगमध्ये एकही गुन्हा न घडता गाझियाबादच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. जे राज्यात त्यापूर्वी कधीच घडले नव्हते.

वल्सा नायर सिंह
प्रधान सचिव, पर्यटन विभाग

अविस्मरणीय अनुभव

१९९८ मध्ये महाराष्ट्रात पोस्टिंग मिळाल्यानंतर मला चंद्रपूर आणि गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात काम करता आले. येथे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अविकसित भागात गरजूंपर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्याची संधी मिळाली. येथील काही भागात वैद्यकीय सुविधादेखील उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे नवजात बालकांसाठी इन्क्युबेटर, पहिली रक्तपेढी अशा सुविधांसह आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण करताना समस्यांमधूनही विकास साधता येतो हे दाखवून देता आले. आदिवासी आणि ग्रामीण रहिवाशांनी महिला अधिकारी म्हणून मला कधी वेगळी वागणूक दिली नाही हा अनुभवदेखील अविस्मरणीय आहे.

तीव्र इच्छाशक्ती व परिश्रम आवश्यक

गाझियाबादमधील निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था सक्षमपणे हाताळण्याच्या पहिल्या अनुभवानंतर महाराष्ट्रातील विविध प्रशासकीय पदांवर काम करून प्रधान सचिव पदापर्यंतच्या माझ्या ३१ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक उपलब्धी मिळवण्यात यश आले. मिळालेल्या प्रत्येक पदाच्या कामाकडे समाजासाठी काहीतरी करण्याची संधी म्हणून पाहिले. नवीन पिढीतील विद्यार्थ्यांना मला सांगावेसे वाटते की, पदवी मिळवलेला कोणताही विद्यार्थी प्रशासकीय सेवेत येण्याची महत्त्वाकांक्षा बाळगू शकतो, परंतु यासाठीची परीक्षा निश्चितच सोपी नसते. ती पास होण्यासाठी या क्षेत्रात येण्याची विद्यार्थ्यांची प्रबळ इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काटेकोर नियोजनाबरोबरच भरपूर अभ्यास करण्याची तयारी असणे गरजेचे आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे विषय निवडले, तर त्या विषयांचा अभ्यास सोपा होऊन तो आनंददायी बनू शकतो.

कर्तव्यपूर्तीचे समाधान

ग्रामीण भागाप्रमाणेच मुंबई जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त, मंत्रालयात सचिव अशा विविध पदांवर काम करताना लोकांच्या समस्या जाणून जनहिताच्या योजना राबवता आल्याचेही समाधान आहे. अमेरिकेतून 'पब्लिक पॉलिसी'मध्ये मास्टर्स झाल्यानंतर पर्यावरण विभागाची धुरा हाती आली. इथे बांधकाम क्षेत्रासाठी पर्यावरणपूरक नावीन्यपूर्ण नियमावली आखता आली. पर्यावरणपूरक गणेशा, पर्यावरणपूरक होळी, ध्वनीप्रदूषण मुक्त दिवाळी, पर्यावरणविषयक सेवा योजना, ऑनलाईन पर्यावरणविषयक परवानग्या आदी उपक्रम या काळात सुरू करता आले.

पर्यटन विभागात काम करताना व्यवसाय वाढीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या मर्यादित केली. निवास व न्याहारी (महाभ्रमण) सारख्या योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसायात पुढे येण्याची आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी उपलब्ध करून देता आली, याचेही मोठे समाधान आहे. त्याचबरोबर महिलांसाठी डिजिटल साक्षरता मार्गदर्शन क्षेत्रालासुद्धा प्राधान्य दिले. महाराष्ट्रात मी विविध ठिकाणी विविध पदांवर काम केले. प्रत्येक ठिकाणी नवीन बाबी शिकायला आणि अनुभवायला मिळाल्या. जनहिताची अनेक कामे करता आली याचे समाधान मिळाले. विशेष म्हणजे राज्यात महिला म्हणून कुठेही भेदभावाचा सामना करावा लागला नाही. आवडते क्षेत्र निवडले आणि आवडीने काम केले की समाधानही मिळते. आज शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असताना विद्यार्थिनींनी आपल्या आवडीचे करिअर निवडून ते मिळवण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत आणि निवडलेले काम एन्जॉय करावे, हेच या निमित्ताने मला सांगावेसे वाटते.

शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर
विभागीय संपर्क अधिकारी

आजच्या पिढीतील महिला ह्या सक्षमीकरणाकडे यशस्वी झेप घेत असून महसूल, पोलीस अशा जोखीम असणाऱ्या विभागात काम करत आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी या पदांवर महिला अधिकारी कार्यरत आहेत. कर्तव्यदक्ष आणि लोकाभिमुख प्रशासनात या महिला अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख

आजच्या काळात स्त्री आणि पुरूष प्रत्येक क्षेत्रात बरोबरीने कार्यरत आहेत. प्रशासनात देखील महिला पुरुषांच्या समकक्ष पदांवर कार्यरत आहेत. राज्याच्या प्रशासनात महिलांचा टक्का दिवसेंदिवस लक्षणीयरीत्या वाढत आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. लोकसंख्येचा अर्धा भाग असलेल्या महिलांना राज्याच्या प्रशासनात संधी व महत्त्वाची जबाबदारी दिली जाते. महिला आहे म्हणून प्रशासनात कधीही डावलले जात नाही. महिलांमध्ये उपजत असलेल्या बहुविध जबाबदाऱ्या (multi-tasking) पार पाडण्याच्या कौशल्याचा प्रशासनाला नक्कीच फायदा होतो. प्रशासनाला गती देण्यात महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

महिला सक्षमीकरणाकडे झेप

आजच्या पिढीतील महिला या सक्षमीकरणाकडे यशस्वी झेप घेत असून महसूल, पोलीस अशा जोखीम असणाऱ्या विभागातही काम करत आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यात महिला या जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. तसेच महानगरपालिका व नगरपालिकेतही महत्त्वाच्या पदावर महिला अधिकारी आहेत. प्रशासनात काम करत असताना महिला आणि पुरुष असा भेदभाव नसतो. महिलांनी प्रत्येक कामाला संधी म्हणून स्वीकारावे. आपल्या कामाप्रति नेहमी कर्तव्यदक्ष राहावे, असे मला वाटते.

प्रशासकीय सेवेमध्ये काम करत असताना अनेक आव्हानात्मक प्रसंग मी फार जवळून अनुभवले आहेत. अशा वेळी

आय. ए. कुंदन
प्रधान सचिव, महिला व बालविकास

लोकप्रतिनिधी तसेच सोबतच्या अधिकाऱ्यांची नेहमीच सहकार्याची भूमिका असते. प्रशासनात काम करताना प्रशासन व जनता यामध्ये संवाद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सामान्य माणसांसाठी काम करण्याची संधी मिळते. आपण कुठल्याही विभागात काम करताना जनतेचे हित लक्षात घेऊन नियोजनबद्ध काम केले, तर निश्चितच सकारात्मक बदल घडवता येतात. सर्वसामान्यांसाठी काम केल्याचे मला समाधान आहे.

विभागामार्फत नावीन्यपूर्ण उपक्रम

मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर आहे. या शहराच्या महापालिकेची अतिरिक्त आयुक्त म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली हे मी भाग्य समजते. सध्या महिला व बालविकास विभागात काम करत असताना महिलांच्या सक्षमीकरणाचा ध्यास आणि बालकांचा विकास साधण्यासाठी विभागामार्फत सातत्याने उपक्रम आणि उपाययोजना राबवण्यात येत आहेत. विविध योजनांच्या अंमलबजावणीवर आम्ही भर दिला असून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहेत. वंचित महिलांच्या साहाय्यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. स्त्रीची प्रगती झाली तरच कुटुंबाची आणि पर्यायाने संपूर्ण समाजाची प्रगती साधली जाते. महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न केले जातात.

महिला व बालविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पुणे येथे महिला व बालविकास आयुक्तालय, नवी मुंबई येथे एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालय, राज्य महिला आयोग, राज्य बालहक्क संरक्षण आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण अभियान ही कार्यालये आहेत. विभागाची ही सर्व कार्यालये महिला व बालकांच्या विकासाचे ध्येय समोर ठेवून काम करतात. कोविड-१९च्या संकटकाळात अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी प्रशंसनीय काम केले. त्या काळात अंगणवाडी बंद असल्यामुळे बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रियांना पोषण आहार घरपोच दिला. अनाथ बालके व एकल महिला यांना आर्थिक साहाय्य केले. कोविड-१९ कालावधीमध्ये बालविवाहांची समस्या तीव्रतेने समोर आली. ते रोखण्यासाठी प्रयत्न केले.

प्रत्येक विभागात नियोजनबद्ध योजना, कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी केल्यास लोकाभिमुख कार्यप्रणाली तयार होते, असे मला वाटते. महिला प्रशासनात काम करताना वेगळी दृष्टी समोर ठेवून काम करतात. त्यामुळे अधिकाधिक महिला प्रशासनात आल्यास निश्चितपणे सकारात्मक बदल घडतील, असा मला विश्वास आहे.

शब्दांकन : शैलजा पाटील
विभागीय संपर्क अधिकारी

शिक्षणासाठी मुलींना गावाबाहेर न पाठवणाऱ्या राजस्थानमधल्या देवली या छोट्याशा गावामधील एक सामान्य मुलगी ते महाराष्ट्र राज्याच्या एकात्मिक बालविकास प्रकल्प आयुक्त म्हणून रुबल अग्रवाल यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. याविषयी जाणून घेऊन त्यांच्याच शब्दात..

‘ती’ला सक्षम बनवू या

माझे मूळगाव राजस्थानमधील देवली. या ठिकाणी ना दळणवळण व्यवस्था, ना इतर काही सोयीसुविधा. याच गावातल्या सरकारी शाळेमध्ये माझे शिक्षण झाले. लहानपणापासूनच अभ्यासाची आवड होती. होमवर्क घरी करण्यासाठी दिला जात असे, पण मी शाळेतच तो पूर्ण करून ठेवत असे. दहावी, बारावीच्या परीक्षांमध्ये मी टॉपर होती.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात टर्निंग पॉइंट असतात. तसाच माझ्या आयुष्यात आला. मी साधारण पदवीच्या द्वितीय वर्षात शिकत असतानाच महेश गुप्ता नावाचे प्राध्यापक राजस्थान लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करत होते. मला याची माहिती मिळाल्यानंतर मी त्यांना याबाबत विचारणा केली. त्यांनी सविस्तर माहिती तर दिलीच, पण त्यांनी आमची अभ्यासाची प्रगती पाहून ‘तू आयएएसची तयारी कर,’ असा सल्ला दिला. त्या वेळी मला आयएएस, आयपीएस परीक्षांबाबत कळले. त्यानंतर मी माझ्या कुटुंबासमोर हा प्रस्ताव मांडला.

फक्त दोन वर्षांची संधी

राजस्थानमध्ये मुलगी शिकली की तातडीने तिचे लग्न लावण्याची तयारी केली जाते. मी या प्रथेला कुठे तरी मी छेद देण्याचा प्रयत्न करत होते. माझ्या प्रस्तावावर काही दिवस चर्चा झाली. माझी आई, वहिनी या भक्कमपणे माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या. दोन वर्षेच परीक्षा द्यायची, पास झाले तर ठीक नाही तर लग्न करायचे, या अटीवर मला परवानगी देण्यात आली. मी स्पर्धा परीक्षेसाठी अर्जही केला. त्यासाठी दिल्लीमध्ये क्लासेस जॉईन केले. पहिल्या प्रयत्नाच्या अपयशानंतर दुसऱ्या

रुबल अग्रवाल
आयुक्त, एकात्मिक बालविकास प्रकल्प

प्रयत्नात मला यश मिळाले.

प्रशासकीय प्रवास

२००८ ला मी भारतीय प्रशासन सेवेते दाखल झाली. माझ्या सुदैवाने मला महाराष्ट्रसारखे प्रगत राज्य मिळाले. अकोला येथे परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली. अहमदनगर जिल्हा परिषदेची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मला नियुक्ती मिळाली. या काळात मी जिल्ह्यातील सुमारे एक हजार ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी दिल्या. याच ठिकाणी जिल्हाधिकारी म्हणून काही काम केल्यानंतर मी जळगावला जिल्हाधिकारी म्हणून रूजू झाले. जळगावमध्ये ‘बेटी बचाव बेटी पढाव’ अभियानांतर्गत केलेल्या कामाचा देशपातळीवर गौरव झाला. उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार मिळाला. माझ्या कार्यकाळात झालेल्या निवडणुका या तंटामुक्त झाल्याने मला महात्मा गांधी शांतता पुरस्कारदेखील मिळाला. त्यानंतर शिर्डी येथील साई संस्थानची मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यानंतर पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त आणि आता आयुक्त एकात्मिक बालविकास प्रकल्प असा माझा प्रशासकीय कारकिर्दीचा प्रवास सुरू आहे. दरम्यान कोरोना नियंत्रणासाठी उत्तम व्यवस्थापनासाठी अरुण बोंगीरवार पुरस्कारही मिळाला.

सर्वसामान्यांसाठी काम करावे

प्रशासकीय कामे करताना आव्हाने येतात त्यावर मात करून वाटचाल करून सामान्यांना आपल्याकडून न्याय मिळावा ही अपेक्षा असते. आपण असे काम करावे की, त्यामुळे दुसऱ्याच्या जीवनात नक्कीच चांगले बदल होतील, या दृष्टिकोनातून मी काम करीत असते. सध्या मी ज्या आयुक्तपदावर काम करत आहे तेथे शून्य ते सहा वयोगटातील बालके आणि गरोदर व स्तनदा माता यांच्यासाठीच्या योजना असे कार्यक्षेत्र आहे. संवेदनशीलपणे ते हाताळावे लागते. दुर्गम आणि आदिवासी भागातील बालमृत्यू, मातामृत्यू कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. त्याचबरोबर तीव्र कुपोषण श्रेणीत असणाऱ्या बालकांना सामान्य श्रेणीत आणण्यासाठीच्या कामाला मी प्राधान्य देत आहे.

महिलांना घराबाहेर पडू द्या

नोकरी आणि घर यांचा समतोल साधाताना मला पती, माझा आठ वर्षांचा मुलगा आणि माझ्या सासूबाई यांचा भक्कम पाठिंबा असल्याने मी प्रशासकीय सेवेसाठी चांगला वेळ देऊ शकते. माझ्यापासून प्रेरणा घेऊन माझ्या गावातील मुली आज शिक्षणासाठी गावाबाहेर पडताहेत हा सकारात्मक बदल मला सुखावून जातो. माझी सर्वांना एकच विनंती आहे की, आपली घरातील मुलगी, पत्नी, सून, बहीण कुणीही असो त्यांना शिक्षणासाठी, नोकरीसाठी घराबाहेर पडण्यासाठी मदत करा. महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करा.

शब्दांकन : अजय जाधव
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

कलाक्षेत्रातील अभूतपूर्व योगदानासाठी यंदाचा प्रतिष्ठित पद्मविभूषण पुरस्कार प्रभा अत्रे यांना, तर ज्येष्ठ लावणी गायिका सुलोचना चव्हाण यांना यंदाचा पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कलाद्वयींच्या आजवरच्या कार्याचा घेतलेला हा संक्षिप्त आढावा...

कलाद्वयींचा सन्मान...

डॉ. प्रभा अत्रे - कलाक्षेत्रातील अभूतपूर्व योगदानासाठी यंदाचा प्रतिष्ठित पद्मविभूषण पुरस्कार प्रभा अत्रे यांना प्रदान करण्यात आला. त्यांना भारताच्या प्रसिद्ध किराणा घराण्याच्या विख्यात भारतीय शास्त्रीय संगीत गायिका म्हणून ओळखले जाते. जगभरात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसाराचे मोठे काम त्यांनी केले आहे. प्रतिभावंत गायिका, संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका व विदुषी म्हणून प्रभाताईंचा नावलौकिक आहे. ख्याल गायकीसोबत ठुमरी, दादरा, गज़ल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व

भावसंगीत असे अनेक संगीत प्रकार त्या अतिशय लालित्याने हाताळतात. यापूर्वी त्यांना राज्य शासनाचे विविध पुरस्कार, पद्मश्री, संगीत नाटक अकादमी, पद्मभूषण, कालिदास सन्मान आणि टागोर अकादमी रत्न या प्रमुख पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनही सुरू केले आहे. या फाऊंडेशनच्या माध्यमातून संगीताच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य केले जाते. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहे. त्यात 'स्वरमयी' या त्यांच्या पहिल्यावहिल्या पुस्तकाला राज्य शासनाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले होते. सुस्वराली, अतःस्वर, स्वरयात्रे, स्वरांजनी, सरगम आदी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. प्रभाताईंनी पाश्चिमात्य संगीताचाही अभ्यास केला आहे. खऱ्या अर्थाने पद्मविभूषण हा पुरस्कार देऊन प्रभाताईंनी केलेल्या संगीत साधनेचा यथोचित गौरव करण्यात आला आहे.

सुलोचना चव्हाण - कला क्षेत्रातील योगदानासाठी महाराष्ट्रातील ज्येष्ठ लावणी गायिका, पार्श्वगीत गायिका सुलोचना चव्हाण यांना यंदाचा पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचा जन्म मुंबईतील गिरगाव येथे झाला. त्यांचे विवाहापूर्वीचे नाव सुलोचना कदम असे होते. बालपणी श्रीकृष्ण बालमेळ्यात त्यांनी काम केले. हिंदी, उर्दू, गुजराती, मराठी नाटकात बालभूमिका केल्या. त्यांच्या मोठ्या भगिनीने त्यांना कलाक्षेत्रासाठी प्रोत्साहन दिले. श्रीकृष्ण बालमेळ्याचे रंगभूषाकार दांडेकर चित्रपट सृष्टीशी संबंधित होते. दांडेकर यांच्या ओळखीतून संगीत दिग्दर्शक शाम बाबू पाठक यांच्याकडे सुलोचनाबाईंनी पहिले चित्रपट गीत गायिले. वयाच्या दहाव्या वर्षांपासून त्यांनी गायनाला प्रारंभ केला. लग्नापूर्वी सुमारे ७० हिंदी चित्रपटांतून त्यांनी पार्श्वगायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीत त्या सुलोचना कदम अथवा के. सुलोचना नावाने ओळखल्या जायच्या. मास्टर भगवान यांच्या चित्रपटात त्यांनी पार्श्वगायन केले तेव्हा त्यांच्या सोबत सहगायक सी. रामचंद्र होते. मोहम्मद रफी, मन्ना डे, शमशाद बेगम, गीता दत्त, शामसुंदर अशा कलावंतांबरोबर सहगायनाची संधी त्यांना लाभली. वयाच्या सोळाव्या वर्षी मन्ना डे यांच्यासोबत त्यांनी भोजपुरी रामायण गायिले. भोजपुरी, हिंदी, गुजराती, तामिळ, पंजाबी आदी भाषांतील गीते त्यांनी गायिली. सुलोचनाबाईंनी लावणी

सोबत भावगीते आणि भक्तिगीते देखील गाऊन लोकसंगीताचे दालन समृद्ध केले आहे. पी. सावळाराम यांच्या नावाने दिला जाणाऱ्या गंगाजमुना पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा लता मंगेशकर पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले आहे. चित्रपटातील पार्श्वगायनासोबत मराठी चित्रपटातील लावणी गायन ही त्यांची खरी ओळख झाली. त्यांना लावणीसम्राज्ञी हा किताब आचार्य अत्रे यांच्याकडून प्राप्त झाला.

– अतुल पांडे

साहित्य क्षेत्रातही आता नारी शक्तीची छाप पाहायला मिळत असून २०२०-२०२१ चे साहित्य अकादमीचे अनुवादासाठी दोन पुरस्कार राज्यातील महिला साहित्यिकांनी पटकावले आहे. डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना डॉ. प्रकाश आमटे यांच्या प्रकाशवाटा या आत्मकथनाच्या संस्कृत अनुवादासाठी, तर सोनाली नवांगुळ यांना 'इरंडाम जामंगळीन कदै' या तमिळ भाषेतल्या पुस्तकाच्या अनुवादासाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

सन्मान अद्वितीय प्रतिभेचा

डॉ. मंजुषा पंढरीनाथ कुलकर्णी

प्रकाशवाटा या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मकथनाचा 'प्रकाशमार्गा:' हा संस्कृत अनुवाद डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनी केला असून याच साहित्यकृतीला 'साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार' प्राप्त झाला आहे. मराठी साहित्याच्या संस्कृतमधील अनुवादाला पहिल्यांदाच हा सन्मान मिळाला आहे. २०२०-२०२१ चा हा साहित्य अकादमीचा पुरस्कार अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या हस्ते देऊन श्रीमती कुलकर्णी यांचा गौरव करण्यात आला. यापूर्वी त्यांना या अनुवादासाठी 'साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०' या पुरस्कारानेदेखील सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. त्यांची आतापर्यंत २५ पुस्तके प्रकाशित झाली असून २३ पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. राज्याच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक म्हणून काम करण्याचा मानही त्यांना मिळाला आहे. २१ वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले असून व्याख्याता, कवयित्री, लेखिका निवेदिका म्हणूनही त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांनी नाट्यप्रयोग, एकपात्री प्रयोगही केले आहेत.

श्रीमती कुलकर्णी यांचा तुळजापूर ते मुंबई व्हाया परळी, पुणे, औरंगाबाद हा आयुष्याचा ४४ वर्षांचा प्रवास आश्चर्यकारक आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण तुळजापूर येथे झाले. परळी येथून बारावीत गुणवत्ता यादीत, 'बी.ए'ला पुणे विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान त्यांनी पटकावला. एमपीएससी तसेच संस्कृत विशारद पदवी परीक्षेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम, तर एम.एड.च्या परीक्षेत एसएनडीटी विद्यापीठातून त्या तृतीय आल्या होत्या. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून स्मृती साहित्यातील निवडक स्मृतींचे तौलनिक अध्ययन या विषयात त्यांनी पीएच.डी केली. अनेक वर्षांपासून त्या संशोधन मार्गदर्शक म्हणून संस्कृतमध्ये पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शासकीय विदर्भ महाविद्यालय अमरावती, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्व विद्यालय, रामटेक इ. ठिकाणी त्यांनी २१ वर्षांहून अधिक कालावधीसाठी अध्यापनाचे कार्य केले.

– राजाराम देवकर

सोनाली नवांगुळ

दक्षिणेतील सलमा या लेखिकेच्या 'इरंडाम जामंगळीन कदै' या तमिळ भाषेतल्या पुस्तकाचे सोनाली नवांगुळ हिने 'मध्यरात्रीनंतरचे तास हे पुस्तक अनुवादित केले. या अनुवादासाठीच सोनाली नवांगुळ यांना साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आले. सोनालीचे लिखाण अनेकांना प्रेरणा देणारे आहे. यापूर्वी तिने दोन्ही पाय गमावलेल्या 'ऑस्कर पिस्टोरियस' या जगातल्या वेगवान धावपटूने लिहिलेले पुस्तक 'ड्रीमरनर' अनुवादित केले. तो तिच्या प्रेरणेचा स्रोत झाला.

सांगली जिल्ह्याच्या बत्तीस शिराळा या छोट्याशा गावात शिक्षक दाम्पत्याच्या घरी सोनालीचा जन्म झाला. सोनाली नऊ वर्षांची असताना, तिच्या पाठीवर बैलगाडी पडली आणि त्यामुळे तिच्या कंबरेतील व पायातील बळ गेले! 'पॅराप्लेजिक' झाल्यामुळे ना कमरेखाली संवेदना, ना नैसर्गिक विधींवर नियंत्रण! पूर्ण परावलंबी झाली ती. तिच्या आयुष्याला विचित्र कलाटणी मिळाली ती उपचारासाठी मुंबईतील हॉस्पिटलमध्ये दीड वर्षे गेली तेव्हा तेथे एकटीच असे. वय वर्षे अवघे नऊ. सोनालीला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाल्यानंतर ती गावी, बत्तीस शिराळ्याला गेली. शाळेत जाणे शक्य नव्हते. आईवडील, बहीण यांची शाळा चालू होती. ते तिघेही जण सोनालीची काळजी मायेने घेत. पण तरीही तिला तिचे घर 'अनोळखी' वाटू लागले. सोनाली घरी अभ्यास करून फक्त परीक्षेपुरती शाळेत जाई. घरी अभ्यास करून दहावीमध्ये शाळेत पहिली आली. घरीच अभ्यास करूनच बी.ए. झाली. गंमत अशी की, जी सोनाली शाळेत जाऊ शकली नव्हती, तिच्या एका गोष्टीचा समावेश द्वितीय भाषा मराठी असणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना गेली चार वर्षे पाठ्यपुस्तकात अभ्यासण्यासाठी म्हणून आहे.

दरम्यान या अवस्थेत सोनालीने आईवडिलांच्या पश्चात अधिक परावलंबित्व येऊ नये, यासाठी घर सोडून राहण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि कोल्हापूरला स्थायिक झाली. ऑस्कर पिस्टोरियस वाचनात येऊन सुरू झालेला साहित्यिक प्रवास आता स्वतःच्या व अनुवादित ८ पुस्तकांपर्यंत आला आहे, तो पुढे चालूच राहील.

युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांचा १० एप्रिल हा जन्मदिन. शास्त्रीय गायिका म्हणून आमोणकर यांची कारकिर्द १९६० आणि ७० च्या दशकात बहरली. बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल, अवघा रंग एक झाला, या पंढरीचे सुख पाहता डोळा, कानडा विठ्ठल विटेवरी, माझे माहेर पंढरी अशा अनेक भजनांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य केले. १० एप्रिल या त्यांच्या जन्मदिनानिमित्त कार्यकर्तृत्वाचा संक्षिप्त आढावा घेण्याचा केलेला हा प्रयत्न...

गानसरस्वतीचे स्मरण

प्रा.डॉ. भागवत ढोले

गानसरस्वती किशोरीताई रवी आमोणकर यांचा जन्म १० एप्रिल १९३१ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी (मुंबई) येथे झाला. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे बाबा माधवदास भाटिया यांचे निधन झाले. तिन्ही मुलांची जबाबदारी मोगुबाई कुर्डीकर (किशोरीताईंच्या आई) यांच्यावर पडली. त्यांनी ती शेवटपर्यंत निभावली. त्यांनी तिघांनाही चांगले संस्कार दिले. त्या संस्कारामुळे ते तिघेही आदर्श नागरिक ठरले. त्यांच्या संस्कारांमुळे जीवनाकडे पाहण्याची आदर्श तसेच सौंदर्यपूर्ण दृष्टी लाभली. किशोरी आमोणकर यांना डॉक्टर व्हायचे होते. परंतु काही कारणास्तव महाविद्यालयीन शिक्षण झाल्यानंतर त्या संगीत कलेकडे वळल्या. त्यांचे संगीताचे प्राथमिक प्रशिक्षण त्यांच्या आई जयपूर घराण्याच्या शास्त्रीय गायिका मोगुबाई कुर्डीकर यांनी घेतले होते.

शास्त्रीय संगीताचे धडे

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांनी त्यांच्या आईसोबत कार्यक्रमांसाठी प्रवास सुरू केला. कुर्डीकर गायन करताना त्यांच्यासोबत तानपुरा वाजवत होत्या. १९४० या दशकाच्या सुरुवातीस तरुण किशोरी आमोणकरांनी भेंडीबाजार घराण्याच्या अंजनीबाई मालपेकर यांच्याकडून हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे धडे घ्यायला सुरुवात केली आणि नंतर इतर अनेक घराण्यांच्या शिक्षकांकडून प्रशिक्षण घेतले. त्यांच्या शिक्षकांमध्ये आग्रा घराण्याचे अन्वर हुसेन खान, ग्वाल्हेर घराण्याचे शरदचंद्र आरोलकर आणि बाळकृष्णबुवा पर्वतकर यांचा समावेश होता.

गानसरस्वती किशोरीताई रवी आमोणकर

संगीत कारकिर्द

शास्त्रीय गायिका म्हणून आमोणकर यांची कारकिर्द १९६० आणि ७० च्या दशकात वाढली. आजारामुळे त्यांच्या गाण्याच्या क्षमतेवर परिणाम झाल्याने त्यांनी काही काळ कार्यक्रम करणे थांबवले. त्यांनी अनेक रागांसाठी अनेक रचना तयार केल्या. आमोणकर या लोकप्रिय वक्त्या होत्या आणि त्यांनी भारतभर प्रवास केला होता. संगीतातील रसभावना या विषयावरील व्याख्यानांसाठी त्या प्रसिद्ध होत्या.

अनेक प्रसिद्ध गाणी

बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल, अवघा रंग एक झाला, या पंढरीचे सुख पाहता डोळा, कानडा विठ्ठल विटेवरी, माझे माहेर पंढरी अशा अनेक भजनांनी रसिकांच्या मनावर राज्य केले. त्या चित्रपट गाण्यांसह सोप्या शास्त्रीय बंदिशी सादरीकरणासाठी प्रसिद्ध होत्या. १९९० मध्ये आलेल्या दृष्टी या हिंदी चित्रपटात त्यांनी गाणे गायले होते. त्यांना चित्रपट संगीताची आवड निर्माण झाली आणि १९६४ मध्ये आलेल्या 'गीत गाया पत्थरों ने' आणि 'दृष्टी' या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले.

अनेक पुरस्कारांनी सन्मानित

पद्मविभूषण, पद्मभूषण, संगीत नाटक अकादमी, संगीत नाटक अकादमी फेलोशिप या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच शास्त्रीय संगीतासाठी सुब्बलक्ष्मी पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांच्या नावे २०१८ पासून पुरस्कार दिल्या जातो. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी तीन दिवसीय 'गानसरस्वती संगीत महोत्सवा'चे आयोजन केले जाते.

संचालक, स्वरगंध संगीत विद्यालय, पुणे

महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद आदींच्या माध्यमातून महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यावर राज्य शासनाचा नेहमीच भर राहिला आहे. यामुळे महिलांमध्ये स्वत:चे विश्व निर्माण करण्याची उर्मी निर्माण झाली आहे. काही महिलांनी, तरुणींनी शासनाच्या मदतीने, तर काहींनी मदतीची वाट न पाहता उंच भरारी घेतली आहे. त्याबाबत काही प्रातिनिधिक यशकथा...

घेऊ उंच भरारी...

सुरेखाताईंनी फुलवला संसार

गोदावरीचा वेढा ज्या गावापासून थोड्या अंतराने पुढे सरकत जातो, त्यापैकी नाळेश्वर हे एक गाव. नैसर्गिक सुबत्ता असूनही अल्पभूधारक शेतकऱ्यांना फारसे काही हाती लागेलच याची मात्र शाश्वती नाही. अवघ्या अडीच-तीन एकराच्या छोट्या तुकड्यात शेती करून मुलांचे चांगले शिक्षण, नांदेडजवळ असल्याने जे काही अधिक चांगले असेल ते मुलांना देणे शक्य नसल्याचे सुरेखाताई मैठे ओल्या डोळ्यांनी सांगत

होत्या. मात्र सुरेखाताईंनी स्वप्न पाहणे थांबवले नव्हते.

अधिक शाश्वत उत्पन्नाच्या प्रयत्नात असलेल्या सुरेखाताई यांची गावात एक दिवस 'माविम'चे अधिकारी चंदनसिंग राठोड यांचेशी भेट झाली. बचतगटाच्या माध्यमातून खूप काही होऊ शकते, हा विश्वास राठोड यांनी त्यांना दिला. यातूनच पुढे आदिशक्ती महिला बचतगट साकारला. महिला आर्थिक विकास महामंडळाने या गटाला किराणा दुकानासाठी १.७५ एक लाख रुपये बँकेमार्फत कर्ज दिले. यामुळे सुरेखाताईंसह इतर नऊ जणींना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. सुरेखाताईंनी आपल्या कौशल्यातून एका वर्षातच कर्ज फेडले. जोडीला पिठाची गिरणी घेऊन त्यासाठीच्या कर्जाचीही परतफेड केली.

संसारासाठी शेतीवरचा आर्थिक ताण सुरेखाताईंनी इतर व्यवसायातून दूर केल्याने त्यांचे पती संभाजी मैठे यांनी आपल्या ९० गुंठ्यावर निशिगंधासह गुलाब शेतीचे स्वप्न पाहिले. 'फुलांची शेती करायला सोपी नाही. खूप जीव लावावा लागतो झाडांवर मग तेव्हा निशिगंध आणि गुलाब फुलतात' या शब्दांत सुरेखाताई व्यक्त होत होत्या. या दोघांनी २० गुंठ्यावर गुलाब, ३० गुंठ्यांवर निशिगंध, २० गुंठ्यांवर गलांडा आणि २० गुंठ्यांवर बिजली फुले लावून महिन्याच्या उत्पादनाचे गणित बसवले.

नांदेड येथे दर दिवशी दीड ते दोन हजार रुपयांची फुलविक्री करून मैठे दाम्पत्य महिन्याला ४५ हजार रुपयांचे उत्पादन घेते. या फुलशेतीच्या जोरावर एक मुलगी फार्मसीच्या दुसऱ्या वर्षाला आहे, तर मुले नांदेडला चांगले शिक्षण घेत असल्याचे सुरेखा मैठे अभिमानाने सांगतात.

– विनोद रापतवार
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड

जिद्दिने उभारला गृहोद्योग

जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी असल्यास परिस्थितीशी दोन हात करण्याचे बळ आपसूकच प्राप्त होते. आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी शासनाची योजना व त्यासाठी केलेले योग्य नियोजन यामुळे निश्चित यश प्राप्त होऊ शकते. राज्यातील महिला बचतगटांच्या सदस्यांनी अतिशय परिश्रमाने आपला जीवनस्तर उंचावला आहे. सोबतच कुटुंबाला आर्थिक उभारी प्राप्त करून दिली आहे.

अशीच यशकथा गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील शंभू टोला येथील शारदा समूहातील अनिता मेंढे यांची आहे. स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या अनिताताईंनी अंतर्गत कर्ज योजनेतून २०, ग्राम संघातून ३५ व सीसीएलमधून २० असे ७५ हजार रुपये कर्जस्वरूपात घेतले. या रकमेत स्वगुंतवणुकीतून काही पैसे टाकून आटा चक्की, हळद व मिरची कांडण मशीन खरेदी केली. तसे एवढी मोठी गुंतवणूक करून उद्योग सुरू करणे त्यांच्यासाठी धाडसाचेच होते म्हणा. पण मेहनत करण्याची तयारी असणाऱ्यांसाठी ही संधी असते. याच संधीचा लाभ घेत अनिताताईंनी या गृहउद्योग उभा केला. मागील दोन वर्षांपासून त्यांचा हा गृह उद्योग चांगला भरभराटीला आला आहे.

या गृहउद्योगातून त्यांना २-३ लाख रुपये उत्पन्न मिळत आहे. त्या नियमितपणे कर्ज परतफेडही करत आहेत. यासोबतच जोडधंदा म्हणून त्यांनी कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला आहे. यातही आपल्याला यश मिळेल, अशी खात्री त्यांना आहे. कुठलाही उद्योग व्यवसाय करताना लागणारे नियोजन व त्यासाठीची मेहनत घेण्याची तयारी अंगी

असली की यश हमखास मिळते. ही बाब अनिता मेंढे यांनी सुरू केलेला गृहउद्योग पाहिला की लक्षात येते. या गृहउद्योगासोबतच त्या शेतीही करतात. शेती आणि गृहउद्योग यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून नियमित कर्ज फेडही करतात. लघू गृहउद्योजिका म्हणून त्या आपली ओळख निर्माण करण्यात यशस्वी होत आहेत. अर्थातच 'उमेद'च्या सहकार्याशिवाय हे शक्य नव्हतेच.

– रवी गिते
जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया

शासन पाठीशी; आम्ही खंबीर

बालपणातच आईवडिलांचे छत्र हरपणे ही तशी नियतीने केलेली क्रूर थट्टाच. मात्र अशाही अवस्थेत शासनाचा भक्कम आधार असल्यावर आयुष्यात सकारात्मक बदल घडू शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सोनाली, दीपाली आणि रूपाली या तिघा बहिणींची ही कहाणी.

सोनाली शिवदास इंगोले (वय २६) ही आता सध्या कौटुंबिक तक्रार निवारण कक्ष बाळापूर जि. अकोला येथे कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहे. या कामातून मिळणाऱ्या मानधनावर ही युवती तिच्या लहान बहिणीचे पदव्युत्तर शिक्षण तर करत आहेच; शिवाय स्वतः स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून शासनाच्या सेवेत अधिकारी बनण्याचे स्वप्न साकारत आहे.

या तिघा बहिणींची कहाणी सुरू होते, मुंबई या शहरातून. तेथे त्यांचे वडील शिवदास इंगोले हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. २००७ मध्ये त्यांचे दुर्दैवी निधन झाले. परिणाम ह्या कुटुंबाला मुंबई सोडून गावाकडे यावे लागले. परिस्थिती हलाखीची असल्याने तिघा मुलींना त्यांच्या आईने शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या अमरावतीच्या बालगृहात दाखल केले आणि ती स्वतः दुधलम ता. मूर्तिजापूर येथे माहेरी राहू लागली. दरम्यान दुर्दैवाने २०११ मध्ये आईचेही निधन झाले. तीनही मुली अनाथ झाल्या.

तिघा बहिणींचे बालगृहात बालपण, प्राथमिकनंतर माध्यमिक शिक्षण झाले. वयाच्या १८व्या वर्षानंतर सोनालीला पदवीचे शिक्षण घेण्यासाठी अमरावतीच्या समाजकल्याण मुलींचे वसतिगृह येथे निवारा आणि सर्व शैक्षणिक सुविधा मिळाल्या. तिने समाजशास्त्र विषयात एम.ए. पदवी मिळविली. त्यानंतर ती अकोल्याच्या शासकीय जागृती महिला राज्यगृहात दाखल झाली. यथावकाश शिक्षण पूर्ण करून तिच्या बहिणीही दाखल झाल्या. आता तिघी बहिणी या महिला राज्यगृहात राहतात. तेथे निवास, आहार, कपडे हे सगळे शासनाकडून पुरवले जाते. दीपाली आता २४ वर्षांची असून तिने समाजकार्य या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली, तर लहान रूपाली आता २२ वर्षांची असून ती मानसशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण अकोल्यातच घेत आहे.

राज्य शासनाने महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या व बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटीपद्धतीने भरण्यात येणाऱ्या पदांमध्ये अनाथांना विशेष प्राधान्य दिले आहे. त्याअंतर्गत सोनाली आणि दीपाली या दोघींना बाळापूर आणि मूर्तिजापूर येथील कौटुंबिक तक्रार निवारण कक्षात कार्यालयीन कामकाजासाठी निवडण्यात आले. येथे मिळणाऱ्या मानधनातून त्या आपल्या लहान बहिणीचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत आहेत. शिवाय स्वतः स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत आहेत.

महिला राज्यगृहात त्यांच्या दिवसाला सकाळी सहा वाजल्यापासून सुरुवात होते. दिवसभराचे कार्यालयीन कामकाज आटोपून सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत अभ्यासिकेत अभ्यास करून यशप्राप्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत.

शासनाचे बालगृह, समाजकल्याण वसतिगृह, मोफत शिक्षण, अनाथांना मोफत आहार, निवास व सर्व सुविधांमुळे आमचे आयुष्य हे आम्ही सुरक्षितपणे जगू शकलो. स्वतःच्या पायावर उभे राहू शकलो असल्याचे सोनाली सांगते. आतापर्यंतच्या आयुष्यात महिला व बालविकास विभाग, समाजकल्याण विभाग आणि त्याअंतर्गत येणाऱ्या विविध संस्था यांची छत्रछाया आणि कवचकुंडले आमच्या सोबत आहेत. त्यामुळे आम्ही आमचे स्वप्न बघू शकतो आणि ते साकारण्यासाठी जिद्दही बाळगू शकतो, असे सोनाली सांगते.

– डॉ. मिलिंद दुसाने
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

बेलोऱ्यातील उद्योजिका महिला

शेतातील उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ व गटांसाठी असलेल्या आर्थिक साहाय्य योजनेचा लाभ घेऊन महिला उद्यमशील होत आहेत. शासकीय योजनेच्या माध्यमातून चांदुर बाजार तालुक्यातील बेलोरा गावातील प्रार्थना ग्रामसंघाने गटाच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योगाची सुरुवात केली. या बचतगटाने गुणवत्तापूर्ण मालाची निर्मिती करून वर्षाला दोन लाख रुपये नफा कमवला आहे. दहा समूहातील १०० महिला या व्यवसायाच्या माध्यमातून यशस्वी उद्योजिका झाल्या आहेत.

बेलोरा येथे तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. प्रार्थना ग्रामसंघाच्या गटातील महिलांनी उमेद अभियानांतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजना (एमकेएसपी) अंतर्गत मिनी दालमिलसाठी प्रस्ताव सादर केला. व्यवसायाचे स्वरूप, उपलब्ध बाजारपेठ, होणारा नफा, एकूण

ग्रामसंघाची गुंतवणूक या बाबींचा ताळेबंद सादर केला. योजनेंतर्गत या गटाला ३ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. दालमिल उद्योग सुरू करण्यासाठी जागेची निवड, शेड उभारणी, मिनी दाल मिल उपकरणांची खरेदी, वीज खर्च व इतर बाबींचा खर्च करून व २ समूहांकडून अडीच लाख रुपये कर्ज ग्रामसंघांनी घेऊन मिनी दालमिल प्रत्यक्ष उभारून सुरुवात केली. दाळीचे ब्रॅंडिंग व पॅकेजिंग करण्यात ह्या महिला निपुण झाल्या आहेत. शासकीय योजनेचा लाभ घेऊन तालुक्यातील १०० महिलांना रोजगार उपलब्ध झाला व महिलांच्या उपजिविकेचे साधन निर्माण झाले आहे.

तळेगाव ठाकुरच्या उद्योजिका

'उमेद' - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तळेगाव ठाकुरच्या स्वामी समर्थ स्वयंसाहाय्यता बचतगटाने सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग सुरू केला. नैसर्गिक शेतीद्वारे उत्पादित हळद, मिरची पावडर, विविध प्रकारचे लोणचे, मसाले, इत्यादींचे पॅकेजिंग करण्याकरिता

साहित्य खरेदी केले. स्थानिक बाजारपेठेसह गटाच्या महिलांनी निर्माण केलेल्या उत्पादनाच्या विक्रीसाठी मॉल विकसित केले. मॉलमध्ये विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या उत्पादन साहित्याच्या ब्रँडची ओळख निर्माण झाली असून बाजारपेठेत या उत्पादनांची ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे.

- पल्लवी धारव
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

अभियंता युवती ट्रॅक्टर मेकॅनिक

मेकॅनिकल इंजिनिअरिंग करून नोकरीच्या मागे न धावता वडिलांच्याच गॅरेजमध्ये धनश्री प्रेमलाल हातझाडे (२४) चांदोरी (उसगाव ता. साकोली, जि. भंडारा) ही उच्चशिक्षित तरूणी चक्क ट्रॅक्टर दुरुस्तीचे काम गेल्या दोन वर्षांपासून करत आहे.

पुरुषी वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात अगदी सराईतपणे काम करून तिने हातखंडा मिळवला आहे. ट्रॅक्टर दुरुस्तीचे अवजड काम करणारी ती जिल्ह्यातील पहिली महिला मेकॅनिक आहे. तिच्या वडिलांनीसुद्धा मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी मिळवली आहे. नोकरी न करता स्वतःचे गॅरेज टाकले आहे. त्यांच्या प्रेरणेतून धनश्रीनेसुद्धा ही वेगळी वाट निवडली आहे.

कुशल मेकॅनिक म्हणून सिद्ध

धनश्रीने शिक्षण घेताना कधीही गॅरेजमध्ये काम केले नव्हते. किंवा तसा विचारही कधी केला नव्हता. मात्र एक दिवस सहा ते सात ट्रॅक्टर दुरुस्तीसाठी आले. एकही कर्मचारी गॅरेजमध्ये त्या दिवशी आला नव्हता. हीच संधी साधून धनश्रीने वडिलांच्या परवानगीने तिची चुणूक दाखवून दिली. इथूनच धनश्रीच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. तिने याच व्यवसायात करिअर करण्याचा निर्णय घेतला. गेल्या दोन अडीच वर्षांत तिने स्वतःला एक कुशल मेकॅनिक म्हणून सिद्ध केले आहे. उच्चशिक्षित होवूनही एखाद्या कंपनीत ती चांगल्या पगाराची नोकरी करू शकत होती. मात्र तिने निवडलेल्या वेगळ्या वाटेने तिला स्वतःची एक वेगळी ओळख दिली आहे. भविष्यातही याच क्षेत्रामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे ध्येय धनश्रीने बाळगले आहे. कोणतेही काम लहान किंवा मोठे नाही. त्या कामात तुम्ही स्वतःला किती झोकून देता हे महत्त्वाचे आहे, असे धनश्रीचे मत आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा

बचतगटांचा 'सुपर शॉपिंग मॉल'

योग्य मार्गदर्शन व साहाय्य मिळाल्यास महिला आपल्या कर्तृत्वाने पुरुषांचे वर्चस्व असलेल्या व्यवसायांमध्ये उंच भरारी घेऊ शकतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी गावातील महिला! या महिलांनी शासनाच्या पाठबळाने बँकेतून कर्ज घेत बचतगटाद्वारे चालवला जाणारा जिल्ह्यातील पहिला 'सुपर शॉपिंग मॉल' सुरू केला आहे. हा अभिनव उपक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरला आहे.

बचतगटांना 'उमेद'चे बळ

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) मध्ये संगमनेर तालुक्यात बचतगटांचे जाळे निर्माण झाले आहे. यासाठी गटविकास अधिकारी अनिल नागणे यांच्या मार्गदर्शनाखाली उमेद अभियानाचे तालुका व्यवस्थापक रवींद्र खलाटे, तालुका समन्वयक प्रशांत पानसरे, प्रभाग समन्वयक रेश्मा पाटील यांनी बचतगटांतील सदस्यांना

व्यवसाय करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेच्या सहकार्याने कर्जपुरवठा मिळून देणे, व्यावसायिक कौशल्याचे प्रशिक्षण देण्याचे काम 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून केले.

या अभियानामधून घुलेवाडी गावात १० महिलांनी एकत्र येऊन बचतगट स्थापन केले. बघता-बघता गावात ३० स्वयंसहायता गटांची स्थापना झाली. या गटांचे मिळून 'रुक्मिणी महिला ग्रामसंघा'ची स्थापना करण्यात आली. 'ग्रामसंघा'च्या माध्यमातून गावातील वेगवेगळ्या गटातील महिला एकत्रित आल्या आणि विचारांची देवाण-घेवाण झाली. कोरोना कालावधीत सर्व काही बंद होते; परंतु जीवनावश्यक वस्तूंची सुविधा चालू होती. हे लक्षात घेऊन 'ग्रामसंघा'तील ६ महिलांनी पुढे येत 'सुमनांजली सुपर शॉपिंग मॉल' टाकण्याचा निर्णय घेतला. महिलांच्या या व्यवसायाला 'उमेद' अभियानातून पाठबळ मिळाले. 'उमेद' बरोबर केलेल्या करारामुळे राष्ट्रीयकृत बँकेने सुपर शॉपीसाठी वित्त पुरवठा केला. तर काही भांडवल बचतगटांतील महिलांनी स्वतः उभारले. राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते विजयादशमीच्या दिवशी १५ ऑक्टोबर २०२१ रोजी शॉपिंग मॉलचे उद्घाटन झाले.

हक्काचे विक्री केंद्र

बचतगटांमधील महिलांनी उत्पादन केलेल्या वस्तू तसेच शेतकऱ्यांनी सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले भाजीपाला व फळभाज्या शॉपींग मॉलमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येतात. यामुळे बचतगटांसाठी छोटेसे विक्री केंद्र तयार झाले आहे. आज या सुपर शॉपीमध्ये महिला बचतगटांचे २५ लाखांच्या वर भागभांडवल गुंतलेले आहे. मागील चार महिन्यांपासून या मॉलमधून महिलांना चांगले उत्पन्न ही मिळत आहे. संगमनेर पंचायत समिती सभापती सुनंदा जोर्वेकर यांच्या नेतृत्वाखाली मनीषा ढमाले, अश्विनी ढमाले, उषा ढमाले, योगिता सातपुते व मनीषा कोकणे या महिला या सुपर शॉपिंग मॉलचे व्यवस्थापन उत्कृष्टपणे सांभाळत आहेत.

- सुरेश पाटील
माहिती अधिकारी उप माहिती कार्यालय, शिर्डी

शिवकन्याचे तीन व्यवसायांत यश

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून बीड जिल्ह्यातील धारूरच्या पाटील गल्लीतील रहिवासी शिवकन्या दत्तात्रय दीक्षित यांची बचतगटाच्या माध्यमातून सुरू असलेली वाटचाल इतर महिलांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. दिशा महिला बचतगट असे त्यांच्या बचतगटाचे नाव. त्यांच्या बचतगटात १० सदस्य आहेत. दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातून त्यांनी २०१८ मध्ये हा बचतगट स्थापन केला. या बचतगटाच्या माध्यमातून शिवणकाम, शेवया तयार करणे व पापड बनवणे, असे तीन व्यवसाय त्या करतात.

बचतगट स्थापन झाल्यानंतर शिवकन्या दीक्षित यांनी आवास योजनेतून घर बांधायला काढले होते. पण, दोन वर्षांपूर्वी सुवर्णकारागीर असलेल्या त्यांच्या पतीचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. घरी सासूबाई, शिवकन्या यांची २ मुले, दीर, जाऊ, त्यांची २ मुले असे एकत्र कुटुंब. त्यांचे दीर सुवर्णकारागिरीचे काम करतात. त्यामुळे घरची परिस्थिती जेमतेमच. खचून न जाता त्यांनी नवीन व्यवसाय करण्यासाठी पदर खोचला.

बचतगटाच्या एका बैठकीमध्ये वेगवेगळ्या योजनांची, उद्योगाची व मार्केटिंगची माहिती त्यांना महिला आर्थिक विकास महामंडळाकडून मिळाली. माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी एस. बी. चिंचोलीकर व प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्राकडून त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली. बचतगटाला बँकेकडून कर्ज मिळाले.

शिलाई मशीनपासून सुरुवात

'माझा डिझाईनरचा कोर्स झाला होता. परंतु, शिलाई मशीन नसल्यामुळे माझा व्यवसाय सुरू होऊ शकला नव्हता. तो बचतगटामुळे सुरू झाला. हा बचतगट सुरू झाल्यापासून गटामध्ये अंतर्गत कर्ज घेऊन मी शिलाई मशीन घेतली व माझ्या व्यवसायाला सुरुवात झाली', असे शिवकन्या दीक्षित यांनी सांगितले.

बचतगटाला तीन टप्प्यात सहा लाख रुपये बँकेचे कर्ज मिळाले. त्यावर त्यांनी दुसरा व्यवसाय सुरू करत पुढचे पाऊल टाकले. त्यांनी शेवया तयार करण्याची मशीन खरेदी केली व शेवया करून देण्याचा दुसरा व्यवसाय सुरू केला. त्यामुळे बचतगटातील इतर महिलांनाही रोजगार उपलब्ध झाला. त्यांचे दोन्ही व्यवसाय सुरळीत चालू असून दरदिवसाला सर्व खर्च जाता ५०० ते ७०० रुपये व हंगामामध्ये १००० ते १५०० रुपयांचे दररोज उत्पन्न त्यांना मिळते. दरम्यान दोन व्यवसायावर अवलंबून न राहता आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी बचतगटातून काही व व्यवसायातून काही रक्कम गुंतवून पापड तयार करण्याचे यंत्र खरेदी केले. सध्या शिलाई, शेवया निर्मिती व पापड बनवणे असे त्यांचे तीन व्यवसाय व्यवस्थितपणे सुरू आहेत. शिवकन्या दीक्षित यांचे व्यवसायाचे स्वप्न महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या बचतगटामुळे साकार झाले. दरम्यान, व्यवसाय सुरू होताच त्यांनी अपूर्ण राहिलेले घराचे बांधकाम, शौचालय बांधकामही केले. शिवाय त्यांच्या जाऊबाईंनाही मेस चालवण्यासाठी प्रोत्साहन दिले.

- संप्रदा बीडकर
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

बचतगटामुळे वर्षाताई सक्षम

बुलडाणा तालुक्यातील अवघ्या २२६३ लोकसंख्येच्या भडगाव या गावात महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत १२ बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी सिद्धेश्वर महिला बचतगटातील संघटीका वर्षा छगन सोळंके यांना

सुरुवातीला बचतगटात येण्यास परवानगी नव्हती. कुटुंबात सासू, सासरे, नंणद, दोन मुले व पती असे एकूण सात लोक आहे. बचतगटासाठी कुटुंबीयांचा विरोध होता. शेवटी कुटुंबीयांना विश्वासात घेऊन त्यांनी बचतगटात नाव टाकले व गटात संघटीका होण्यास तयार झाल्या.

बचतगटाचे महत्त्व

दहावी उत्तीर्ण असलेल्या श्रीमती सोळंके यांनी सोबत शेतमजुरी करणाऱ्या महिलांना सोबत घेऊन सिद्धेश्वर नावाचा बचतगट स्थापन केला व स्वत:ची मासिक बचत मजुरी करून भरली. इतर महिलासुद्धा अशाचप्रकारे मजुरी करून बचत जमा करत होत्या. गटाला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीयकृत बँकेकडून ५० हजार रुपये एवढे पहिले कर्ज मिळाले. ते सर्व महिलांनी घेतले. तेव्हा सौ. वर्षा यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी पैशांची अत्यंत गरज होती. कर्जाच्या माध्यमातून त्यांच्या मुलाचा प्रवेश झाल्याने कुटुंबीयांना बचतगटाचे महत्त्व कळले.

आर्थिक सुबत्ता आली

दरम्यान भडगाव 'गाव कृषी समृद्धी प्रकल्पां'तर्गत मिळालेली ५ हजार रुपयांची मदत व बचतगटांतर्गत कर्जाच्या रकमेतून त्यांनी शिलाई मशीन घेतली. दिवसाला दोन-तीन ब्लाऊज शिवायचे काम सुरू झाल्याने शेतमजुरी करण्याची गरज पडत नाही. पती पण त्यांना मदत करू लागले. आता मुले चांगले शिक्षण घेत आहेत. शिलाई करत असताना त्यांनी ब्युटी पार्लरचाही क्लास केला. त्यामुळे त्यांना दुसरे कर्ज १.१० लाख रुपये मिळाले. त्यामधून ब्युटी पार्लरचे सामान खरेदी केले. अजून थोडे पैसे टाकून पिको मशीन खरेदी केली. आता त्यांचा व्यवसाय खूप चांगल्या रीतीने सुरू आहे. त्यांचे पती हे सुतारकाम करतात. परंतु बचतगटात आल्याने कुटुंबाला खूप फायदा झाला. त्यांना तिसरे कर्ज २ लाख रुपये मिळाले. त्यामधून त्यांनी त्यांच्या पतीच्या सुतारकामास हातभार लागावा यासाठी कटर मशीन व ग्लेन्डर मशीन खरेदी केले. नंतर जवळच्या करडी या गावात भाड्याने दुकान घेतले. या बचतगटामुळे श्रीमती सोळंके यांच्या कुटुंबाला खूप आधार मिळाला. वेळोवेळी सीएमआरसीच्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन मिळाले. आत्मविश्वास वाढून त्या आता निर्भीडपणे बँकेत जाऊन प्रश्न सोडवतात. गावामध्ये ग्रामसभेतपण जातात. आपल्या अडचणी मांडतात. बचतगटामुळे व परिश्रमामुळे त्यांच्या जीवनात मोठे सकारात्मक घडले, त्या इतर महिलांसाठी प्रेरणा ठरत आहेत.

- गजानन कोटुरवार
जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा

सुरेखाताईंची समृद्ध अवजार बँक

शासनाच्या महाडीबीटी कार्यक्रमांतर्गत धुळे जिल्ह्यातील बेटावद (ता. शिंदखेडा) येथील महिला शेतकरी सुरेखा यशवंत महाजन यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केला. सोडतीनंतर सुरेखाताई यांची राज्य कृषी योजनेंतर्गत कृषी यांत्रिकीकरणात अवजारे बँकसाठी निवड झाली. अवजारे बँकेसाठी कर्ज प्रकरण पूर्वसंमती व अनुदानाच्या हमीपत्रानुसार मंजूर करण्यात आले.

सुरेखाताई महाजन यांनी मोठे व लहान ट्रॅक्टरसोबत रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर, हायड्रोलिक नांगर, मळणीयंत्र, सीड कम फर्टिलायझर, ब्लोअर इ. अवजारे खरेदी केली. त्यासाठी त्यांना बँकेने १५ लाख रुपये कर्ज दिले, तर कृषी विभागाकडून त्यांना १० लाख रुपये अनुदान प्राप्त झाले. ऑनलाईन

पद्धतीने कृषी यांत्रिकीकरणात अवजारे बँक या बाबीसाठी शिंदखेडा तालुक्यात त्यांची पहिलीच मोठी अवजार बँक आहे. शासनाकडून लाभ मिळाल्यानंतर सुरेखाताई यांनी परिसरातील शेतकऱ्यांना अवजारे बँकेची सेवा उपलब्ध करून दिली. रब्बी हंगामातील पिके काढणीनंतर जमीन तयार करणे, नांगरणी, रोटाव्हेटरसाठी त्या सध्या मदत करत आहेत. प्रतिदिवशी साधारणत: ५ एकर क्षेत्राची नांगरणी रुपये १२०० प्रतिएकर दराने व ८ एकर क्षेत्रावर रोटाव्हेटर मारण्यासाठी रुपये १००० प्रतिएकर दराने अवजारे भाडे तत्त्वावर उपलब्ध करून देतात. म्हणजेच महिनाभरात सध्या प्रतिदिवशी १४ हजार रुपये रक्कम त्यांना प्राप्त होत आहे. भविष्यात कल्टिव्हेटरचा वापर, मळणी यंत्राचा वापर, ब्लोअर्सचा फवारणीसाठी वापर, पेरणीसाठी सीड कम फर्टिलायझरचा वापर परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी त्या प्रयत्न करणार आहेत.

सुरेखाताई स्वत: महिला बचतगटाच्या अध्यक्षा असल्याने नेतृत्वगुण, उत्तम नियोजन, व्यवहार कुशलपणा अंगी असल्याने अवजारे बँक संकल्पना अत्यंत चांगल्या पद्धतीने राबवत आहेत. आपल्या यशासाठी यजमान यशवंत महाजन, स्टेट बँक ऑफ इंडियाचे बेटावद शाखेचे व्यवस्थापक, कृषी साहाय्यक शिवाजी मुळे, कृषी पर्यवेक्षक प्रताप पाटील, कृषी अधिकारी नवनाथ साबळे व तालुका कृषी अधिकारी विनय बोरसे यांचे सहकार्य लाभल्याचे त्या आवर्जून सांगतात.

- विलास बोडके
जिल्हा माहिती अधिकारी, धुळे

फुलशेती मुळे नवी 'उमेद'

महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना आर्थिक पाठबळ देण्याच्या हेतूने जालना जिल्ह्यात 'उमेद'च्या माध्यमातून बचतगटांची एक चळवळ निर्माण करण्यात आली. जालना तालुक्याच्या पीरकल्याण गावामध्ये अवघ्या १२ महिलांनी मिळून श्रीराम स्वयंसहायता महिला बचतगटाची स्थापना केली. या गटाच्या माध्यमातून फुलशेती, द्राक्षशेती व कृषी औजार बँकेची स्थापना केली असून याद्वारे या महिला लाखो रुपयांची उलाढाल करत आहेत. 'उमेद'चा आधार घेत या महिला खऱ्या अर्थाने सक्षम झाल्याचे चित्र पाहावयास मिळत असून त्यांचे हे कार्य इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

श्रीराम स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या सदस्या

जालना मुख्यालयापासून १८ कि.मी. अंतरावर वसलेले पीरकल्याण हे गाव. गावाचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन म्हणजे शेतीच. शेतीतील उत्पादनावर अवलंबून असलेल्या या गावामधील रहिवाशी असलेल्या सौ. संगिता विशाल शिंदे. केवळ शेतीवरच अवलंबून न राहता आपल्या कुटुंबाचे, आपल्या मित्र-मैत्रिणींच्या परिवाराची आर्थिक उन्नती व्हावी, या दृष्टीने त्यांनी गावातीलच १२ महिलांना एकत्र करत श्रीराम स्वयंसहायता बचतगटाची स्थापना केली.

गटाची स्थापना केल्यावर पतीच्या मदतीने तालुक्याच्या ठिकाणी जाऊन गटाचे खाते उघडले. स्वत:च्या हिमतीवर काहीतरी करण्यासाठी घराच्या बाहेर टाकलेले पाऊल आणि त्यात मिळालेले यश हा क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय असल्याचे श्रीमती शिंदे सांगतात. दर महिन्याला गटातील प्रत्येक महिलेने बचत करून पैसे जमवले. जमलेल्या पैशातून महिलांना अंतर्गत कर्ज उपलब्ध करुन दिले. या कर्जस्वरूपात दिलेली रक्कमही महिलांनी वेळेत परतफेड केल्याने गटाची बचतही मोठ्या प्रमाणात झाली.

फुलशेतीला सुरुवात

केवळ बचतच करायची नाही, तर घरची दैनंदिन सर्व कामे सांभाळून गावामध्येच एखादा व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार गटातील सर्व महिलांनी केला. फुलशेतीच्या उद्योगाचा विचार समोर आला. यासाठी उमेदची मोठी मदत झाली. उमेदने त्यांना फुलशेतीसाठी दीड लाख रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले. कर्ज तसेच बचतीच्या रकमेतून निशिगंधा आणि झेंडूची रोपे लावली. यातून दर महिन्याला सर्व खर्च जाऊन तीन ते चार हजार रुपये शिल्लक राहू लागले. त्यामुळे अधिक प्रमाणात फुलशेती करण्याचा निर्धार केला. फुलशेतीसाठी पाणी कमी पडू लागल्याने एक विहीर खोदली. विहिरीला भरपूर पाणी लागले. केवळ निशिगंध आणि झेंडुची फुलशेती न करता बाजारात अधिक मागणी असलेल्या गुलाब, गलंडे, बीजली या फुलांच्याही शेतीस साडेसात एकरवर सुरुवात केली. जालना, पुणे यासारख्या ठिकाणी ही फुले विक्रीसाठी पाठवण्यात येतात. आजघडीला एक ते दीड लक्ष रुपये या फुलशेतीमधून उत्पादन होते.

कृषी अवजार बँक

गावामध्ये उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेतीच असल्याने कृषी अवजारांची प्रत्येक शेतकऱ्याची निकड लक्षात घेऊन नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत कृषी अवजारांच्या बँकेसाठी निश्चय त्यांनी केला. गटाचा कृषी अवजार खरेदीसाठीचा १३ लाख १० हजार रुपयांचा प्रस्ताव बँकेने मंजूर केला. या कर्जाच्या रकमेतून ट्रॉली, रोटाव्हेटर, पेरणीयंत्र, व्हीपास, वखर, नांगर आदी साहित्य खरेदी केले. या माध्यमातून त्यांच्या गटाला दरवर्षी ३ ते ४ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.

'चूल आणि मूल एवढंच कार्यक्षेत्र मानणाऱ्या आम्ही. केवळ एकीच्या बळावर आज इथपर्यंत पोहोचलो आहोत. आपल्या आवडीच्या वस्तू घेण्यासाठी, हौस, मौज करण्यासाठी पावलोपावली मन मारावे लागत होते. परंतु बचतगटामुळे आज आम्ही सर्वजणी आमच्या स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभ्या असून आमच्या संसारालाही मोठा हातभार लावत आहोत' हे गटातील सर्वजणी अभिमानाने सांगतात.

- प्रमोद धोंगडे
जिल्हा माहिती अधिकारी, जालना

'ती' बनली 'तिचा' आधार

एक महिलाच दुसऱ्या महिलेचे दु:ख समजून घेईल, या आशेने सोलापुरातील त्रस्त महिला माझा नवरा रोज दारू पिऊन घरी भांडण करून मला व लेकरांना मारतो. घरात खायला काय न्हाय... अशा तक्रारींचा पाढा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्यासमोर मांडत होत्या. त्यांचा श्रीमती सातपुते यांनी संवेदनशीलपणे विचार करून 'ऑपरेशन परिवर्तन'मधून त्यांना स्वावलंबनाचा आशेचा किरण दाखवला.

'ऑपरेशन परिवर्तन' अंतर्गत स्वावलंबी झालेल्या महिलांसोबत पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते.

अशी सुचली कल्पना...

अवैध हातभट्टीच्या दारू व्यवसायात कुटुंबातील पुरुषांसोबत महिला आणि मुलांचाही सहभाग असतो. यामुळे सर्वांना या व्यवसायापासून परावृत्त करण्यासाठी पर्यायी रोजगार देणे महत्त्वाचे होते. दारूने अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली होती. महिन्यातून दोनदा धाडी टाकूनही काही उपयोग होत नव्हता. हातभट्टी दारू निर्मितीची ५६ ठिकाणे शोधून आठवड्यातून दोनदा धाडी टाकून उद्ध्वस्त करण्यात आली. त्यांच्या उपजीविकेचे काय, यासाठी श्रीमती सातपुते यांनी १ सप्टेंबर २०२१

पासून 'ऑपरेशन परिवर्तन' अभियान जिल्हाभर सुरू केले. सातत्यपूर्ण कारवाई, समुपदेशन, पुनर्वसन आणि जागृती या चतु:सूत्रीचा वापर करून ऑपरेशन परिवर्तन राबवले जात आहे. हातभट्टी दारू निर्मितीबरोबर विक्रीची ठिकाणेही नष्ट केली.

प्रत्येक अधिकाऱ्याला गाव दत्तक

ज्या ठिकाणी अवैध हातभट्टीची दारू तयार होते, विक्री होते अशी जिल्हाभरातून ११९ गावे शोधून फौजदार, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपअधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि स्वत: पोलीस अधीक्षक यांनी एक गाव दत्तक घेतले. श्रीमती सातपुते यांनी मुळेगाव तांडा हे गाव दत्तक घेऊन महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. दत्तक गावात अधिकारी आठवड्यातून दोनवेळा दारू अड्डे नष्ट केलेल्या ठिकाणी भेटी देऊन पाहणी करतात.

सुशिक्षित मुलांसाठी रोजगार मेळावे

पोलीस वेल्फेअर रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिले. रोजगार मेळाव्यात ऑपरेशन परिवर्तनमधील ३४ मुलांना नोकरी मिळाली. कारचालक, हॉटेल, पानटपरी, वॉचमन, पशुपालन, शेती, किराणा दुकान, वडापाव गाडा, खवा भट्टी यासोबतच कौशल्यपूर्ण कामांचा यात समावेश आहे. यामुळे या तरुणांना रोजगार आणि समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली.

रोजगारातून महिलांचे सक्षमीकरण

पर्यायी रोजगार देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि मिटकॉनच्या माध्यमातून महिला, पुरुष यांच्या कौशल्यानुसार रोजगार प्रशिक्षण देण्यात आले. जिल्ह्यातील हातभट्टी व्यवसायातील ६०० कुटुंबांपैकी ४४३ कुटुंबांचे पुनर्वसन केले. परिवर्तनाने महिलांनाही सक्षम करण्याचा प्रयत्न पोलीस विभागाचा आहे. जे हात वर्षानुवर्षे हातभट्टीची दारू तयार करण्यात आणि विकण्यात गुंतले होते, ते हात आता ब्रँडेड कपडे शिवणार आहेत. त्यांनी शिवलेला शर्ट परदेशात पाठवण्याची जबाबदारी एका गार्मेंट कंपनीने घेतली आहे. शिलाई मशिनसह ब्युटिशियनचे प्रशिक्षण महिलांना देण्यात येत आहे. यामुळे रोजगारातून महिलांचे सक्षमीकरण होऊ लागले आहे.

मुळेगाव तांडातील परिवर्तन

हातभट्टी दारू निर्मितीचे केंद्र म्हणून मुळेगाव तांड्याकडे पाहिले जात. पुरूषासोबत महिला, मुले या व्यवसायात होती. गावातील ४१ महिलांना जिल्हा उद्योग केंद्र आणि मिटकॉनच्या माध्यमातून फॅशन डिझायनिंग, मशिन ऑपरेटरचे ४५ दिवसांचे प्रशिक्षण दिले. याठिकाणी २१ मार्च २०२२ रोजी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांच्या हस्ते परिवर्तन उद्योग समूहाचा शुभारंभ करण्यात आला. प्रशिक्षित महिलांना मुख्यमंत्री रोजगार योजनेतून बँकामार्फत कर्ज उपलब्ध करून अत्याधुनिक १८ शिलाई मशिन घेऊन दिल्या. परिवर्तनच्या माध्यमातून अनेकांच्या हाताला काम मिळू लागल्याने मुळेगाव तांडा उद्योगगाव म्हणून ओळखूले जाऊ लागले आहे.

- धोंडिराम अर्जुन
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर

शेळी पालनातून आम्ही झालो समर्थ

महाबळेश्वर, पाचगणीसारख्या थंड हवेच्या ठिकाणी तसेच स्ट्रॉबेरीसाठी प्रसिद्ध असलेले आणि आणखी वेगळी ओळख लाभलेले भिलार या पुस्तकांच्या गावात शेतीला पूरक बंदिस्त शेळीपालनाचा व्यवसाय सावली महिला स्वयंसहायता गट यशस्वीपणे करत आहेत. या गटाचे काम पाहून शेजारील शिंदेवाडी, गणेशपेठ, रुईघर येथील महिला बचतगटही या व्यवसायाकडे वळले आहेत.

सावली महिला स्वयंसहायता समुहाच्या अध्यक्षा हर्षला बाजीराव मालुसरे व सचिव आशा विठ्ठल भिलारे या समुहाचे काम उमेदच्या दशसूत्रीनुसार योग्यरीत्या करत आहेत. तसेच ग्रामपंचायतीमार्फत राबवले जाणारे विविध कार्यक्रम, अभियाने, महिला ग्रामसभा यामध्ये त्या सक्रिय सहभाग घेतात. गटातील आशा विठ्ठल भिलारे व शुभांगी बळवंत भिलारे यांची जागा शेळीपालनासाठी निवडण्यात आली. जागा व पाण्याचा प्रश्न मिटल्यानंतर तालुका अभियान कक्षाच्या साहाय्याने १५ हजार रुपयांचे खेळते भांडवल उभे करून प्रत्यक्ष जागेची स्वच्छता व इतर सर्वसाधारण कामे सुरू केली.

या तालुक्यात होणारे अतिपर्जन्यमान, थंडी, चारापाण्याची वर्षभराची व्यवस्था याचे सूक्ष्म नियोजन त्यांनी केले. २० x १०० चौ.फुटाचे निवारा शेड आणि एक एकर मोकळ्या जागेत जाळीचे कंपाऊंड तयार केले. दरम्यान बँकेकडून त्यांना पहिले अर्थसाहाय्य एक लाख रुपये मिळाले. त्यातून आफ्रिकन बोर, सानीयय, बिटल, उस्मानाबादी शेळ्या व बोकड खरेदी केले. तसेच आवश्यक असणारी औषधे व खाद्य उपलब्ध केले. लेंडीखत, दूध विक्रीच्या रकमेतून कर्जाची परतफेड मुदतीत केली. त्यामुळे बँकेने विनासायास दोन लाख रुपयांचे दुसरे अर्थसाहाय्य दिले. आज या गटाकडे जवळपास ४० शेळ्या, बोकड व करडे आहेत. लेंडी खताला गावातून चांगली मागणी असून महाबळेश्वर, पाचगणी, भिलार येथे पर्यटकांना जवळपास १८० रुपये लीटर दराने शेळीचे दूध विकले जाते. त्यामुळे गटाला आर्थिक उत्पन्न चांगले मिळत आहे. या बचतगटाने शेळीपालनाबरोबरच आता कुक्कुटपालनाचा जोडव्यवसायही सुरू केला आहे.

- दत्तात्रय कोकरे
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

गृहिणी ते कुशल मोटार मेकॅनिक

नोकरी असो किंवा व्यवसाय आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. मग ते काम घरचे असो किंवा बाहेरचे. हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर येथे गेल्या १२ वर्षांपासून मेकॅनिकचा व्यवसाय करणाऱ्या जयश्री अंभोरे या एकमेव महिलेची ही यशकथा.

जयश्री अंभोरे यांच्या माहेरची परिस्थिती तशी हलाखीची. त्यातच त्यांनी आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेतल्यानंतर घरच्यांनी त्यांचा विवाह गोविंद अंभोरे यांच्याशी करून दिला. त्यांच्यावर संसाराची मोठी जबाबदारी पडल्याने त्यांची पुढे शिक्षण घेण्याची इच्छा असतानाही त्या शिक्षण पूर्ण करू शकल्या नाहीत. त्यांचे पती गोविंद अंभोरे यांचा मोटार रिवायंडिंगचा व्यवसाय आहे. पतीची व्यवसायात होणारी धावपळ, कष्ट पाहून जयश्री यांनी त्यांना मदत करण्याचे निश्चित केले. व्यवसायात पतीला

लागणारे कष्ट कमी करण्यासाठी जयश्री या मदत करू लागल्या. व्यवसायाचे कुठलेही प्रशिक्षण न घेता संपूर्ण रिवायंडिंगचे काम त्यांनी शिकून घेतले. या व्यवयातील कामात त्या परिपूर्ण झाल्या. आता जयश्री अंभोरे यांना कुशल मोटार मेकॅनिक म्हणून सर्वजण ओळखतात. जयश्री यांचे पती कामानिमित्त बाहेर गेल्यास व्यवसायाची जबाबदारी त्या सक्षमपणे पार पाडतात.

जिद्द, सचोटी व नियमित कष्टाच्या बळावर जयश्री यांनी त्यांच्या लघुउद्योगाला मोठा आकार दिला. आखाडा बाळापूर येथील बसस्थानकाशेजारी बोल्डा रस्त्यावर जयश्री अंभोरे यांचे मोटार रिवायंडिंगचे दुकान आहे. व्यवसायात आपले काम निष्ठेने पूर्ण करण्याची धडपड त्यांच्यात दिसून येते. दररोज त्या साधारण चार ते पाच मोटार दुरुस्तीचे काम सहजतेने पूर्ण करतात. मोटार मेकॅनिक बनलेल्या जयश्री अंभोरे या हिंगोली जिल्ह्यातील एकमेव महिला आहेत. या कामात त्यांना एका मोटारीमागे जवळपास ४०० ते ५०० रुपयांचा मोबदला मिळतो. आपल्या पतीसोबत व्यवसायातून त्या संसाराला मोठा हातभार लावत आहेत. भविष्यात मुलींसाठी आखाडा बाळापूर येथे मोटार रिवायंडिंगची प्रशिक्षण संस्था उभी करण्याचा मानस जयश्री अंभोरे यांनी व्यक्त केला.

- श्वेता पोटुडे-राऊत
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

आवडीला व्यवसायाचे रूप

मंगरुळपीरनजीक असलेल्या जांब शिवारात शेडनेट व पॉली हाऊसच्या माध्यमातून सरला रमेश मोहिते या सुशिक्षित शेतकरी महिलेने नावीन्यपूर्ण साई रोपवाटिकेच्या माध्यमातून भाजीपालावर्गीय व पपई रोपांची निर्मिती करून जिल्ह्यातीलच नव्हे, तर शेजारच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नगदी पिकाचा मार्ग दाखवला आहे. कृषी क्षेत्रातील त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी श्रीमती मोहिते यांचा २०१९-२० मध्ये राज्य शासनाने वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने गौरव केला.

सरला मोहिते यांची शेलूबाजारजवळ असलेल्या घुगरी या गावी ५ एकर शेती आहे. पती रमेश मोहिते हे मानोरा तालुक्यातील मानोली येथे खासगी शाळेत शिक्षक आहेत. सरला मोहिते यांचे शिक्षण बी.ए.पर्यंत झाले. रोप निर्मिती करण्याची त्यांची आवड त्यांना एक चांगली आदर्श शेतकरी बनवेल, असे त्यांना कधी वाटले नाही.

प्रयत्नांना यश

२००५ मध्ये मंगरूळपीर येथील वैष्णवीनगरात घरी असलेल्या खुल्या जागेत २००५-२००९ या कालावधीत पपईची रोपे तयार करून विक्री केली. २००६ मध्ये तयार केलेली तायवान पपईची रोपे बघून ६५ हजार रुपयांची तायवान पपईची रोप तयार करण्याची त्यांना ऑर्डर मिळाली. सरलाताईने यशस्वीपणे रोपे निर्मिती होत असल्याने त्यांनी २००७ पासून भाजीपाला रोपे तयार करण्याला सुरुवात केली. पपई, वांगे, मिरची, टोमॅटो, कोबी, झेंडू, टरबूज आणि खरबूज यांची रोपे त्या तयार करू लागल्या.

सहा एकर शेती घेतली

दरम्यान रोपवाटीकेच्या व्यवसायात यश मिळत असताना त्यांनी जांब शिवारात २००९ मध्ये दोन, २०१० मध्ये दोन, २०१२ मध्ये एक व २०१९ मध्ये एक अशी एकूण सहा एकर शेती खरेदी केली. रोपवाटिकेतील रोपांसाठी पाण्याची सुविधा म्हणून या सहा एकर शेतामध्ये सहा बोअरवेल आणि एक विहीर तयार केली.

२०१२ मध्ये कृषी विभागाच्या संरक्षित शेती योजनेतून २० गुंठे जमिनीवर ७ लक्ष रुपयातून शेडनेट तयार केले. २०१४ मध्ये संरक्षित शेती योजनेतून २० गुंठे जमिनीवर १६ लाख रुपयांचे पॉली हाऊस तयार केले.

गादी वाफ्यावर सुद्धा शेतकऱ्यांच्या ऑर्डरप्रमाणे रोपांची निर्मिती करण्यात येते. भाजीपालावर्गीय रोपे आणि पपईची रोपे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसोबतच शेजारच्या अकोला, अमरावती, हिंगोली, बुलडाणा, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहज साई रोपवाटीकेतून उपलब्ध होत आहे. सर्व खर्च वजा करता वर्षाकाठी ४ ते ५ लाख रुपये नफा मिळत असल्याचे सरला मोहिते यांनी सांगितले.

- विवेक खडसे
जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम

मोती पिकले सोन्यावाणी

'कौन कहता हैं कि आसमां में सुराख नही हो सकता, एक पत्थर तो तबियतसे उछालो यारो!' दुष्यंत कुमार यांच्या या ओळी यवतमाळ जिल्ह्याच्या आर्णी तालुक्यातील लोणी गावातील महिलांसाठी लागू होतात. सोयाबीन, कापूस, तूर या पारंपरिक पिकांपेक्षा या महिलांनी मोत्यांची यशस्वी शेती करून दाखवली आहे.

'माविम'चे साहाय्य

महिला आर्थिक विकास महामंडळाने महिलांच्या आर्थिक, सामाजिक उन्नती आणि सक्षमीकरणासाठी गावात महिलांचे चार बचतगट तयार केले. या महिलांना वेगवेगळे उद्योग व शेतीच्या प्रयोगांबाबत प्रशिक्षण दिले.

मोती शेती करण्याचा प्रस्ताव आमच्यापुढे माविमचे जिल्हा समन्वयक रंजन वानखडे आणि लोक संचालित साधन केंद्र आर्णीच्या सीमा भाम्रटकर यांनी ठेवला. पारंपरिक शेती करणाऱ्या या महिलांना मोत्याची शेती करतात हे ऐकून आश्चर्याचा धक्का बसला. 'हा प्रस्तावच आमच्यासाठी जगावेगळा होता. शेतीत राबणारे हात.. सोने, हिरे, जडजवाहीर आयुष्यात कधी पाहिले नाही. नकली मोत्यांच्या माळा गळ्यात मिरवल्या असतील तर तेही नाही. पण मग प्रत्यक्षात खऱ्या मोत्यांची शेतीच करण्याची संधी चालून आली आणि आम्ही उसंतही न घेता याला होकार दिल्याचे' बचतगटातील माधुरी सवाई यांनी सांगितले.

मोत्यांची शेती यशस्वी

दुर्गामाता बचत गटातील अनिता लाड, कल्पना काळे, जीविताबाई वावगे, शिल्पा मांजरे आणि माधुरी सवाई या महिलांना मोत्यांची शेती कशी करायची? याचे प्रशिक्षण देण्यात आले. शेतात १५ x १५ x १५ चा खड्डा तयार करून त्यामध्ये पाणी भरले. दोन्ही बाजूला दोरी बांधून शिंपल्यामध्ये बी टाकून काम सुरू झाले. सुरुवातीला त्यातील बारकावे माहीत नसल्यामुळे समोर आलेल्या प्रसंगातून महिला शिकत गेल्या. ९ महिने पोटातील बाळाची काळजी घ्यावी तशी महिलांनी शेतातील शिंपल्याची काळजी घेतली.

१४ महिन्यांनी शिंपल्यात मोती तयार झाले. संबंधित कंपनीने प्रतिशिंपला ३०० ते ३५० रुपयांप्रमाणे मोती खरेदी केले. १४ महिन्यात महिलांना ४ लाखांचे उत्पन्न मिळाले. खर्च वजा जाता महिलांनी हा नफा आपसात वाटून घेतला. या प्रकल्पामुळे महिलांच्या आकांक्षा वाढल्या असून त्या अधिक जोमाने काम करून आता स्वतः साठीही मोत्याची माळ खरेदी करू शकतील, असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ

मालविका; नागपूरकरांचा अभिमान

राज्याची उपराजधानी, संत्रानगरी नागपूरची, क्रीडा क्षेत्राची स्वपराक्रमाने ब्रँड ॲम्बेसिडर झालेली बॅडमिंटनपटू मालविका बनसोड प्रत्येकाच्या गळ्यातील ताईत आहे. नागपूरसारख्या शहरामध्ये अभिनंदनाच्या बॅनरपासून क्रीडा क्षेत्रातील कोणत्याही कार्यक्रमात मालविकाच्या पराक्रमाची तुतारी वाजल्याशिवाय राहत नाही.

नागपूरच्या या बॅडमिंटनपटूने वरिष्ठ गटाच्या इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेत थेट ऑलिम्पिकपटू साईना नेहवालला आव्हान दिल्यानंतर ती प्रचंड प्रकाशझोतात आली. जानेवारी महिन्यात या नागपूरकर कन्येने अवघ्या ३४ मिनिटांत साईनाचा पराभव करत खळबळ उडवून दिली. ऑलिम्पिक पदकाची शक्यता तिच्या पराक्रमाने निर्माण झाली आहे. अशा वेळी राज्य शासनदेखील मागे राहिले नाही, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी मालविकाच्या तयारी संदर्भात प्रत्यक्ष लक्ष घातले. तिच्या या खेळातील प्रगतीला बघून यापूर्वी जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून ७५ शटलबॉक्स देण्यात आले होते. पालकमंत्री डॉ. नितीन राऊत व क्रीडा मंत्री सुनिल केदार यांच्या पुढाकाराने जिल्हा प्रशासनामार्फत नुकतेच तिच्या ऑलिम्पिक खेळाच्या तयारीसाठी दहा लाख रुपयांचा धनादेश दिला आहे. स्थानिक स्तरावर जिल्हा प्रशासनाने एखाद्या क्रीडापटूला तयारीसाठी थेट मदत करण्याची ही लक्षणीय घटना आहे.

जिल्ह्याचे नाव देशभर करणारी मालविका ही राज्य शासनाच्या अनिवासी क्रीडा प्रबोधिनी नागपूर येथील खेळाडू आहे. त्यामुळे नागपूर क्रीडा प्रशासनालादेखील मालविकाच्या प्रत्येक खेळीची उत्सुकता असते. संपूर्ण राज्याचे लक्ष आता तिच्या खेळावर असून बॅडमिंटन खेळाची मोठी परंपरा असणाऱ्या नागपूर महानगराला आगामी काळात तिच्या भीम पराक्रमाच्या अनेक गोष्टी ऐकण्याची उत्सुकता आहे.

- प्रवीण टाके
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

संसाराचे स्टिअरिंग माझ्या हातात

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत गोंदिया येथील उत्कर्ष लोकसंचालीत साधन केंद्र स्थापित डोंगरुटोला येथील पद्मा वसंत उके यांनी जागृती स्वयंसहायता महिला बचतगटाच्या माध्यमातून आपला उत्कर्ष साधला आहे. रिक्षा चालवून त्या सशक्तपणे आपला संसार चालवत आहेत.

श्रीमती उके या सुरुवातीला बिडीकाम व

शेतमजुरी करत. २००५ मध्ये त्यांच्या महिला बचतगटाची स्थापना झाली. गटाला सुरुवातीला २५ हजार रुपयांचे कर्ज मिळाले. सर्व महिलांनी दोन-दोन हजार रुपये वाटून घेतले. मात्र श्रीमती उके यांना हवे तेवढे कर्ज मिळू शकले नाही. नंतर त्यांनी पुन्हा कर्जासाठी अर्ज करून ५० हजार रुपये कर्ज मिळवले. त्यातून श्रीमती उके यांनी १० हजार रुपयांचे कर्ज घेऊन किराणा दुकान सुरू केले. मात्र गावात नगद कमी आणि उधारी जास्त व वसुलीही वेळेत होत नसल्याने दुकान बंद करावे लागले. त्यानंतर त्या एका वकिलाच्या घरी स्वयंपाकासाठी जाऊ लागल्या, त्यातून त्यांना महिन्याला सहा हजार रुपये मिळायचे.

ग्रामसंस्थेच्या मासिक सभेमध्ये माविम सहयोगिनी ताईने मानव विकास कार्यक्रम योजनेंतर्गत महिलांना ई-रिक्षाच्या योजनेची सविस्तर माहिती दिली. इतर सर्व गटांनी ई-रिक्षा घ्यायला तयारी दाखवली नाही, मात्र श्रीमती उके यांच्या गटाने ही तत्परता दाखवली. 'पद्माबाई तू दुसऱ्याकडे स्वयंपाकाला जाण्यापेक्षा रिक्षा घेऊन चालवं ना' असे गटातील महिलांनी श्रीमती उके यांना प्रोत्साहन दिले. घरच्यांनीही पाठिंबा दिला.

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत उत्कर्ष लोकसंचालीत साधन केंद्र मानव विकास कार्यक्रम वर्ष २०२०-२१ या योजनेमधून १०% रक्कम उभी करत बँकेकडून अर्थसाहाय्य मिळून त्यांनी रिक्षा खरेदी केली.

सुरुवातीला आपण रिक्षा चालवू शकणार की नाही अशी भीती त्यांच्या मनात होती. मात्र माविमच्या पाच दिवसांच्या रिक्षा चालवण्याच्या प्रशिक्षणानंतर त्यांची रिक्षा सुसाट धावू लागली. सकाळी ८ वाजता वकिलाकडे स्वयंपाक व सकाळी ११ ते संध्याकाळी ५ दरम्यान रिक्षा चालवून त्या संसाराला मोठा हातभार लावत आहेत. रिक्षा चालवून दिवसाला २५० ते ३०० रुपये मिळतात. त्यातून मी कर्ज वेळेवर परत करते व घरात देखील खूप मदत करते. त्यामुळे माझ्या घरातील सर्व लोक खूप खूश असल्याचे श्रीमती उके आनंदाने सांगतात आणि म्हणतात,

माविमच्या मदतीने आली
माझ्या हातात ई-रिक्षाची स्टेरिंग...
वाढविणार मी माझ्या
माया बहिणींची डेरिंग

बांबू उद्योगामुळे आयुष्याला कलाटणी

एखाद्या महिलेने ठरवले तर, ती तिचे जीवनमान बदलू शकते. तेही केवळ बांबूच्या कलाकुसरीतून. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, चंद्रपूरच्या मूल गावातील अंजू मोहुर्ले. त्यांनी आवडीचे काम निवडून आपल्या कुटुंबाला समर्थ केले आहे.

श्रीमती मोहुर्ले यांच्यावर त्यांचे कुटुंब अवलंबून होते. मात्र हलाखीच्या परिस्थितीत दररोजची गुजराण करणे कठीण बनले होते. दरम्यान सीएफसीमध्ये त्यांना बांबूपासून विविध वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण मिळाले. यातून त्यांना त्यांचे आवडते काम सापडले. त्या इतर शहरांतील प्रदर्शनांमध्ये भाग घेऊ लागल्या, यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. समाधान मिळाले. कुटुंबाला आर्थिक आधार देऊ शकत असल्याचा त्यांना आनंद आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात बांबू मुबलक प्रमाणात आहे. बांबूपासून बनवलेली उत्पादने, त्यांचा टिकाऊपणा, सुलभ देखभाल, कमी किमतीत मिळणाऱ्या बांबूला आता चांगली मागणी आहे. ग्रामीण महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी बांबू संशोधन आणि तंत्रज्ञान केंद्र, चिचपल्ली आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांनी जिल्ह्यातील पाच विभागामध्ये सामान्य सुविधा केंद्र अर्थात कॉमन फॅसिलिटी सेंटर (सीएफसी)च्या माध्यमातून हा उपक्रम सुरू केला. माविमच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे यांच्या विशेष प्रयत्नाने आणि व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूरमधील ग्रामीण महिलांना २०१८-१९ मध्ये प्रशिक्षण देऊन २०१९- २०मध्ये त्यांच्यामार्फत उत्पादन निर्मिती करण्यात आली. जिल्ह्यात चंद्रपूर, चिचपल्ली, विसापूर, पोंभुर्णा, मूल, चिमूर येथे ७ सीएफसी कार्यरत असून त्याद्वारे एकूण १ हजार २०० बचत गटातील महिलांना बांबू हस्तकलेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या महिला आता सोफा खुर्ची, स्टूल, शू रॅक, सेंटर टेबल, फोल्डेबल स्टूल, टेबल वॉच, व्हायलेट, फ्लॉवर पॉट, फोटो फ्रेम, डायरी, किचन, पेन स्टँड, कोस्टर, ट्रे, गणेशमूर्ती, फूट प्रेस हँड सॅनिटायझर यांसारख्या विविध कलात्मक वस्तू बनवू लागल्या आहेत.

कौशल्याने सावरला संसाराचा गाडा

पोंभुर्णा गावातील रोहिणी खोब्रागडे यांचं छोटंसे किराणा दुकान होतं. मात्र, एका अपघातात पती गमावल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली. दोन मुलांसह सगळ्या कुटुंबाचा भार त्यांच्यावर आला. चंद्रपूरमधील बोधिसत्व बचतगटाशी त्या संलग्न होत्या. त्यांनी सीएफसीमध्ये बांबू क्राफ्टचे दोन महिने प्रशिक्षण घेतले. दृढविश्वास आणि कठोर परिश्रमाने त्यांचे कौशल्य आणि उत्पादनही वाढले. त्या आता महिन्याला ७ ते ८ हजार रुपये कमावत आहेत. डायरी, टी कोस्टर, चरका, टेबल घड्याळ, मेणबत्त्या आणि बऱ्याच गोष्टी तयार करण्यात त्या तरबेज झाल्या आहेत.

- महेंद्र गमरे
व्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ

अवयवदानातही पुढे...

अवयवदान हे सर्वात मोठे दान आहे. मृत्यूनंतरही अवयवांच्या रूपात दुसऱ्याच्या शरीरात जिवंत राहण्याचा तो एक चांगला मार्ग आहे. अवयवदान केल्यास अवयवाअभावी मृत्यूच्या जवळ असलेल्या एखाद्या रुग्णाला आयुष्य जगण्याची आणखी एक संधी मिळू शकते. अवयवदानाच्या या मोहिमेत महिलाही आघाडीवर आहेत. त्याची ही काही प्रातिनिधिक उदाहरणे..

झोया राणा (२१) मूळची नागपूरची. मुंबईला फाईन आर्टचे शिक्षण सुरू असताना सुट्टीमध्ये ती घरी आली. मार्च २०१५ मध्ये सिव्हिल लाईन्स येथे तिचा अपघात झाला. डॉक्टरांनी तिला ब्रेनडेड (मेंदू मृत) घोषित केले. या कसोटीच्या क्षणी झोयाची आई रोझिना राणा यांनी मन घट्ट करून अवयवदानाचा निर्णय घेतला. मृत्यूनंतरही 'मुली'ला इतरांमध्ये जगवण्यासाठी धडपडणारी 'आई'. झोयाच्या अवयवदानामुळे दोन पुरुषांना जीवनदान मिळाले.

गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्याजवळ सहा वर्षाच्या रिव्यानीचा २७ एप्रिल २०१८ ला अपघात झाला. उपचारादरम्यान तिला मेंदू मृत घोषित करण्यात आले. या कठीण प्रसंगी रिव्यानीची आई आरती रहांगडाले यांनी आपल्या लेकीचे अवयवदान करण्याचा निर्धार केला. रिव्यानीच्या अवयवदानामुळे पाच मुलांना जीवनदान मिळाले. रिव्यानीची आई गृहिणी असून त्यांनी या कृतीतून इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

भंडारा जिल्ह्यातील जवाहरनगर गावातील माधुरी गणेश ठाकरे या २२ वर्षीय गृहिणीला ९ मार्च २०२२ रोजी अपघातामुळे मेंदूमृत घोषित करण्यात आले. तिच्या निधनाचे दुःख बाजूला ठेऊन जागतिक महिला दिनी तिचे अवयवदान करून तिच्या निकटवर्तीयांनी समाजासमोर आदर्श ठेवला.

एस. राधाकृष्णन (६१) हे वेकोलिमधून सन २०१३ मध्ये निवृत्त झाले. त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने मेंदू मृत घोषित करण्यात आले. त्यांची पत्नी रमा राधाकृष्णन यांनी या कठीण परिस्थितीतही स्वतःला सावरून पतीचे मूत्रपिंड आणि डोळे दान करण्याचे ठरवले. त्यांचे एक मूत्रपिंड एका २३ वर्षीय तरुणीला, तर दुसरे मूत्रपिंड एका ६३ वर्षाच्या महिलेला बसवण्यात आले. तसेच राधाकृष्णन यांचे दोन्ही डोळे दान करण्यात आले. यामुळे दोघांना दृष्टी मिळाली.

अवयवदानाचे महत्त्व

अवयवदानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी १३ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक अवयवदान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो, तर राष्ट्रीय स्तरावर २७ नोव्हेंबर हा दिवस 'अवयवदान दिन' म्हणून देशभर साजरा केला जातो. एका मेंदू मृत रुग्णामुळे ८ रुग्णांना जीवनदान मिळू शकते. जिवंत व्यक्ती केवळ आपल्या नातेवाइकांसाठीच अवयवदान करू शकतो. याव्यतिरिक्त इतर कोणाला जिवंतपणी दुसऱ्यांसाठी अवयवदान करायचे असल्यास त्यास शासनाची परवानगी घेणे आवश्यक असते. कृत्रिम श्वासोच्छवास प्रणालीवरील ब्रेनडेड रुग्णांच्या नातेवाइकांनी मंजुरी दिल्यास, त्यांचे अवयवदान होऊ शकते. इतर राज्यांच्या तुलनेत अवयवदानात महाराष्ट्र पुढे असल्याचे अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीच्या अध्यक्षा डॉ. विभावरी दाणी यांनी सांगितले.

- अपर्णा यावलकर
माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

पीडित महिलांसाठी 'सखी'

हिंसाग्रस्त महिलेला एका छताखाली समुपदेशन, कायदेविषयक, वैद्यकीय, पोलीस यंत्रणाविषयक, वास्तव (आधार) प्रकारच्या सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात महिला व बालविकास विभाग केंद्र शासन पुरस्कृत सखी वन स्टॉप सेंटर कार्यान्वित आहे. या केंद्राने वर्षभरात २०४ पीडित महिला व २ बालकांना आधार देण्याचे काम केले आहे. पीडित महिलांनी मदतीसाठी १८१, ०२३६२-२२९०३९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी यांनी केले आहे.

२६ जानेवारी २०१८ रोजी तात्पुरत्या स्वरूपात केंद्र सरकारच्या तत्कालीन निर्देशानुसार व महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांच्या सूचनेप्रमाणे जिल्ह्यात वन स्टॉप सेंटर सुरू करण्यात आले. १५ जुलै २०२० पासून कामकाजाला सुरुवात झाली. खासगी, सार्वजनिक, कार्यालयीन अशा कोणत्याही स्तरावरील क्षेत्रात हिंसेला बळी पडलेल्या महिलेला आधार देऊन महिलेला तिच्यावर होणाऱ्या हिंसेविरोधात दिलासा मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही या वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून करण्यात येते. मानसिक आधार

किंवा समुपदेशन, निवासाची तात्पुरती सोय, कायदेविषयक मार्गदर्शन, पोलीस ठाणे संबंधित सेवांची माहिती, वैद्यकीय सेवा, मनोसामाजिक समुपदेशन केले जाते.

ओरोसमधील या सेंटरमधून १५ जुलै २०२२ ते २३ मार्च २०२२ पर्यंत २०४ प्रवेशितांना समुपदेशन सेवा देण्यात आली. ४२ जणांना विधी सेवा, १५ जणांना आरोग्य सेवा, एकाला मनोरंजनात्मक सेवा, २०० जणींना कायदेविषयक सेवा, ११ महिला व २ बालकांना निवासी सेवा, तर ४६ जणींना अन्य इतर सेवा केंद्राच्या वतीने देण्यात आली आहे, अशी माहिती केंद्राच्या प्रशासक ॲड. पूजा काजरेकर यांनी दिली. आसाम, गोवा येथील महिलांना या केंद्रामार्फत सुरक्षित घरी पोहोचवण्यात आले असून केंद्रामार्फत संबंधित महिलांच्या घरांना भेट देऊन पाठपुरावाही केला जातो आहे.

- प्रशांत सातपुते
जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

महाराष्ट्र हे देशातील लोकसंख्याबाबत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून, यामध्ये ११.२ कोटी नागरिक वास्तव्य करत आहेत. महिलांची संख्या साधारण ५.४१ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ४८% आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने लोकसंख्येचा अर्धा भाग असलेल्या महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरण करण्यासाठी महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून सातत्याने नवनवीन उपक्रम व योजना राबवण्यात येत आहेत.

'ती'च्यासाठी योजना

महाराष्ट्र शासनाने जून १९९३ मध्ये महिला व बालविकास विभागाची स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून स्थापना केली. या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट महिला आणि बालक यांचे जगणे, सुरक्षा, विकास आणि समाजात सहभाग याबाबी समग्रपणे झाल्या पाहिजेत यावर लक्ष केंद्रित करणे हे आहे. धोरण तयार करणे, कार्यक्रम/योजना तयार करणे, विकास योजनांची अंमलबजावणी करणे तसेच महिला व बालविकास कार्यात काम करणाऱ्या सरकारी आणि समाजसेवी संस्थांमध्ये समन्वय साधणे ही या विभागाची दायित्वे आहेत. या विभागाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुढीलप्रमाणे :-

शासकीय महिला वसतिगृहे (राज्यगृहे)

उद्दिष्ट : समस्याग्रस्त महिलांना समाजात पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने शासकीय महिला वसतिगृहांची (राज्यगृहे) स्थापना केली आहे.

लाभार्थी-सामाजिक : नैसगिक व अनैसर्गिक संकटे, तसेच असामाजिक कृतीतून निर्माण होणाऱ्या समस्याग्रस्त महिला.

निकष : १६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, घटस्फोटित, कुमारीमाता, लैंगिक अत्याचारित, अनैतिक व्यापारात अडकलेल्या, सामाजिक संकटग्रस्त महिलांना प्रवेश दिला जातो.

लाभाचे स्वरूप : या वसतिगृहांमध्ये महिला स्वेच्छेने, स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने. तसेच पोलिसांमार्फत न्यायालयाच्या आदेशाने दाखल होतात.

या वसतिगृहांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण व प्रशिक्षण सुविधा, तसेच कायदेविषयक सल्ला, समुपदेशन सेवा देणे, तसेच आवश्यक तेथे त्यांचे विवाहद्वारे पुनर्वसन करणे.

वसतिगृहांमध्ये प्रवेश देण्यात आलेल्या महिलेस प्रवेश घेतल्यानंतर किमान ३० दिवसांच्या वास्तव्यानंतर एक वर्षाकरिता सुधारित माहेर योजनेंतर्गत दरमहा एक हजार रुपये अनुदान दिले जाते. महिलेच्या बरोबर तिची लहान मुले असल्यास पहिल्या मुलाला ५०० रुपये व दुसऱ्या मुलासाठी ४०० रुपये दरमहा अनुदान दिले जाते.

राज्यामध्ये १८ जिल्ह्यांमध्ये एकूण २० संस्था कार्यरत असून प्रत्येक संस्थेची मान्य संख्या १०० इतकी आहे व एकूण मंजूर संख्या २००० आहे.

महिला संरक्षणगृहे

उद्दिष्ट : अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ कायद्याखाली ही योजना राबवली जाते. कुंटणखान्यातून सुटका करण्यात आलेल्या सज्ञान महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी संरक्षणगृहे चालवली जातात.

लाभार्थी : अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ कायद्याखाली पोलिसांमार्फत कुंटणखान्यातून सोडवून आणलेल्या व न्यायालयाने आदेशित केलेल्या १८ वर्षांवरील महिलांचे संरक्षण व महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत संरक्षणगृहे चालवली जातात.

लाभाचे स्वरूप : समुपदेशनाद्वारे अनैतिक व्यापारातून परावृत्त करणे, महिलांना त्यांच्या घरी परत पाठवणे, तसेच महिलांचे विवाह करून देणे, व्यवसाय प्रशिक्षण देऊन स्वावलंबी करणे.

प्रवेश देण्यात आलेल्या महिलेस प्रवेश घेतल्यानंतर किमान ३० दिवसांच्या वास्तव्यानंतर एक वर्षाकरिता सुधारित माहेर योजनेंतर्गत दरमहा एक हजार रुपये अनुदान दिले जाते. महिलेबरोबर तिची लहान मुले असल्यास पहिल्या मुलाला ५०० रुपये व दुसऱ्या मुलासाठी ४०० रुपये दरमहा अनुदान दिले जाते.

राज्यात शासकीय संरक्षणगृहे मुंबई व नागपूर येथे कार्यरत असून त्यांची मान्य संख्या २०० आहे. तसेच १ संरक्षण गृहे स्वयंसेवी संस्थामार्फत चालवण्यात येतात.

राज्यातील २० सर्व शासकीय महिला वसतिगृहे/राज्यगृहे यांना अनैतिक व्यापार

प्रतिबंध अधिनियम १९५६ च्या कलम २१ अन्वये संरक्षणगृहाची मान्यता देण्यात आली आहे.

स्वयंसेवी आधारगृहे

उद्दिष्ट : समस्याग्रस्त महिलांना समाजात पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी आधारगृहे चालवली जातात.

लाभार्थी : नैसर्गिक व अनैसर्गिक संकटे व असामाजिक कृतीतून निर्माण होणाऱ्या समस्याग्रस्त महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी.

निकष : १६ ते ६० वर्ष या वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, कुमारीमाता, बलात्कारित अथवा संकटग्रस्त महिला.

लाभाचे स्वरूप : या वसतिगृहांमध्ये महिला स्वेच्छेने, स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने, तसेच पोलिसांमार्फत न्यायालयाच्या आदेशाने दाखल होतात. या संस्थामध्ये महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण व प्रशिक्षण सुविधा आणि कायदेविषयक सल्ला इ. सेवा पुरवण्यात येतात. या योजनेतंर्गत ९५० रुपये इतके साहाय्यक अनुदान दरमहा दरडोई दिले जाते.

प्रवेश देण्यात आलेल्या महिलेस प्रवेश घेतल्यानंतर किमान ३० दिवसांच्या वास्तव्यानंतर एक वर्षाकरिता सुधारित माहेर योजनेंतर्गत दरमहा एक हजार रुपये अनुदान दिले जाते. महिलेबरोबर तिची लहान मुले असल्यास पहिल्या मुलाला ५०० रुपये व दुसऱ्या मुलासाठी ४०० रुपये दरमहा अनुदान दिले जाते. राज्यात सहा जिल्ह्यांमध्ये सहा आधारगृहे कार्यरत आहेत.

स्वाधारगृह योजना

निराश्रीत महिला, कैदी महिला, नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार झालेल्या महिला, कुंटणखान्यातून मुक्त केलेल्या, बलात्कारित, लैगिक अत्याचारास बळी पडलेल्या महिला, हुंडाग्रस्त, एच.आय.व्ही. एडसग्रस्त अशा समस्याग्रस्त महिलांना पुनर्वसनासाठी सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबवली जाते.

लाभाचे स्वरूप : अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी सुविधा खेरीज मेडिकल सेंटर, हेल्प लाईन, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, मानसोपचार केंद्र, समुपदेशन केंद्र इत्यादी लाभ महिलांना पुनर्वसनाच्या दृष्टीने देणे.

उज्ज्वला योजना

उद्दिष्ट : महिला व मुलींच्या मानवी वाहतुकीला आळा घालण्यासाठी, स्त्रिया व मुलींचे लैंगिक शोषण थांबवणे व पीडित महिलांची सुटका करून त्यांना संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी.

लाभार्थी : निराश्रित महिला, कैदी महिला, नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार झालेल्या कुंटणखान्यातून मुक्त केलेल्या, बलात्कारित, लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या हुंडाग्रस्त, एच. आय. व्ही. एडसग्रस्त महिला.

लाभाचे स्वरूप : लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, वेश्या व्यवसायातील पोलिसांनी सुटका केलेल्या स्त्रिया व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व प्रशिक्षण देवून पुनर्वसन केले जाते.

या योजनेचे प्रतिबंध, सुटका, पुनर्वसन, पुनः एकात्मीकरण, पुनःप्रत्यार्पण असे प्रमुख पाच घटक आहेत. नवीन मार्गदर्शक सुचनेनुसार या योजनेवर होणाऱ्या खर्चामध्ये केंद्र शासनाचा ६०% आणि राज्य शासनाचा ३०% व स्वयंसेवी संस्थाचा १०% असा हिस्सा आहे.

वन स्टॉप क्राईसेस सेंटर

संकटग्रस्त महिलांसाठी आवश्यक उपचार व मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी केंद्र शासनाने वन स्टॉप क्राईसेस सेंटर ही योजना सुरू केली आहे. शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक, समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना अशा संकटग्रस्त महिलांना या योजनेच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. या महिलांना वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीससाहाय्य, मानसोपचार, विधिसाहाय्य, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इ.सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येतात.

Sakhi
One Stop Centre
सखी वन स्टॉप सेंटर

लाभाचे स्वरूप : वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीससाहाय्य, मानसोपचार, विधिसाहाय्य, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इ. सुविधा.

मनोधैर्य योजना

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार (पीओसीएसओ), ॲसिड हल्ल्यातील पीडितांना अर्थसाहाय्य देण्यात येते.

लाभार्थी : बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला या प्रकरणात बळी पडलेल्या महिला तसेच १८ वर्षांखालील वयोगटातील अल्पवयीन मुली.

लाभाचे स्वरूप : या प्रकरणात बळी पडलेल्या पीडितांना प्रकरणातील गांभीर्यानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत ३ लाख ते १० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य करण्यात येते.

महिला समुपदेशन केंद्र

महिला व बालकांना समुपदेशन सेवा उपलब्ध करून घ्याव्यात, त्यांच्या बाबतीत घडणाऱ्या अत्याचारास आळा बसावा या हेतूने पोलीस स्टेशनच्या आवारामध्ये महिला समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या प्रत्येक समुपदेशन केंद्रात दोन प्रशिक्षित समुपदेशक नेमण्यात आले आहेत. समुपदेशन केंद्र योजना राबवण्यासाठी समुपदेशन केंद्र स्थापन करणाऱ्या संस्थेस वार्षिक अनुदान देण्यात येते. राज्यात सध्या जिल्हास्तरावर ३९, तर तालुकास्तरावर १०४ समुपदेशन केंद्रांना (एकूण १४३) मान्यता दिली आहे. यापैकी १२९ समुपदेशन केंद्रे सध्या कार्यरत आहेत.

ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी

साहाय्यित नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प सन २०२०-२१ ते २०२५-२६ या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये महिला व बालविकास विभागाच्या वतीने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) राबवण्यात येत आहे.

व्यक्तिगत अनुदान

आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील महिलांना स्वतःच्या कुटुंबास आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी हातभार लावणे शक्य व्हावे, या हेतूने महिलांना खाद्यपदार्थ तयार करून विकणे, मण्यांच्या वस्तू तयार करून विकणे, भाजीपाला विकणे इत्यादी सारखे छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रत्येकी ५०० रुपयांचे एकदाच आर्थिक अनुदान देण्यात येते. यात आर्थिकदृष्ट्या मागास महिलांमधून निराधार, निराश्रित, विधवा किंवा नैतिक संकटात सापडलेल्या महिलांना प्राधान्य देण्यात येते. ही योजना वैयक्तिक लाभाची असून जिल्हास्तरावर राबवण्यात येते.

मुलींना विद्यावेतन

शासनमान्य संस्थेत नर्सिंग, पॅकिंग, टेलिफोन ऑपरेटर, टंकलेखन, संगणक, आयटीआय इत्यादी प्रशिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील महिला व मुलींना प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये दरमहा १०० रुपये विद्यावेतन देण्यात येते.

विवाहासाठी आर्थिक साहाय्य

योजनेचे स्वरूप : अनाथालये, शासकीय महिला वसतिगृहे (राज्यगृहे), संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे व शासन अनुदानित बालगृहे या योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय तसेच स्वयंसेवी संस्था मधील निराश्रित मुलींच्या विवाहाकरिता साहाय्यक अनुदान शासनामार्फत देण्यात येते. अनाथ मुलींच्या पुनर्वसनासाठी शासनाने ही योजना सुरू केलेली असून संस्थेतील प्रवेशितेचा विवाह जमल्यानंतर विहित नमुन्यातील विवाह मान्यता व अनुदान प्रस्ताव संबंधित संस्था अधिक्षक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्यामार्फत विभागीय उप-आयुक्त, महिला व बालविकास यांना सादर करतात व त्यांच्याकडून अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव आयुक्तालयास सादर करण्यात येतो.

लाभाचे स्वरूप : शासकीय महिला वसतिगृहे, संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे, शासन अनुदानित बालगृहे या संस्थामधील अनाथ मुलीच्या विवाहासाठी १ मार्च २०१२ रोजीचा सुधारित शासन निर्णयानुसार सदरचे अनुदान २५,००० रुपये इतके करण्यात आले असून, शासनाच्या वतीने संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, संस्थेतील मुलीच्या विवाहासाठी व संसारापयोगी वस्तू मुलीच्या गरजेनुसार खरेदी करण्यासाठी एकूण २५,००० रुपये इतक्या रकमेचा धनादेश संबंधित मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्याची कार्यवाही करतात.

लाभासाठी अर्हता : १) मुलगी उपरोक्त प्रमाणे संस्थेतील प्रवेशित असावी. २) मुलीचे वय १८ पेक्षा कमी नसावे. ३) मुलीचे दोन्ही पालक हयात असतील अथवा तिचे आई अथवा वडील या दोघांपैकी, एक हयात असतील तर कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २०,००० रुपयांपेक्षा जास्त नसावे. ४) विवाहासाठी इतर कोठूनही आर्थिक साहाय्य मिळाले नसावे.

नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह

नोकरी करणाऱ्या एकल महिला, अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या महिलांकरिता नोकरी करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहेत. सद्यःस्थितीत राज्यात मुंबई उपनगर जिल्ह्यात (६), मुंबई शहर जिल्ह्यात (४), ठाणे जिल्ह्यात (४), पुणे जिल्ह्यात (४) आणि उर्वरित ३२ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक वसतिगृह कार्यरत आहे. या वसतिगृहांची मंजूर प्रवेशित क्षमता १०० इतकी आहे.

देवदासींसाठी कल्याणकारी योजना

देवदासींना निर्वाह अनुदान

ही योजना शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१०/प्र.क्र.२१५ (भाग-२)/का-२, १५ फेब्रुवारी २०११ अन्वये संजय गांधी निरधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजनेमध्ये वर्ग करण्यात आली. शासनातर्फे ४० वर्षांवरील देवदासींना उदर निर्वाहाकरिता दरमहा ६०० रुपये इतके निर्वाह अनुदान देण्यात येते. परंतु ही योजना संजय गांधी निराधार अनुदान योजनेत व आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजनेमध्ये १५ फेब्रुवारी २०११ च्या शासन निर्णयान्वये १ एप्रिल २०११ पासून वर्ग करण्यात आली आहे. ही वैयक्तिक लाभाची योजना असून देवदासींचे प्राबल्य असणाऱ्या ११ जिल्ह्यांमध्ये (मुंबई, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, लातूर व उस्मानाबाद) जिल्हा स्तरावरून राबवण्यात येते.

देवदासी व तिच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान

महाराष्ट्र राज्यात मुंबई देवदासी संरक्षण अधिनियम १९३४ अंतर्गत देवदासी प्रथेवर आळा घालण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी देवदासींचे प्राबल्य असणाऱ्या

११ जिल्ह्यांमध्ये विविध योजना राबवण्यात येतात. यातीलच अविवाहित देवदासी व देवदासींच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान ही योजना महाराष्ट्रात राबवली जात आहे. हे अनुदान १८ वर्षांवरील देवदासी किंवा देवदासीच्या मुलीच्या विवाहासाठी दिले जाते. १ मार्च २०१२ रोजीच्या शासन निर्णयनुसार देवदासी / देवदासींच्या मुलींना विवाहासाठी विवाह सोहळ्याच्या खर्चाकरिता मुलगी पदवीधर नसल्यास २५,००० रुपये तसेच जर पदवीधर असेल तर ५०,००० रुपये तिच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यावर जमा करण्यात येतात.

देवदासींच्या मुलामुलींना गणवेश व शालेय साहित्यासाठी अनुदान

शासन निर्णय १ मार्च २०१२ नूसार देवदासींच्या मुलामुलींसाठी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींना शिक्षणास मदत होण्यासाठी मुलासाठी १६०० रुपये व मुलीसाठी १७५० रुपये एवढे दरडोई अनुदान वर्षातून एकदा देण्यात येते. या अनुदानासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

दिवंगत लताताई पुरस्कार सकट योजना

देवदासींची अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे करत असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना वर्षभराच्या कार्यक्रमांना व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनातर्फे १०,००० रुपये प्रोत्साहनपर अनुदान वर्षातून एकदा देण्यात येत होते. यामध्ये सुधारणा करून देवदासी कल्याणाचे काम करणाऱ्या दिवंगत लताताई सकट यांच्या नावाने राज्य स्तरावर व्यक्तीला १,००,००० रुपयांचा पुरस्कार तसेच दोन संस्थांना ५०,००० रुपयांचा पुरस्कार याप्रमाणे पुरस्कार योजना शासन निर्णय १ मार्च २०१२ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहे.

देवदासीच्या मुलामुलींकरिता वसतिगृह

देवदासींच्या मुलामुलींना योग्य शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यांत देवदासींच्या मुलामुलींकरिता वसतिगृह ही योजना राबवण्यात येत असून या योजनेंतर्गत दोन स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. संस्थेस लाभार्थींच्या परीरक्षणासाठी दरमहा दरडोई ९५० रुपये देण्यात येते.

बहुउद्देशीय महिला केंद्र

महिलांच्या विकासाकरिता महिलांना माहिती उपलब्ध होण्याची व ती समजण्याची नितांत गरज आहे. महिलांना आवश्यक तो सल्ला व मार्गदर्शन तसेच आपद्ग्रस्त महिलांना मदत मिळावी या दृष्टीने योजना राज्यात मुंबई, पुणे, नाशिक व औरंगाबाद या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे बहुउद्देशीय महिला केंद्र कार्यरत आहेत.

महिलांना मोकळ्या वातावरणात विचारांची देवाण-घेवाण, मुक्त चिंतन करता यावे तसेच महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणाविषयी व नोकरी आणि कायदेविषयक सल्ला देऊ शकतील, याकरिता बहुउद्देशीय महिला केंद्र नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थामार्फत दोन जिल्ह्यांच्या ठिकाणी कार्यरत आहेत.

बहुउद्देशीय महिला केंद्रामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण, नोकरी व कायद्याची माहिती आणि मार्गदर्शनाकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग, वाचनालयाची आणि पाळणाघराची सुविधा, विविध विषयावरील चर्चासत्रे व शिबिरे, जनजागृती अशा विविध सुविधा स्वयंसेवी संस्थेद्वारे उपलब्ध करून देण्यात येतात.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली झाली असून आयोगाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे. आयोगाच्या मुख्यालय मुंबई येथे आहे. हे लक्षात घेऊन राज्य महिला आयोगाची कार्यालये सर्व विभागीय आयुक्तालयांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी सुरू करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे ही सर्व कार्यालये कार्यान्वित करण्यात आली आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, पोलीस यंत्रणा, आरोग्य विभागाची मदत घेऊन पीडितांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयोग काम करत आहे.

राज्यातील दुर्लक्षित पीडित व समस्याग्रस्त महिलांना मोफत समुपदेशन मिळावे हा आयोगाच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत आतापर्यंत २५० समुपदेशन केंद्रांना जिल्हा परिषद पंचायतसमिती नगरपालिका व नगरपरिषद स्तरावर सहमती देण्यात आली आहे. राज्यातील व राज्याबाहेरील महिलांना आयोगाविषयी माहितीची गरज लागल्यास त्यांना ही माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून महिला आयोगाची वेबसाईट (संकेतस्थळ) बनवून महिलांसाठी असणाऱ्या सुविधा व कायद्याची माहिती अद्ययावत करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ कालावधीत अर्थसाहाय्य

कोविड-१९ कालावधीत देहविक्रय करून उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० या कालावधीकरिता दरमहा ५,००० रुपये तसेच त्यापैकी ज्या महिलांची मुले शाळेत जातात अशा महिलांना एका मुलाकरिता २५०० रुपये प्रमाणे दोन मुलांपर्यंत रोख स्वरूपात आर्थिक साहाय्य थेट लाभ हस्तांतर पद्धतीद्वारे कोणत्याही ओळखपत्राचा आग्रह न धरता अदा करण्याकरिता मुख्यमंत्री साहाय्यता निधीमधून एकूण ५७ कोटी ७५ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निधी

राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिला व बाल सशक्तीकरण या सर्वसमावेशक योजनेकरिता जिल्हा नियोजन समितीस नियोजन विभागाकडून मिळणाऱ्या एकूण निधीच्या किमान ३% इतका निधी कायमस्वरूपी महिला व बालविकास विभागाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांच्या विकासासाठी शासनातर्फे त्रिस्तरीय धोरण राबवण्यात येत असून महिला सबलीकरण आणि बालकांचा विकास, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि एकात्मिक बालविकास सेवा योजना यांचा विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

संकलन : शैलजा पाटील
विभागीय संपर्क अधिकारी

ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेले पदार्थ आणि वस्तू ऑनलाईन विक्री करता याव्यात, यासाठी राज्य कक्षाने स्वत:चे पोर्टल विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. यामध्ये स्वयंसाहाय्यता गटांना आपल्या वस्तू व पदार्थ थेट जगभरातील ग्राहकांना विकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या सर्व प्रयत्नातून निश्चितच येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण महिलांच्या दारिद्र्य निर्मूलनासाठी मदत होणार असून आश्वासक चित्र दिसणार आहे.

व्यापक व आश्वासक 'उमेद'

परमेश्वर राऊत

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची २०१० मध्ये १२ राज्यात आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण देशभर अंमलबजावणी झाली. महाराष्ट्रात २०११ मध्ये महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान (उमेद) या नावाने या अभियानाची अंमलबजावणी सुरू झाली. १२ जिल्ह्यातील काही निवडक तालुक्यांमध्ये लक्षकेंद्री पद्धतीने, तर उर्वरित राज्यात Non-Intensive पद्धतीने हे अभियान राबवण्यात येत आहे.

योजना नव्हे अभियान !

दारिद्र्य निर्मूलनासाठी समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना प्रेरित करून ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या सक्षम व स्वायत्त संस्था उभारून त्यांना वित्तीय सेवांचा लाभ मिळवून देत उपजीविकेचे सर्वांगीण आणि शाश्वत स्रोत निर्माण करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. उद्दिष्टपूर्ततेच्या पलीकडील व्यापक दृष्टी, अपेक्षित परिणामांसाठी कटिबद्ध आणि विकास प्रक्रिया घडून येण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे असे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रात या अभियानाला 'उमेद' असे नाव देण्यात आले आहे. प्रत्येक उपेक्षित, वंचित, सक्षम होण्यास सिद्ध असणाऱ्या ग्रामीण नारीशक्तीची उमेद. राज्यातील ५२ लाखांपेक्षा जास्त ग्रामीण महिलांचे हक्काचे व्यासपीठ आणि आधार असलेले हे अभियान म्हणजे 'उमेद अभियान' आहे.

महाराष्ट्रात या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यात आलेली आहे. क्षेत्रीय स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हे अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र, समर्पित व संवेदनशील मनुष्यबळ व अंमलबजावणी यंत्रणा प्रस्थापित करण्यात आलेली आहे.

अभियानांतर्गत गरिबी निर्मूलनाचा समग्र विचार केलेला असून यामध्ये समुदाय विकासापासून ते शाश्वत उपजीविका निर्माण करण्याच्या सर्व बाबींचा समावेश आहे. सामाजिक समावेशन, आर्थिक समावेशन, वित्तीय समावेशन व सार्वजनिक सेवांची उपलब्धी व विकास योजनांचा लाभ हे या अभियानाचे आधारस्तंभ आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्त्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्याचे काम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत करण्यात येत आहे.

समुदाय संघटनांच्या माध्यमातून गावातील गरीब, गरजू व वंचित कुटुंबातील महिलांचे स्वयंसाहाय्यता समूह तयार करून या समूहाचे गावनिहाय ग्रामसंघ तयार करण्यात येत आहेत. ग्रामसंघाच्या माध्यमातून विविध पथदर्शी प्रकल्प राबवणे, शासकीय योजनेचा लाभ मिळवणे, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांची भागीदारी वाढवणे, समुदाय संसाधन व्यक्तीची निवड करून त्यांची क्षमता बांधणी करणे, गाव विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये महिलांचा समावेश होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, महिला समूहांनी तयार केलेल्या विविध उत्पादनास वेगवेगळ्या पद्धतीने बाजारपेठ मिळवून देण्याचे तसेच उत्पादनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्याचे काम या अभियानामार्फत करण्यात येत आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनाचा राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती

अभियान हा एकमेव समग्र असा कार्यक्रम आहे. अभियानामार्फत तयार झालेल्या समुदायस्तरीय संस्था ह्या विविध विकास योजनाच्या वाहक म्हणून कार्य करत आहेत. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, पोषण आहार, आरोग्य, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अधिनियम, सामाजिक सुरक्षा योजना इत्यादी महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ घेण्याकरिता समुदायस्तरीय संस्था सातत्याने प्रयत्न व पाठपुरावा करत आहेत. त्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी हे अभियान अत्यंत उपयुक्त आहे.

अभियानाचा वाढता व्याप...

अभियानाच्या आजच्या स्थितीचा विचार करताना अभियानाची वाटचाल निश्चितच यशस्वीतेकडे जाणारी आहे, असेच म्हणावे लागेल. राज्यातील साधारण २७७५० ग्रामपंचायतीमध्ये आणि ३९३८७ गावांमध्ये उमेद अभियानाचे अस्तित्व आहे. ग्रामीण महाराष्ट्रात या अभियानांतर्गत ५ लाख ७० हजार ६८५ स्वयंसाहाय्यता गट कार्यरत

आहेत. सुमारे ५५ लाख ९२ हजार ५०५ ग्रामीण कुटुंब यामध्ये समावेश आहे. याचाच अर्थ किमान ५६ लाखांपेक्षा जास्त महिलांचा सहभाग या अभियानात आहे. अभियानाकडून २ लाख ७९ हजार ४८० स्वयंसाहाय्यता गटांना फिरता निधी ४२४ कोटी रुपये एवढा वितरित केलेला आहे. समुदाय गुंतवणूक निधी ६० हजार ३३६ गटांना ४२५ कोटी एवढा वितरित केला आहे.

उमेदचा उपजीविका उपक्रम

राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान

उद्दिष्टानुसार योजना, स्वयंरोजगार आणि ग्रामीण महिलांच्या संघटनेला प्रोत्साहन देण्यावर केंद्रित आहे. या कार्यक्रमामागची मूलभूत संकल्पना ग्रामीण महिलांना संघटित करणे आणि त्यांना स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे ही आहे. ग्रामीण भागातील महिलांची शाश्वत उपजीविका वृद्धी करणे तसेच त्यांना शाश्वत शेती, पशुपालन, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग याकरिता तांत्रिक मार्गदर्शन करण्याबरोबरच शासनाच्या इतर योजनांचा लाभ देण्याचे प्रयत्न केले जातात.

गरीब कुटुंबांना लाभदायक स्वयंरोजगार आणि कुशल वेतन-रोजगाराच्या संधींचा लाभ मिळवून देणे, गरिबी कमी करण्यासाठी, ज्यामुळे गरीबांच्या मजबूत आणि शाश्वत तळागाळातील संस्था उभारून त्यांच्या उपजीविकेमध्ये शाश्वत आधारावर लक्षणीय सुधारणा होते. स्वयंसाहाय्यता गटातील समान उत्पादन घेणाऱ्या पिकावर आधारित १५ ते ४० महिलांचे उत्पादक गट तयार करणे, एकाच गावातील किंवा शेजारच्या २ ते ३ गावातील उत्पादक गटांची मिळून शेतकरी उत्पादक कंपनी तयार करणे, तिची नोंदणी 'रजिस्ट्रार ऑफ कंपनी'स कडे करणे, संचालक मंडळातील महिलांना प्रशिक्षण देणे व क्षमता बांधणी करणे, एकत्रित कृषी निविष्ठा खरेदी करण्याबाबत मार्गदर्शन व अंमलबजावणी करण्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. तसेच उत्पादित केलेल्या शेतमालाची विक्री एकत्रित केल्यामुळे मध्यस्थांची दलाली कमी होऊन शेतकरी महिलांना थेट फायदा होतो. कंपनीचा व्यवसाय आराखडा तयार करणे, सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे या बाबी उमेदच्या मदतीने स्वयंसाहाय्यता गटाच्या महिला पूर्ण करतात. महिला शेतकऱ्यांची १९ उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

उमेदचे लक्ष्य

उमेद अभियानांतर्गत सहभागी सर्व महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांना किमान वार्षिक उत्पन्न प्रत्येकी १ लाख रुपये एवढे करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्यातील ग्रामीण महिलांना कृषी आधारित सुमारे ३१ लाख ४८ हजार ९५० महिलांचे व्यवसाय सुरू आहेत, तर बिगर कृषी आधारित उपजीविका उपक्रम १ हजार ६३४ महिलांनी सुरू केले आहेत.

२०२२-२३ या आर्थिक वर्षात अभियानातील महिलांच्या उपजीविका उपक्रमात वाढ होऊन त्या आत्मनिर्भर व्हाव्यात, या हेतूने उपजीविका वर्ष म्हणून घोषित केले आहे. विशेष स्वरूपाचे महाजीविका अभियान राज्यभर सुरू करण्यात आले आहे. या अभियानामुळे उपजीविका वृद्धी करू इच्छिणाऱ्या महिलांना व्यवसाय प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षण तसेच आवश्यक पतपुरवठ्यासाठी मदत होणार आहे.

अभियानातील ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेले पदार्थ आणि वस्तू ऑनलाईन विकता यावेत, यासाठी अमेझॉन आणि फ्लिपकार्ट या ऑनलाईन कंपन्यासोबत करार करून सद्य:स्थितीत दोन्ही पोर्टलवर वस्तूदेखील उपलब्ध आहेत. हीच गरज ओळखून राज्य कक्षाने स्वत:चे पोर्टल विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. यामध्ये जगभरातील ग्राहकांना स्वयंसाहाय्यता गटांना आपल्या वस्तूंची व पदार्थांची थेट विक्री करण्याची संधी मिळणार आहे. या सर्व प्रयत्नातून निश्चितच येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण महिलांचे दारिद्र्य दूर होण्यास मदत होणार आहे.

लेखक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे अतिरिक्त संचालक आहेत.

राष्ट्रीय-सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी बारामतीच्या सादिया सलीम सय्यद हिने मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते पुण्याच्या लाल महालापर्यंत दौड केली. शिवजयंती दिनी हा उपक्रम राबवून सादियाने छत्रपती शिवाजी महाराजांना अनोखे वंदन केले.

शिवरायांना अनोखे वंदन!

संग्राम इंगळे

सामाजिक ऐक्याबरोबरच शिक्षणात मुलींचा टक्का वाढवण्यासाठी सादिया विशेष प्रयत्न करत आहे. तिच्या या सामाजिक उपक्रमांची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकत तिला शुभेच्छा दिल्या. मूळची बारामतीची रहिवासी असलेली सादिया सलीम सय्यद ही सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. ती सध्या पुण्यात एका सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी करते. नोकरी करतानाच सादियाने आपला धावण्याचा छंद जोपासला आहे. सादिया उत्कृष्ट धावपटू असून तिने शालेय जीवनापासून अनेक स्पर्धांमध्ये यशस्वी कामगिरी केली आहे. सादिया बारामती स्पोर्ट्स फाऊंडेशनची सदस्या आहे. बारामती स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या विविध उपक्रमांमध्ये ती सहभागी होत असते.

१८० किलोमीटरचे अंतर पार

घराची, नोकरीची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत सादियाने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राष्ट्रीय-सामाजिक एकतेचा संदेश देण्यासाठी शिवजयंतीचे (१९ फेब्रुवारी) औचित्य साधून बारामती स्पोर्ट फाऊंडेशनच्या माध्यमातून तिने मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते पुण्याच्या लाल महालापर्यंत १८० किलोमीटर अंतर धावण्याचा संकल्प सोडला होता. त्यासाठी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला तिने मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथून धावायला सुरुवात केली. शिवजयंतीच्या दिवशी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सादिया पुण्याच्या लाल महालात पोहोचली. लाल महालात तिने जिजाऊ माँसाहेब व छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन केले.

उपमुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

सादियाच्या या उपक्रमात तिला बारामती स्पोर्ट्स फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मोलाची साथ दिली. 'आयर्न मॅन' पुरस्काराचे मानकरी सतीश ननवरे यांच्यासह २५ धावपटूंनी तिला या उपक्रमात प्रोत्साहन दिले. गेट वे ऑफ इंडिया ते लाल महालपर्यंतच्या प्रवासात सादियाचे अनेक ठिकाणी स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. तिच्या या सामाजिक उपक्रमांची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिला शुभेच्छा दिल्या.

मुलींना शिकवा, आत्मनिर्भर करा !

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व मोठे आहे. मी कठीण परिस्थितीत माझे शिक्षण पूर्ण केलं आहे. शिक्षणामुळे आपले जीवन बदलू शकते, हा माझा स्वत:चा अनुभव आहे. त्यामुळे समाजातल्या प्रत्येक मुलीला शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी मी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेसोबत काम करत आहे. शिक्षणाच्या या चळवळीत सर्वांनी सहभागी व्हावे. पालकांनीसुद्धा आपल्या मुलींना शिकवावे आणि आपल्या पायावर उभे करावे, असे सादिया सांगते.

गेल्या दोन वर्षांपासून विविध संकटांवर मात देत राज्य शासन काम करत आहे. दोन वर्षांच्या कालावधीत घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होताना दिसत आहे. या निर्णयांमुळे विविध प्रकल्पांचा शुभारंभ होत आहे, अनेक प्रकल्पांचे भूमिपूजन, शुभारंभ होत आहेत. तसेच योजनांच्या कार्यपूर्तीचा, प्रकल्पांचा आढावा घेण्याचे काम सातत्याने होत आहे, अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

पाऊल पडते पुढे

वॉटर टॅक्सीसेवेचा शुभारंभ

देशात पहिली रेल्वे सेवा मुंबई-ठाणे दरम्यान सुरू झाली. त्यानंतर देशात त्याचे जाळे विस्तारले. मुंबईतून जी सुरुवात होते त्या सुविधांचा प्रसार आणि अनुकरण संपूर्ण देशात होते हे आजवर दिसून आले आहे. आज देशातील पहिल्या वॉटर टॅक्सी सेवेचा शुभारंभही मुंबईतून होत आहे, याचा अभिमान असल्याचे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बेलापूर जेट्टी आणि बेलापूर मुंबई वॉटर टॅक्सी सेवेच्या उद्‌घाटन प्रसंगी काढले.

महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत बेलापूर येथून सुरू करण्यात आलेल्या वॉटर टॅक्सीचा शुभारंभ आणि बेलापूर जेट्टीच्या उद्‌घाटन सोहळ्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, बंदरे विकास मंत्री अस्लम शेख, राज्यमंत्री अब्दुल सत्तार, खासदार राजन विचारे, आमदार रविंद्र फाटक, मंदा म्हात्रे, ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्यासह वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते.

एनसीसी चमूचे यश गौरवास्पद

नवी दिल्लीत राजपथावर झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलनात सर्वोत्कृष्टतेचा प्रधानमंत्री ध्वज (प्राईम मिनिस्टर्स बॅनर) महाराष्ट्राच्या राष्ट्रीय छात्रसेनेच्या चमूने पटकावला आहे. तसेच महाराष्ट्र संचालनालयाने सर्वोत्कृष्ट संचालनालयाचे पारितोषिक पटकावले आहे. ही बाब महाराष्ट्रासाठी गौरवास्पद असल्याचे उद्‌गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले.

महाराष्ट्र राष्ट्रीय छात्रसेनेच्या या यशासाठी आयोजित कौतुक सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. ठाकरे बोलत होते. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, राष्ट्रीय छात्रसेनेच्या महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल वाय. पी. खंडुरी तसेच राष्ट्रीय छात्रसेनेचे वरिष्ठ अधिकारी, प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी तसेच विविध पारितोषिक पटकावणारे छात्रसैनिक उपस्थित होते.

बेलापूर जेट्टी आणि बेलापूर मुंबई वॉटर टॅक्सी सेवेचा उद्‌घाटन कार्यक्रम.

विमानतळ विकासकामांचा आढावा

रत्नागिरी विमानतळावरून लवकरात लवकर प्रवासी वाहतूक सुरू व्हावी, याकरिता पायाभूत सुविधांकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या अनुषंगाने विमानतळाच्या परिसरातील विकासकामांचे सुनियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

रत्नागिरी विमानतळ विकासाबाबत मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली या वेळी ते बोलत होते. या वेळी परिवहन मंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. अनिल परब,

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, विमानचालन संचालनालयाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी डॉ. बी.एन. पाटील, तटरक्षक दलाचे अधिकारी आदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

उपनगरीय नवीन रेल्वेसेवांचा शुभारंभ

ठाणे आणि दिवा दरम्यानच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेमुळे अथकपणे धावणाऱ्या मुंबईकरांच्या जीवनाला अधिक गती येईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला, तर पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे काम करताना अडचणींचा सामना करत राज्य आणि केंद्र शासनाच्या समन्वयातून हा प्रकल्प पूर्ण झाल्याचे सांगत एका अर्थाने 'दिवा'स्वप्न पूर्ण झाल्याची भावना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी व्यक्त केली.

दूरदृश्य प्रणालीद्वारे प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते ठाणे आणि दिवा दरम्यानच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचे लोकार्पण आणि उपनगरीय नवीन रेल्वेसेवांचा शुभारंभ झाला. या वेळी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

ठाणे रेल्वे स्थानक येथे झालेल्या सोहळ्यात केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, खासदार राजन विचारे, डॉ. श्रीकांत शिंदे, विनय सहस्त्रबुद्धे, मनोज कोटक, आमदार संजय केळकर, प्रमोद पाटील, निरंजन डावखरे, महापौर नरेश म्हस्के, रेल्वे बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डी.के.त्रिपाठी, ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदनिकांच्या बांधकामाचा ई-शुभारंभ

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे आणि खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) गोरेगाव पुनर्विकास प्रकल्पातील प्रलंबित सदनिकांच्या बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. गोरेगावच्या प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई, वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख, गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज उर्फ बंटी पाटील, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती विनोद घोसाळकर, खासदार प्रियांका चतुर्वेदी, आमदार कपिल पाटील, विलास पोतनीस, सुनिल प्रभू, विद्या ठाकूर, विद्याताई चव्हाण, माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, डॉ. योगेश म्हसे आदी उपस्थित होते.

प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन

अलिबाग तालुक्यातील उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचा भूमीपूजन सोहळा दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते, तर ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे तर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री कु. आदिती तटकरे, आरोग्य मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, खासदार सुनिल तटकरे, आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. महेंद्र कुरा आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक

मराठा समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी तातडीने स्वतंत्र समर्पित मागासवर्ग आयोग गठित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत राज्य शासन व मंत्रिमंडळ उपसमितीने मराठा समाजाबाबत आजवर घेतलेल्या विविध निर्णयांच्या अंमलबजावणीचा विस्तृत आढावा घेण्यात आला. तसेच प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कालबद्धरीतीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) अशोक चव्हाण, समितीचे सदस्य महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती, महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी तसेच संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते.

कृती आराखडा अहवालाचे लोकार्पण

बदलत्या वातावरण स्थितीला सामोरे जाताना मुंबई महानगराचे वातावरण सक्षम बनवण्यासाठी तसेच मुंबईतील विकासकामांना शाश्वत दृष्टिकोन प्रदान करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका निर्मित 'मुंबई वातावरण कृती आराखडा अहवाल'चे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दूरदृश्य पद्धतीने करण्यात आले. या वेळी पर्यावरण, पर्यटन आणि राजशिष्टाचार मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, खासदार अरविंद सावंत, आमदार सुनील शिंदे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, पर्यावरणीय व वातावरणीय बदल विभागाच्या प्रधान सचिव

मनीषा म्हैसकर आदी उपस्थित होते.

स्थायी मंत्रिगटाची बैठक

जीएसटी चोरी रोखण्यासाठी बायोमेट्रिक प्रणालीचा प्रभावी वापर, व्यावसायिकांच्या पडताळणीसाठी कार्यस्थळाची प्रत्यक्ष पाहणी, यंत्रणेद्वारे उपलब्ध माहितीच्या आधारे व्यावसायिकांच्या आर्थिक व्यवहारांची प्रत्यक्ष तपासणी, बोगस व्यावसायिक नोंदणी रोखण्यासाठी प्रत्यक्ष तपासणी, जीएसटीएन नोंदणीवेळी वीजग्राहक क्रमांक अनिवार्य करणे, करदात्यांच्या बँकखात्यांचे 'एनपीसीआय' कडून प्रमाणीकरण, संशयित व्यावसायिकांचे गैरव्यवहार शोधण्यासाठी 'फिडबॅक' यंत्रणेची स्थापना अशा सात शिफारशी

अजित पवार
उपमुख्यमंत्री

जीएसटी परिषदेत करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या विविध राज्यांच्या स्थायी मंत्रिगटाच्या दुसऱ्या महत्त्वपूर्ण बैठकीत घेण्यात आला. या वेळी हरयाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला, तामिळनाडूचे वित्तमंत्री डॉ. पालनिवेल थियागा राजन, आसामाच्या वित्तमंत्री अजंता नियोग यांनीही बैठकीत विचार मांडले.

संशोधन केंद्राचे उद्घाटन

पशुवैद्यक महाविद्यालय परळ-मुंबई येथे 'प्राणिजन्य अन्न सुरक्षेविषयी उत्कृष्ट प्रगत संशोधन केंद्राचे' उद्घाटन आणि गोरेगाव येथील विद्यार्थी वसतिगृह इमारतीचे ऑनलाईन भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, पशुसंवर्धन विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ. आशिष पातुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

विविध विकास प्रकल्पाचे उद्घाटन

पुणे शहर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेमाच्या प्रेरणेसाठी प्रसिद्ध आहे. पुण्याने शैक्षणिक, संशोधन आणि विकास, माहिती तंत्रज्ञान आणि वाहन उद्योग क्षेत्रात आपली ओळख प्रस्थापित केली आहे. त्यामुळे आधुनिक सुविधा गरजेच्या असून त्यासाठी सुरू करण्यात आलेल्या विकास प्रकल्पांसाठी केंद्र सरकार सहकार्य करेल, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

पुणे येथील एमआयटी महाविद्यालय मैदानावर आयोजित विविध विकास प्रकल्पाचे उद्घाटन आणि भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उद्योगमंत्री सुभाष देसाई, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

मेट्रो मार्गाच्या कामाची पाहणी

केंद्राकडून परवानगीची प्रक्रिया पूर्ण करून मुंबईतील दुसरा मेट्रो मार्ग मार्चमध्ये कार्यान्वित करू, अशी ग्वाही पर्यावरण तथा राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली.

एमएमआरडीएच्या माध्यमातून तयार होत असलेल्या अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व यादरम्यानच्या तयार मुंबई मेट्रो ७ च्या पहिल्या टप्प्याची ट्रायल रन पार पडली. आरे, दिंडोशी आणि कुरार या मेट्रो स्थानकदरम्यानच्या कामाची नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पाहणी केली.

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आरे, दिंडोशी, कुरार अशा तीन स्थानकांदरम्यान ट्रायल रन घेऊन यावरील कामाची पाहणी केली. या मेट्रोमार्गाचे काम जवळपास पूर्ण झाले असून यादरम्यान सेवा सुरू करता येणे शक्य असल्याबाबत त्यांचे एकमत झाले. एमएमआरडीएचे आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी झालेल्या कामांची माहिती त्यांना दिली. या ट्रायल रननंतर बोलताना त्यांनी झालेली कामे समाधानकारक असून आता फक्त परवानगीची प्रक्रिया पूर्ण करणे बाकी

एकनाथ शिंदे
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

असल्याचे सांगितले. ती प्रक्रिया येत्या काही दिवसात पूर्ण करून मुंबईतील दुसऱ्या मेट्रो मार्गाचा एक टप्पा सुरू करणे आपल्याला शक्य होईल, असे मंत्री आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले.

महिला सबलीकरणाची आवश्यकता

समाज आणि देशाच्या विकासासाठी महिलांना सबळ करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी केले.

राज्य महिला आयोगाच्या वतीने आदिशक्ती प्रेरणा पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

जयंत पाटील
जलसंपदा मंत्री

सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या कार्यक्रमाला उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे, डॉ. इंदिरा हिंदुजा उपस्थित होते.

महिलांकडे कौशल्यपूर्ण काम करण्याची नैसर्गिक गुणवत्ता असते. त्यांना संधी दिली तर त्या अतिशय उल्लेखनीय काम करतात. समाज आणि देशाच्या विकासासाठी महिलांना विविध क्षेत्रात संधी दिली पाहिजे, असे जलसंपदा मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. या वेळी लोहारा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दिपमला भेंडे, सहायक पोलीस निरीक्षक शुभांगी आगाशे, पोलीस कर्मचारी रेणुका सांगळे, प्रतिमा डेरे, रजनीगंधा गेडाम, संध्या दूरधवे, औरंगाबाद जिल्ह्यातील टपरगावच्या सरपंच रुपाली मोहिते, उपसरपंच वैशाली तुपे, सीमा भगवान, संध्या मोहिते, नाशिकच्या माधुरी आहेर, संगीता टेकाडे, नगरच्या ॲड. रंजना पवार-गवांदे, पोलीस उपायुक्त नियती ठाकर-दवे, सहायक पोलीस निरीक्षक सुरेखा धस, पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्या दीक्षा दिंडे, मनिषा तोकले यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्य नाट्यस्पर्धेचे उद्घाटन

समाजामध्ये बदल घडवण्याची ताकद नाटकांमध्ये असून महाराष्ट्राच्या या संतांच्या भूमीला नाटकांमधून विचारांचे बळ मिळाले असल्याचे गौरवोद्गार महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या 'हीरकमहोत्सवी राज्य नाट्यस्पर्धेचे' राज्यस्तरीय उद्घाटन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे व सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, उपसचिव विलास थोरात, सांस्कृतिक कार्य

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे उपस्थित होते.

जिल्हा व ग्रामीण मार्गाची दर्जोन्नती

राज्यातील काही रस्त्यांवरील वाहतुकीची वर्दळ, रस्त्यांचा एकूण होणारा वापर विचारात घेता परभणी, बीड, औरंगाबाद जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्ग हे राज्य मार्गात तर ग्रामीण मार्ग प्रमुख जिल्हा मार्गात दर्जोन्नत करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी या रस्त्यांच्या दर्जोन्नतीला मान्यता दिली असून त्याचे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे.

या मार्गावरील गावांची संख्या, लोकसंख्या, रस्त्यांवरील वाहतुकीची वर्दळ, रस्त्यांचा एकूण होणारा वापर विचारात घेऊन मार्गांचा दर्जा वाढवण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य मार्ग २५३ पासून ढेंगळी पिंपळगाव-झोडगाव-तिडी-पिंपळगाव गुळी धामणगाव, राज्य मार्ग २२१ देऊळगाव गात डासाळा ते

अशोक चव्हाण
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

जिल्हा सरहद्द रस्ता हा सुमारे २७.७०० कि.मी.चा प्रमुख जिल्हा मार्ग २७ रस्ता दर्जोन्नत करण्यात आला असून तो आता राज्य मार्ग ४३२ या क्रमांकाने ओळखला जाणार आहे. परभणी जिल्ह्यातील पिंपरी बु. ग्रामीण मार्ग ३९ पासून ते सेलू राज्य मार्ग २२१ पर्यंतचा ५ कि.मी. लांबीचा रस्ता ग्रामीण मार्ग-१३६ या नावाने दर्जोन्नत करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग ६१ गंगामसला - आडोळा - सोमठाणा - छत्रबोरगाव - आळसेवाडी - मंजरथ - आबुजवाडी सादोळा - पुरुषोत्तमपुरी - महातपुरी - डुब्बाथडी - काळेगावथडी - हिवरा (बु.), कवडगाव थडी - गव्हाणथडी - सुर्डी - नजिक राज्य महामार्ग ५० पर्यंतचा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्गाचा भाग असून हा ५३.१०० कि.मी. लांबीचा रस्ता आता प्रमुख जिल्हा मार्ग ७७ मध्ये दर्जोन्नत करण्याचा निर्णय घेतला आहे.

औरंगाबाद जिल्हातील प्रमुख जिल्हा मार्ग ५३ पासून गाडीवाट - गाजीपूर - लाखेगाव - नांदलगाव - काटगाव - धुपखेडा - दिन्नपूर - जळगाव - ७४ - ढाकेफळ - मुलानी वाडगाव - शेवता हा १३.५०० कि.मी.चा इतर जिल्हा मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग १२५ मध्ये दर्जोन्नत करण्यात आला आहे. पाचोड लिंबगाव - हर्षी - सोनवाडी - प्रमुख जिल्हा मार्ग - ३६ - पारुंडी तांडा आडुळ - मुमराबाद हा १३ कि.मी.चा इतर जिल्हा मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग १२६ म्हणून दर्जोन्नत करण्यात आला आहे.

केंद्रांवर कारवाई

शिवभोजन केंद्रांबाबतच्या तक्रारी लक्षात घेता नियमांचे पालन न करणाऱ्या शिवभोजन केंद्रांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहे.

मंत्रालयातील दालनात शिवभोजन थाळी योजनेसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, या वेळी मंत्री श्री.भुजबळ बोलत होते. या वेळी अन्न, नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे, सहसचिव सुधीर तुंगार, सहसचिव चारुशीला तांबेकर व इतर अधिकारी

उपस्थित होते.

शिवभोजन थाळीची गुणवत्ता तपासणीसाठी अधिकाऱ्यांची पथके तयार करा. शिवभोजनच्या गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारे हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही.

शिवभोजन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक शिवभोजन केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्याचे नियोजित आहे. या कामासाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत होती. मात्र प्रत्येक शिवभोजन

छगन भुजबळ
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

केंद्रचालकांकडून या कामाला थोडा अवधी वाढवून मिळावा अशी मागणी होती. हे लक्षात घेता प्रत्येक शिवभोजन केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्यासाठी एक महिन्याचा अवधी वाढवून देण्यात आला आहे, अशी माहिती श्री. भुजबळ यांनी दिली.

योजनेच्या उद्दिष्टांमध्ये सुधारणा

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत राज्यात सात कोटी लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत जिल्हानिहाय उद्दिष्टांमध्ये सुधारणा केल्यानंतर राज्यात २५ लाख ०५ हजार ३०० अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना, तर ५ कोटी ९२ लाख १६ हजार प्राधान्य कुटुंब लाभार्थींना सवलतीच्या दरात अन्नधान्य योजनेचा लाभ मिळणार आहे, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक हक्क संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

राज्यासाठी ७६.३२ टक्के ग्रामीण (४६९.७१ लक्ष) व ४५.३४ टक्के शहरी (२३०.४५ लक्ष) असे एकूण ७ कोटी लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली वरील माहितीच्या आधारे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमातंर्गत जिल्हानिहाय उद्दिष्टांमध्ये सुधारणा केल्यानंतर सध्या राज्यात अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांची संख्या नाशिक, जळगाव, नंदुरबार, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या सात जिल्ह्यात सर्वाधिक आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम अंतर्गत जिल्हानिहाय इष्टांक वाढीबाबतचा शासन निर्णय १८ फेब्रुवारी २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मागण्यांबाबत सकारात्मक

पोलीस पाटील हा शासनाचा प्रतिनिधी म्हणून गावपातळीवर कार्यरत असतो. गावाची कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस पाटलांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे राज्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याबरोबरच पोलीस पाटलांचे मानधन वेळेत अदा करण्याचे निर्देश गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे गृहमंत्री वळसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि गृह राज्यमंत्री शंभूराज देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील पोलीस पाटील यांच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव महसूल नीतीन करीर, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, प्रधान सचिव गृह संजय सक्सेना, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि राज्यातील विविध पोलीस पाटील संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पोलीस अंमलदारांना पदोन्नतीची संधी

पोलीस शिपाई यांना त्यांच्या सेवा कालावधीत आश्वासित प्रगती योजनेनुसार पदोन्नती साखळीने पोलीस उपनिरिक्षक पदावर पदोन्नती संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. राज्यातील हजारो पोलीस शिपाई, हवालदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करणारा हा शासन निर्णय असून, यामुळे पोलीस दलाच्या बळकटीकरणास चालना मिळेल तसेच गुन्ह्यांची उकल होण्यास व गुन्हे रोखण्यास मदत होईल, असा विश्वास गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी व्यक्त केला.

राज्यातील अंमलदारांना वर्षानुवर्षे सेवेनंतरही पोलीस उपनिरीक्षक या अधिकारी पदावर पोहोचता येत नसल्याने त्यांना पदोन्नतीचा लाभ देऊन अधिकारी होता यावे, या दृष्टिकोनातून हा प्रस्ताव गृहविभागाने तयार केला होता. या निर्णयाला मंजुरी दिल्याबद्दल गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

दिलीप वळसे-पाटील
गृहमंत्री

या निर्णयामुळे पोलीस दलातील पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गातील वाढीमुळे एकूण तपासी अधिकाऱ्यांच्या संख्येत भरीव वाढ होणार असल्याने पोलीस अधिकाऱ्यांवरील ताण निश्चितपणे कमी होईल, असा विश्वास गृहमंत्री वळसे -पाटील यांनी व्यक्त केला.

नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश

सामान्य नागरिकांना चांगल्या प्रतीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करा, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिल्या.

सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे

यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याबाबत चर्चा करण्यासाठी बैठक झाली. त्या वेळी त्यांनी या सूचना दिल्या. आरोग्य भवनमधील सभागृहात झालेल्या बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. एन. रामास्वामी, अतिरिक्त अभियान संचालक डॉ. सतीश पवार, संचालक डॉ साधना तायडे आदी उपस्थित होते.

आराखड्यात नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करावा. त्यासाठी इतर राज्यांच्या आराखड्याचा अभ्यास करावा. आरोग्य क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या राज्यातील चांगल्या उपक्रमांची माहिती घेऊन त्याचा आराखड्यात समावेश करता

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

येईल का याबाबत विचार करावा. आरोग्य योजनांचे मूल्यमापन करण्यात यावे. कारण असे मूल्यमापन करणे आरोग्य सेवांत सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरत असते. त्यामुळे विविध आरोग्य योजनांचे मूल्यमापन करून त्यामध्ये सुधारणा करावी, अशा सूचना आरोग्यमंत्री श्री.टोपे यांनी दिल्या.

ई.एस.आय.सी.चे रुग्णालय उभारणार

राज्यातील प्रत्येक कामगारांना तसेच गरजवंतांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (ई.एस.आय.सी) किमान ३० बेडचे एक रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या महामंडळाच्या दहा किलोमीटरपुढे एक रुग्णालय ही अट काढण्यात येणार असून आता लोकसंख्या तसेच आवश्यकतेनुसार रुग्णालय उभारण्यात येणार असल्याचे कामगार मंत्री तथा कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे अध्यक्ष हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

कर्मचारी राज्य विमा महामंडळच्या महाराष्ट्र क्षेत्र प्रादेशिक बोर्डाची ११२ वी बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा ई.एस.आय.सी.चे उपाध्यक्ष राजेश टोपे, केंद्रीय आरोग्य सचिव डॉ. नीलिमा केरकट्टा, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल तसेच महामंडळावर नियुक्त सदस्य ऑनलाईन तसेच ऑफलाईन उपस्थित होते.

'महाआवास'चा दुसरा टप्पा

ग्रामीण भागातील सामान्य गोरगरीब जनतेला स्वत:च्या हक्काचे छत मिळावे, यासाठी सातत्याने शासनाकडे मागणी होती. महाआवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ५ लाख घरे बांधून त्याची उद्दिष्टपूर्ती पूर्ण केली असून, आता महाआवास अभियान २.० मधील आणखी ५ लाख घरे ३१ मार्च २०२२ पर्यंत बांधण्याचा दृढनिश्चय करावा, अशा सूचना ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी केल्या.

महाआवास अभियान २.० ची बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली. या बैठकीस ग्रामविकास विभागाचे सहसचिव मंगेश मोहिते, राज्य व्यवस्थापन कक्ष संचालक डॉ. राजाराम दिघे, प्रधानमंत्री आवास योजनेचे उपसंचालक निलेश काळे, राज्य ग्रामीण योजनेचे उपसंचालक मंजिरी टकले तसेच राज्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, उपआयुक्त, प्रकल्प संचालक, गट विकास अधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

हसन मुश्रीफ
ग्रामविकास, कामगार मंत्री

'महाजीविका अभियाना'चा शुभारंभ

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या उमेद अभियानमार्फत 'महाजीविका अभियान' राज्यस्तरीय शुभारंभ ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे करण्यात आला. या कार्यक्रमास ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हेमंत वसेकर, गृहनिर्माण (ग्रामीण)चे संचालक डॉ. राजाराम दिघे, अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेल्या बचतगटाच्या महिला उपस्थित होत्या.

सल्लागार समितीची बैठक

राज्यातील विद्यार्थी घडवण्यासाठी काळाची पावले ओळखून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अभ्यासक्रमामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार प्रक्रिया विकसित करणारी २१व्या शतकातील कौशल्ये आणि संविधानिक मूल्ये याचा अंतर्भाव करावा, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिले.

राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती' स्थापन करण्यात आली आहे. याद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास करून अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मदत केली जाणार आहे. या समितीची बैठक शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच ऑनलाइन पद्धतीने झाली.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक एम.देवेंदर सिंह यांनी बैठकीमध्ये आतापर्यंत तयार करण्यात आलेल्या इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकासंदर्भात समिती सदस्यांसमोर सादरीकरण करून पुढील रूपरेषा विषद केली. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम तयार करताना विचारात घ्यावयाच्या विविध बाबी, कौशल्य वयाचे विकसन करण्यासाठी

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

शिक्षकांच्या अध्यापन पद्धती, याबाबत आयोजित करावयाची प्रशिक्षणे याबाबत या वेळी सांगोपांग चर्चा झाली.

पाठ्यपुस्तक मंडळ (बालभारती) चे संचालक कृष्णकुमार पाटील, बालभारतीचे नियंत्रक विवेक गोसावी, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे प्राचार्य (समन्वय) विकास गरड, आयसीएसई बोर्ड प्रतिनिधी संगीता भाटिया, आयबी बोर्ड प्रतिनिधी महेश बालाकृष्णन, आरपीजी फाऊंडेशनच्या संचालक राधा गोयंका, अंजुमन-ई- इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, फादर जॉर्ज अथाएड, केंब्रिजचे प्रतिनिधी शमीम चौधरी, स्कूल लीडरशिप नेटवर्क मुंबईचे संस्थापक फ्रान्सिस जोसेफ यांच्यासह केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, केंब्रिज आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ, विविध शिक्षण मंडळाचे प्रतिनिधी आदी समिती सदस्य या वेळी उपस्थित होते.

अधिसूचना निर्गमित

बॅचलर इन स्पोर्ट्स सायन्स, बॅचलर इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट व मास्टर इन स्पोर्ट्स सायन्स आणि मास्टर इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांना केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. तसेच आता विद्यापीठ अनुदान आयोगाने या अभ्यासक्रमांना मान्यतेबाबत अधिसूचना निर्गमित केली असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी दिली.

देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ राज्यात स्थापन करण्यात आले असून क्रीडा विज्ञान व क्रीडा व्यवस्थापन पदवी आणि पदव्युत्तर या पदव्यांच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ अनुदान मंडळाने (युजीसी) मान्यता दिली आहे. हा अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षात या विद्यापीठात सुरू करण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम देशात प्रथमच महाराष्ट्र राज्यातील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठात सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात गेल्या दीड वर्षापूर्वी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची घोषणा झाली. त्याच वेळी हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार होता, परंतु त्या वेळी कोरोनाचा प्रादुर्भाव होता. आरोग्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याने अभ्यासक्रम सुरू करता आला नाही. आता हळुहळु कोरोना प्रादुर्भाव कमी कमी होत असल्याने विद्यापीठात येत्या शैक्षणिक

सुनील केदार
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

वर्षापासून विद्यार्थ्यांना प्रवेश देणे सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात वसलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठात पहिल्या टप्प्यात २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी, क्रीडा विज्ञान व क्रीडा व्यवस्थापनातील ३ वर्षांचा अभ्यासक्रम, तसेच क्रीडा शिकवणी व प्रशिक्षण कार्यक्रमही सुरू करण्यात आला आहे. या संस्थेने क्रीडा तंत्रज्ञान, क्रीडा प्रशासन व क्रीडा व्यवस्थापन यांसारख्या अभ्यासक्रमांमध्ये 'आयआयटी' आणि 'आयआयएम या संस्थांचेदेखील सहकार्य मागितले आहे; जेणेकरून एकत्रित आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करता येईल, असे श्री. केदार यांनी सांगितले.

संकेतस्थळाचे उद्घाटन

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नव्याने करण्यात आलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून जनतेला अद्ययावत माहिती मिळेल, जनतेने संकेतस्थळाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केले.

विजय वडेट्टीवार
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संकेतस्थळाच्या मंत्री श्री. वडेट्टीवार बोलत होते. या वेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव नंदकुमार, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचे संचालक दिलीप हळदे, सहसचिव देवाप्पा गावडे, उपसचिव कैलास साळुंखे, सिद्धार्थ झाल्टे, कक्षाधिकारी किशोर फुलझुले, संकेतस्थळ निर्मितीचे वरिष्ठ सल्लागार देविदास सुसे, विजयसिंह राजपूत, प्रल्हाद अनलम, साक्षी गोराड, सिल्वर टेक्नॉलॉजीचे शुभम राणे उपस्थित होते.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संकेतस्थळामुळे जनतेला घरबसल्या सर्व माहिती मिळण्यास मदत होणार आहे. हे संकेतस्थळ मराठी व इंग्रजी दोन्ही भाषातून आहे. https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in/en असे या संकेतस्थळाचे नाव आहे. या संकेतस्थळावरील माहिती विद्यार्थी तसेच जनतेला अत्यंत उपयुक्त अशी आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागानेही नव्याने या विभागाचे होणाऱ्या निर्णयांची व तसेच उपक्रमांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करावी, जेणेकरून जनतेला याची माहिती मिळेल.

थेट कर्ज योजनेची मर्यादा वाढवली

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती

व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेची कर्जमर्यादा २५ हजार रुपयांवरून १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. गरजूंनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केले आहे.

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील दारिद्र्य रेषेखालील जीवनमान जगणाऱ्या घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २५ हजार रुपयांपर्यंतची थेट कर्ज योजना राबवण्यात येत आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत लघू उद्योगांकरिता लागणाऱ्या भांडवली व पायाभूत गुंतवणुकीमध्ये झालेली वाढ, कच्च्या मालाच्या किमतीत झालेली दरवाढ व सतत होणारी महागाई निर्देशांकातील वाढ या बाबी विचारात घेता २५ हजार रुपये इतकी थेट कर्जाची मर्यादा अल्प असल्याने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेंतर्गत कर्जाची मर्यादा २५ हजार रुपयांवरून १ लाख रुपये करण्यात आली आहे. महामंडळाच्या २९ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या झालेल्या संचालक मंडळाच्या ११९ व्या बैठकीत या विषयाला मंजुरी दिली आहे. त्यानुषांगाने १४ फेब्रुवारी २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय विधी विद्यापीठांना निधी

राज्य शासनाने मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ २०१४ च्या अधिनियमान्वये स्थापन केले असून त्यासाठी शासनाने मागील दोन वर्षांत १५० कोटी निधी मंजूर केला आहे. नागपूर येथे वरणगाव परिसरात ६० एकर जागा नागपूर येथील विद्यापीठासाठी दिली आहे. याठिकाणी शैक्षणिक संकुल बांधून पूर्ण झाले आहे. या विद्यापीठांच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

शासकीय विधी महाविद्यालय मुंबई, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ नागपूर यांच्या विविध उपक्रमांचा आढावा आणि शासकीय विधी

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

महाविद्यालय मुंबईच्या आझादी ७५ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमात भारतीय संविधानाच्या विविध तरतुदींवर आधारित माहिती पुस्तिकेचे प्रकाशन समारंभ झाला. या वेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपंकर दत्ता, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.शुकरे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू विजेंदरकुमार, शासकीय विधी महाविद्यालय मुंबईच्या प्राचार्य अस्मिता वैद्य, बार कॉन्सिलचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या विकासकामांसाठी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातील १८ कोटी रुपये विविध विकासकामांसाठी मंजूर केले आहेत. पुढील आठवड्यात आणखी १२ कोटी रुपये दिले जाणार आहेत. विधी विद्यापीठाच्या विकास कामांसाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

योजनेच्या अंमलबजावणीत आघाडीवर

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त पात्र शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांना देण्यासाठी कृषी विभागाने नियोजनबद्ध प्रयत्न करावे, अशा सूचना कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या आहेत.

आतापर्यंत या योजनेकरिता शेतकऱ्यांकडून शासनाकडे ७ हजार ५५४ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी बँकेकडे सादर प्रकरणे २ हजार २३० इतकी आहेत. बँकेने मंजूर केलेली प्रकरणे २३५ इतकी आहेत. आतापर्यंत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत मिळालेले ६५ कोटी रुपये इतके अनुदान शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. तरी सुद्धा 'एक जिल्हा, एक उत्पादन'अंतर्गत निवडलेली उत्पादने तसेच जी.आय. मानांकन मिळालेल्या पिके व उत्पादनांची मूल्यसाखळी बळकट करण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे, असेही कृषी मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

पुस्तकाचे लोकार्पण

राज्यात सोयाबिनचे क्षेत्र ४१ लाख हेक्टर असून सध्या शेतीक्षेत्रात सोयाबीन प्रथम क्रमांकाचे पीक आहे. त्याची

दादाजी भुसे
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

उत्पादकता वाढवण्यासाठी 'सोयाबीन डिजिटल शेती शाळा' हे पुस्तक ज्या भागात सोयाबीन क्षेत्र आहे. त्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवू. या पुस्तकात शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यात आली असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना निश्चित होईल, असा विश्वास कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला.

'सोयाबीन डिजिटल शेती शाळा पूर्व मशागत ते कापणीपर्यंत' या पुस्तकाचे लोकार्पण कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले. पाणी फाऊंडेशन, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते. या वेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमिर खान, पाणी फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक सत्यजित भटकळ, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील, संचालक (संशोधन व विस्तार शिक्षण) डॉ. शरद गडाख, तसेच सामाजिक कार्यकर्ते पोपटराव पवार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

'सिट्रस इस्टेट' योजनेच्या खर्चास मान्यता

पैठण तालुका फळरोपवाटिका येथील प्रक्षेत्रावर मोसंबी फळपिकासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'सिट्रस इस्टेट' या योजनेच्या कार्यक्रम अंमलबजावणीकरिता

संदीपानराव भुमरे
रोहयो, फलोत्पादन मंत्री

२०२१-२०२२ साठी १३ कोटी ५ लाख रुपये इतक्या निधीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच या योजनेच्या २०२१-२०२२ मधील मूळ तरतूदीच्या ५०% च्या मर्यादित ९ कोटी ९३ लाख रुपये इतका निधी वितरित करण्यात आला असून या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती रोहयो, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी दिली.

राज्यात लिंबूवर्गीय फळपिकांमध्ये संत्र्यापाठोपाठ मोसंबी फळपिकाचे उत्पादन घेतले जाते. मोसंबी उत्पादनात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक लागतो. मराठवाड्यात मोसंबी पिकांसाठी अनुकूल हवामान, पीक पद्धतीचा विचार करता मोसंबी हे फळपिक शेतकऱ्यांना अधिक लाभदायक ठरते. मराठवाड्यात सुमारे ३९ हजार ३७० हेक्टर क्षेत्रावर मोसंबी उत्पादन घेतले जाते. त्यापैकी औरंगाबाद जिल्हा-२१ हजार ५२५ हेक्टर व जालना जिल्हा-१४ हजार ३२५ हेक्टर हे प्रमुख मोसंबी उत्पादक जिल्हे आहेत.

मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मोसंबी फळपिकाचे शाश्वत उत्पादन, प्रक्रिया तसेच निर्यातीसाठीचे क्लस्टर निर्माण करण्याची गरज विचारात घेऊन तालुका फळरोपवाटिका, पैठण, जि. औरंगाबाद येथील प्रक्षेत्रावर मोसंबी फळपिकासाठी सिट्रस इस्टेट स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या २०२१-२०२२ मधील मूळ तरतुदीच्या ५०% च्या मर्यादित रुपये ९ कोटी ९३ लाख रुपये इतका निधी आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे मंत्री श्री. भुमरे यांनी या वेळी सांगितले सांगितले.

अभ्यासगटाची स्थापना

राज्यातील विविध कार्यकारी संस्थांच्या गट सचिवांच्या समस्या सोडवण्यासाठी अकोला-वाशिम मॉडेल राबवण्याबाबत अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सभागृहात सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या

बाळासाहेब पाटील
सहकार व पणन मंत्री

अध्यक्षतेखाली राज्यातील गट सचिवांच्या समस्यांबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीला सहकार विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, सातारा, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, चंद्रपूर, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सहकारी संस्थांचे गट सचिव व कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

तज्ज्ञांची समिती गठित

राज्यातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी वस्त्रोद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती भिवंडी, मालेगाव, धुळे, सोलापूर, इचलकरंजी आदी यंत्रमागबहुल भागांची प्रत्यक्ष पाहणी करून महिनाभरात शासनास अहवाल सादर करेल, अशी माहिती वस्त्रोद्योग मंत्री अस्लम शेख यांनी दिली.

अस्लम शेख
मत्स्यव्यवसाय मंत्री

वस्त्रोद्योगमंत्री अस्लम शेख यांच्या अध्यक्षतेखाली काही दिवसांपूर्वी भिवंडी येथे झालेल्या बैठकीत यंत्रमागधारकांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली होती. यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करून उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठित करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार वस्त्रोद्योग विभागाने पाच सदस्यीय समिती गठित केली असून समितीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल लतीफ मोहम्मद अन्वर यांची, तर सदस्य म्हणून डॉ. नुरुद्दीन अन्सारी, रशीद ताहीर

मोमीन, सादिकुज्जमा हे सदस्य असणार आहेत. वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपायुक्त (मुंबई) हे सदस्य सचिव आहेत, असेही मंत्री अस्लम शेख यांनी सांगितले.

मच्छीमार सहकारी संस्थांना दिलासा

कोरोना प्रादुर्भाव काळात राज्यातील मच्छीमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने मासेमारीकरिता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव-जलाशयांची वार्षिक तलाव ठेका रक्कम भरणा करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी दिली.

कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेच्या वेळी राज्यात घोषित लॉकडाऊनमुळे राज्यातील मच्छीमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना पूर्ण क्षमतेनुसार मासेमारी करता आली नाही. तसेच उत्पादित मासळीची विक्री करण्यास पुरेसा वाव न मिळाल्यामुळे मच्छीमारांना आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्यातील मासेमारीकरिता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव आणि जलाशयांची चालू वर्ष २०२१-२२ ची वार्षिक तलाव ठेका रक्कम भरणा करण्यासाठी १ मार्चपासून ३० एप्रिलपर्यंत दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

'माविम' विकासाचा महामार्ग

बचतगट हे महिला सक्षमीकरणाचे सशक्त माध्यम असून, महिला आर्थिक विकास महामंडळ आपल्या ई-बिजनेस प्लॅटफॉर्मद्वारे महिला सक्षमीकरणासाठी काम करत आहे. ई-मार्केटिंगमध्ये महिला कमी पडू नयेत, यासाठी बचतगटाच्या उत्पादनांना 'माविम'मार्फत ऑनलाइन मार्केटिंगचे सर्व व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. 'माविम' म्हणजे महिलांच्या विकासाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

ठाकूर यांनी केले.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)च्या ४७ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केले होते, त्या वेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर या दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होत्या, तर उद्योग मंत्री सुभाष देसाई, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, 'माविम'च्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

बाल आधार नोंदणी शुभारंभ

आधार ओळखपत्रामुळे प्रत्येक रहिवाशाला एक विशिष्ट ओळख मिळाली आहे. लॉकडाऊन काळात आधार ओळखपत्राचा गरजूंना मदत देण्यासाठी उपयोग झाला. बालकांच्या आधार नोंदणीमुळे पूरक पोषण आहार बालकांपर्यंत पोहोचवण्यास मदत होईल. बालकांचा शारीरिक आणि मानसिक विकासाचा पाया मजबूत करण्याचे काम अंगणवाड्या करत आहेत. जर महिला सक्षम असेल, तर बालक सुदृढ होईल आणि पर्यायाने राज्य सुपोषित होईल, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले.

राज्यस्तरीय बाल आधार नोंदणी शुभारंभ आणि नागरी बालविकास केंद्र पथदर्शी कार्यक्रमाचा आढावा आणि विस्तार योजनेचा शुभारंभ महिला आणि बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमास युआयडीएआयचे उपसंचालक सुमनेश जोशी, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त रूबल अग्रवाल, युनिसेफच्या पोषण विशेषज्ञ राजलक्ष्मी नायर, उपायुक्त गोकुळ देवरे उपस्थित होते.

पाणलोट विकास घटक योजना

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजना राज्यात राबवण्याबाबत कोटेकोर नियोजन करण्याचे मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी निर्देश दिले.

मंत्रालयात मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली नवीन प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची (२.०) आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीस जलसंधारण विभागाचे सहसचिव

शंकरराव गडाख
मृद् व जलसंधारण मंत्री

सु. कि. गावडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण ६० : ४० आहे. मृदेची धूप कमी करणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे हे या योजनेचे उद्दिष्ट असून सन २०२२ पासून अंमलबजावणी सुरू होत आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील एकूण ३० जिल्ह्यांमध्ये राबवला जाणार असून मंजूर प्रकल्प संख्या १४४ आहे. कार्यक्रमाद्वारे एकूण ५.६५ लक्ष हेक्टर क्षेत्रावर उपचार केले जाणार असून प्रकल्प मूल्य १३३३.५६ कोटी रुपये (५ वर्षासाठी) आहे, असे मंत्री श्री.गडाख यांनी सांगितले.

सफाई कामगारांचा प्रश्न मार्गी लागणार

सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत सफाई

कामगारांच्या विविध संघटनांच्या मागण्या व महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने शिफारशी केलेल्या आहेत. लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत काढलेले सर्व शासन निर्णय एकत्र करून सुधारित शासन निर्णयाचा प्रस्ताव मंत्रिमंडळात प्रस्ताव

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

सादर करण्यात येईल, असे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले.

मंत्रालयातील दालनात लाड-पागे समितीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे बोलत होते. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अपर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी दूरदृश्य प्रणालीद्वारे, समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, सफाई कामगार नेते गोविंदभाई परमार, सुभाष मालपानी, शकील मुजावर या वेळी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागाच्या २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार फक्त वाल्मीकी मेहेतर व इतर अनुसूचित जातीमधील सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क लागू होता. इतर सर्व जातीच्या सफाई कर्मचारी यांनाही न्याय मिळणे गरजेचे आहे. त्यामध्ये बदल करून सर्वच जातीच्या सफाई कर्मचारी यांना वारसा हक्क लागू करणे, यासह सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत सफाई कामगारांच्या विविध संघटनांच्या मागण्या व महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोग यांनी केलेल्या शिफारशींचाही विचार करण्यात येईल.

सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करून लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आतापर्यंत विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत काढलेले सर्व शासन निर्णय एकत्र करून सुधारित शासन निर्णयाचा प्रस्ताव मंत्रिमंडळात सादर करण्यात येईल, यामुळे राज्यातील सर्व महानगर पालिका व नगरपालिकामधील वारसा हक्काचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे श्री. मुंडे यांनी सांगितले.

सामंजस्य करार

वातावरणीय बदलाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर २०५० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे. महाराष्ट्रात जनजागृती, मूल्यांकन आणि कृती या त्रिसूत्रीच्या आधारे पर्यावरणपूरक शाश्वत विकास घडवून हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. माझी वसुंधरा मोहिमेतून पर्यावरणस्नेही जीवनशैलीकडे नागरिकांना वळवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत निसर्गाच्या पंचतत्त्वावर आधारित 'माझी वसुंधरा' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत वातावरणीय बदलांच्या परिणामांवर अनुकूलन व उपशमन उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यशासनामार्फत करण्यात येत असलेल्या या कामाची दखल घेऊन या उपाययोजनांना साहाय्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची अग्रणी संस्था 'संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम' आणि 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' यांच्यामधील सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. पर्यावरण व वातावरणीय विभागामार्फत प्रधान सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी तर संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यांच्यामार्फत प्रादेशिक संचालक आणि प्रतिनिधी डेचेन सेरिंग यांनी स्वाक्षरी केली. या वेळी मंत्री श्री. ठाकरे बोलत होते.

कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे ऑनलाईन स्वरूपात झालेल्या या कार्यक्रमात 'संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे भारतातील मुख्य अतुल बगाई, ब्रँड ॲम्बॅसिडर दिया मिर्झा, अर्थशास्त्र विभागाच्या संचालिका शीला अग्रवाल-खान, अफरोज खान व देश विदेशातील इतर मान्यवर उपस्थित होते.

वैमानिक प्रशिक्षणाचा प्रारंभ

नागपुरातील उड्डाण क्लबची गौरवशाली परंपरा असून हा क्लब पुनरुज्जीवित झाल्यामुळे विदर्भातील युवकांना विमान उड्डाण प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. नागरी उड्डाण क्षेत्रात जागतिक स्तरावर निर्माण होत असलेल्या विविध

आदित्य ठाकरे
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

संधींचा लाभ घेण्याचे आवाहन पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात असलेल्या नागपूर उड्डाण क्लबच्या हँगरमध्ये वैमानिक प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष प्रारंभ श्री. ठाकरे यांचे हस्ते झाला. या वेळी ऊर्जा मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, मदत व पुनर्वसन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, खासदार कृपाल तुमाने, आमदार दुष्यंत चतुर्वेदी, आमदार आशिष जयस्वाल, विभागीय आयुक्त तथा नागपूर उड्डाण क्लबच्या अध्यक्ष प्राजक्ता लवंगारे-वर्मा, महापालिका आयुक्त राधाकृष्णन बी., जिल्हाधिकारी आर. विमला, महसूल उपायुक्त मिलिंद साळवे आदी उपस्थित होते.

इलेक्ट्रिक वाहन कक्षाचा शुभारंभ

'मुंबई इलेक्ट्रिक वाहन कक्षा'चा शुभारंभ सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या कार्यक्रमात पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, मुंबईचे उपमहापौर ॲड सुहास वाडकर, स्थानिक आमदार मंगलप्रभात लोढा, बेस्ट समितीचे अध्यक्ष आशिष चेंबूरकर, बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. संजीवकुमार, उपायुक्त (पर्यावरण) सुनील गोडसे, डब्ल्यूआरआय इंडियाच्या सिटिज प्रोग्रामचे कार्यकारी संचालक माधव पै, नागरी विकास उपक्रम प्रमुख लुबायना रंगवाला, इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक चैतन्या कानुरी, सल्लागार कौस्तुभ गोसावी, पर्यावरण सल्लागार तन्मय टकले आदी उपस्थित होते. वर्ल्ड रिसोर्सेस इंडिया (डब्ल्यूआरआय) संस्थेच्या सहकार्याने या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

इतर घडामोडी

पुरस्कार वितरण

देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या पद्म पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते झाले. पुरस्कार वितरण कार्यक्रम दोन टप्प्यात पार पडला. या प्रथम टप्प्यातील पद्म पुरस्कार समारंभात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांना त्यांच्या क्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी 'पद्म पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती यांच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती वैंकय्या नायडु, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसेच अन्य केंद्रीय मंत्रिगण उपस्थित होते. प्रथम टप्प्यात पार पडलेल्या पद्म पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये डॉ. सायरस पुनावाला आणि एन.चंद्रशेखरन यांना 'पद्मभूषण पुरस्कार' तर डॉ. भिमसेन सिंघल, डॉ. विजयकुमार डोंगरे, डॉ. हिंमतराव बावस्कर तसेच डॉ. अनिलकुमार राजवंशी यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. सायरस पुनावाला यांना उद्योग व व्यापार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी 'पद्मभूषण पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. श्री पुनावाला हे सुप्रसिद्ध औषधी निर्माता आहेत. जगातील सर्वात मोठी औषधी निर्माण करणारी सिरम संस्थेचे ते संस्थापक आहेत. कोरोना माहामारीच्या साथीत या संस्थेने तयार केलेली लस सर्व भारतीयांना तसेच अन्य देशातील लोकांनाही सर्वोपयोगी ठरली. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले.

एन. चंद्रशेखरन यांनाही उद्योग व व्यापार क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. श्री. चंद्रशेखरन हे टाटा सन्सचे अध्यक्ष आहेत. ते भारतील एक नामांकित उद्योजक आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना गौरवण्यात आले.

वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी डॉ. भिमसेन सिंघल यांना 'पद्मश्री पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. डॉ. सिंघल हे नामांकित न्युरोलॉजिस्ट आहेत. डॉ. सिंघल यांनी मज्जतंतूचा शास्त्रीयरीत्या अभ्यास केलेला आहे. धमन्या आक्रसणे (स्क्लेरोसिस) आणि पार्किन्सन रोगावर त्यांचे संशोधन जगमान्य आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करत त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. विजयकुमार डोंगरे यांना कुष्ठरोगांवर केलल्या निस्वार्थ उपचारांसाठी वैद्यकीय क्षेत्रामधून 'पद्मश्री पुरस्कारा'ने गौरवण्यात आले. डॉ. डोंगरे हे आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. ते गेली अनेक वर्ष कुष्ठरोग्यांवर उपचार करत आहेत. त्यांच्या या निरपेक्ष सेवेची दखल घेऊन त्यांना गौरवण्यात आले.

विंचुदंश आणि सर्पदंशावर केलेल्या अभ्यासासाठी डॉ. हिम्मतराव बावस्कर यांना 'पद्मश्री पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील विंचुदंश आणि सर्पदंश झालेल्यांचे प्राण त्यांनी वाचवले आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. अनिलकुमार राजवंशी यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. तळागळातील शास्त्रज्ञ अशी डॉ. राजवंशी यांची ओळख आहे. निंबकर कृषी संशोधन संस्था (नारी) चे ते संचालक आहेत. डॉ. राजवंशी यांनी अक्षय ऊर्जा संशोधन, ग्रामीण आणि सतत विकास याविषयांवर त्यांचा ३० वर्षांपेक्षा अधिक अभ्यास आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात येते. या वर्षी एकूण १२८ पद्मपुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये ४ 'पद्मविभूषण', १७ 'पद्मभूषण' आणि १०७ 'पद्मश्री' पुरस्कारांचा समावेश आहे.

पुरस्कार घोषित झालेल्या मान्यवरांमध्ये ३४ महिलांचा समावेश आहे. १० अप्रवासी भारतीयांना हे मानाचे पुरस्कार जाहीर झाले असून १३ मान्यवरांना मरणोत्तर पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. यापैकी काही पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यातील पुरस्काराचे वितरण

ज्येष्ठ शास्त्रीय गायिका स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. राष्ट्रपतींच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील चार मान्यवरांचा यात समावेश आहे.

राष्ट्रपती भवनातील दरबार हॉलमध्ये आयोजित दिमाखदार सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या देश-विदेशातील मान्यवरांना पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातून शास्त्रीय गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना पद्मविभूषण, तर ज्येष्ठ लावणी गायिका सुलोचना चव्हाण, प्रसिद्ध पार्श्व गायक सोनू निगम आणि आयुर्वेदाचार्य डॉ. बालाजी तांबे यांना (मरणोत्तर) पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. या वेळी उपराष्ट्रपती एम.वैंकय्या नायडू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात २ पद्मविभूषण, ५ पद्मभूषण आणि ५३ पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना पद्मविभूषण या मानाच्या नागरी पुरस्काराने गौरवण्यात आले. प्रतिभावंत गायिका, संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका आणि विदुषी म्हणून डॉ अत्रे यांचा भारतीय अभिजात संगीतात नावलौकिक आहे. ख्याल गायकीसोबतच ठुमरी, दादरा, गझल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व भावसंगीत अशा संगीत प्रकारात त्यांचे प्रभुत्त्व आहे. भारतीय शास्त्रीय संगीताचा देश-विदेशात प्रसार करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. 'स्वरमयी', 'सुस्वराली', 'स्वरांगिणी', 'स्वररंजिनी' या संशोधनपर संगीतविषयक पुस्तकांसह 'अंत:स्वर' या काव्यसंग्रहाचे लेखनही त्यांनी केले आहे. कलाश्रेत्रातील योगदानासाठी त्यांना यापूर्वी पद्मभूषण (२००२) आणि पद्मश्री (१९९०) या नागरी सन्मानानेही गौरवण्यात आले आहे.

लावणी सम्राज्ञी ज्येष्ठ लोकगीत गायिका सुलोचना चव्हाण यांना कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. गेल्या ७५ वर्षांपासून त्या गायनक्षेत्रात कार्यरत आहेत. श्रीमती चव्हाण या १९४६ पासूनच हिंदी चित्रपटांमध्ये गायन करू लागल्या. 'ही माझी लक्ष्मी' या चित्रपटाद्वारे त्यांनी मराठी चित्रपटांमध्ये गायनास सुरुवात केली. यासोबतच त्यांनी गुजराती, भोजपुरी, तामिळ, पंजाबी भाषांमध्येही भजन, गझल असे विविध प्रकारचे गायन केले आहे.

प्रसिद्ध पार्श्वगीत गायक सोनू निगम यांनाही कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. लॉर्ड ऑफ कॉर्ड्स नावाने प्रसिद्ध असलेल्या सोनू निगम यांनी हिंदी, मराठीसह एकूण १० भाषांमध्ये ४ हजार गीत गायिली आहेत.

वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी आयुर्वेदाचार्य डॉ. बालाजी तांबे यांना (मरणोत्तर) पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला होता या कार्यक्रमात त्यांच्या पत्नी वीणा तांबे यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. डॉ. तांबे यांनी आयुर्वेदाच्या प्रचार, प्रसार आणि संशोधनात गेल्या साडेतीन दशकांपासून अधिक काळ कार्य केले. त्यांनी आयुर्वेदिक औषधीशास्त्र आणि आयुर्वेदिक फिजिओथेरपीवरही संशोधन केले आहे. त्यांनी लाखो रुग्णांवर उपचार केले. दूरचित्रवाणीहून त्यांनी हजारो कार्यक्रमांद्वारे आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार केला. त्यांनी आयुर्वेदावर ५० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत.

महाराष्ट्रातील ११ महिलांना पुरस्कार

विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या महिलांना 'भारत बदलणाऱ्या महिला' (Women Transforming India) या पुरस्काराने नीती आयोगातर्फे सन्मानित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्राच्या ११ महिलांचा समावेश होता. देशातील एकूण ७५ महिलांना या वेळी सन्मानित करण्यात आले.

नीती आयोगच्यावतीने 'भारत बदलणाऱ्या महिला' या ५ व्या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हे वर्ष अमृतमहोत्सवी वर्ष असल्यामुळे विविध क्षेत्रातील प्रशसंनीय कार्य करणाऱ्या ७५ महिलांना गौरवण्यात आले. याप्रसंगी नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत, सल्लागार अण्णा राय तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

माजी पोलीस महासंचालक तथा पुदुचेरीच्या माजी राज्यपाल किरण बेदी, माजी सहायक महासचिव संयुक्त राष्ट्र लक्ष्मी पुरी, डीआरडीओच्या रोनॉटिकल सिस्टमच्या महासंचालक डॉ. टेसी थॉमस, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माजी अध्यक्ष अरुंधती भट्टाचार्य, नॅसकॉमच्या अध्यक्षा देबजानी घोष, अभिनेत्री आणि लोक गायिका इला अरुण यांसह ट्रॅक आणि फिल्ड थलीट शायनी विल्सन, टोक्यो ऑलिम्पिक विजेती मुष्टियोद्धा लवलीना बोरगोहेन, जागतिक प्रथम क्रमांची पॅरा बॅडमिटंनपटू मानसी जोशी, टोक्यो ऑलिम्पियन जिम्नॅस्ट प्रणिती नायक, मुष्टियोद्धा सिमरनजीत कौर यांच्याहस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

डॉ. हिंमतराव बावस्कर

नटराजन चंद्रशेखरन

डॉ. प्रभा अत्रे

डॉ. अनिल कुमार राजवंशी

यांना मिळाला पुरस्कार

मुंबईच्या डॉ. अर्पणा हेगडे, या अरमान नावाने गैरशासकीय संस्था चालवतात. या

संस्थेच्या वतीने गर्भवती माता, नवजात अर्भक आणि पाच वर्षापर्यंतच्या बालकांची काळजी घेतली जाते. आतापर्यंत २७ लाख माहिला आणि बालकांना त्यांनी आवश्यक ती मदत पुरवली आहे. ही संस्था १९ राज्यात काम करते. केंद्र शासनाच्या आरोग्य विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या किलकारी आणि मोबाईल अकादमी या प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबाजवणी अरमानच्या माध्यमातून केली जाते. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले.

कचरा कामगारांवर संस्थेने केलेल्या कामाचा सकारात्मक परिणाम झाला आहे. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुणे येथील स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या प्रेमा गोपालन यांनाही सन्मानित करण्यात आले. त्या पुरस्कार स्वीकारायला येऊ शकल्या नाही, परंतु त्यांच्या संस्थेच्या प्रतिनिधीने हा पुरस्कार स्वीकारला. त्यांनी संस्थेच्या माध्यातून बदलत्या नैसर्गिक वातावरणानुसार ग्रामीण भागात महिलांना

आकांक्षा फाऊंडेशनच्या माध्यमातून शाहीन मिस्त्री या वर्ष २००८ पासून शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट शिक्षण मिळावे, यासाठी काम करत आहेत. आजपर्यंत या संस्थेने ३२,००० मुलांना टीच फॉर इंडियाच्या माध्यमातून शिक्षित केले आहे. अप्रत्यक्षपणे ३३ दक्षलक्ष बालकांपर्यंत ही संस्था पोहोचली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पुरस्काराने गौरवण्यात आले.

पुण्याच्या सुलज्जा मोटवानी यांनी प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षण

डॉ. विजय डोंगरे

सुलोचना चव्हाण

वीणा तांबे

सोनू निगम

नागपूर जिल्ह्यात क्रांती ज्योती महिला बचतगट (रूलर मार्ट) चालवणाऱ्या दीपा चौरे आहेत. यांच्या बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण भागात उच्च गुणवत्तेचे उत्पादन तयार केली जातात. त्यांनी ३५० ते ५०० महिलांना या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

माणदेशी महिला सहकारी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकरीत्या सक्षम करणाऱ्या चेतना गाला सिन्हा यांनाही सन्मानित करण्यात आले.

मुंबईतील रीसिटी नेटवर्क प्रा. लि.च्या मेहा लाहिरी या स्वच्छता यावर काम करतात. प्लास्टिक कचरा हे आजचे आव्हान असून त्याच्याशी निगडित काम करणाऱ्या कामगारांचे समुपदेशन, त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम त्या करतात. संस्था स्थापनेपासून ६९% पेक्षा जास्त महिला

शेती करण्याचे प्रशिक्षण दिले. त्यांची संस्था महाराष्ट्र, केरळ, बिहार, ओरिसा या राज्यांतही काम करते. त्यापर्यंत त्यांनी दिड लाख ग्रामीण महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षित केलेले आहे. पुण्यातील आदया ओरीजनल्स प्रा. लि. संस्थेच्या सायली मराठे यांना त्यांच्या ऐतिहासिकपणा जपणाऱ्या चांदीचे दागिने बनवण्याच्या कामासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मुंबईच्या शांती राघवन या अनऐबल इंडिया गैरशासकीय संस्थेच्या माध्यमातून दिव्यांगासाठी मागच्या दोन दशकांपासून काम करतात. देश घडवण्यात दिव्यांगाची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्याकडून मिळणाऱ्या करातून नवनवीन प्रकल्प उभारले जातात. दिव्यांगाचे अस्तित्व अन्यसारखेच महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित त्या करत असतात. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुंबईतील टीच फॉर इंडिया आणि द

व्हावे यासाठी काइनेटिक ग्रीन एनर्जी ॲण्ड पावर सोलूशयन या कंपनीच्या माध्यमातून प्रदूषण कमी करणारे सार्वजनिक वाहतुकीसाठी वापरात असणारे वाहन तयार केले. या वाहनाची किमतही परवडण्यासारखी ठेवली. त्यांचा लाभ लोकांना होत आहे. या माध्यमातून आतापर्यंत ५० हजार लोकांना रोजगार मिळालेला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. मात्र त्या या कार्यक्रमास उपस्थित राहू शकल्या नाहीत. यासह मुंबईच्या फुट डॉक्टर पायांची निगा कशी राखायची बद्दलची माहिती कलर मी मॅड प्रा. लि. कंपनीच्या माध्यमातून त्रिशला सुराणा देत असतात. यांना आणि मुंबईच्याच ओखई या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण कारागिरांना रोजगार देणाऱ्या कीर्ती पुनिया यांनाही सन्मानित करण्यात आले.

टीम लोकराज्य

राज्य मंत्रिमंडळाच्या २, ९ व १६ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या बैठकीत गृहनिर्माण, परिवहन, महसूल, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, नगरविकास, सामान्य प्रशासन, आदिवासी विकास, पदूम, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, उच्च व तंत्रशिक्षण आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..

मंत्रिमंडळात ठरले

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

पालघर जिल्ह्यातील पालघर नगरपरिषद व बोईसर ग्रामपंचायतीचा मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयामुळे पालघर नगरपरिषद आणि बोईसर ग्रामपंचायत क्षेत्राचा मुंबई महानगर प्रदेशातील (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये समावेश होणार आहे. ठाणे मुख्यालय असलेल्या या प्राधिकरणात यापूर्वीच नवी मुंबई महानगरपालिका (सिडको आणि नैना क्षेत्रासह), ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, उल्हासनगर अशा आठ महानगरपालिका आणि अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान अशा सात नगरपालिका-नगरपरिषदांचा समावेश करण्यात आला आहे. पालघर नगरपरिषद व बोईसर ग्रामपंचायतीचा यामध्ये समावेश नव्हता तो या निर्णयाने होणार आहे.

दुरुस्तीचे विधेयक मागे

केंद्र शासनाने २०१९ मध्ये केंद्रीय मोटार वाहन कायदा लागू केल्याने राज्याने २०१७ मध्ये मंजूर केलेले विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. रस्ते सुरक्षाविषयक उपाययोजना व त्याच्याशी संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र परिवहन कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याचे विधेयक (क्र.२८/२०१७) ६ एप्रिल २०१७ रोजी विधानमंडळात मंजूर करण्यात आले होते. हे विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राज्यपाल यांच्या माध्यमातून केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात केंद्र शासनाने केंद्रीय मोटार वाहन (सुधारणा) कायदा २०१९ लागू केला. केंद्राच्या या कायद्यामध्ये राज्याने प्रस्तावित केलेल्या बाबींचा समावेश असल्याचे केंद्र शासनाने सूचित केले आहे. त्यानुसार राज्याचे हे विधेयक मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

मावसाळा येथील जमीन महामंडळाला

औरंगाबाद जिल्ह्यातील मौजे मावसाळा (ता. खुलताबाद) येथील सेंट्रल इस्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट या संस्थेच्या ताब्यातील ४५ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नावे करण्यास मान्यता देण्यात आली. मौजे मावसाळा (ता.खुलताबाद) येथील गट नं.१/१० मधील ४५ हेक्टर शासकीय जमीन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सेंट्रल इस्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे यांच्याकडून ताब्यात घेतलेली आहे. ही जमीन महामंडळाच्या नावे करण्यास मान्यता देण्यात आली. या ठिकाणी महामंडळाच्या वाहन चालकांना प्रशिक्षण देणे, अन्य ट्रक व बस ड्रायव्हर यांचे प्रशिक्षण वर्ग चालवणे आणि सुरक्षेबाबत अन्य प्रशिक्षण व संशोधनाच्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

करार करण्यास मान्यता

राज्यातील अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी नवी दिल्लीच्या अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणासमवेत सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली. अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली व राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासन यांच्यामध्ये हा सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या कराराचा कालावधी २ वर्षाचा असेल आणि तो परस्पर संमतीने पुढे वाढवण्यात येणार आहे. या करारात अंमलबजावणी व अनुपालन प्रणालीचे सक्षमीकरण करणे, अन्न चाचणी प्रणालीचे सक्षमीकरण करणे, 'ईट राईट इंडिया मुव्हमेंट'अंतर्गत विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे, तसेच अन्न सुरक्षेशी संबंधित इतर बाबींचा समावेश आहे. या करारानुसार अन्न सुरक्षा प्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी ६०:४० या प्रमाणात केंद्र व राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे.

मुंबई मनपावर प्रशासक नेमणार

बृहन्मुंबई महानगरपालिकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची मुदत ७ मार्च २०२२ रोजी संपत आहे. परंतु राज्यात कोविडची आपत्ती त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदस्य संख्येत केलेली वाढ आणि त्यामुळे झालेली प्रभागांची

पुनर्रचना यामुळे ही निवडणूक घेणे शक्य होणार नसल्याने प्रशासक नियुक्ती करण्याची सूचना राज्य निवडणूक आयोगाने केली होती. सद्य:स्थितीत प्रशासक नियुक्तीबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे ही सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्यात येईल. प्रशासकाची नियुक्ती ही आगामी सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या महानगरपालिकेच्या पहिल्या सभेच्या दिनांकापर्यंत लागू राहील.

माहिती कार्यालयांचे बळकटीकरण

राज्यात विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयांच्या इमारती व माहिती भवन उभारून माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिक बळकटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे शासकीय योजनांची प्रसिद्धी केली जाते. या महासंचालनालयाच्या अंतर्गत आठ विभागीय माहिती कार्यालये आहेत. परंतु बहुतांश माहिती कार्यालये भाड्याच्या जागेत असून अप्रत्यक्षपणे

त्याचा परिणाम कामकाजावर होत आहे. त्यामुळे अशा सर्व अधीनस्थ माहिती कार्यालयांसाठी स्वत:ची जागा मिळवून, कार्यालयाची इमारत बांधकाम, बळकटीकरण, पायाभूत सुविधा निर्मिती करण्यासाठी विभागीय व जिल्हा माहिती कार्यालय, माहिती भवन इमारत बांधकाम योजना राबवण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक ती शासकीय जमीन प्राप्त करून घेण्यात येईल.

योजनेच्या आर्थिक निकषात वाढ

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या आर्थिक निकषात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. आदिवासी लोकसंख्या १५०० पेक्षा जास्त असलेल्या भागात ७५ लाख रुपये, १००० ते १४९९ पेक्षा जास्त असलेल्या भागात ५० लाख रुपये, ५०० ते ९९९ पेक्षा जास्त असलेल्या भागात ३५ लाख रुपये, ४९९ पेक्षा कमी आदिवासी लोकसंख्या असलेल्या २५ लाख रुपये अशा सुधारित आर्थिक निकषांमध्ये ५ वर्षांपर्यंत कामे घेता येतील.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा ही योजना २०२१-२२ पासून राज्यस्तरावर वर्ग करण्यात आली आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा, मिनीमाडा व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्राबाहेरील ५० टक्के व त्यापेक्षा जास्त अनुसुचित जमातीची लोकसंख्या असलेल्या वस्त्या / पाडे / वाड्या / गाव/ नगर पंचायती / नगरपरिषदा / नगरपालिका / महानगरपालिका या मधील वार्ड/प्रभाग यांचा विकास करण्याबाबत सुचवण्यात येणाऱ्या कामांना सुधारित निकष लावण्यात येतील.

शेळी समूह योजना

अमरावती जिल्ह्यातील पोहरा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्रात शेळी समूह योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी ७.८१ कोटी इतका निधी देण्यात येईल. पोहरा प्रमाणेच राज्यातील उर्वरित ५ महसूल विभागात प्रत्येकी एक शेळी समूह प्रकल्प राबवण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

राज्यातील शेळी पालनाचा व्यवसाय हा भूमिहीन ग्रामीण तसेच अल्पभूधारकांसाठी उपजीविकेचे महत्त्वपूर्ण साधन आहे. देशातील शेळ्यांच्या संख्येत महाराष्ट्र ६ व्या क्रमांकावर असून राज्यामध्ये उत्पादित होणाऱ्या दुधापैकी २ टक्के हिस्सा शेळ्यांच्या दुधाचा आहे. त्याचप्रमाणे एकूण मास उत्पादनाच्या १२.१२ टक्के एवढे उत्पादन शेळीच्या मासांचे होते.

राज्यामध्ये अनेक भागात संसर्गजन्य रोगांमुळे शेळ्या रोगग्रस्त होऊन मरण पावतात. गावातील स्थानिक जातीचे बोकड किंवा उपलब्ध असणारा कोणताही बोकड पैदाशीकरिता वापरला जातो. मासांच्या वाढत्या मागणीमुळे कमी वयातील शेळ्यांची कत्तल होते व जातिवंत पशुधन उपलब्ध होत नाही. त्यामुळे शेळी-मेंढी पालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्यामध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत शेळी पालकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येऊन उत्पादक कंपन्याही स्थापन करण्यात येतील. शेळी पालकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात येतील. याशिवाय शेळ्यांचे दूध व दुग्धजन्य प्रक्रिया केंद्र स्थापन करणे, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र व निवासस्थान, सामूहिक सुविधा केंद्र स्थापन करण्यात येतील.

कौशल्य विभागाच्या नावात बदल

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे नामकरण आता कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग असे करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्रात स्टार्टअप्सच्या माध्यमातून नवीन संकल्पना राबवण्यात येत असून नावीन्यतेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. नावीन्यता ही संकल्पना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, या दृष्टिकोनातून हे सुधारित नामकरण करण्यात आले आहे.

विद्यापीठांत अध्यासन केंद्रांसाठी धोरण

राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये अध्यासन केंद्र निर्माण करण्याकरिता धोरणास मान्यता देण्यात आली. विद्यापीठांच्या शैक्षणिक व संशोधनविषयक उद्दिष्टांना चालना देणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या समवेत संशोधनाची संधी उपलब्ध करून देणे, परिषदा, चर्चासत्रे, व्याख्यानमाला आयोजित करणे, आंतरविद्याशाखीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणे, थोर व्यक्तींच्या विचारांवर व मूल्यांवर अधारित अभ्यास आणि

कार्यक्रमांचे आयोजन असे उपक्रम अध्यासन केंद्रांनी राबवणे गरजेचे आहे.

लस उत्पादनाला वेग

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळात केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने कोव्हॅक्सिन लस उत्पादित करण्याच्या प्रकल्पास अर्थसाहाय्य करण्यास व उत्पादनाच्या तंत्रज्ञानातील काही आवश्यक बदल करण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही हाफकिन महामंडळाकडून करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची उभारणी जलद गतीने होणेसाठी यापूर्वी गठित करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीस प्रकल्पाशी संबंधित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकारही प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

खटले मागे घेणार

राज्यात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केल्यामुळे दाखल झालेले खटले मागे घेण्यास मान्यता देण्यात आली. हे खटले मागे घेण्यासाठी पुढील अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. बैलगाडा शर्यतीच्या घटनेत जिवीत हानी झालेली नसावी, खासगी व सार्वजनिक मालमत्तेचे ५ लाखांपेक्षा जास्त नुकसान झालेले नसावे, या खटल्यांवर पोलीस आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील क्षेत्रिय समितीकडून निर्णय घेण्यास मान्यता देण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिकेमध्ये दिलेल्या निर्णयानुसार ज्या खटल्यांमध्ये विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा समावेश आहे, असे खटले उच्च न्यायालयाच्या संमतीशिवाय मागे घेण्यात येऊ नये, असे निर्देश दिले आहेत. त्याला अनुसरून विद्यमान व माजी खासदार व आमदार यांचा ज्या खटल्यात समावेश आहे ते खटले मागे घेणे योग्य असल्याचे क्षेत्रिय समितीचे मत झाल्यास समितीने त्याबाबत शिफारस करून उच्च न्यायालयाकडे तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात आली.

जिल्हा ग्रामीण विकास योजना

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ही बंद करण्याऐवजी १०० टक्के राज्य योजना म्हणून राबवण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाने १ एप्रिल २०२२ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन निधीतील केंद्राचा ६० टक्के वाटा देणे बंद केल्याने ही योजना १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना म्हणून राबवण्यास मंजुरी देण्यात आली. प्रत्येक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस १५ पदांऐवजी ८ पदांचा आकृतिबंध असेल.

मिशन महाग्राम

ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन अंतर्गत महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या हेतूने राज्यात 'मिशन महाग्राम' २०२२ ते २०२५ या कालावधीत राबवण्यास मान्यता देण्यात आली. मिशन महाग्रामअंतर्गत मानव विकासाच्या प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रित करून विकासाचे शाश्वत ध्येय साध्य करण्यासाठी सामुदायिक सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून ५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात येईल.

वैद्यकीय तपासणी

राज्यातील ४० ते ५० वर्ष या वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची दोन वर्षातून एकदा, तर ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची दरवर्षी वैद्यकीय तपासणी करण्याचा आणि त्यासाठी ५ हजार रुपये इतकी रक्कम प्रतिपूर्ती म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार ४० वर्षांवरील वयाच्या सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकीय तपासण्या, ठरवून दिलेल्या नमुन्यात, त्या-त्या आर्थिक वर्षात करून घ्याव्या लागणार आहेत. त्यासाठीच्या खर्चाची आवश्यक रक्कम संबंधित रुग्णालयाला प्रथम स्वत: अदा करावी व त्याची प्रतिपूर्ती आपल्या कार्यालयातून मिळवावी लागणार आहे.

अध्यापकांना भत्ते लागू

शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक, तसेच अधिष्ठाता, सह संचालक व संचालक या संवर्गाना सातव्या वेतन आयोगानुसार भत्ते लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसीनुसार ७ व्या वेतन आयोगातील वेतनविषयक तरतुदी २०१९ मध्ये लागू करण्यात आल्या आहेत.

वाहतूक भत्त्याच्या दरात वाढ

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या दरात १ एप्रिलपासून सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. एस-२० व त्यावरील वेतन स्तरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना बृहन्मुंबई नागरी समूह, नागपूर नागरी समूह व पुणे नागरी समूहात ५४०० रुपये व इतर ठिकाणी २७०० रुपये, एस-७ ते एस-१९ स्तरासाठी अनुक्रमे २७०० व १३५० रुपये, एस-१ ते एस-६ स्तरासाठी १००० व ६७५ रुपये. उपरोक्त एस-१ ते एस-६ या वेतन स्तरामधील २४ हजार २०० रुपये व त्यापेक्षा जास्त वेतन आहरित करणाऱ्या बृहन्मुंबई नागरी समूह, नागपूर नागरी समूह व पुणे नागरी मधील कार्यरत कर्मचाऱ्यांना २७०० रुपये व इतर ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांना १३५० रुपये इतका वाहतूक भत्ता मिळेल.

टीम लोकराज्य

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच मुंबईत पार पडले. स्थानिक प्राधिकरणांच्या कार्यालयात मराठी भाषेच्या वापराचे विधेयक, शक्ती विधेयकाला बळकटी देणारे महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालय विधेयकासह इतर १७ विधेयकांना दोन्ही सभागृहात मंजुरी मिळाली. कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, गृह, नगरविकास, ग्रामविकास आदी विविध विभागांच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय या अधिवेशनात घेण्यात आले. याबाबत थोडक्यात आढावा..

सतरा विधेयकांना मंजुरी

किशोर गांगुर्डे

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अभिभाषणाने विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा प्रारंभ झाला. विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात झालेल्या या अभिभाषणात राज्यपालांनी कोरोना साथीचा मुकाबला करण्यासाठी राज्य शासनामार्फत अनेक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आल्याबद्दल गौरवोद्गार काढले.

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, उद्योगपती राहुल बजाज, माजी मंत्री नारायण पाटील, माजी विधानसभा सदस्य गजानन बाबर, विश्वासराव पाटील, नरेंद्रसिंग पाडवी, श्रीमती आशाताई टाले, रामनिवास सिंह, एन.डी. पाटील, सुधीर जोशी, दत्तात्रय लंके, संजीवनी हरी रायकर, कुमुद महादेव रांगणेकर, ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांना शोक प्रस्तावाद्वारे विधानसभा आणि विधान परिषदेत आदरांजली वाहण्यात आली.

विकासासाठी भरीव निधी

राज्य शासनाने विदर्भ तसेच मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव निधी दिला आहे. राज्यपाल यांच्या निर्देशाप्रमाणे पंचसुत्रीनुसार निधीचे वाटप करण्यात येत आहे. मराठवाडा, विदर्भ येथील प्रकल्पासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. त्याचबरोबर अनुशेषदेखील पूर्ण केला जाईल, विदर्भासाठी २६ टक्के निधी, मराठवाड्यासाठी १८.७५ टक्के, तर उर्वरित महाराष्ट्रासाठी ५५ टक्के निधी दिला असून कोणावरही अन्याय केला नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना सांगितले. कोरोना संकटकाळात अडचणीत आलेल्या उद्योग, व्यापार क्षेत्राला अडचणीतून बाहेर काढून उभारी देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड- २०२२ अभय योजना विधिमंडळात जाहीर केली.

महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे अधिनियम मंजूर

राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या कार्यालयीन कामकाजात जनसंवाद व जनहिताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे, त्या अनुषंगाने मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी मांडलेले महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम २०२२ हे विधेयक दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आल्याचे मंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

पोलीस भरती

पोलीस भरती २०१९ मधील रिक्त असलेल्या ५ हजार २९७ पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून निवडलेल्या उमेदवारांना लवकरच नेमणुका देण्यात येणार आहेत. त्याशिवाय येत्या काही दिवसात ७ हजार २३१ पदांची पोलीस भरती करण्यात येणार असल्याची घोषणा गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी विधानसभेत केली.

कोविड संकटकाळात ३९४ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर केले आहे. बलात्कार आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत दाखल गुन्ह्यांसाठी १३८ विशेष

जलदगती न्यायालये सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्याशिवाय गृहरक्षक दलाच्या जवानांना वर्षभरात १२० ते १५० दिवस काम देण्याचा निर्णय घेण्यात आला असून वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवल्याचेही गृहमंत्री श्री. वळसे-पाटील यांनी सांगितले.

शक्ती विधेयक मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठवले असून त्यांच्या मान्यतेनंतर लागू होणाऱ्या शक्ती कायद्याच्या माध्यमातून महिलांना अधिक प्रभावीपणे न्याय देता येईल असेही गृहमंत्री श्री. वळसे-पाटील यांनी विधानसभेत सांगितले.

लाड-पागे समितीच्या शिफारशींसह नवीन समितीचा विचार

लाड-पागे समिती होऊन ४२ वर्षे झाली असून त्या वेळची आणि आताची स्थिती यात फरक आहे. येत्या काळात या समितीच्या शिफारशींसह नवीन समिती गठित करण्याचा विचार करावा लागेल, असे सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत सांगितले.

मनपा-नपामध्ये शववाहिका ठेवणे बंधनकारक

महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये शववाहिका ठेवणे बंधनकारक असून ज्या महापालिका-नगरपालिकांमध्ये शववाहिका नसेल, त्यांनी जिल्हा नियोजन समितीमधून किंवा आमदार निधीमधून शववाहिनी घेण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे, असे सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी विधानसभेत सांगितले. महिलांच्या प्रसूतीसाठी १०२ या विशेष क्रमाकांवर रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या असून अलीकडच्या काळात राज्यात सुमारे एक हजार रुग्णवाहिका बदलल्या आहेत, असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

कोकणातील आपत्तीवर उपाययोजनांसाठी

कोकणात सातत्याने येणाऱ्या आपत्तीवर मात करण्यासाठी शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्याचा निर्णय घेतला असून येत्या चार वर्षांत साधारणत: एकूण ३२०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. यामध्ये राज्य शासनाकडून १२०० कोटी रुपये, तर १५ व्या वित्त आयोगाकडून २००० कोटी रुपये सहभाग असणार आहे. याद्वारे समुद्र धूप प्रतिबंधक बंधारे, भूमिगत विद्युत वाहिन्या, चक्रीवादळ केंद्रे, निवारा केंद्रे बांधणी आदींचे नियोजन असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

बीडीडी चाळींचे नामकरण

वरळीतील बीडीडी चाळीचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे नगर, नायगाव येथील बीडीडी चाळीला शरद पवार नगर आणि ना. म. जोशी बीडीडी चाळीला राजीव गांधी नगर नाव देण्यात आले असल्याची घोषणा गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केली. दरम्यान, गोरेगाव येथील पुनर्विकास होत असलेल्या पत्राचाळीला यापुढे सिद्धार्थनगर नावाने ओळखले जाईल, असेही जाहीर केले.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये राज्यात पहिल्या टप्प्यात मंजूर झालेल्या ३० हजार कि.मी. च्या रस्त्यांची कामे सुरू असून दुसऱ्या टप्प्यात १० हजार कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यातील कामांना येत्या दोन महिन्यांत प्रत्येक जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती मंजुरी देणार असून त्यानंतर दिवाळीपासून कामे सुरू करण्यात येतील, असे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

समृद्धी महामार्गाचा विस्तार

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा नागपूरपासून गोंदिया, गडचिरोलीपर्यंत विस्तार करण्यात येणार आहे.

या विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.

शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही

राज्यातील शाळेतील विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड नसल्यास त्यांची नावे शाळेच्या हजेरीपटावरून कमी करण्यात येत नाहीत किंवा त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात नाही. आधारकार्ड नाही म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत नाही असे, शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्न करत आहे. यासाठी विद्यार्थी हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या सोयीसुविधा शाळांना देण्याचे निर्णय घेण्यात येत आहेत. सांगली, जळगाव, हिंगोली या जिल्ह्यांसह अन्य जिल्ह्यातही जिल्हा नियोजन समितीमार्फत आदर्श शाळांबाबत खूप चांगले काम झाले आहे. शाळांच्या सुविधेकरिता ३०० कोटी रुपये देण्यात आले असून आता ५४ कोटी रुपये देण्यात आले आहे. निजामकालीन शाळेसाठी ९२ कोटी रुपये देण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात आदर्श शाळा निर्माण होणार असल्याचे सांगून राज्यातील सर्व माध्यमांच्या खासगी व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. येणारे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी सर्व खासगी शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुरू असतील, असेही शिक्षणमंत्र्यांनी विधानपरिषदेत सांगितले.

जमिनी विनापरवानगी हस्तांतरित केल्यास कारवाई

आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तीस विनापरवानगी हस्तांतरण केल्यास तक्रारी प्राप्त होताच त्यावर तत्काळ कारवाई केली जाईल, असे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. अवैध वाळूचोरीच्या विषयावर महसूल विभाग गांभीर्याने उपाययोजना करत असून वाळू धोरण राबवताना त्यात सुलभता आणण्याचे प्रयत्न करण्यात येत असून वाळू धोरणात काही बदल करण्यात येत असल्याचेही महसूल मंत्र्यांनी सांगितले.

७२ वसतिगृहे सुरू करणार

इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ७२ वसतिगृहे सुरू करण्यात येणार असून या वसतिगृहांचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत सांगितले. महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेचे कामकाज गतीने व्हावे, यासाठी २० पदे मंजूर झाली असून लवकरच ही पदे भरली जाणार असून मुंबई तसेच नाशिक येथील कार्यालय लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

समिती स्थापन

इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाला राजकीय आरक्षण देण्यासंदर्भात न्यायालयात पूर्ण ताकदीनिशी लढत असून याकरिता निष्णात वकील नेमण्यात आले आहेत. हे आरक्षण न्यायालयात टिकावे, ही सर्वांचीच भूमिका आहे. त्यामुळे जयंतकुमार बांठिया यांच्या नेतृत्त्वाखाली सहा अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती ३ महिन्यांत आपला परिपूर्ण अहवाल सोपवेल. आवश्यकता वाटल्यास या समितीला १ महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल. या समितीला निधीची कोणतीही कमतरता भासणार नाही, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण

रायगड किल्ला हा शिवछत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असून रायगड किल्ल्याचा विकास आणि किल्ल्यावरील जुन्या व जीर्ण विद्युतवाहिन्या बदलून वीजवितरण यंत्रणेचे सक्षमीकरण व नूतनीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी शिवजयंतीच्या निमित्ताने रायगड जिल्हा नियोजन समितीमार्फत ६.०४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे, असे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी विधानसभेत सांगितले.

केंद्राकडे पाठपुरावा

राज्यातील रास्त भाव दुकानातून पुरविण्यात येणारा धान्याचा इष्टांक हा २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे केंद्राने ठरवून दिला असून धान्याचा हा इष्टांक वाढवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे, असे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत सांगितले.

बालसंगोपनगृहात राहण्याची परवानगी

राज्यातील निराधार आणि बेघर बालकांना वयाच्या १८ वर्षापर्यंत बालसंगोपन गृहात ठेवले जात होते, मात्र, वयाच्या २३ वर्षापर्यंत बालसंगोपनगृहात मुलांना राहण्याची परवानगी देणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. ११.४३ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असून, बालसंगोपनगृहांची संख्या वाढवण्यात येणार आहे अंगणवाडीतील बालकांना सर्व प्रकारच्या सुविधा देणे ही शासनाची जबाबदारी असून, सर्व अंगणवाड्यांसाठी सुसज्ज जागा आणि सर्व सुविधांसाठी जलदकृती कार्यक्रम राबवून ही कामे एका वर्षात पूर्ण करण्यात येतील. वाढती लोकसंख्या आणि मागणीनुसार नवीन अंगणवाडी सुरू करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी विधानसभेत सांगितले.

द्राक्षबागांचे होणार संरक्षण

वातावरणातील बदल, गारपीट व अतिवृष्टी यांसारख्या समस्यांपासून द्राक्षबागांचे संरक्षण करण्यासाठी त्यावर प्लास्टिक आच्छादन लावण्याचा प्रयोग राज्यात करण्यात येणार असून चालू वर्षात प्रायोगिक तत्त्वावर १०० हेक्टर क्षेत्रावर हे आच्छादन लावण्यात येईल. त्यानंतर त्याची राज्यभरात अंमलबजावणी करण्यात येईल, असे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत सांगितले.

जलसंपदाचा कालबद्ध कार्यक्रम

जलसंपदा विभागामार्फत पुढील दोन वर्षात १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा मानस असून यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी विधानसभेत दिली, तर महाराष्ट्र व गुजरात राज्यादरम्यान प्रस्तावित दमणगंगा-पिंजाळ व पार-तापी-नर्मदा या नदीजोड

११ विधेयके पारित

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी कामकाज संपल्यानंतर विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी अधिवेशन कालावधीतील कामकाजाचा आढावा घेतला. विधान परिषदेत २ विधेयके पुरःस्थापित करण्यात आली, तर २ विधेयके संमत करण्यात आली. विधानसभेची ११ विधेयके पारित करण्यात आली, तर ४ विधेयके (धनविधेयके) विधानसभेकडे शिफारशीशिवाय परत पाठवण्यात आल्याचे सभापतींनी सांगितले.

विधान परिषदेत अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत एकूण १५ बैठका झाल्या त्यात रोज सरासरी ५ तास ५३ मिनिटे असे संपूर्ण कालावधीत ८८ तास ३७ मिनिटे प्रत्यक्षात कामकाज झाले. या सभागृहात एक हजार ७५५ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते, त्यातील ७७५ प्रश्न स्वीकृत होऊन ११३ प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. १२२ अतारांकित प्रश्न प्राप्त झाले होते, शिवाय तारांकित प्रश्नांमधून अतारांकित झालेल्या प्रश्नांची संख्या २३५ होती. त्यातील ४२० अतारांकित प्रश्नांना उत्तरित केले गेले. सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींसंबंधी तीन विषयांवर सर्वसाधारण चर्चा करण्यात आली, तर नियम ९३ अन्वये ८० सूचना प्राप्त झाल्या होत्या. १०६ औचित्याचे मुद्दे प्राप्त झाले होते. ५८५ प्राप्त लक्षवेधी सूचनांपैकी २१० सूचना मान्य करण्यात येऊन ५० सूचनांवर सभागृहात चर्चा झाली. विधानपरिषदेत ९२.८५ टक्के सदस्यांची जास्तीत-जास्त उपस्थिती होती, असेही शेवटी सभापती श्री. नाईक-निंबाळकर यांनी सांगितले.

१०६ तास ३० मिनिटे कामकाज

३ मार्चपासून सुरू असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १५ बैठका झाल्या असून प्रत्यक्षात १०६ तास ३० मिनिटे इतके कामकाज झाले आहे. रोजचे सरासरी कामकाज ७ तास १० मिनिटे इतके झाले आहे, असे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत सांगितले.

अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी उपाध्यक्ष श्री. झिरवाळ यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाचा आढावा सभागृहात सादर केला. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ६ हजार ६९८ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते त्यातील ६९६ प्रश्न स्विकृत होऊन ६४ प्रश्नांना विविध विभागांच्या मंत्र्यांनी सभागृहात उत्तरे दिली आहेत. विधानसभेत १७८७ लक्षवेधी सूचना आल्या, त्यातील २७४ सूचना स्वीकृत करण्यात आल्या, तर त्यातील ८० सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विधानसभेत १३ शासकीय विधेयके पुरःस्थापित करण्यात आली तर १५ विधेयके संमत करण्यात आली. एक अधिक विधानपरिषद विधेयक संमत करण्यात आले. याच सभागृहात नियम २९३ अन्वये प्राप्त एका सूचनेवर आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर आवश्यक असलेल्या ६ पेक्षा अधिक सूचनांवर तसेच अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली. या सभागृहात अधिवेशन काळात सुमारे ९१.५३ टक्के सदस्यांची जास्तीत-जास्त उपस्थिती होती, असेही उपाध्यक्ष श्री. झिरवाळ यांनी सांगितले.

प्रकल्पांमधून महाराष्ट्राने बाहेर पडण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पात राज्याच्या नार-पार खोऱ्यातील १५.३२ (अतिरिक्त घनफूट) पाणी गुजरात राज्याला देण्याचा प्रश्न येत नाही, असे स्पष्टीकरण जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी विधान परिषदेत केले.

पत्रकार कल्याण निधी

शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीत सध्या ३५ कोटी रुपये राष्ट्रीयकृत बँकेत मुदतठेव स्वरूपात गुंतवण्यात आले आहेत. त्यावरील मिळणाऱ्या व्याजामधून राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा त्यांच्या मृत्युपश्चात वारसांना मदत करण्यात येत आहे, असे माहिती व जनसंपर्क विभागाच्या राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले. या योजनेंतर्गत आजवर २५८ पत्रकार व त्यांचे कुटुंबीय यांना एकूण १ कोटी ५८ लाख ५२ हजार ७११ रुपये एवढी रक्कम वैद्यकीय कारणास्तव आर्थिक मदत करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

भरारी पथक

बनावट वैद्यकीय व्यवसायी शोधून काढण्याकरिता जिल्हा, तालुका, महानगरपालिका, नगरपालिका स्तरावर दर महिन्याला बैठक घेण्यात येणार असून भरारी पथकाची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. त्याकरिता व्याप्ती व नियम अधिक कडक करण्याची गरज निर्माण झाली आहे. बनावट वैद्यकीय व्यावसायिकाकडून उपचार घेत असताना एखाद्याचा मृत्यू झाल्यास तर त्यासंदर्भातील खटला जलदगती न्यायालयामध्ये चालवण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

रिक्त पदे भरणार

वाढते पशुधन आणि विभागाची प्रशासकीय गरज लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे लवकरच भरण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार यांनी विधान परिषदेत दिली. दूध उद्योग जिवंत राहिला पाहिजे. यासाठी दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग मोठ्या प्रमाणावर उभे राहिल्यास मागणी आणि पुरवठा होऊ शकेल. खुल्या अर्थव्यवस्थेत आपण दूध उत्पादकांसमोर बंधने लादू शकत नाही. त्यामुळे दूध उत्पादनासंदर्भात एफआरपी देण्यासंदर्भात बैठक घेण्यात आली असून याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती मंत्री सुनील केदार यांनी दिली.

अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) अध्यादेश २०२१ चे कायद्यात रुपांतर झाले आहे. ३१ जानेवारी २०२२ पर्यंत १६७ अनधिकृत मासेमारी नौकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. यापैकी १७ प्रतिवेदने निकाली काढण्यात आली असून ५२.७१ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी विधानपरिषदेत दिली. आतापर्यंत २१०.६५ कोटी रुपये एवढी रक्कम मच्छीमारांना डिझेल परताव्यापोटी वितरित करण्यात आलेली आहे. २०२१-२२ च्या हिवाळी अधिवेशनात ५० कोटी रुपये एवढा निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी ३९ कोटी रुपये एवढा निधी वितरित करण्यात वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

आयोगाचे लवकरच गठन

राज्य मागास वर्ग आयोगाचे लवकरच गठन होणार असून, त्यामार्फत मराठा समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास केला जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी दिली. राज्य शासनाने प्रथम पुनर्विलोकन याचिका दाखल करावी आणि त्यावर निर्णय झाल्यानंतरच राज्य मागास वर्ग आयोगाचे गठन करावे, अशी शिफारस माजी न्या. दिलीप भोसले यांनी केली होती. त्यानुसार राज्य सरकार पुनर्विलोकन याचिकेवरील निर्णयाच्या प्रतीक्षेत होते. मात्र, त्यास विलंब होत असल्याने स्वतंत्रपणे मागास वर्ग आयोगाचीही प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य मागासवर्ग आयोग गठन करण्याचा निर्णय घेतला असून, लवकरच त्याची घोषणा होईल. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे, अशी स्पष्टोक्तीही श्री.चव्हाण यांनी या वेळी केली.

विभागीय संपर्क अधिकारी

अर्थसंकल्प विशेष

२०२२-२३

- विकासाची पंचसूत्री
- एक ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्टे
- सर्वांगीण विकासासाठी भरीव तरतूद
- सामाजिक उत्तरदायित्व
- पर्यटन विकासासाठी नवीन क्षेत्रांना बळ
- राज्याची संस्कृती व वारसास्थळांचे जतन
- छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार योजना
- कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण आणि उद्योग या पाच क्षेत्रांसाठी तब्बल १ लाख १५ हजार २१५ कोटी रुपयांची तरतूद
- 'सीएनजी' इंधनावरील मुल्यवर्धीत कर (व्हॅट) १३.५० टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत कमी
- राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विधिमंडळ सदस्यांचा स्थानिक विकास निधी ४ कोटींवरून ५ कोटी

कोरोना संकटावर मात करून राज्याच्या सर्वांगीण विकासाची मोठी भरारी घेणारा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात सादर केला. यात निश्चित केलेल्या विकासाच्या पंचसुत्रीमुळे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे राज्याचे उद्दिष्ट पूर्णत्वाला जाईल. राज्यातील सर्व घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे.

विकासाची पंचसूत्री

उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

यंदाच्या अर्थसंकल्पातून कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण, उद्योग क्षेत्राच्या विकासाला बूस्टर डोस मिळाला असून हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाच्या, समाजातील दुर्बल घटकांच्या हिताची जोपासना करणारा आहे.

कोरोनाचे संकट, निसर्गाचा लहरीपणा यामुळे राज्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली असतानाही राज्याच्या विकासाची घोडदौड कायम असल्याचे अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले आहे. विकासाच्या पंचसूत्रीसाठी तीन वर्षात ४ लाख कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कृषी व संलग्न क्षेत्राला या अर्थसंकल्पाने मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील सिंचन क्षमता वाढवणे, ६० हजार कृषी पंपाना वीज जोडणी देणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. निर्यातक्षम २१ शेतमालाचे क्लस्टर तयार केल्याने शेतमालाला चांगला भाव मिळेल.

आरोग्य सुविधांचे बळकटीकरण

कोरोना संकटात राज्यातील जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी राज्य शासनाने मोठ्याप्रमाणात आरोग्य सुविधांचे जाळे निर्माण केले. हीच व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे, आरोग्य सेवांचा दर्जात्मक विस्तार करण्याचे नियोजनही अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. १६ जिल्ह्यात १०० खाटांची स्त्री रुग्णालये, वैद्यकीय शिक्षणाचा गुणात्मक आणि दर्जात्मक विकास यासाठी भरीव निधी दिला आहे. पुणे शहराजवळ देशातील पहिली वैद्यकीय वसाहत आपण निर्माण करत आहोत.

रोजगार संधीचा विकास

रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठी इनोव्हेशन हब स्थापन करणे, नवीन स्टार्टअप्ससाठी १०० कोटी रुपयांचा स्टार्टअप फंड उपलब्ध करण्याचा महत्त्वाचा निर्णय यात घेतला आहे.

'सामाजिक'साठी भरीव तरतूद

हा अर्थसंकल्प महिलांच्या, बालकांच्या व दुर्बल घटकांच्या हिताच्या रक्षणासाठी, त्यांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. अंगणवाडी मदतनीसांना मोबाईल सेवा देणारी ई-शक्ती आपण प्रदान करत आहोत. बालसंगोपन अनुदानात भरीव वाढ करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात अमृतमहोत्सवी महिला व बालभवनाची उभारणी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. अल्पसंख्याक, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण आणि आदिवासी विभागांच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यात आली आहे. महिला शेतकऱ्यांसाठी कृषी योजनेतील तरतूद ५० टक्के केल्याने महिला शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल.

भारतरत्न लता मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी, थोर समाज सुधारक व महनीय व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्रे सुरू करण्यासाठी निधी, ऐतिहासिक व महत्त्वाच्या शाळांचा विकास, तंत्रचलित नालासफाईची निश्चिती या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

ई-वाहन धोरणाला प्रोत्साहन

इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा वाढवणे, मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतुकीचा २५ टक्के हिस्सा इलेक्ट्रिक वाहनांचा असण्यासाठी टाकलेली पावले महत्त्वाची आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिक्षित करणे, माझी वसुंधरा अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी करणे, नद्यांचे संवर्धन यामुळे पर्यावरणाप्रति सजगता निर्माण होईल.

पायाभूत सुविधांचा विकास

रस्ते, मेट्रो, बंदरविकास, विमानतळ विकास अशा विविध दळणवळणाच्या साधनांचा दर्जात्मक विकास, गृहनिर्माण क्षेत्रातील उद्दिष्टपूर्ती करण्याला प्राधान्य दिले आहे. मुंबई महानगरप्रदेशातील वाहतूक ताण कमी करण्यासाठी नवीन जलमार्गांची निश्चिती करण्यात आली आहे

नव्या योजना

वसमत येथे मा. बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सोयाबीन व कापूस पिकासाठीच्या विशेष कृती कार्यक्रम, मिशन महाग्रामच्या माध्यमातून शाश्वत विकासाचा प्रयत्न, पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजनेची अंमलबजावणी, मुंबई-पुणे, नागपूर येथे स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्थळांचा हेरिटेज वॉक, विविध धार्मिक स्थळे आणि परिसर विकासासाठी निधी अशा काही नवीन योजना आणि उपक्रमांची आखणीही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

करमाफी

विविध करांवरील सवलतीसाठी अभय योजना, नैसर्गिक वायूवरील कर सवलत, मुद्रांक शुल्कात कर सवलत, जलवाहतुकीस चालना देण्यासाठी कर माफी अशा विविध महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात केल्याने या क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

शब्दांकन : डॉ. सुरेखा मुळे
मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या तिसऱ्या आणि राज्याच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पाचे विधिमंडळातील चर्चेत तसेच विधिमंडळाबाहेर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मुक्तकंठाने कौतुक केले. हे कौतुक तसेच सद्भावनेतून केलेली टीका या दोन्ही गोष्टींबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून येणाऱ्या काळात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री म्हणून राज्याची अर्थव्यवस्था अधिक गतिमान, मजबूत करण्याचा, राज्याच्या विकास प्रक्रियेसाठी भक्कम आर्थिक पाठबळ उभे करण्याचा प्रयत्न असणार आहे.

विकासासाठी भक्कम तरतूद

अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री

यंदाचा अर्थसंकल्प विकासाच्या पंचसूत्रीवर आधारीत आहे. अर्थसंकल्पात कृषी, उद्योग, आरोग्य, दळणवळण, मनुष्यबळ विकास या पाच क्षेत्रांच्या पायाभूत सुविधा विकासावर आपण भर दिला आहे. या क्षेत्रांसाठी तब्बल १ लाख १५ हजार २१५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. येत्या तीन वर्षांत यावर ४ लाख कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासातून महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार अर्थसंकल्पात व्यक्त केला आहे.

करकपातीमुळे सर्वसामान्यांना दिलासा

राज्याच्या या अर्थसंकल्पात राज्यातील जनतेवर एक रुपयाचीही करवाढ केलेली नाही. उलट 'पीएनजी', 'सीएनजी'सारख्या नैसर्गिक गॅसवरील व्हॅट १३.५० टक्क्यांवरून ३ टक्के इतका कमी केला आहे. पाईपद्वारे घरपोच मिळणारा स्वयंपाकाचा 'पीएनजी' साडेतीन रुपये प्रति एससीएम (स्टॅन्डर्ड क्युबिक मीटर), तर वाहनांसाठी लागणारा 'सीएनजी' प्रतिकिलो ६ रुपयांनी स्वस्त झाला आहे.

इतर महत्त्वपूर्ण तरतुदी

राज्यातील सर्व आमदारांचा स्थानिक विकास निधी ५ कोटी रुपयांपर्यंत वाढवला. कोरोना संकटकाळात सापडलेल्या उद्योग, व्यापार क्षेत्राला संकटातून बाहेर काढण्यासाठी 'महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड-२०२२' अभय योजना अर्थसंकल्पात आपण जाहीर केली. संत ज्ञानेश्वर माऊलांच्या ७२५ व्या समाधी वर्षानिमित्त निवृत्ती महाराज, ज्ञानेश्वर महाराज, सोपानकाका महाराज, संत मुक्ताई या संत भावंडांच्या समाधिस्थळाच्या विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

विदर्भाला अधिक निधी

राज्यातील महाविकास आघाडी सरकार विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक विकासासाठी बांधील आहे. राज्यपालांनी निश्चित केलेल्या निकषांपेक्षा विदर्भाला २३.०३ टक्के ऐवजी चालू आर्थिक वर्षात २६ टक्के निधी देण्यात आला. मराठवाड्यासाठी १८.६२ टक्के निकष असला तरी चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत पुढील वर्षी निधीत वाढ करण्यात आली आहे.

जीएसटी संकलनात विक्रमी वाढ

लोकराज्यच्या वाचकांना, राज्यातील जनतेला सांगताना आनंद होत आहे की, दोन वर्षांच्या कोरोना संकटानंतर यंदा राज्याने विक्रमी जीएसटी करसंकलन केले आहे. आयजीएसटी, सीजीएसटी, एसजीएसटी (अनुक्रमे आंतरराज्य, केंद्रीय व राज्य जीएसटी) मिळून राज्याने यंदा दोन लाख कोटींहून अधिक जीएसटी संकलनाचा टप्पा पार केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ३३ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे.

आपल्या राज्यातून देशाला सर्वाधिक कर जातो. देशाच्या जीएसटीवसूलीत महाराष्ट्राचा वाटा १४.७० टक्के आहे. महाराष्ट्रानंतर गुजरातचा क्रमांक असून दोन्ही राज्यांच्या कर संकलनात १ लाख कोटींचा फरक आहे. हा फरक लक्षात घेऊन केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणाऱ्या अनुदान, मदत, विशेष निधीत वाढ व्हावी, यासाठी आपला प्रयत्न आहे.

केंद्रीय जीएसटी परिषदेने जीएसटी करचोरी रोखण्यासाठी तसेच कर प्रणालीतील दोष शोधून सुधारणा सुचवण्यासाठी, देशातील काही राज्यांच्या उपमुख्यमंत्री व वित्तमंत्र्यांची राष्ट्रीय समिती आपल्या राज्याच्या उपमुख्यमंत्री, वित्तमंत्र्यांच्या म्हणजेच, माझ्या नेतृत्वाखाली स्थापन केली आहे. यासमितीने जीएसटी परिषदेला अनेक शिफारशी केल्या असून त्याचाही उपयोग राज्याचे जीएसटी संकलन वाढीसाठी झाला आहे.

राज्यात कमी झालेला कोरोनाचा धोका, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेबांनी राज्यातून कोरोना निर्बंध हटवण्याची केलेली घोषणा आणि या पार्श्वभूमीवर राज्याच्या जीएसटी संकलनात होत असलेली वाढ हे वस्तुस्थिती लक्षात घेऊन, यंदाच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये अंदाजित केलेले ४ लाख ३ हजार ४२७ कोटी रुपयांचे राज्याच्या महसूल जमेचे उद्दिष्ट गाठण्यात आपण सगळे जण निश्चित यशस्वी होऊ, असा विश्वास आहे.

शब्दांकन : संजय देशमुख
उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

राज्याचा अर्थसंकल्प विकासाच्या पंचसूत्रीवर आधारलेला असून राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आहे. शेतकरी, उद्योजक, व्यापारी, कामगार, कलाकार, महिला, विद्यार्थी या सर्व समाजघटकांना न्याय देण्याच्या दृष्टीने आरोग्य, उद्योग, शिक्षण, कृषी, जलसंपदा, ऊर्जा, सांस्कृतिक यासह सर्व विभागांसाठी भरीव आर्थिक तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

सर्वसमावेशक अर्थसंकल्प

बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

यंदाच्या २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. उद्योग, व्यापार व शेतीला चालना मिळून यातून रोजगार निर्मिती होणार आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय

अर्थसंकल्पात नियमीत पीक कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान देण्याचे घोषित केले आहे. १० हजार कोटी रुपयांची तरतूद यासाठी केली असून २० लाख शेतकरी बांधवांना याचा फायदा होणार आहे. भूविकास बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी, किमान आधारभूत किमतीवर शेतमाल खरेदीसाठी ६ हजार ९५२ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मुद्रांक शुल्कात सवलती

मुद्रांक शुल्कावरील दंडाच्या रकमेत सवलत देण्यासाठी १ एप्रिल २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीसाठी दंड सवलत अभय योजना राबण्यात येणार आहे. महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था यांना विनामोबदला स्थावर मिळकत हस्तांतरित होत असेल, तर अशा दस्तांवर सध्या आकारला जाणारा ३ टक्के, खरेदी पत्रावरील ५ टक्के मुद्रांक शुल्क माफ करण्यात येणार आहे. बांधकाम व्यवसायाला चालना देण्यासाठी मुद्रांक शुल्क समायोजनाच्या कालावधीत १ वर्षावरून ३ वर्षे इतकी वाढ करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम व्यवसायातील गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळणार आहे.

आरोग्यसेवेचे बळकटीकरण

कोविड-१९ काळात आलेले अनुभव लक्षात घेता आरोग्यसेवा बळकट करण्यासाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. अद्ययावत वैद्यकीय शिक्षण सुविधा उभारणे आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा वाढवणे याबरोबर नांदेड, अमरावती, जालना, भंडारा, अहमदनगर आणि सातारा येथे प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर युनिट उभारले जाणार आहेत. यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे.

महिला व बालकांचा प्राधान्याने विचार

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या ३ टक्के रकमेतून प्रत्येक जिल्ह्यात अमृतमहोत्सवी महिला बालभवन उभारण्यात येणार आहे. कुपोषण रोखण्यासाठी ग्रामीण भागात ज्याप्रमाणे बालसंगोपन केंद्र उभारली गेली आहेत, त्याप्रमाणे नागरी भागातही बालसंगोपन केंद्रे उभारण्याची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्यासाठी राज्यातील १६ जिल्ह्यांत १०० खाटांचे महिला रुग्णालये उभारण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे.

औद्योगिक विकासाला चालना

राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी करण्यात आलेली तरतूद ही गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. मनुष्यबळ विकासासाठी इनोव्हेशन हब उभारणीसाठी ५०० कोटी आणि स्टार्टअप फंडसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आदिवासी समाजातील नवउद्योजकांना प्रोत्साहन व आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे आदिवासी औद्योगिक क्लस्टर उभारण्यात येणार आहे.

पायाभूत सुविधांचा विकास

दळणवळणाच्या सुविधा विकासासाठी अतिशय महत्त्वाच्या असतात. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि दळणवळणासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. रस्ते, मेट्रो, बंदरविकास, विमानतळ विकास अशा विविध दळणवळणाच्या साधनांचा दर्जात्मक विकास, गृहनिर्माण क्षेत्रातील उद्दिष्टपूर्ती करण्याला या अर्थसंकल्पाने प्राधान्य दिले आहे.

पर्यटनाला अधिक चालना

राज्यातील पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात विविध प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. पुणे वन विभागात बिबट्या सफारी आणि बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानातील आफ्रिकन सफारी सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. पुरातत्त्व स्मारकांच्या जतन, संवर्धन आणि दुरुस्तीसाठी जिल्हानिहाय महावारसा सोसायटीची स्थापना करण्यात येणार आहे.

शब्दांकन : शैलजा पाटील
विभागीय संपर्क अधिकारी

राज्याचा २०२२-२३ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार व वित्त राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधिमंडळात सादर केला. यंदाचा अर्थसंकल्प विकासाच्या पंचसुत्रीवर आधारित असून कृषी, आरोग्य, मनुष्यबळ विकास, दळणवळण आणि उद्योग या पाच क्षेत्रांसाठी तब्बल १ लाख १५ हजार २१५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या क्षेत्रांसाठी येत्या तीन वर्षांत त्यासाठी ४ लाख कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

आश्वासक अर्थसंकल्प

यंदाच्या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ न करता 'सीएनजी' इंधनावरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) १३.५० टक्क्यांवरून तीन टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. तसेच विकासाची पंचसूत्री, सामाजिक उत्तदायित्व, पर्यटन विकासासाठी नवीन क्षेत्रांना बळ, महाराष्ट्राची संस्कृती व वारसास्थळांचे जतन, विकास करण्यासाठी विविध योजना हे यंदाच्या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य आहे. राज्याच्या विकासाची गुरुकिल्ली असलेल्या या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विकासासाठी भरीव तरतूद करण्यात आली असून एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कोरोनामुळे संकटात सापडलेल्या उद्योग, व्यापार क्षेत्राला संकटातून बाहेर काढण्यासाठी 'महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड - २०२२' योजनाही या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर करण्यात आली आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विधिमंडळ सदस्यांचा स्थानिक विकास निधी ४ कोटींवरून ५ कोटी करण्यात आला आहे. याचा फायदा सर्व भागांच्या व सर्व घटकांच्या विकासासाठी होणार आहे.

आपला महाराष्ट्र देशातील सर्वाधिक प्रगत राज्य आहे. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार अशा सर्व क्षेत्रात महाराष्ट्राची घोडदौड कायम राहावी, राज्याच्या अर्थव्यवस्थेने एक ट्रिलियन डॉलरचे लक्ष्य गाठावे, यासाठी अनेक निर्णय यंदाच्या अर्थसंकल्पात घेण्यात आले आहेत. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२२-२३ साठी १३ हजार ३४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वार्षिक योजनेसाठी १ लाख ५० हजार कोटी, अनूसूचित जाती उपयोजनेसाठी १२ हजार २३० कोटी, अनूसूचित जमाती उपयोजनेसाठी ११ हजार १९९ कोटी रूपयांची तरतूद केली आहे.

चालू आर्थिक वर्षात महसूली जमा ४ लाख ३ हजार ४२७ कोटी प्रस्तावित असून महसूली खर्च ४ लाख २७ हजार ७८० कोटी रुपये आहे. २४ हजार ३५३ कोटी रुपयांची महसूली तूट अपेक्षित आहे.

विधिमंडळात अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी छत्रपती संभाजी महाराजांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार, वित्त राज्यमंत्री शंभुराज देसाई.

छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार

महाराष्ट्राची अस्मिता, स्फूर्तिस्थान स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतिदिनी अर्थसंकल्प सादर करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी अर्थसंकल्प सादर करण्याचे औचित्य साधून छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसे त्यांचे स्मारक वढु बुद्रुक व तुळापूर, ता. हवेली जि. पुणे या परिसरात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी महाविकास आघाडी शासनाकडून २५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

असामान्य शौर्य, धाडस दाखवणाऱ्या राज्यातील नागरिकांसाठी येत्या वर्षापासून महाराजांच्या नावाने छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार योजना सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

कृषी

नियमित पीक कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन : ६ मार्च २०२० रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणात नियमित पीक कर्जफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान देण्याचे घोषित केले होते. पण ही रक्कम आर्थिक अडचणींमुळे वाटप होऊ शकली नाही. शेतकरी बांधवांना दिलेल्या वचनाची पूर्ती नवीन आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे. या अनुदानाचा लाभ नियमित कर्जफेड करणाऱ्या अंदाजे २० लाख शेतकरी बांधवांना होईल. त्याकरिता २०२२-२३ मध्ये १० हजार कोटी रुपये तरतूद करण्यात

राज्याला प्रगतिपथावर नेणारा अर्थसंकल्प

कृषी, आरोग्य, मनुष्यबळविकास, दळणवळण व उद्योग या विकासाच्या पंचसुत्रीवर भर देत सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आणि प्रगतिपथावर घेऊन जाणारा आहे. कोरोना महामारीच्या संकटामुळे आर्थिक संकटाचा सामना करत असतानाही कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प सादर करून समाजातील सर्व घटकांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून उद्योग, व्यापार व शेतीला अधिक चालना मिळून यातून रोजगार निर्मिती होईल. शेतकरी, उद्योजक, व्यापारी, कामगार, कलाकार, महिला, विद्यार्थी, सर्व समाजघटकांना न्याय देण्याच्या दृष्टीने आरोग्य, शिक्षण, कृषी, जलसंपदा, उर्जा, सांस्कृतिक यांसह सर्व विभागासाठी भरीव आर्थिक तरतूद करून महाराष्ट्र राज्याला कायम प्रगतिपथावर ठेवणारा हा अर्थसंकल्प आहे.

- शंभूराज देसाई, वित्त राज्यमंत्री

आली आहे.

भूविकास बँकेची कर्जमाफी : भूविकास बँकेच्या ३४ हजार ७८८ कर्जदार शेतकऱ्यांची ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून कर्मचाऱ्यांची २७५ कोटी ४० लाख रुपये इतकी देणी अदा करण्याचेही ठरवले आहे. भूविकास बँकांच्या जमिनी व इमारतींचा वापर यापुढे शासकीय योजनांसाठी करण्यात येणार आहे.

पंतप्रधान पीक विमा योजना : गुजरात व अन्य काही राज्ये पंतप्रधान पीक विमा योजनेतून यापूर्वीच बाहेर पडली आहेत. महाविकास आघाडी शासनाने मा. प्रधानमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून या योजनेमध्ये बदल करण्याची विनंती केली आहे. ती मान्य झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या पीक नुकसान भरपाईसाठी अन्य पर्यायांचा विचार करण्यात येणार आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना : सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात खरीप हंगाम २०२१ पासून शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा करण्याची घोषणा केली होती. या योजनेमुळे पीक कर्ज वाटपात वाढ झाली असून फेब्रुवारी २०२२ अखेर ४१ हजार ५५ कोटी रुपये कर्जाचे वाटप झाले आहे. २०२२-२३ मध्ये व्याज सवलत योजनेंतर्गत ९११ कोटी रुपये निधी सुमारे ४३ लाख १२ हजार शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र : मा. बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्र, वसमत जि. हिंगोली येथे स्थापन करण्यात येईल. या केंद्रामध्ये प्रामुख्याने हळद पिकाची उत्पादकता वाढवण्याकरिता संशोधन करण्यात येणार आहे, त्यासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

सोयाबीन व कापूस पिकांसाठी विशेष कृती योजना : विदर्भ आणि मराठवाड्यात कापूस व सोयाबीन लागवडीचे प्रमाण लक्षणीय आहे. तेथील सर्व शेतकऱ्यांची उत्पादकता प्रगतशील शेतकऱ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी आणि मूल्यसाखळी विकासासाठी विशेष कृती योजनेकरिता येत्या ३ वर्षात १ हजार कोटी रुपये निधी देण्यात येईल.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना : मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेचा विस्तार करून त्यामध्ये शेततळ्याचा समावेश करण्याचा निर्णय झाला आहे. शेततळ्याच्या अनुदानाच्या रकमेत ५० टक्के वाढ करून ते ७५ हजार रूपये करण्यात येईल.

महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष : यंदा २०२२ हे वर्ष महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष म्हणून राबवण्यात येत आहे. महिला शेतकऱ्यांकरिता कृषी योजनांमध्ये राखीव असलेली ३० टक्के तरतूद वाढवून यापुढे ती ५० टक्के करण्यात येईल. कृषी विभागाच्या योजनांमध्ये यापुढे तरतुदीच्या ३ टक्के निधी आजी-माजी सैनिकांनाही उपलब्ध करून देण्यात येईल.

मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजना : अन्नप्रक्रिया व कृषिमालाच्या मूल्यवर्धनासाठी पुढील ५ वर्षांकरिता मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजना राबवण्यात येईल. भरड धान्यांवरील कृषिप्रक्रिया व मूल्यवर्धन यावर या योजनेत विशेष भर देण्यात येईल.

कृषी विद्यापीठांना विशेष अनुदान : बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ (दापोली जि. रत्नागिरी) आणि परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने या विद्यापीठांना संशोधनाकरिता प्रत्येकी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येईल.

सहकार

कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण : राज्यातील ३०६ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणासाठी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात २ हजार कोटी रुपयांच्या योजनांची घोषणा करण्यात आली होती. बाजार समित्यांनी पायाभूत सुविधांसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची १००% परतफेड शासनाकडून करण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षांत या योजनेत सुमारे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

शेतमालासाठी किमान आधारभूत किंमत : खरीप व रब्बी पणन हंगाम २०२१-२२ अंतर्गत राज्य सरकारने १ कोटी ५० लाख ५८ हजार क्विंटल धानाची व ७ लाख ९६ हजार क्विंटल भरड धान्याची खरेदी केली आहे. आगामी रब्बी व खरीप पणन हंगाम २०२२-२३ अंतर्गत २ कोटी ३३ लाख ६० हजार क्विंटल धानाची व ३२ लाख ३२ हजार क्विंटल भरड धान्याची खरेदी अपेक्षित असून दोन्ही हंगामांकरिता ६ हजार ९५२ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

कृषी निर्यात धोरण : कृषी निर्यात धोरण

तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. निर्यातक्षम विविध २१ शेतमालांचे जिल्हानिहाय क्लस्टर तयार करून तिथे पायाभूत सुविधांचा विकास करून प्रशिक्षणाद्वारे सेंद्रिय व पारंपरिक तसेच जी.आय.टॅग प्राप्त कृषिमालाच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन देण्यात येईल. या धोरणाची अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील सुविधा समितीमार्फत करण्यात येणार आहे.

प्राथमिक सेवा सोसायट्यांचे संगणकीकरण : सहकार हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राज्यातील २० हजार ७६१ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करून त्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोअर बँकिंग सिस्टिमशी जोडण्यात येईल. येत्या तीन वर्षात त्यासाठी ९५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला १ हजार ५१२ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

जलसंपदा

सिंचन प्रकल्प : राज्यात सध्या २७० सिंचन प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. ते पूर्ण झाल्यानंतर २६ लाख ३८ हजार ७७१ हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होणार असून त्याद्वारे ३१७ टीएमसी पाणीसाठा निर्माण होईल. महाविकास आघाडीने गेल्या २ वर्षात सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यावर भर दिला असून त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. गेल्या दोन वर्षात २८ प्रकल्पात पाणीसाठा करण्यात आला आहे. येत्या दोन वर्षात १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

पंतप्रधान कृषी सिंचन योजना : पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतील २६ प्रकल्पांपैकी फेब्रुवारी २०२२ पर्यंत ९ प्रकल्प पूर्ण झाले असून २०२२-२३ मध्ये आणखी ११ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पूर्ण झालेल्या ९ प्रकल्पांमधून २ लाख ८६ हजार ७९ हेक्टर सिंचन क्षमता व ३५ टीएमसी पाणीसाठा निर्माण झाला आहे.

बळीराजा जलसंजीवनी योजना : बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत मंजूर ९१ प्रकल्पांपैकी फेब्रुवारी २०२२ पर्यंत २८ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. २०२२-२३ मध्ये २९ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पूर्ण झालेल्या २८ प्रकल्पांमधून २० हजार ४३७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

गोसीखुर्द प्रकल्प : गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पात १०० टक्के, म्हणजे ४०.४५ टीएमसी पाणीसाठा व ५३ टक्के, म्हणजे १ लाख ३४ हजार ४३१ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. डिसेंबर २०२१ अखेर प्रकल्पावर १४ हजार २५१ कोटी रुपये खर्च झाला असून प्रकल्पाची सर्व कामे डिसेंबर-२०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी सन २०२२-२३ मध्ये ८५३ कोटी ४५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चासाठी जलसंपदा विभागाला १३ हजार ५५२ कोटी व खारभूमी विकासासाठी ९६ कोटी रुपये नियतव्यय मंजूर केला आहे.

मृद् व जलसंधारण

मृद् व जलसंधारणाची कामे : येत्या दोन वर्षात मृद् व जलसंधारणाची ४ हजार ८८५ कामे पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यावर ४ हजार ७७४ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे.

आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनर्जीवित करणे : उस्मानाबाद, गडचिरोली आणि नंदूरबार या आकांक्षित जिल्ह्यांत वाशिम जिल्ह्याच्या धर्तीवर पाझर तलावांचे साठवण तलावात रूपांतर करून जलसिंचन सुविधा पुनर्जीवित करण्याची योजना राबवण्यात येणार आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मृद् व जलसंधारण विभागाला ३ हजार ५३३ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

कृषिपंप जोडणी

१ एप्रिल २०१८ पासून कृषिपंपांसाठी प्रलंबित असलेल्या २ लाख ४० हजार अर्जांपैकी महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत १ लाख नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या असून २०२२-२३ मध्ये आणखी ६० हजार कृषिपंपांच्या वीज जोडणीचे उद्दिष्ट आहे.

रोजगार हमी योजना

सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम : नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांत २४ हजार ६१४ सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम राबवण्यात येत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ४३ हजार ९०२ सिंचन विहिरींची कामे हाती घेतली आहेत.

फळबाग लागवड योजना : फळबाग लागवडीच्या सुधारित धोरणानुसार फळबाग लागवड योजनेत केळी, ड्रॅगन फ्रुट, एव्हॅकॅडो, द्राक्षे आदी फळ पिके तसेच अन्य महत्त्वाच्या मसाला पिकांचा नव्याने समावेश करण्यात येत आहे. या वर्षी एक लाख हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट आहे.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना : मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेमधून रस्त्यांच्या कामातील कुशल भागासाठी राज्य रोजगार हमी योजनेतून पूरक निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

रोजगार हमी योजनेसाठी २०२२-२३ मध्ये १ हजार ७५४ कोटी आणि फलोत्पादनासाठी ५४० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

पदुम

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय परळ : बैलघोडा हॉस्पिटल म्हणून प्रसिद्ध असलेल्या मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना

परळ येथे २ ऑगस्ट १८८६ रोजी झाली. या महाविद्यालयाच्या परिसरात ६० ते १२० वर्षे जुन्या १३ इमारती आहेत. हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकरिता २०२२-२३ मध्ये १० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.

शेळी पालनासाठी सामूहिक सुविधा केंद्र : अमरावती जिल्ह्यातील पोहरा येथे शेळी समूह योजनेंतर्गत श्रेणीवर्धन व क्षमतावाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील प्रत्येक महसुली विभागात एक शेळी समूह प्रकल्प राबवण्यात येईल. या प्रकल्पासाठी ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

बैलगाडा शर्यत : परंपरेने चालत आलेल्या बैलगाडा शर्यतींनी उत्तम, सुदृढ गोवंशाची पैदास आणि संगोपनाचे साधन म्हणून मोठी कामगिरी बजावली आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या भल्यासाठी या शर्यती सुरू राहाव्यात, अशी ठाम भूमिका घेऊन महाविकास आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला आणि बैलगाडा शर्यतींची परवानगी मिळवली. महाराष्ट्रातील स्थानिक जातींच्या सुदृढ गोवंशांची पैदास यामुळे अबाधित राहील, असा विश्वास आहे.

देशी गायी, म्हशींसाठी प्रयोगशाळा : देशी गायी, म्हशींची उत्पादकता वाढवण्यासाठी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एक, अशा एकूण तीन मोबाईल प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार आहेत. उच्च उत्पादन क्षमता असलेल्या गायी व म्हशींची स्त्री-बीजे प्रयोगशाळेत फलित करून सर्वसाधारण गायी-म्हशींमध्ये स्त्रीभ्रूण प्रत्यारोपणाची सुविधा किफायतशीर दरात व शेतकऱ्यांच्या दारात उपलब्ध करून देण्यात येईल.

मासळी केंद्रांची देखभाल व दुरुस्ती : महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा ५० कोटी रुपयांनी वाढवून त्या निधीतून किनारी भागातील मासळी उतरवणाऱ्या १७३ केंद्रांची देखभाल व दुरुस्ती करण्याचा निर्णय.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाला ४०६ कोटी १ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सार्वजनिक आरोग्य

सर्वांगीण विकासासाठी निरोगी समाज ही पूर्वअट असते. विकासाची पंचसूत्री या कार्यक्रमातील आरोग्य या दुसऱ्या सूत्रासाठीही भरीव तरतूद करण्यात आली आहे.

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात आरोग्य संस्थांच्या श्रेणीवर्धन व बांधकामासाठी ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीचा ४ वर्षांचा प्रकल्प जाहीर केला होता. या प्रकल्पासाठी हुडकोकडून ३ हजार ९४८ कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. २०२२-२३ मध्ये या प्रकल्पाला हुडको कर्ज साहाय्यातून २ हजार कोटी, तर १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ हजार ३३१ कोटी रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. नियमित अर्थसंकल्पीय निधीव्यतिरिक्त आरोग्य सेवांवर येत्या ३ वर्षात सुमारे ११ हजार कोटी रुपये निधी खर्च करण्याचे सरकारचे नियोजन आहे.

प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर युनिट : मुंबई शहराबाहेर प्रथम दर्जाचे शासकीय ट्रॉमा केअर युनिट नसल्याने तिथल्या गंभीर जखमी रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागते. राज्यात नांदेड, अमरावती, जालना, भंडारा, अहमदनगर आणि सातारा या ठिकाणी प्रत्येकी ५० खाटांचे प्रथम दर्जाचे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्यासाठी भांडवली खर्चाकरिता १०० कोटी रुपये आणि आवर्ती खर्चासाठी १८ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

लिथोट्रिप्सी उपचार पद्धती : ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना शासकीय रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रियेविना किडनी स्टोन काढण्याची लिथोट्रिप्सी उपचार पद्धती उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. २०० खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये येत्या तीन वर्षात ही उपचार पद्धती सुरू करण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता या वर्षी १७ कोटी ६० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

नेत्र विभागाचे श्रेणीवर्धन : मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शासकीय रुग्णालयांमध्ये आधुनिक फेको उपचार पद्धती सुरू करण्याचे शासनाने ठरवले आहे. एकूण ६० रुग्णालयांमध्ये ही उपचार पद्धती सुरू करण्यात येणार आहे, त्यासाठी पहिल्या टप्प्यात २० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.

यंत्राद्वारे कपडे धुलाई आणि स्वच्छता : राज्यातील ५० खाटांपेक्षा अधिक क्षमता असणाऱ्या रुग्णालयांना यांत्रिक धुलाई संयंत्रे आणि ३० खाटांवरील रुग्णालयांना स्वच्छता यंत्रे देण्यात येणार आहेत.

कर्करोग निदान सुविधा : कर्करोगाचे वेळेत व जलद निदान तसेच उपचाराच्या उद्देशाने ८ आरोग्य मंडळांसाठी ८ मोबाईल कर्करोग निदान वाहनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यासाठी ८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

टाटा कॅन्सर रिसर्च सेंटर व हॉस्पिटलला आयुर्वेदिक रुग्णालय आणि औषधी वनस्पतींच्या लागवडीकरिता मौजे तांबाटी ता. खालापूर जि. रायगड येथील १० हेक्टर जमीन देण्यात येत आहे.

रुग्णालयांची स्थापना व श्रेणीवर्धन, महिला व नवजात शिशू रुग्णालये : सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी महिला व नवजात शिशू रुग्णालयांची स्थापना करण्यात येईल. त्यानुसार हिंगोली, यवतमाळ, बुलडाणा, सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, वर्धा, भंडारा, जळगाव, अहमदनगर, धुळे, सोलापूर, रत्नागिरी, औरंगाबाद आणि रायगड येथे प्रत्येकी १०० खाटांची स्त्री रुग्णालये स्थापन करण्यात येतील. अकोला व बीड येथे स्त्री रूग्णालयाचे बांधकाम व श्रेणीवर्धनाचे काम हाती घेण्यात येत आहे.

रुग्णालयांचे श्रेणीवर्धन : २०२१-२२ या वर्षात राज्यात रुग्णखाटांची क्षमता १ हजार २०० ने वाढून विशेषोपचाराची सुविधा

उपलब्ध झाली आहे. राज्यात ४९ रुग्णालयांच्या बांधकाम, दुरुस्ती व इतर कामांसाठी १ हजार ३९२ कोटी ११ लाख रुपये किमतीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

नवीन मनोरुग्णालयाची स्थापना : जालना येथे ३६५ खाटांचे नवीन प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्यात येत आहे. या रुग्णालयाच्या बांधकामासाठी अंदाजे ६० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

शिव आरोग्य योजना : महानगरातील तज्ज्ञ डॉक्टरांची निदान व उपचारांची सेवा ग्रामीण भागातील जनतेस शिव आरोग्य योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्हा रुग्णालयात टेलिमेडिसीन केंद्रे स्थापन करण्यात येतील. पुढील टप्प्यात ही सेवा उपजिल्हा रुग्णालयांपर्यंत विस्तारित करण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाला ३ हजार १८३ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये

११ मार्च १८८६ रोजी पेनसिल्वेनिया वुमन्स मेडिकल कॉलेजमधून एम.डी. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या आनंदीबाई जोशी या पहिल्या भारतीय व मराठी महिला डॉक्टर ठरल्या. त्या गोष्टीला यंदा १३६ वर्षे पूर्ण झाली. त्यांचे स्मरण करून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागासाठी अनेक निर्णय घेण्यात आले.

पदव्युत्तर पदवी प्रवेश क्षमतेत वाढ : देशातील होतकरू युवकांना इथेच वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळावी म्हणून पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश क्षमतेत लक्षणीय वाढ

करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून मुंबई येथे सेंट जॉर्ज पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकीय पदव्युत्तर संस्था, तर नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था स्थापन करण्यात येत आहे. शिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमात आधुनिक फिजिओथेरपी तंत्राचा समावेश करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा कार्यप्रणाली : अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी अन्न चाचणी प्रणाली, प्रयोगशाळांचे सक्षमीकरण व ईट राईट इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात येतील. याकरिता येत्या २ वर्षात १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

इंद्रायणी मेडिसीटी : पुणे शहराजवळ ३०० एकर जागेमध्ये अत्याधुनिक इंद्रायणी मेडिसीटी उभारण्याचा शासनाचा मानस आहे. या वसाहतीत रुग्णालय, वैद्यकीय संशोधन, औषध उत्पादन, वेलनेस, फिजिओथेरपी केंद्र उपलब्ध असतील. सर्व उपचार पद्धती एकाच ठिकाणी उपलब्ध असलेली ही देशातील पहिली वैद्यकीय वसाहत ठरेल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाला २ हजार ६१ कोटी रुपये निधी उपलब्ध केला जाणार आहे.

मनुष्यबळ विकास

आधार जोडणी : विविध लाभ, सवलतीच्या व शिष्यवृत्तीच्या योजना राज्यातील बालके, विद्यार्थी व अन्य घटकांसाठी राबवण्यात येतात. राज्यातील एकही पात्र लाभार्थी या योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी आदिवासी विकास, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्याक विकास, कौशल्य विकास, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व योजना लाभार्थींच्या आधारक्रमांकाशी जोडण्यात येतील. ही कार्यवाही १ जून २०२२ पूर्वी पूर्ण करण्यात येईल.

कौशल्य विकास

आधुनिक तंत्रज्ञान केंद्र : जागतिक डिजिटल क्रांतीच्या युगात राज्यातील सुशिक्षित युवक-युवतींच्या कौशल्यात वाढ करून रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माण करण्याकरिता राज्यातील प्रत्येक महसुली विभागात एक इनोव्हेशन हब स्थापन करण्यात येईल. त्याकरिता ५०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

गडचिरोली जिल्ह्यात खासगी सहभागातून कौशल्यवर्धन केंद्र उभारून दरवर्षी ५ हजार विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येईल. याकरिता शासनाकडून ३० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील व उर्वरित निधी सामुदायिक सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून उभारण्यात येईल.

राज्यात इनोव्हेशन व इन्क्युबेशन इको सिस्टिम : राज्यात इनोव्हेशन व इन्क्युबेशन इको सिस्टिम निर्माण करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. तरुणांना विशेष संधी उपलब्ध करून देण्यासाठी नावीन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित स्टार्टअपसाठी बीज भांडवल तसेच इन्क्युबेशन सेंटरमार्फत विशेष सुविधा व मार्गदर्शन पुरवण्याचा शासनाचा मानस आहे. स्टार्ट अपसाठी प्रारंभिक टप्प्यातील भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी १०० कोटी रुपये रकमेचा राज्य सरकारचा स्टार्ट अप फंड उभारण्यात येत आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नव्याने नामकरण करण्यात आलेल्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विकास विभागाला ६१५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण

भारतरत्न लता दिनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय शासकीय संगीत महाविद्यालय : महाविकास आघाडी सरकारने भारतरत्न लता दिनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय व संग्रहालय स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील प्रांगणात जागा निश्चित करण्यात आली असून त्यासाठी

१०० कोटी रुपये निधी राखून ठेवला आहे.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - विकास कामासाठी निधी : कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाला यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशाला, राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र व संग्रहालय संकुल तसेच अन्य विभागांच्या आधुनिकीकरणाकरिता १० कोटी रुपये व मुंबई विद्यापीठाच्या लोकमान्य टिळक रत्नागिरी उपकेंद्रासाठी २ कोटी रुपये निधी देण्यात येईल.

विद्यापीठांतर्गत अध्यासन केंद्र : राज्यातील विद्यापीठांत थोर समाजसुधारक व महनीय व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्रे स्थापन करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले असून अशा प्रत्येक केंद्रासाठी ३ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

विविध महाविद्यालयांचे नूतनीकरण : मुंबई येथील सिडनहॅम, एल्फिन्स्टन महाविद्यालय आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाकरिता प्रत्येकी ५ कोटी रुपये, औरंगाबाद येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त १० कोटी रुपये, तसेच नागपूर येथील लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभागासाठी १ हजार ६१९ कोटी रुपये निधीची तरतूद.

शालेय शिक्षण

ऐतिहासिक महत्त्वाच्या शाळांचा विकास : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या कार्यक्रमांतर्गत राज्यातील महापुरुषांशी संबंधित गावांतील १० शाळांची निवड करण्यात आली असून, या शाळांना शैक्षणिक सुविधा सुधारणांसाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार. यामध्ये (१) महात्मा फुले यांचे मूळगाव खानवडी, ता. पुरंदर, जि. पुणे, (२) राजर्षी शाहू महाराज यांचे जन्मगाव कागल, जि. कोल्हापूर, (३) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवेश घेतलेली पहिली शाळा, सातारा, (४) लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे जन्मगाव वाटेगाव, ता. वाळवा, जि. सांगली, (५) महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जन्मगाव - मुरुड, जि. रत्नागिरी, (६) साने गुरुजी यांचे जन्मगाव पालगड, ता. दापोली, जि. रत्नागिरी, (७) सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा, (८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती, (९) संत गाडगेबाबा यांचे जन्मगाव शेंडगाव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती, (१०) क्रांतिसिंह नाना पाटील यांचे मूळगाव येडे मच्छिंद्र, ता. वाळवा, जि. सांगली, (११) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माध्यमिक शाळा, चौंडी, ता. जामखेड, जि. अहमदनगर, (१२) शिक्षण महर्षी, कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांची जन्मभूमी असणाऱ्या पापळ, ता. नांदगाव खंदेश्वर, जि. अमरावती, (१३) वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी शिक्षण घेतलेली जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव-बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक या शाळांचा समावेश आहे.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ५ टक्के निधी शालेय शिक्षण विभागास : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इमारती, वर्ग खोल्यांचे बांधकाम व इतर सोयीसुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या नियतव्ययापैकी ५ टक्के निधी यापुढे उपलब्ध होईल.

जवाहर बालभवन : जवाहर बालभवन या शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्राच्या इमारतीच्या मजबुतीकरण, नूतनीकरण व विस्ताराच्या कामासाठी २०२२-२३ मध्ये १० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता शालेय शिक्षण विभागाला २ हजार ३५४ कोटी व क्रीडा विभागाला ३८५ कोटी रुपये नियतव्यय मंजूर आहे.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ : भीमा कोरेगाव विजयस्तंभ मौजे पेरणे फाटा, ता. हवेली, जि. पुणे येथे सोयी सुविधायुक्त स्मारक व परिसर विकासाची कामे हाती घेण्यात येतील.

यंत्रचलित सफाई : नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये कार्यरत सफाई कामगारांची जोखीम कमी करून यापुढे गटार सफाई यंत्रचलित पद्धतीने करण्याचे राज्य सरकारने ठरवले असून त्यासाठी आधुनिक गाड्या पुरविण्यात येणार आहेत.

तृतीयपंथी व्यक्तींसाठी योजना : तृतीयपंथीयांसाठी बीज भांडवल व व्याज सवलतीची स्वंयरोजगार योजना राबवण्यात येणार आहे. राज्यातील सर्व तृतीयपंथीयांना ओळखपत्रे आणि शिधापत्रिका देण्याची विशेष मोहिमही राबवण्यात येणार आहे.

बार्टी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था-बार्टीला विविध विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी २५० कोटी रुपये निधी देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाला सर्वसाधारण योजनेकरिता २ हजार ८७६ कोटी, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाकरिता १२ हजार २३० कोटी असा एकूण १५ हजार १०६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

आदिवासी विकास

मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह व स्वयंम योजना : आदिवासी विकास विभागाच्या ४९१ वसतिगृहांमध्ये ३२ हजार

९५८ मुले आणि २० हजार ९११ मुली अशा एकूण ५३ हजार ८६९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंम योजना राबवण्यात येत असून २०२१-२२ मध्ये ८ हजार पात्र विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न असलेल्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात येत आहे.

शबरी घरकूल योजना : शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत ग्रामीण भागाकरिता शौचालय बांधकामासह सर्वसाधारण क्षेत्राकरता प्रति घरकुल १ लाख ३२ हजार रुपये, तर नक्षलग्रस्त आणि डोंगराळ क्षेत्राकरता १ लाख ४२ हजार रुपये अनुदान देण्यात येते. २०२२-२३ मध्ये त्यासाठी ३०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

आदिम जमातींसाठी बहुउद्देशीय संकुल : सवणे ता. तलासरी, जि. पालघर आणि झिंगानुर ता. सिरोंचा, जि. गडचिरोली येथे अनुक्रमे कातकरी व माडीया गोंड समाजासाठी बहुउद्देशीय संकुल बांधण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता आदिवासी विकास विभागाला ११ हजार १९९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

इतर मागास बहुजन कल्याण

महाज्योती : महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था-महाज्योतीला विविध विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी २५० कोटी रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

समर्पित आयोग : इतर मागासवर्गीय समाजाचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्व निश्चित करण्यासाठी नवीन समर्पित आयोगाची स्थापना करण्यात येत आहे. या आयोगाला प्रशासकीय सोयीसुविधांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शिष्यवृत्ती योजना : इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरिता १ हजार २० कोटी, शैक्षणिक व परीक्षा शुल्कासाठी ४०० कोटी, सावित्रीबाई फुले मुलींच्या शिष्यवृत्तीकरिता १०० कोटी आणि आश्रमशाळांकरिता ४०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता इतर मागास बहुजन कल्याण विभागाला ३ हजार ४५१ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

अल्पसंख्याक विकास

परदेशी शिष्यवृत्ती योजना : सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांनाही पदव्युत्तर आणि पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात येत आहे.

पोलीस भरती निवासी प्रशिक्षण योजना : अल्पसंख्याक उमेदवारांकरिता पोलीस भरती प्रशिक्षण योजना निवासी स्वरूपात राबवण्याचा आणि त्याचा कालावधी दोनऐवजी तीन महिन्यांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०२२-२३ या वर्षापासून ही योजना सुधारित स्वरूपात राबवण्यात येणार आहे.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ : मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा ५०० कोटी रुपयांवरून वाढवून ७०० कोटी रुपये करण्यात आली आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अल्पसंख्यांक विकास विभागाला ६७७ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

महिला व बालविकास

ई-शक्ती योजना : एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अंमलबजावणीत अधिक अचूकता, सुलभता व तत्परता यावी, यासाठी ई-शक्ती योजनेतून १ लाख २० हजार अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका भगिनींना मोबाईल सेवा उपलब्ध करून देण्यात येईल.

बालसंगोपनासाठीच्या निधीत वाढ : ० ते १८ वयोगटातील बालकांचे पालन करणाऱ्या संस्था किंवा कुटुंबाला दर महिन्याला देण्यात येणाऱ्या प्रतिबालक अनुदानात ११२५ रुपयांवरून २ हजार ५०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात येत आहे.

अमृतमहोत्सवी महिला बालभवन : जिल्हा वार्षिक योजनेच्या एकूण निधीपैकी ३ टक्के निधी महिला व बालविकास योजनांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय झाला आहे. त्यातून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अमृतमहोत्सवी महिला व बालभवन उभारण्यात येणार आहे.

नागरी बालविकास केंद्र : नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्रांच्या धर्तीवर नागरी बालविकास केंद्रे सुरू करण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय सरकारने घेतला आहे.

सॅनिटरी नॅपकीनसाठी मशिन बसवणे : आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी मोफत सॅनिटरी नॅपकीन डिस्पेन्सिंग मशिन बसवण्यात येतील.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महिला व बालविकास विभागाला २ हजार ४७२ कोटी रुपये नियतव्यय मंजूर केला आहे.

ग्रामीण विकास

मिशन महाग्राम : ग्रामीण महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या हेतूने येत्या ३ वर्षात राज्यात मिशन महाग्राम राबवले जाणार आहे. मानव विकासाच्या प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रित करून विकासाचे शाश्वत ध्येय साध्य करण्यासाठी सामुदायिक सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून

५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात येईल.

पंतप्रधान ग्रामीण आवास योजना : पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेंतर्गत ७ लाख ६७ हजार ७६६ घरकुले बांधून पूर्ण झाली असून, २०२२-२३ मध्ये सुमारे ५ लाख घरकुलांचे उद्दिष्ट आहे. त्याकरिता ६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

झोपडपट्टी सुधारणा : मुंबईमधील झोपडपट्टी सुधारण्यासाठी ज्याप्रमाणे स्वतंत्र निधी उपलब्ध होतो त्याच धर्तीवर म्हाडाच्या मुंबईबाहेरील विभागीय मंडळातील झोपडपट्ट्यांमधील मूलभूत कामे करण्यासाठी २०२२-२३ मध्ये १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

पंतप्रधान नागरी आवास योजना : पंतप्रधान नागरी आवास योजनेंतर्गत १ लाख २८ हजार ६९० घरकुले पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. लाभार्थींना ३ हजार ४२४ कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ग्रामविकास विभागाला ७ हजार ७१८ कोटी रुपये तसेच गृहनिर्माण विभागाला १ हजार ७१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहेत.

रस्ते विकास

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ : महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ याअंतर्गत सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये किमतीच्या १० हजार कि.मी. लांबीच्या ग्रामीण रस्त्यांच्या कामांना मंजुरी दिली असून येत्या २ वर्षांत ही कामे पूर्ण होतील.

पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा -३ : पंतप्रधान ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत एकूण ६ हजार ५५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कामांची २०२२-२३ मध्ये सुरुवात करण्यात येईल.

रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग : गेल्या वर्षी रेवस ते रेड्डी या सागरी महामार्गाची घोषणा करण्यात आली होती. या महामार्गावरील रेवस आणि कारंजा यांना जोडणाऱ्या धरमतर खाडीवरील २ कि.मी. लांबीच्या ८९७ कोटी ७० लाख रुपये खर्चाच्या मोठ्या चौपदरी खाडी पुलाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या सागरी महामार्गाच्या कामाकरिता सुमारे १ हजार १०० हेक्टर भूसंपादनासाठी ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित.

पुणे-रिंगरोड प्रकल्प : पुणे-रिंगरोड प्रकल्पासाठी सुमारे १ हजार ९०० हेक्टर जमिनीचे संपादन करावयाचे असून त्याकरिता १ हजार ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग नागपूर ते भंडारा-गोंदिया आणि नागपूर ते गडचिरोली असा विस्तारित करण्याचे नियोजन आहे. या महामार्गाचे ७७ टक्के काम पूर्ण झाले असून जालना ते नांदेड या द्रुतगती जोड महामार्गाच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

हायब्रीड न्युईटी-नाबार्ड साहाय्य : हायब्रीड न्युईटी योजनेतून ८ हजार ६५४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या मजबुतीकरण व दर्जोन्नतीच्या कामांपैकी ३ हजार ६७५ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. त्यासाठी २२ हजार ३०९ कोटी रुपये खर्च झाला आहे. उर्वरित कामे २०२२-२३ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. नाबार्डने मंजूर केलेल्या ६५ रस्ते विकासांची व १६५ पुलांची कामे २०२२-२३ मध्ये सुरू करण्यात येतील.

आशियाई विकास बँकेच्या अर्थसाहाय्यातून रस्तेविकास : आशियाई विकास बँकेच्या अर्थसाहाय्यातून ९९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे मजबुतीकरण व दर्जोन्नती करण्यात येत आहे. त्यांची अंदाजित किंमत ५ हजार ६८९ कोटी रुपये आहे. २०२२-२३ मध्ये ७६५ कि.मी.लांबीची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ते विकासासाठी १५ हजार ६७३ कोटी रुपये व इमारती बांधकामासाठी १ हजार ८८ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

परिवहन सेवा

जल वाहतूक : मुंबई महानगर क्षेत्रातील रस्ते व रेल्वे वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी वसई, भाईंदर, डोंबिवली, कल्याण, वाशी, ऐरोली, मीठबंदर (ठाणे) व बेलापूर ही ठिकाणे जलमार्गाने जोडण्याचा सरकारचा मानस आहे. या ठिकाणी जेट्टी व तत्सम सुविधा तसेच खाडीचे खोलीकरण करण्याची योजना आहे, याकरिता ३३० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

भाऊचा धक्का ते बेलापूर जलसेवा सुरू झाली असून या सेवेचे दर सर्वसामान्यांना परवडतील असे असावेत, यासाठी जल वाहतूक सेवेला कर सवलत देण्यात आली आहे.

रेल्वे विकास : अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा-देसाईगंज - गडचिरोली, नागपूर-नागभीड या रेल्वे मार्गांची कामे विविध टप्प्यांत असून जालना-जळगाव, कल्याण-मुरबाड-माळशेज, पनवेल-विरार या नवीन रेल्वे प्रकल्पांमध्ये राज्य शासनाकडून आर्थिक सहभाग देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

नाशिक- पुणे मध्यम अतिजलद रेल्वे : नाशिक-पुणे मध्यम अतिजलद रेल्वे प्रकल्पाला केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पासाठी १६ हजार ३९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यापैकी ८० टक्के भार राज्य शासन उचलणार आहे. मुंबई-जालना-नांदेड-हैद्राबाद बुलेट ट्रेनच्या प्रस्तावाबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

मेट्रो प्रकल्प : पुणे येथील स्वारगेट ते पिंपरी चिंचवड आणि वनाझ ते रामवाडी, मुंबई मेट्रो मार्गिका २ ए व ७ तसेच नवी मुंबई येथील बेलापूर ते पेंढार या मेट्रो मार्गिका पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहेत.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कपासून शिवाजीनगरला जोडणाऱ्या पुणे मेट्रो लाइन ३ प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. या उन्नतमार्ग मेट्रोची लांबी २३ कि.मी. असून प्रकल्पाची एकूण किंमत ८ हजार ३१३ कोटी रुपये आहे.

मुंबईतील मेट्रो मार्गिका क्रमांक ३, कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गिकेचा विस्तार कफ परेडपासून नेव्ही नगरपर्यंत होणार आहे. पुण्यातील स्वारगेट ते कात्रज या मार्गावर मेट्रो प्रकल्प प्रस्तावित आहे. पिंपरी ते निगडी, वनाझ ते चांदणी चौक, रामवाडी ते वाघोली, स्वारगेट ते हडपसर, हडपसर ते खराडी, खडकवासला ते स्वारगेट या जोड मार्गिकांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मा. बाळासाहेब ठाकरे यांची भव्य स्मारके उभारण्याची कामे प्रगतिपथावर आहेत. शिवडी ते न्हावा शेवा सागरी सेतू प्रकल्पाचे ६४% काम पूर्ण झाले असून हे काम २०२३ च्या अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कलानगर उड्डाणपूल आणि कल्याणजवळील उल्हास नदीवरील दुर्गाडी पूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. छेडा नगर उड्डाणपूल, सांताक्रुझ - चेंबूर जोडरस्त्याचा विस्तार, वसई-विरारजवळील नायगांव पूल तसेच पनवेलजवळील नेवाळे फाटा या प्रकल्पांची कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास अर्थसाहाय्य : महाराष्ट्रातील राज्य परिवहन महामंडळाची एस.टी. सेवा ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या माणसाचा दळणवळणाचा मुख्य आधार आहे. या सेवेचे महत्त्व आणि अपरिहार्यता लक्षात घेऊन मागील दोन वर्षात शासनाने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ४ हजार १०७ कोटी रुपये आर्थिक मदत केली. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकरिता पर्यावरणपूरक ३ हजार नवीन बसगाड्या उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या १०३ बसस्थानकांच्या आधुनिकीकरण, दर्जावाढ आणि पुनर्बांधणीसाठी राज्य शासनाकडून भांडवली अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरीता परिवहन विभागाला ३ हजार ३ कोटी, बंदरे विकासासाठी ३५४ कोटी तसेच नगरविकास विभागाला ८ हजार ८४१ कोटी रुपयांचा निधी देण्यात येत आहे.

विमानतळाचा विकास

हवाई सेवेला चालना देणे : शिर्डी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरून माल वाहतुकीकरिता स्वतंत्र टर्मिनल उभारण्याचे प्रस्तावित असून रात्रीच्या उड्डाणाची सुविधाही लवकरच सुरू करण्यात येत आहे. शिर्डी विमानतळाच्या कामाकरिता १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

रत्नागिरी विमानतळाच्या भूसंपादन व बांधकामासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याचे सरकारने निश्चित केले असून अमरावती विमानतळावर रात्रीची उड्डाणसुविधा सुरू करण्यासाठी नवीन टर्मिनलच्या इमारतीची उभारणी व धावपट्टीच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात येत आहे. कोल्हापूर विमानतळाकरिता आवश्यक जमिनीचे भूसंपादन व नविनीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. गडचिरोली येथे नवीन विमानतळ उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

उद्योग

मिशन ऑक्सिजन स्वावलंबन : राज्यात वैद्यकीय ऑक्सिजनचा तुटवडा होता. मिशन ऑक्सिजन स्वावलंबन अंतर्गत १ हजार ८७० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ११४ नवीन प्रकल्प उभारून १ हजार ४८० मेट्रिक टन अतिरिक्त ऑक्सिजन निर्मिती क्षमता निर्माण झाली. आता राज्य वैद्यकीय ऑक्सिजनच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे.

मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० : आर्थिक मंदी असतानाही उद्योग विभागाद्वारे मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत नामांकित उद्योग घटकांसमवेत एकूण ९८ गुंतवणूक करार करण्यात आले. राज्यात त्यातून १ लाख ८९ हजार कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित असून रोजगाराच्या ३ लाख ३० हजार नवीन संधी निर्माण होतील, असा अंदाज आहे.

ई-वाहन धोरण : २०२१ ते २०२५ साठी महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण मंजूर करण्यात आले आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीत राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी १५७ % ने वाढली आहे. सन २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत इलेक्ट्रिक वाहनांचा हिस्सा १० टक्के व मोठ्या शहरांच्या सार्वजनिक वाहतुकीतील हिस्सा २५ टक्के करण्याचे उद्दिष्ट आहे. सन २०२५ पर्यंत ५ हजार चार्जिंग सुविधांच्या उभारणीचे उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १ लाखहून अधिक उमेदवारांनी गुंतवणूक प्रस्ताव सादर केले आहेत. विविध बँकांनी त्यापैकी ९ हजार ६२१ प्रस्ताव मंजूर केले असून त्याद्वारे १ हजार १०० कोटी रुपयांची

गुंतवणूक झाली आहे. येत्या वर्षी ३० हजारांहून अधिक स्वयंरोजगार प्रकल्पातून सुमारे १ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण होतील.

पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना : पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना जाहीर करण्यात आली आहे. कोविडमुळे विधवा झालेल्या महिलांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी या योजनेत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून भांडवलाच्या कर्जावरील व्याजाची १०० टक्के परतफेड करण्यात येणार आहे.

आयात उत्पादनावरील अवलंबित्व कमी करणे : अनेक वस्तूंची आयात झपाट्याने वाढत आहे. अशा वस्तूंचे उत्पादन राज्यातच व्हावे, यासाठी राज्यातील अशा क्षेत्रांतील कार्यरत उद्योगांना उत्पादनावर आधारित प्रोत्साहन योजना किंवा तत्सम योजनेद्वारे लाभ देण्यात येतील.

खादी ग्रामोद्योग केंद्र, नांदेड : स्वातंत्र्यसैनिक स्वामी रामानंद तीर्थ आणि गोविंदभाई श्रॉफ यांनी १९६७ मध्ये नांदेड येथे मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीची स्थापना केली. माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांनी त्यानंतर या संस्थेचा विस्तार केला. येथे तयार झालेले राष्ट्रध्वज मंत्रालयासह

संपूर्ण देशात वापरले जातात. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त खादी ग्रामोद्योग केंद्राच्या या इमारतीची पुनर्बांधणी व विक्री केंद्र उभारणीसाठी २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

आदिवासी औद्योगिक क्लस्टर : आदिवासी समाजातील नवउद्योजकांना प्रोत्साहन व आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे आदिवासी औद्योगिक क्लस्टर उभारण्यात येणार आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागाला ८८५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

सीएनजीवरील व्हॅट कमी

अर्थसंकल्पात घोषणा केल्याप्रमाणे सीएनजी इंधनावरील मूल्यवर्धित कराचा (व्हॅट) दर १३.५ टक्क्यांवरून ३ टक्के इतका कमी केल्याची अधिसूचना वित्त विभागाने जारी केली आहे. यामुळे राज्यात सीएनजी इंधन स्वस्त झाले असून याचा फायदा ऑटोरिक्शा, टॅक्सी चालकांसह, प्रवासी वाहतूक करणारी वाहने तसेच नागरिकांना होत आहे. प्रदूषण नियंत्रणासाठीही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे आहे. सीएनजीचे कमी झालेले नवे दर १ एप्रिल २०२२ पासून लागू झाले आहेत.

ऊर्जा

सौर ऊर्जा प्रकल्प : मौजे कौडगाव व मौजे शिंदाळा (जि.लातूर), मौजे साक्री (जि.धुळे), वाशीम, मौजे कचराळा (जि. चंद्रपूर) आणि यवतमाळ येथे एकूण ५७७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील. याशिवाय राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा पार्क विकसित करण्यात येणार आहेत.

मुंबई पारेषण प्रणाली सक्षमीकरण प्रकल्प : मुंबई पारेषण प्रणालीच्या क्षमतेत वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. मुंबईत ११ हजार ५३० कोटी रुपये खर्चाची ४०० किलोवॅट क्षमतेची ४ उपकेंद्रे आणि १ हजार मेगावॅट क्षमतेचा अति उच्चदाब वाहिन्यांचा पारेषण प्रकल्प राबवण्यात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना : अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या घरासाठी प्राधान्याने व स्वस्तात वीज जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना राबवण्यात येत असून या योजनेचा कालावधी ६ डिसेंबर २०२२ पर्यंत वाढवण्यात येत आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता ऊर्जा विभागाला ९ हजार ९२६ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार.

मदत व पुनर्वसन

मागील दोन वर्षात राज्यातील जनतेने कोविड, तौक्ते चक्रीवादळ, महापूर यांसारख्या विविध नैसर्गिक आपत्तींचा सामना केला. या आपत्तींमध्ये शासन जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी माणुसकीच्या भावनेतून प्रत्येकाला मदतीचा हात देण्याची जबाबदारी शासनाने निभावली.

कोविड-१९ उपाययोजना व मदत : २०२१-२२ मध्ये कोविड-१९ महामारी नियंत्रणासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून ९०५ कोटी १९ लाख रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. कोविड-१९ साथरोगांमुळे आई-वडिल गमावलेल्या मुला-मुलींना ५ लाख रुपये आर्थिक साहाय्य देण्यात येत आहे.

कोविड कर्तव्यावर असताना कोविडने मृत्यू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या

कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले. कोविड-१९ आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकटच्या नातेवाईकाला ५० हजार रुपये सानुग्रह साहाय्य प्रदान करण्यात येत असून मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या १ लाख ७२७ निकटच्या नातेवाईकांच्या बँक खात्यामध्ये आतापर्यंत ५०३ कोटी ६३ लाख रुपये रक्कम जमा करण्यात आली आहे.

असंघटित कामगारांना अर्थसाहाय्य : कोविड-१९ महामारीच्या काळात सरकारने बांधकाम कामगार, माथाडी कामगार, घरेलु कामगार, सुरक्षा रक्षक अशा एकूण १३ लाख ३ हजार कामगारांना ७१५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य दिले आहे. याव्यतिरिक्त ऑटो व सायकल रिक्षा चालक, छोटे व्यापारी, फेरीवाले आदी अनेक गरजू घटकांना आर्थिक तसेच अन्नधान्याची मदत केली आहे.

अतिवृष्टी व पूरग्रस्तांना मदत : राज्य शासनाने जून ते ऑक्टोबर २०२१ कालावधीमध्ये झालेल्या पिकांच्या नुकसानीकरिता ५ हजार ५४४ कोटी १० लाख रुपयांचा निधी शेतकऱ्यांना मदत म्हणून उपलब्ध करून दिला आहे.

तौक्ते चक्रीवादळ, अतिवृष्टी व पूर

नुकसान भरपाई : रायगड, रत्नागिरी व राज्याच्या इतर भागात आलेल्या तौक्ते चक्रीवादळ व महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात शासनाने आपत्तिग्रस्तांना ६ हजार ७९ कोटी ४८ लाख रुपये मदत केली आहे.

आपत्ती सौम्यीकरण उपाययोजना : कोकण विभागातील चक्रीवादळे व अन्य आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी राज्य शासनाने ३ वर्षे कालावधीचा ३ हजार २०० कोटी रुपयांचा आपत्ती सौम्यीकरण कार्यक्रम मंजूर केला आहे. या योजनेतून धूप प्रतिबंधात्मक बंधारे, भूमिगत विद्युत वाहिन्या, बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्रे, पूर्वसूचना प्रणाली व दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय ही कामे हाती घेण्यात येत आहेत.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मदत व पुनर्वसन विभागाला ४६७ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. शिवाय नैसर्गिक आपत्ती मदत व इतर अनिवार्य खर्चासाठी १० हजार ६५५ कोटी ७३ लाख ७ हजार रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. कामगार विभागाला १२५ कोटी रुपये उपलब्ध करण्यात येत आहेत.

पाणीपुरवठा व स्वच्छता

जलजीवन मिशन : जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत २०२२-२३ मध्ये १८ लाख ७२ हजार ८४६ नळजोडण्या देण्याचे उद्दिष्ट असून त्यासाठी १ हजार ६०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम : मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ६०२ कोटी ७ लाख रुपये किमतीची ७४३ कामे मंजूर आहेत. त्यापैकी ७२२ कामे प्रगतिपथावर असून ५११ योजनांमधून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला ३ हजार २२३ कोटी रुपये उपलब्ध करण्यात येत आहेत.

पर्यटन प्रकल्प

जलक्रीडा पर्यटन : कोयना धरणाच्या परिसरात सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात शिवसागर जलाशयात उच्च दर्जाचा ५० कोटी रुपयांचा जल पर्यटन प्रकल्प प्रस्तावित आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी तसेच भंडारा येथील गोसीखुर्द प्रकल्पावरही दर्जेदार जल पर्यटन प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

हेरिटेज वॉक : महाराष्ट्रातील स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व थोर समाजसुधारकांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, या उद्देशाने मुंबई, पुणे व नागपूर येथे स्वातंत्र्यलढ्याशी निगडित स्थळांचा हेरिटेज वॉक आयोजित करण्यात येणार आहे.

अभय योजनेंतर्गत कर सवलत

कोरोना संकटकाळात अडचणीत आलेल्या उद्योग, व्यापार क्षेत्राला अडचणीतून बाहेर काढून उभारी देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी जाहीर केलेल्या 'महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड - २०२२' अभय योजनेच्या विधेयकाला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी मान्यता दिली आहे.

या योजनेमुळे, कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये १० हजार रुपयांची थकबाकी असल्यास या थकबाकीची रक्कम संपूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. वस्तू व सेवा कर (जीएसटी) अस्तित्वात येण्यापूर्वी विक्रीकर विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध करांसंदर्भातील ही योजना असून या योजनेंतर्गत आवश्यक रकमेचा भरणा करण्यासाठी १ एप्रिल २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये १० हजार रुपयांची थकबाकी असल्यास सदर थकबाकीची रक्कम संपूर्णपणे माफ होईल. या योजनेचा लाभ छोट्या व्यापाऱ्यांना सुमारे १ लाख प्रकरणांमध्ये होणार आहे.

ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशान्वये थकबाकीची रक्कम १ एप्रिल २०२२ रोजी, १० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यापाऱ्यांना अविवादित कर, विवादित कर, शास्ती या वेगवेगळा हिशोब न करता सरसकट एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध करण्यात आला आहे. अशी ठोक २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रक्कम माफ करण्यात येणार आहे. राज्यातील लहान व्यापाऱ्यांना जवळपास २ लाख २० हजार प्रकरणांमध्ये याचा लाभ होणार आहे. त्यासोबतच या अभय योजनेत अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या ही योजना पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने आणि पारदर्शकपणे राबवण्यात येणार आहे.

कोरोना संकटाने अडचणीत आलेल्या उद्योग व व्यापार क्षेत्राला अडचणीतून बाहेर काढण्यात, उभारी देण्यात ही योजना महत्वाची भूमिका बजावेल, तसेच योजनेला उद्योग व व्यापार क्षेत्राकडून चांगला प्रतिसाद मिळेल.

जव्हार व फर्दापूर येथे पर्यटन विकास : पालघर जिल्ह्यातील जव्हार या निसर्गरम्य ठिकाणास पर्यटन स्थळाचा 'ब' वर्ग दर्जा देण्यात आला असून तिथे तसेच फर्दापूर जि.औरंगाबाद येथील जमिनीचा विकास करून पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात येतील.

अजिंठा, वेरुळ, महाबळेश्वर पर्यटन आराखडा : अजिंठा, वेरुळ व महाबळेश्वर या पर्यटन स्थळांसाठी एकात्मिक विकास आराखडा करून त्या स्थळांचा सर्वांगीण विकास करण्याचे ठरवण्यात आले आहे. अजिंठा आणि वेरुळ या जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळांवर आधुनिक सामूहिक सुविधा केंद्र पुन्हा सुरू करण्यात येत आहे. लोणावळा येथील टायगर पॉईंटवरून दिसणारे विहंगम दृश्य पर्यटकांमधे लोकप्रिय आहे. तेथे स्काय वॉक व इतर आवश्यक पर्यटन सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

गडकिल्ले

किल्ल्याचे जतन व संवर्धन : रायगड किल्ला व परिसर विकासाकरिता २०२२-२३ मध्ये १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राजगड, तोरणा, शिवनेरी, सुधागड, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग या सहा किल्ल्यांसाठी १४ कोटी आणि मुंबईतील शिवडी व सेंट जॉर्ज किल्ल्यांच्या जतन व संवर्धन आराखड्यांसाठी २०२२-२३ मध्ये ७ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, गनिमीकावा यांना जागतिक वारसा दर्जा :

आमदार निधीत वाढ

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदारांचा स्थानिक विकासनिधी ५ कोटी करण्यात आला आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील विकासकामांना यामुळे गती मिळणार आहे. गत वर्षी ३ कोटींवरून ४ कोटी निधीची तरतूद करण्यात आली होती. आता ४ कोटींवरून ५ कोटी निधीची तरतूद केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि त्यांच्या गनिमी कावा युद्धपद्धतीला जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यासाठी युनेस्कोकडे सविस्तर प्रस्ताव दाखल करण्यात येत आहे.

तीर्थक्षेत्र

कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिर विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाकरीता २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. वढा, जि. चंद्रपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील विकास आराखड्याला मान्यता देऊन २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

सांस्कृतिक कार्य

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमांच्या आयोजनात देशात महाराष्ट्र आघाडीवर असून त्यासाठी ५०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. गेट वे ऑफ इंडिया वास्तूवर महाराष्ट्राची सांस्कृतिक वैभव दर्शवणारा मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील ध्वनिप्रकाश कार्यक्रम करण्याचे प्रस्तावित आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून राज्य सरकारने स्वातंत्र्य सैनिकांना निवासी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मासिक उत्पन्नाची १० हजार रुपयांची मर्यादा ३० हजार रुपये केली आहे.

महावारसा सोसायटी : राज्यात ३७६ संरक्षित आणि सुमारे १ हजार ५०० असंरक्षित पुरातत्त्व स्मारकांच्या जतन, संवर्धन आणि दुरुस्तीसाठी अशासकीय आर्थिक स्रोत निर्माण करून त्यांच्या संवर्धन आणि व्यवस्थापनाबाबत स्थानिक रहिवाशांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण व्हावी म्हणून जिल्हानिहाय महावारसा सोसायट्या स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

अमृतमहोत्सवी वंदे मातरम् : हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त औरंगाबाद येथे अमृतमहोत्सवी वंदे मातरम् सभागृहांचे काम पूर्ण करण्यात येणार असून, त्यासाठी एकूण ४३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पर्यटन विकासासाठी १ हजार ७०४ कोटी व सांस्कृतिक कार्य विभागाला १९३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

विधी व न्याय

न्यायालये : राज्यात १८ अतिरीक्त न्यायालये, २४ जलदगती न्यायालये आणि १४ कुटुंब न्यायालये निर्माण करण्यात येणार आहेत. या न्यायालयांच्या कामकाजाकरिता तसेच नवीन न्यायालय स्थापन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मा.उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयात ई-गर्व्हनन्स योजनेकरिताही पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता विधी व न्याय विभागाला ५७८ कोटी रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

शिवभोजन योजना : शिवभोजन योजनेंतर्गत राज्यात गरजूसांठी १ हजार ५३५ केंद्रांच्या माध्यमातून ८ कोटी ७० लाखांपेक्षा अधिक शिवभोजन थाळ्या

उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गुणसंवर्धित तांदळाचे वितरण : पोषणद्रव्यांची कमतरता दूर करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्याच्या धर्तीवर राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत पोषणतत्व गुणसंवर्धित तांदूळ उपलब्ध करून देण्याची योजना राबवण्यात येत आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला ३८५ कोटी रुपये नियतव्यय मंजूर केला आहे.

गृह

महाराष्ट्र एनसीसी देशात सर्वोत्तम : राष्ट्रीय छात्र सेनेतील प्रशिक्षित विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र पोलीस दलातील सहभाग वाढवण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कमांडो भत्त्यात वाढ : नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या विशेष अभियान पथकातील (सी-६०) पोलीस अधिकारी व अंमलदार यांना देण्यात येणाऱ्या मासिक कमांडो भत्त्यामध्ये दुप्पट वाढ करून तो ८ हजार रुपये करण्यात येणार आहे.

गडचिरोली येथे विशेषोपचार रुग्णालय : गडचिरोली जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारचे उपचार व शस्त्रक्रिया करणे शक्य व्हावे, यासाठी सैन्यदल रुग्णालयाच्या धर्तीवर पोलीस जवानांसाठी विशेषोपचार रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला सुरक्षा व उपक्रम : सातारा जिल्ह्यामध्ये राबवण्यात आलेला महिला सुरक्षा पथदर्शी उपक्रम राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृह विभागाला १ हजार ८९२ कोटी रुपये नियतव्यय मंजूर केला आहे.

नियोजन विभाग

अष्टविनायक विकास आराखडा : अष्टविनायक मंदिरांच्या सर्वांगीण विकास आराखड्याकरिता ५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.

पंढरपूर मंदिर सुधारणा : पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्याची अंदाजित किंमत ७३ कोटी ८० लाख रुपये असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

सारथी : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथीला विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी २५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागाला ६ हजार ८१८ कोटी ९९ लाख रुपये नियतव्यय मंजूर केला आहे.

वने

भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०२०-२१ नुसार राज्याच्या वनक्षेत्रात सुमारे २० चौ.कि.मी. इतकी वाढ झाली आहे. वनाच्छादनातही १ हजार ३०२ चौ.कि.मी. ची वाढ झाली आहे.

वन्यजीव बचाव केंद्र, चंद्रपूर : चंद्रपूर शहरालगत वनक्षेत्रात १७१ हेक्टरमध्ये व्याघ्र सफारी सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील वन्य प्राण्यांना तातडीने उपचार देण्याची

सुविधा निर्माण करण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यात व्याघ्र सफारीस पूरक असे वन्यजीव बचाव केंद्र उभारण्यात येणार आहे.

जीन बँक स्थापना : राज्यातील जनुकीय जैवविविधता जतन करण्याकरिता महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पाला पुढील पाच वर्षांकरिता २८६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

जैवविविधता उद्यान : थोर अर्थतज्ज्ञ पद्मविभूषण डॉ. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख यांच्या कार्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ रायगड जिल्ह्यामध्ये मौजे जामगाव, ता. रोहा येथे डॉ. चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख जैवविविधता वन व वनस्पती उद्यानाची उभारणी करण्यात येईल.

सौर ऊर्जा कुंपण योजना : वन्य प्राण्यांद्वारे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानीला आळा घालण्यासाठी सौर ऊर्जा कुंपण ही योजना राज्यातील सर्व संवेदनशील गावांत राबवण्याचा निर्णय.

आफ्रिकन सफारी : आफ्रिका खंडातील वन्य प्राणी प्रदर्शित करण्यासाठी १०० कोटी रुपये खर्च करून बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानात आफ्रिकन सफारी प्रस्तावित आहे.

बिबट्या सफारी : पुणे वन विभागात ९० हेक्टर वन क्षेत्रात बिबट्या सफारी प्रस्तावित असून त्यासाठी ६० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महसूल विभागाला ३४७ कोटी व वन विभागाला १ हजार ९९५ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

संत भावंडांच्या समाधिस्थळचा विकास

महाराष्ट्र संतांची भूमी आहे, या संतपरंपरेचा महाराष्ट्राला अभिमान आहे. संत ज्ञानेश्वर माऊली ७२५व्या समाधी वर्षानिमित्त नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्ती महाराजांचे समाधिस्थळ, पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराजांचे समाधिस्थळ, पुणे जिल्ह्यातील सासवड येथील संत सोपानकाका महाराजांचे समाधिस्थळ, जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील संत मुक्ताई यांच्या समाधिस्थळाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महिला सुरक्षा पथदर्शी उपक्रम

महिला सुरक्षेचा आधुनिक दृष्टिकोनातून विचार करून गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांच्या संकल्पनेतून सातारा जिल्ह्यात महिला सुरक्षेसाठी अभिनव कार्यप्रणाली निर्माण करणारा आणि महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देणारा 'महिला सुरक्षा पथदर्शी उपक्रम' राबवण्यात येत आहे. साताऱ्यात या उपक्रमास मिळालेल्या यशामुळे आता हा उपक्रम राज्यभर राबवण्यात येणार आहे. सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ही घोषणा करण्यात आली.

साताऱ्यात पोलीस विभागाने या पथदर्शी उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केल्याने ६ महिन्यांतच या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम दिसून आले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन हा उपक्रम राज्यभर राबवण्यास मान्यता दिली. त्यामुळे आता प्रत्येक जिल्ह्यात हा उपक्रम राबवला जाईल.

उपक्रमाचे यश

या उपक्रमांतर्गत महिलांसाठी असलेल्या कायदेविषयक जागृती, पोलिसी कार्यपद्धतीत सुधारणा आणि सामान्य महिलांना स्वसंरक्षणाचे धडे यावर भर देण्यात आला आहे.

सातारा जिल्ह्यात जिल्हा पोलीस दलाच्या वतीने १६ जुलै २०२१ पासून महिला सुरक्षा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येत आहे. आतापर्यंत यातून ५००हून अधिक युवतींना स्वसंरक्षणाचे मोफत प्रशिक्षण, तर ३७ हजारांहून अधिक महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ या कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम जिल्ह्यात सकारात्मक दिसून आले आहेत. साताऱ्यात पोलीस विभागाने हा महिला सुरक्षा पथदर्शी उपक्रम राबवला. सातारा पोलिसांनी घेतलेल्या कष्टामुळे हा उपक्रम यशस्वी झाला असून महिला सुरक्षेच्या दृष्टीने तो महत्त्वपूर्ण ठरला आहे.

पर्यावरण

माझी वसुंधरा : माझी वसुंधरा अभियान २.० ला स्थानिक स्वराज्य संस्थांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला असून ११ हजार ९६८ स्थानिक स्वराज्य संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत. त्यासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.

पर्यावरण सजगता : विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनातच पर्यावरण व वातावरणीय बदलांबद्दल सजगता निर्माण व्हावी, यासाठी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण विषयाचा शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे.

राज्य नदी संवर्धन योजना : राज्यातील २३ नद्यांच्या संवर्धनाचे प्रस्ताव असून त्याकरिता १५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

२०२२-२३ वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाला २५३ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

मराठी भाषा विभाग

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून या चळवळीचा भाग म्हणून महाराष्ट्रातील जनतेने मा.राष्ट्रपती महोदयांना १ लाख २० हजार पोस्टकार्ड पाठवली आहेत.

राज्यातील सर्व आस्थापनांचे नामफलक देवनागरी लिपीत, मराठीत लिहिणे बंधनकारक करण्याचा निर्णय शासनाने अमलात आणलेला आहे. मराठी साहित्य-वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक पुस्तकाचे गाव सुरू करण्यात येईल.

मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र : मराठी भाषेच्या विकास व संवर्धनासाठी मुंबईत १०० कोटी रुपये खर्चाचे मराठी भाषा भवन उभारण्यात येईल. येत्या २ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या भवनाचे भूमिपूजन होत आहे. नवी मुंबईतील ऐरोली येथे मराठी भाषा संशोधन उपकेंद्रासाठी २५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

सामान्य प्रशासन विभाग

मराठवाडा मुक्तिसंग्राम-अमृतमहोत्सव : १७ सप्टेंबर २०२२ रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू होत आहे. हे वर्ष साजरे करण्यासाठी मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांत मुक्तिसंग्रामाची माहिती देणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित करण्यासाठी मराठवाड्यातील सर्व मंत्री व पालकमंत्र्यांचा समावेश असलेली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात येणार आहे. याकरिता ७५ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.

पत्रकार कल्याण निधी : आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेंतर्गत शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्याजातून ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा निवृत्तिवेतन देण्यात येते. हा कल्याण निधी सध्या ३५ कोटी रुपयांचा असून त्यात वाढ करून तो ५० कोटी रुपये करण्यात येत आहे

सुशासनासाठी डाटाचा वापर : शासनाच्या विविध विभागांतर्गत वेगवेगळ्या संगणकीय प्रणाली वापरात असून त्याद्वारे निर्माण होणारा डाटा एकत्रित ठेवणे व त्या डाटावर आधारित निर्णय घेण्याकरिता तो संबंधित विभागांना उपलब्ध करून

देण्यासाठी एक डिजिटल व्यासपीठ निर्माण करण्याचेही सरकारने ठरवले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामाकाजाकरिता स्वतंत्र भवन : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे स्वतंत्र भवनासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र भवन : राज्याच्या राजधानीत कामानिमित्त येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांची तात्पुरत्या निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारण्यात येईल. याकरिता १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

२०२२-२३ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मराठी भाषा विभागाला ५२ कोटी, सामान्य प्रशासन विभागाला १ हजार १३९ कोटी, माहिती तंत्रज्ञान विभागाला ७०२ कोटी व माहिती व जनसंपर्क विभागाला २६५ कोटी रुपये नियतव्यय मंजूर.

वित्त विभाग

राज्य सरकारी अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी : शासनाने ४० वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या ५ लाख

अधिकारी-कर्मचाऱ्यांची वैद्यकीय चाचणी करण्याचा निर्णय घेतला असून त्याकरिता प्रतिवर्षी २५० कोटी रुपये खर्च येईल.

स्मारके

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा जोतिबा फुले स्मारक : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा १२५ वा स्मृतीदिन, १० मार्च २०२२ रोजी झाला. फुले दाम्पत्याचे निवासस्थान फुलेवाडा पुणे शहरातील गंजपेठेत आहे. राज्य संरक्षित वारसास्थळ असलेल्या या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी महाविकास आघाडी सरकार या वर्षी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची ६ मे रोजी १०० वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने हे वर्ष कृतज्ञता पर्व म्हणून साजरे केले जाणार आहे. त्यानिमित्ताने राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महाराणी सईबाई स्मृतिस्थान विकास : राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या मौजे पाल खुर्द, ता. वेल्हे, जि. पुणे येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजेंच्या मातोश्री महाराणी सईबाई यांच्या स्मृतिस्थान परिसराच्या विकासासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री संत जगनाडे महाराज स्मारक : श्री संत जगनाडे महाराज यांचे समाधीस्थळ असलेल्या सुदुंबरे ता. मावळ जि. पुणे या क्षेत्राला तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा दिला गेला आहे. श्री संत जगनाडे महाराजांच्या स्मारकाचा विकास आणि परिसरातील सौंदर्यीकरणासाठी १० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वार्षिक योजना

जिल्हा वार्षिक योजना २०२२-२३ : २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १३ हजार ३४० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही तरतूद २ हजार ३०५ कोटी रुपयांनी अधिक आहे.

वार्षिक योजना २०२२-२३ : २०२२-२३ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम १ लाख ५० हजार कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या १२ हजार २३० कोटी रुपये, तर आदिवासी विकास उपयोजनेच्या ११ हजार १९९ कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

सुधारित अंदाज २०२१-२२ : २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित होती. महसुली जमेचे सुधारित अंदाज ३ लाख ६२ हजार १३२ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत. २०२१-२२ च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख ३७ हजार ९६१ कोटी रुपये व सुधारित अंदाज ४ लाख ५३ हजार ५४७ कोटी रुपये असून, आपत्तीच्या काळात राज्यातील जनतेला केलेली भरीव मदत इत्यादी कारणांमुळे २०२१-२२ या वर्षाच्या खर्चाच्या सुधारित अंदाजात वाढ झाली आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ : २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ४ लाख ३ हजार ४२७ कोटी रुपये व महसुली खर्च ४ लाख २७ हजार ७८० कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी २४ हजार ३५३ कोटी रुपये महसुली तूट येत आहे. अर्थव्यवस्थेची गती मंदावली आहे, तथापि विकासाची पंचसूत्री या कार्यक्रमातून अर्थव्यवस्थेला चालना देण्यात येणार आहे.

कोरोनाच्या संकटासह नैसर्गिक आपत्तीचा सामना करताना राज्य सरकारने राबवलेल्या विविध उपाययोजनांमुळे राज्याची विकासाची घोडदौड सुरू आहे. कोरोना काळात राज्य शासनाने केलेल्या कामाचे देशभरात कौतुक झाले आहे.

राज्यातील उद्योग, व्यापारी बांधवांना कर सवलतीसाठी अभय योजना, नैसर्गिक वायूवरील कर सवलत, मुद्रांकशुल्कात कर सवलत, जलवाहतुकीस चालना देण्यासाठी करमाफी अशा विविध महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात केल्याने राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे. सामाजिक उत्तरदायित्व जपणारा, पर्यटन विकासाच्या नव्या क्षेत्रांना बळ देणारा, संस्कृती जतन आणि वारसास्थळांचा विकास साधणारा हा अर्थसंकल्प आहे.

संकलन : संजय देशमुख
उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

महाराष्ट्र शासनाने जानेवारी २०२१ मध्ये 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद : संघर्ष आणि संकल्प' हा जवळपास ५७० पानांचा ग्रंथ प्रसिद्ध केला. शासनाच्या सीमा कक्षाचे तत्कालीन प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे यांच्या पुढाकाराने हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. डॉ. दीपक पवार हे मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक आणि शासनाचे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाचे विशेष कार्य अधिकारी या पुस्तकाचे संपादक आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागांतर्गत असलेल्या सीमाकक्षाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे.

ऐतिहासिक दस्तऐवज



डॉ. प्रकाश परब

'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद : संघर्ष आणि संकल्प' हे पुस्तक एकूण आठ भागांमध्ये विभागलेले आहे. पहिल्या भागात मान्यवरांची मनोगते आहेत. त्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, सीमाप्रश्नाचे समन्वयक मंत्री छगन भुजबळ आणि एकनाथ शिंदे, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस आणि सीमा लढ्याचे प्रमुख दिवंगत डॉ. एन. डी. पाटील यांच्या मनोगतांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात श्रीकांत देशपांडे यांनी सीमा कक्षाचे प्रधान सचिव म्हणून उचललेल्या पावलांचा आढावा घेतला आहे. एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याने मनात आणले तर तो अल्पकाळात किती भरभक्कम काम करू शकतो, याचा वस्तुपाठ त्यांच्या मनोगतातून दिसतो. डॉ. दीपक पवार यांनी संपादकीयमध्ये अभ्यासक आणि कार्यकर्ता अशा दुहेरी भुमिकेतून या चळवळीचा मागोवा घेतला आहे. तसेच सीमाप्रश्न सोडवणुकीची संभाव्य दिशाही स्पष्ट केली आहे.

मराठीपण अधोरेखित करणारे लेख

तिसऱ्या भागात १९५६ पासून २०१० पर्यंत केंद्रात आणि राज्यात सीमाप्रश्नासंबंधी घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडींचा तारीखवार तपशील दिलेला आहे. 'महाराष्ट्राचे महामंथन' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिणाऱ्या लालजी पेंडेसे यांच्या साराबंदीच्या लढ्याचा तपशील आलेला आहे. दाजिबा देसाई यांचा संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या लढ्याचा तपशील देणारा लेख, मनोहर जोशी यांचा शिवसेनेचा सीमालढ्यातील सहभाग दर्शवणारा लेख, शांताराम बोकील यांचा महाजन आयोगाच्या अहवालाची उलट तपासणी करणारा दीर्घ लेख आणि बॅ. नाथ पै यांचे बेळगावातले अखेरचे भाषण, ही या भागाची वैशिष्ट्ये म्हणता येतील. या पुस्तकाचे संपादक डॉ. दीपक पवार यांनी सकाळ वर्तमानपत्रासाठी 'सीमापर्व' या नावाचे सदर जवळपास दीड वर्ष चालवले होते. या लेखमालेतून

सीमाभागातील जनतेला सर्वोच्च न्यायालयातील दाव्याची सविस्तर ओळख झाली. या लेखमालेचा संपादित अंश या भागात आहे. गॅझेटियर विभागाचे दिलीप बलसेकर आणि सायली पिंपळे यांनी सीमाभागातील मराठीपण अधोरेखित करणारा लेख लिहिला आहे.

भाषणे आणि चर्चा

चौथ्या भागात सीमाभागातील नकाशे देण्यात आले आहेत. हे सर्व नकाशे ॲड. राम आपटे यांच्या 'महाराष्ट्र-कर्नाटक बोर्डर डिस्प्युट' या पुस्तकातून घेण्यात आले आहेत. पाचव्या भागात विधिमंडळात सीमाप्रश्नावर झालेली भाषणे आणि चर्चा यांतील निवडक तपशील घेण्यात आला आहे. यामध्ये उद्धराव पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, ए. आर. अंतुले, मधु दंडवते, एन. डी. पाटील. शरद पवार, मनोहर जोशी, सुभाष देसाई, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे या मान्यवरांच्या भाषणांचा समावेश आहे. यातील ए. आर. अंतुले यांच्या भाषणाचे पुढे 'महाजन कमिशन रिपोर्ट अनकव्हर्ड' या नावाने छोटेखानी पुस्तक झाले होते आणि ते महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केले होते. पुस्तकाच्या सहाव्या भागात सीमाप्रश्नाचे समन्वयक मंत्री छगन भुजबळ आणि एकनाथ शिंदे यांची भाषणे आहेत. तसेच कन्नड सक्तीविरोधी आंदोलनात छगन भुजबळ यांनी वेषांतर करून कर्नाटकात जाण्याचे जे धाडस दाखवले, त्याचा तपशीलही आहे. पुस्तकाच्या सातव्या भागात सीमाप्रश्नाचा कलेशी असणारा आंतरसंबंध मांडण्यात आला आहे. त्यामध्ये शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची व्यंगचित्रे आणि शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, भास्कर मुणगेकर, आत्माराम पाटील, अर्जुन विष्णू जाधव यांनी लिहिलेली सीमालढ्याची गाणी आहेत.

लढ्याची चित्रमय झलक

पुस्तकाच्या आठव्या भागात महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकार आणि कर्नाटक सरकार यांच्याशी केलेला पत्रव्यवहार दिला आहे. या बाबतीत केंद्र सरकार आणि कर्नाटक सरकार यांच्याकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय निराशाजनक आहे, हे नमूद केले पाहिजे. जवळपास सहा दशकांहून अधिक काळ चाललेल्या लढ्याची चित्रमय झलक या भागात आहे. विविध वर्तमानपत्रांच्या बातम्यांमधून सीमालढ्याचे प्रतिबिंब कसे पडले आहे, याचाही आढावा घेण्यात आला आहे. अशा प्रकारच्या बातम्यांचे, लेखांचे, चित्रांचे, पत्रव्यवहारांचे संकलन करण्याची यंत्रणा शासनाने विकसित करणे गरजेचे आहे. सीमाप्रश्नाबद्दल शासनाने वेळोवेळी जे निर्णय घेतले, त्याचे संकलन या भागात केले आहे. त्यामुळे या प्रश्नाबद्दल आणि महाराष्ट्र सरकारने त्यासाठी केलेल्या कामाबद्दल अधिक जाणून घेऊ इच्छिणाऱ्यांना अधिक माहिती या पुस्तकातून मिळू शकेल. महाराष्ट्र- कर्नाटक बॉर्डर डिस्प्युट कोट्यातून सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी इ. अभ्यासक्रमांसाठी काही जागा राखीव ठेवलेल्या असतात. या योजनेचे लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यांची यादीही या पुस्तकात दिली आहे. तसेच सीमालढ्यात हुतात्मे झालेल्यांच्या वारसदारांची यादीही आहे. तसेच, उदगीर इथल्या दिलीप एकंबेकर महाविद्यालातल्या डी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सीमाभागातल्या विद्यार्थ्यांची यादीही आहे.

सात दशकांच्या सीमालढ्याचे महत्त्व

या पुस्तकाला काही मर्यादाही आहेत. ५०० हून अधिक पृष्ठे आणि आठ विभाग याद्वारे सात दशकांचा सीमालढ्याचा महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज या पुस्तकात मांडला गेला आहे. हा दस्तऐवज सीमावासीयांना, अभ्यासकांना महत्त्वपूर्ण आहेच, शिवाय न्यायालयीन लढ्यासाठीही हा दस्तऐवज मोलाचा ठरणार आहे. दुसरीकडे सीमाप्रश्नावरील या स्वरूपाचा हा पहिलाच दस्तऐवज असल्याने सर्व गोष्टी एकाच ग्रंथात येतील, अशी अपेक्षा ठेवणेही अवास्तव आहे.

कौतुकास्पद प्रयत्न

सीमाप्रश्नावर अशा स्वरूपाचा दस्तऐवज निर्माण करून हा प्रश्न जनतेपर्यंत, विशेषतः आजच्या युवा पिढीपर्यंत नेण्याचा महाराष्ट्र शासनाचे, सीमा कक्षाचे प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे आणि पुस्तकाचे संपादक डॉ. दीपक पवार यांचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. आजची युवा पिढी टेक्नोसॅव्ही असल्याने या पुस्तकाची किंडल आवृत्तीही काढावी तसेच हे पुस्तक ऑनलाइन व्यासपीठांवर उपलब्ध करून द्यावे. सध्याचे जग हे माहिती तंत्रज्ञानाचे असल्याने न्यायालयीन लढाईबरोबरच या पुढे सीमावासीयांचा हा लढा समाजमाध्यमांमधूनही लढावा लागणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाची सीमाप्रश्नाबद्दलची भूमिका मांडणारा सर्व दस्तऐवज विकिपीडियावर मुक्तपणाने उपलब्ध करून दिला गेला पाहिजे. सीमाभागातील जनतेला आपल्या अडचणींबद्दल महाराष्ट्र शासनाशी सातत्याने कसे जोडून घेता येईल, यासाठी एखादे ॲप तयार करता येईल का, याचाही विचार शासनाने करायला हवा.

पुस्तकाचे संपादक डॉ. दीपक पवार त्यांच्या संपादकीयमध्ये एके ठिकाणी म्हणतात - काही वेळा पुरेसे यश न मिळाल्याने एक पाऊल पुढे, दोन पावले मागे असे करावे लागते; तर काही वेळेला धोरणात्मक माघार घ्यावी लागते. पण, कधी काय करायचे आणि निर्णायक यशाचा टप्पा कसा गाठायचा, याची ब्ल्यू प्रिंट तयार असल्याशिवाय आता पुढे जाता येणार नाही. लढाई सर्वोच्च न्यायालयातली असो की रस्त्यावरची, महाराष्ट्राला आपली सर्वश्रेष्ठ फौज मैदानात उतरवली पाहिजे, तिला पुरेशी रसद दिली पाहिजे, सर्व पातळ्यांवर ध्येयाची पुरेशी स्पष्टता असली पाहिजे, जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्व यांची निश्चिती झाली पाहिजे, तरच बोगद्याच्या अखेरीस प्रकाश आहे असे आपण खात्रीलायकरीत्या म्हणू शकू. डॉ. पवारांच्या या दुर्दम्य सकारात्मकतेने सीमाप्रश्नाच्या मावळू लागलेल्या मशाली पुन्हा पेटून उठतील, अशी आशा वाटू लागली आहे.

निवृत्त विभागप्रमुख, मराठी विभाग,
वझे महाविद्यालय, मुंबई
महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर विभागाच्या पुढाकाराने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आणि स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून कालिदास स्मारकस्थळी विशेष कार्यक्रम आणि रामटेक येथील ऐतिहासिक स्थळांच्या पाहणी फेरीचे (हेरिटेज वॉक) आयोजन करण्यात आले होते. या आयोजनातून महाकवी कालिदास आणि मराठी भाषा यांच्यातील अनोख्या ऋणानुबंधाला उजाळा देण्यात आला.

कालिदास आम्ही आभारी आहोत!

यंदा मराठी भाषा गौरवदिनाचा सोहळा सर्वत्र साजरा झाला. विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांसोबतच शासकीय संस्थांनीही त्यानिमित्ताने विविध उपक्रम आयोजित केले. मराठी भाषेच्या गौरवाचा जागर यानिमित्ताने सर्वत्र केला गेला. या साऱ्यांमध्ये एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा सोहळा झाला तो रामटेक या कालिदासांच्या भूमीत. या आयोजनामागे एक आगळेवेगळे आणि भावस्पर्शी असे सूत्र होते ते म्हणजे कृतज्ञतेचे. महाकवी कालिदास आणि मराठी भाषा यांच्यातील अनोख्या ऋणानुबंधाला मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने उजाळा देण्यासाठी पुढाकार घेतला तो माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर विभागीय कार्यालयाने.

महाकवींप्रती कृतज्ञता

कालिदासांप्रती मराठी भाषिकांनी कृतज्ञताभाव का जोपासावा, याचा एक सुंदर असा उलगडा या कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला आहे. मराठी ही अभिजात भाषा म्हणून जाहीर व्हावी, यासाठी सध्या राज्य शासनाकडून केंद्राकडे आग्रही पाठपुरावा करण्यात येत आहे. ऐतिहासिक कसोटीवर मराठी अभिजात असल्याचे सिद्ध करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीने केंद्राकडे पाठवलेल्या प्रस्तावात काही ऐतिहासिक महत्त्वपूर्ण पुरावे दिले आहेत. त्यात एक अत्यंत मोलाचा पुरावा आहे, तो म्हणजे कालिदासाचे शाकुंतल! इसवी सन चौथ्या शतकात लिहिल्या गेलेल्या 'शाकुंतल' या अतिशय सुंदर अशा नाट्यकृतीमध्ये मराठी भाषेतील संवाद आहेत. मराठी ही संस्कृतोद्भव भाषा नसून ती स्वतंत्र भाषा असल्याचा महाराष्ट्राचा दावा सिद्ध करण्यासाठी १६०० वर्षांपूर्वीचा हा पुरावा भक्कम ठरणार आहे. त्याबद्दल खरे तर आपण या महाकवीप्रति कृतज्ञ असायला हवे. या दृष्टिकोनातून आजवर ही कृतज्ञता जोपासली गेली नव्हती. यंदा मात्र ती आगळ्यावेगळ्या पद्धतीने आणि अनोखे निमित्त साधून जोपासली गेली.

मान्यवरांची उपस्थिती

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर विभागाच्या पुढाकाराने मराठी भाषा गौरव दिनाचे निमित्त आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य जोपासून कालिदास स्मारकस्थळी विशेष कार्यक्रम आणि रामटेक येथील ऐतिहासिक स्थळांच्या पाहणी फेरीचे (हेरिटेज वॉक) वैशिष्ट्यपूर्ण आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, माध्यमकर्मी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकही उत्साहात सहभागी झाले होते.

मुख्य कार्यक्रमास नागपूरच्या विभागीय आयुक्त प्राजक्ता लवंगारे- वर्मा, स्थानिक आमदार ॲड. आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी आर. विमला, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, पर्यटनमित्र चंद्रपाल चौकसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रभावी वापरासाठी शासनाचे सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत. राजभाषा अधिनियमानुसार शासन व्यवहारात मराठीचा वापर वाढवण्यासाठीही प्रयत्न होत असल्याचे सांगून विभागीय आयुक्त श्रीमती लवंगारे-वर्मा यांनी मराठी भाषा विभागाची जबाबदारी सांभाळताना मुंबईत भाषा भवन उभारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचीही माहिती दिली. रामटेकच्या विकासासाठी कालिदास स्मारक समिती, संस्कृत विद्यापीठ, नगर परिषद आणि प्रशासन यांच्या समन्वयाने प्राधान्याने प्रयत्न केले जातील. यासोबतच पर्यटन स्थळ म्हणूनही रामटेकचा परिपूर्ण विकास व्हावा यासाठीही आपले प्रयत्न असतील, अशा शब्दात त्यांनी उपस्थितांना

आश्वस्त केले. श्रीमती लवंगारे-वर्मा यांचे मराठी भाषा विभागाचे सचिव म्हणून असलेले योगदान खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. या उपक्रमाला त्यांचे मोठे पाठबळ होते. त्यामुळे या कार्यक्रमास त्यांची उपस्थिती ही वेगळा आयाम देणारी ठरली.

स्मारकाचा विकास व देखभाल

नागपूरच्या जिल्हाधिकारी आर. विमला या एक लोकाभिमुख प्रशासकीय अधिकाऱ्यासोबतच जाणिवेच्या साहित्यप्रेमीही आहेत. त्या अत्यंत उत्साहाने या साऱ्या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. मराठी भाषेच्या गौरवासाठी असे कृतिशील उपक्रम होणे आवश्यक असल्याचे सांगून त्या म्हणाल्या, महाकवी कालिदास यांच्या स्मारकाच्या ठिकाणी मराठी भाषा दिनाचा कार्यक्रम होणे आणि अभिजात मराठी भाषेच्या संदर्भात कालिदासांच्या लेखनात विशेष उल्लेख असणे महत्त्वाचे आहे. या स्मारकाचा विकास व देखभाल करण्यासाठी प्रशासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

रामटेकचे विधिमंडळातील प्रतिनिधी असलेले आमदार आशिष जयस्वाल यांचेही या उपक्रमाला चांगले पाठबळ लाभले. ते म्हणाले, कालिदासांच्या स्मृती हा रामटेकचा अतिशय अभिमानास्पद आणि मौल्यवान असा ठेवा असून रामटेकच्या परिपूर्ण विकासासाठी प्रशासनाच्या सहयोगाने प्रयत्न केले जातील. पर्यटन, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि मनोरंजनात्मक अशा विविध दृष्टिकोनातून हा विकास घडावा, यासाठी तसेच महाकवी कालिदास यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाच्या निर्मितीसाठी प्रयत्न सुरू असल्याचीही माहिती त्यांनी या वेळी दिली.

कालिदासाच्या भूमीत मराठी भाषेचा गौरव सोहळा आयोजित होणे हे अत्यंत औचित्यपूर्ण असल्याचे सांगताना संचालक हेमराज बागुल म्हणाले, कालिदासाच्या स्मारकस्थळी होत असलेला हा सोहळा केवळ मराठी भाषेचा गौरव सोहळा नाही, तर ती एका श्रेष्ठ अशा कवीप्रती आपण व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. आपल्यावर कालिदासाचे मोठे ऋण आहेत. या उपक्रमातून त्याबद्दलची कृतज्ञतेची जाणीवच जणू आपण जोपासत आहोत. भाषा हा संस्कृतीचा हुंकार असतो त्यामुळे भाषेचे संवर्धन म्हणजे संस्कृतीचे संवर्धन. जीवनाच्या विविध क्षेत्रात भाषेचा गुणवत्तापूर्ण वापर वाढल्यास तिचा खरा विकास होऊ शकेल. त्यासाठी भाषा संवर्धन हा केवळ शासकीय उपक्रम न राहता ती एक व्यापक जनभावना निर्माण व्हावी.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वय अधिकारी अनिल गडेकर यांनी केले, तर जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांनी आभार मानले.

रामटेक वारसास्थळे पाहणी फेरी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर येथील कार्यालयांमार्फत रामटेक वारसास्थळे पाहणी फेरीचेही आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी आर. विमला व आमदार आशिष जयस्वाल यांच्या

हस्ते हिरवी झेंडी दाखवून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. या वेळी महासंचालनालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. अंबाडा तलावापासून सुरू झालेल्या या फेरीमध्ये कालिदास स्मारक, मेघदूत गॅलरी, रुद्र नरसिंह, केवल नरसिंह, राम मंदिर, कपूर बावडी, जैन मंदिर या ऐतिहासिक स्थळांची पाहणी करण्यात आली.

विभागीय अधिकारी वंदना सारंगपते, निवडणूक उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, रामटेकचे तहसीलदार बाळासाहेब मस्के, पारशिवनी तहसीलदार प्रशांत सांगळे, रामटेक नगर पालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वंजारी , माहिती समन्वयक अनिल गडेकर, मराठी भाषा विभागाचे साहाय्यक संचालक हरीश सूर्यवंशी, चेरी फॉर्मचे अमोल खंते, पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वाघमारे, त्रिलोक मेहर, राकेश मरजीवे यांच्यासह महसूल, माहिती व जनसंपर्क, मराठी भाषा विभाग, स्थानिक प्रशासनाचे अधिकारी तसेच विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा पुढाकार

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा नागपूर विभाग हा अत्यंत उपक्रमशील आणि स्वयंस्फूर्तीने काम करणारा विभाग आहे. आपल्या नियमित कामकाजासोबत विविध उपक्रमातून चौफेर जनसंपर्क राखणाऱ्या या कार्यालयाने भाषा, साहित्य, संस्कृतीच्या संवर्धनासह सामाजिक प्रबोधनासाठी दिलेला सहभाग खरोखरच कौतुकास्पद आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा असो की, पुरस्कारविजेत्या वैदर्भीय साहित्यिकांचा सन्मान...उपराजधानीतील विविध सांस्कृतिक उपक्रमात या कार्यालयाचा स्वयंस्फूर्त पुढाकार नेहमीच जाणवतो.

राज्यातील सर्वात मोठी सायबर सुरक्षा कार्यशाळा, अवयवदान जनजागृती सप्ताह, भीषण अशा कोरोना महामारीतील मदतकार्य अशा अनेक पद्धतीने या विभागाने विविध शासकीय यंत्रणांसोबत समन्वय साधून केलेले काम खरोखरच प्रशंसनीय आहे. या कार्यालयाने नियमित कामकाज सांभाळून अनेक उपक्रमात दिलेला सहभाग खरोखरच आदर्श घालून देणारा आहे. विभागाचे महासंचालक तथा प्रधान सचिव दीपक कपूर यांनीही या कार्यालयाच्या उपक्रमशीलचे कौतुक केले आहे. अशा स्वरूपाचा कार्यक्रम हा रामटेक नगरीत प्रथमच झाला असला तरी शासनाची एक वेगळी प्रतिमा यातून समोर आली. या यंत्रणेने कालसुसंगत समाजभान आणि संवेदनशीलता दाखवल्यास ती निश्चितच कौतुकास पात्र ठरू शकते, हेच यातून दिसून आले.

(संचालक कार्यालय, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर)

आपल्या दैनंदिन जीवनात आपण सवयीप्रमाणे अनेक गोष्टी मोजमापांचे महत्त्व लक्षात न घेता वापरतो व त्यांच्या प्रत्येक व्यवहारात आम्ही काही प्रकारचे वजन किंवा माप करतो व त्यामध्ये कोणतेही भिन्नता आणि अयोग्यता ग्राहकांच्या फसवणुकीकरिता कारणीभूत ठरू शकते. म्हणून वैधमापनशास्त्र कायदा आणि खात्री करण्याच्या उद्देशाने मोजमापाच्या साधनांची आवश्यकता आहे, यामुळे ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण होऊ शकते.

दृष्टिकोन वैधमापनशास्त्राचे

डॉ. रविंद्र सिंगल, भा.पो.से.

दोन्ही व्यावसायिक व्यवहार आणि सेवांमध्ये वजन आणि मोजमाप, आपल्या सभ्यतेइतकेच जुने आहे. प्राचीन काळी आकार आणि सुसंगतता यांच्या संदर्भात एकसमानता होती असे हडप्पा, मोहेंजोदारो आणि इतर ठिकाणच्या उत्खननात दिसून आले आहे. त्या काळात घरे, ड्रेनेज, बाथ आणि इतर बांधकामात वापरल्या जाणाऱ्या सामग्रीसह संरचना जे वजन एकल प्रणालीचे अस्तित्व दर्शवते आणि मोजमाप प्राचीन काळी वेगवेगळ्या प्रदेशातील बार्टर पद्धती सारख्या व्यवहारातील वजनाच्या विविध पद्धती प्रणाली, तोला, सेर, पौंड आणि इतर अनेक भिन्न पद्धती अस्तित्वात होत्या असे दर्शवते. देशातील विविध क्षेत्रांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर, शहर ते शहर, बाजार ते बाजार आणि समुदाय ते समुदाय वेगवेगळ्या पद्धती असल्याने व्यवसाय करताना अडचणी निर्माण होतात व त्यामुळे आंतर-प्रादेशिक व्यापार आणि वाणिज्य, म्हणून एकच पद्धती असण्याची नितांत गरज होती.

मीटर अधिवेशन

भारतातील ब्रिटिश राजवटीनेही एकसमान मानके प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला वजनाचे मानक आणि मापन कायदा, १९३९ जुलै १९४२ रोजी लागू झाला. स्वातंत्र्यानंतर, एकसमान मेट्रिक प्रणाली आणि एककांची आंतरराष्ट्रीय प्रणालीद्वारे मान्यता प्राप्त प्रदान करण्यासाठी वैधमापनशास्त्रची ओआयएमएल (OIML) आंतरराष्ट्रीय संस्था सुरू करण्यात आली. विज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने होत असलेल्या प्रगतीला गती देण्यासाठी भारताने त्या काळी वैधमापन संबंधित कायदा १९५६ हा कायदा त्यावेळेस जगभरातील तंत्रज्ञान विचारात घेऊन अस्तित्वात आणला. SI (एस आय सिस्टिम ऑफ युनिट) युनिट्सची पद्धती ही व्यावहारिक प्रणाली असून ती सर्वांना ज्ञात आहे. जसजसे एस आय युनिट विकसित होत गेले, म्हणजे लांबीसाठी मीटर, वजनासाठी किलोग्रॅम आणि

वेळेसाठी सेकंद ते जागतिक स्तरावर स्वीकारले गेले, आंतरराष्ट्रीय स्तरावर वैधमापन शास्त्रकरिता एकसूत्रता आणण्याची गरज भासू लागली व त्यामुळेच २० मे १८७५ रोजी 'मीटर अधिवेशन' नावाचे अधिवेशन झाले व पॅरिसमध्ये १७ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षरी केली. तसेच मीटर अधिवेशन (कन्व्हेन्शन ड्यू मीटर) हा एक करार आहे झाला व त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर बीआयपीएम (ब्युरो ऑफ वेट्स अँड मेजर्स) एक आंतरशासकीय संस्थेची स्थापना केली. सर्व सदस्य देशांद्वारे BIPM च्या क्रियाकलापांना कोणत्या मार्गाने वित्तपुरवठा होईल याबाबत व त्याचे व्यवस्थापन निर्धारित करून, मीटर अधिवेशनाने कायमस्वरूपी संस्थात्मक स्थापना केली, बीआयपीएममध्ये आता (१० मार्च २०१६ पर्यंत) ५७ सदस्य राष्ट्रे आहेत, भारतासह जनरल कॉन्फरन्सचे ४१ सहयोगी आणि सर्व प्रमुख औद्योगिक देश. भारत १९५७ मध्ये सदस्य राष्ट्र बनलेला आहे.

मैत्र कमिटी

भारत सरकारने १९५६ च्या कायद्यामध्ये आवश्यक ते बदल सुचविण्याकरिता व त्यावर विचार करण्यासाठी मैत्र कमिटी



मोहेंजोदारो येथे सापडलेली दगडाची वजने.

नावाने एक समिती स्थापन केली. मैत्र समितीने सखोल अभ्यास करून आंतरराष्ट्रीय शिफारशींवर कायदा करणे आवश्यक आहे असे ठरवले व त्यामुळेच मानके वजन आणि मापे कायद्याचा परिणाम म्हणून १९७६, वजन आणि मापांचे मानक (पॅकेज केलेल्या वस्तू) नियम, १९७७ आणि वजन आणि मापांचे मानक (सामान्य) नियम, १९८७, अस्तित्वात आले. परत संसदेने अंबलबजावणी करिता मानके वजने व मापे अंबलबजावणी अधिनियम १९८५ अस्तित्वात आणले व ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्याकरिता प्री-पॅकेज केलेल्या वस्तूंचे नियमन आणि मानकीकरणामध्ये आणखी विस्तार केला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या वेगवान प्रगतीच्या दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थांमध्ये, वजन आणि मोजमापमध्ये एक विशाल उत्क्रांती झाली आहे व वजन आणि मापांची व्याप्ती वाढल्याने विद्यमान कायद्यांचे पुनर्परीक्षण करण्याची गरज भासू लागली. सध्या अस्तित्वात असलेला कायदा मानके व अंमलबजावणी एकत्र करून कायदा करण्यात आला व त्याला द लीगल मेट्रोलॉजी ॲक्ट २००९ असे नाव देण्यात आले आहे व तो १ एप्रिल २०११ रोजी संपूर्ण देशात लागू झाला.

सामायिक जबाबदारी

वैधमापन शास्त्र विषयाच्या संदर्भातली जबाबदारी राज्य व केंद्र शासन यांच्या दोघांमध्ये सामायिक केली जाते व त्याबाबतची विशेष तरतूद भारताच्या संविधानात केलेली आहे. केंद्र सरकार, राष्ट्रीय धोरण आणि इतर संबंधित कार्ये उदाहरणाकरिता, वजन आणि मापांचे एकसमान कायदे, तांत्रिक नियम, प्रशिक्षण, अचूक प्रयोगशाळा सुविधा आणि अंमलबजावणी आंतरराष्ट्रीय शिफारसी इत्यादींचा विचार करते व तो केंद्र सरकारचा विषय आहे. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासन कायद्यांच्या दैनंदिन अंमलबजावणी साठी जबाबदार आहेत. महाराष्ट्रात, वैधमापन शास्त्र कायद्याच्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वैधमापन शास्त्र यंत्रणेकडे सोपवण्यात आली आहे व प्रत्येक राज्यातील वैधमापन शास्त्र कायद्याच्या अंमलबजावणीकरिता, नियंत्रकांच्या आधिपत्याखाली अतिरिक्त नियंत्रकांसह, सहनियंत्रक, उपनियंत्रक, साहाय्यक नियंत्रक आणि निरीक्षक अशी पदे कायद्यातील तरतुदी आणि ग्राहकांचे हित जपण्यासाठी नियम मेट्रिक प्रणालीच्या एकसमान अंमलबजावणी करण्याकरिता केलेली आहेत.

भूमिका आणि उद्दिष्ट

- वजन आणि मापांच्या मानकांची अचूकता राखणे, नियतकालिकाद्वारे व्यावसायिक व्यवहारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वजने व मापे यांची पडताळणी आणि पुन्हा पडताळणी करणे.
- फसव्या साधनांचा वापर करून फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांपासून ग्राहकांचे संरक्षण करणे.
- व्यवहारांमध्ये गैर-मानक वजन आणि मापांचा वापर प्रतिबंधित करणे.
- केवळ परवानाधारक उत्पादक/विक्रेता/दुरुस्तीकरिता वजने व मापे उत्पादन विक्री व दुरुस्ती करतील, याची शहानिशा करणे.
- पॅक केलेल्या वस्तू यांच्या मुख्य डिस्प्ले पॅनलवर घोषणा असल्याची खात्री करणे ग्राहकांच्या माहितीसाठी वस्तूंवर ग्राहकांना तक्रार करण्याकरिता दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी दिलेली आहे, याबाबत खात्री करणे.
- ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वैशिष्ट्यांनुसार सर्व घोषित माहिती सुवाच्य, प्रमुख स्थळी आहे, याची खात्री करणे.
- पॅकिंगचे आकाराने व प्रलोभनाने ग्राहक त्यांना आकर्षित करणारे फसवे पॅकेजेस तपासणी व कारवाई करणे.
- प्री-पॅक केलेल्या वस्तूंची निव्वळ वजनाची तपासणी करणे.
- प्री-पॅक केलेल्या वस्तूंवर आकारमान, वजन किंवा संयोजनाची घोषणा सुनिश्चित करा.
- उत्पादक/पॅकर्स/आयातदारांची नोंदणी करणे व त्यामुळे ग्राहक तक्रारींचे निवारण करणे.
- निर्दिष्ट केलेल्या प्री-पॅक केलेल्या वस्तूंचे मानकीकरण सुनिश्चित करणे.
- MRP च्या घोषणेच्या संदर्भात दिशाभूल करणारी जाहिरात तपासणे व कारवाई करणे.
- MRP पेक्षा अधिक दराने वस्तूंच्या विक्रीवर आळा घालणे व किमतीमध्ये खाडाखोड करणाऱ्यांवर कारवाई करणे.

राज्य शासनाकडे सर्व निरीक्षक वैधमापन शास्त्र यांना कार्यकारी मानक प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे व अशा मानकांची तपासणीकरिता दुय्यम मानकांची प्रयोगशाळादेखील राज्य शासनाकडे उपलब्ध असते. राज्ये आणि केंद्राची वजने आणि मापांची मानके तपासणीकरिता पाच प्रादेशिक संदर्भ प्रयोगशाळा निर्मित करण्यात आलेल्या आहेत अशा प्रयोगशाळांमध्ये राज्य शासनाच्या दुय्यम मानकांचे सत्यापन केले जातात. प्रयोगशाळा (RRSL) अहमदाबाद, भुवनेश्वर, बंगलोर येथे स्थित आहेत. फरीदाबाद आणि गुहाटी या RRSL प्रयोगशाळा संबंधित क्षेत्रातील उद्योगांना कॅलिब्रेशनच्या सेवादेखील प्रदान करतात. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा भारतातील वैधमापन शास्त्रकरिता सर्वोच्च प्रयोगशाळा असून तेथे संदर्भ प्रयोगशाळेतील मानकांचे सत्यापन केले जाते.

अतिरिक्त पोलीस महासंचालक
व नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विकासकामांच्या माहितीची गाडी.

शासनाच्या विविध योजना, ध्येयधोरणे, महत्त्वाकांक्षी प्रकल्प, विकासकामे आणि लोककल्याणकारी योजनांची माहिती अतिशय कल्पक आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून जनसामान्यांपर्यंत विविध माध्यमांद्वारे पोहोचवण्याचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालय करत आले आहे. अलिकडेच महाविकास आघाडी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. या कालावधीत राज्य शासनाने भरीव कामगिरी करत सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले, योजना व उपक्रम राबवले. ते जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने विशेष प्रसिद्धी मोहीम राबवून शासन संवाद साधला. या मोहिमेचा हा संक्षिप्त आढावा...

शासन संवाद

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात संवाद साधण्यासाठी विविध समाजमाध्यमे उपलब्ध आहेत. त्यात फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर या माध्यमांचा वापर हा संवाद साधण्यासाठी करण्यात येत असल्याचे सर्वत्र पाहायला मिळते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयानेही महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाच्या विविध योजना, ध्येय धोरणे, महत्त्वाकांक्षी प्रकल्प, विकासकामांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमांद्वारे संवाद साधला. या शासन संवादात वृत्तपत्रीय जाहिराती, दूरदर्शन, आकाशवाणी, बाह्यमाध्यमे इत्यादी माध्यमांसह प्रदर्शन, कलापथक व पथनाट्य या पारंपरिक प्रसिद्धी माध्यमांद्वारे 'आपला महाराष्ट्र आपले सरकार' हे बोधचिन्ह आणि 'दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची' या घोषवाक्यावर आधारित प्रसिद्धी मोहिमेचे आयोजन केले.

रेल्वेगाड्यांच्या माध्यमातून विकासगाथा

शासनाच्या लोकाभिमुख योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रेन रॅपचा वापर करत तळागाळातील लोकांशी थेट संपर्क साधण्याचा अनोखा प्रयत्न करण्यात आला. यासाठी राज्यातील पाच एक्सप्रेस रेल्वेगाड्यांची निवड करण्यात आली. त्या मुंबईपासून ते राज्याच्या कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र,

उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये लोककल्याणाचा संदेश घेऊन जाणाऱ्या चाकांवरची विकासगाथा ठरल्या आहेत.

राज्याच्या विविध भागात सचित्र माहितीपूर्ण संदेश घेऊन जाणाऱ्या या रेल्वेगाड्या सर्व स्थानकांवरील प्रवाशांसाठी आकर्षणाचा विषय ठरल्या. दादर-सावंतवाडी तुतारी एक्सप्रेस, मुंबई-लातूर एक्सप्रेस, मुंबई-नागपूर नंदीग्राम एक्सप्रेस, कोल्हापूर-गोंदिया व गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस या लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या संदेशासाठी निवडण्यात आल्या.



शासनाच्या दोन वर्षपूर्तीनिमित्त 'दोन वर्षे जनसेवेची, महाविकास आघाडीची' ही राज्यस्तरीय माहिती पुस्तिका आणि मुंबई विभागाधारित 'महामुंबईचा महाविकास' या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. शासनाच्या सर्व विभागांच्या लोककल्याणकारी आणि समाजहिताच्या योजना, निर्णय आणि विकास कामांवर आधारित या पुस्तिका आहेत. या माहिती पुस्तिकांचे वितरण संपूर्ण राज्यभर करण्यात आले.

'आपला महाराष्ट्र, आपले सरकार' अशी टॅगलाईन घेऊन कृषी, आरोग्य, कोविड-१९ काळातील उपाययोजना, पर्यटन, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आदी विभागांची कामे आणि मोफत सातबारा, ई-पीक पाहणी, लसीकरण, चिंतामुक्त शेतकरी आदी विविध लोकोपयोगी योजनांची विकासगाथा मांडणारा समर्पक संदेश या रेल्वे गाड्यांच्या डब्यांवर आकर्षक पद्धतीने मांडण्यात आला. दोन वर्षांत सरकारने केलेल्या विविध विकासकामांचा आलेख या गाड्यांवर प्रदर्शित करण्यात आला. 'दोन वर्ष जनसेवेची, महाविकास आघाडीची'हा संदेश घेऊन या रेल्वेगाड्या धावल्या.

कलापथक आणि पथनाट्य

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांवर आधारित जिल्हास्तर कलापथक/पथनाट्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रत्येकी ६३, तर मुंबई शहर आणि मुंबई उपनगरात प्रत्येकी १०२ कार्यक्रम आयोजित करण्यात आले. राज्य शासनाच्या यादीवरील निवडक संस्थांमधील अगदी नवोदित कलाकारापासून ते ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सुमारे ११०० कलाकार या जागरात सहभागी झाले होते. त्यातही युवा कलाकार मोठ्या संख्येने शासनाशी जोडले गेले, हे या मोहिमेचे वैशिष्ट्य. स्थानिक लोककला, स्थानिक बोली यांचा खुबीने वापर करत. राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यांपासून ते गजबजलेल्या शहरी भागांपर्यंत, बाजारपेठा, बसस्थानके आणि वर्दळीच्या ठिकाणी कलापथक व लोककलामंचांनी कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येऊन विविध वयोगटातील आणि स्तरांतील लोकांपर्यंत ही मोहीम यशस्वीपणे पोहोचवण्यात आली. राज्यभरात सुमारे २ हजार ५०० कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या योजना अतिशय प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यात आल्या.

विविध बाह्य माध्यमांद्वारे प्रसिद्धी

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांवर आधारित जाहिरातींची प्रसिद्धी करण्याकरिता क्रिएटिव्ह वर्क (उदा. प्रिंट, ऑडिओ जिंगल आणि दृकश्राव्य निर्मिती) तयार करण्यात आले. या क्रिएटिव्ह वर्कचा वापर समाज माध्यमाचे विविध प्लॅटफॉर्म, ओ.टी.टी. प्लॅटफॉर्म, वृत्तपत्र दैनिकांतील जाहिराती, होर्डिंग्ज तसेच बाह्य माध्यम अशा विविध माध्यमांवर करण्यात आला. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांवर आधारित दृकश्राव्य जाहिरातींचे प्रसारण सहा वृत्तवाहिन्या आणि नऊ मनोरंजन वाहिन्यांवर करण्यात आले. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांवर आधारित श्राव्य जाहिरातींचे राज्यातील एकूण २३ कम्युनिटी रेडिओ, २८ एफ.एम वाहिन्या, आकाशवाणी केंद्र तसेच दूरदर्शन केंद्राच्या माध्यमातून प्रसारण करण्यात आले. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कल्याणकारी योजनांवर आधारीत प्रिंट क्रिएटिव्हची प्रसिद्धी राज्यातील विविध बाह्य माध्यम (उदा. बस क्यु शेल्टर, ट्रेन रॅप, खासगी होर्डिंग्ज/ शासकीय होर्डिंग्ज, बेस्ट बस रॅप आदी माध्यमांद्वारे करण्यात आली.

मंत्रालयामधील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित सचित्र प्रदर्शनाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली. या वेळी राज्यमंत्री शंभुराज देसाई, राज्यमंत्री संजय बनसोडे, आमदार रोहित पवार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात येत असलेल्या लोकराज्य या मासिकाच्या डिसेंबर २०२१ - जानेवारी २०२२ चा 'आपला महाराष्ट्र आपले सरकार- दोन वर्ष

जनसेवेची महाविकास आघाडीची' या जोड अंकाचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाला दोन वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने राज्य शासन जनसेवेसाठी राबवत असलेल्या विकासकामांचा आढावा या अंकात घेण्यात आला. यात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्रिमहोदयांनी आपल्या विभागातर्फे दोन वर्षांत राबवलेल्या विविध योजना आणि लोककल्याणार्थ घेतलेल्या निवडक निर्णयांबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

मुलाखतींचे प्रसारण

सोशल मीडियावरील 'जय महाराष्ट्र' आणि आकाशवाणीवरील 'दिलखुलास' या कार्यक्रमात पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह अन्य मंत्रिमहोदय व राज्यमंत्री महोदयांच्या मुलाखती प्रसारित करण्यात आल्या.

सचित्र प्रदर्शन

मंत्रालयामधील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित सचित्र प्रदर्शनाला अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनातील सेल्फी पॉईंट हे विशेष आकर्षण ठरले. प्रदर्शन कालावधीत दर दिवशी अंदाजे १२०० ते १५०० लोकांनी भेटी दिल्या. या प्रदर्शनाला उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच विविध विभागाचे मंत्री, राज्यमंत्री महोदयांनी भेट देऊन सचित्र प्रदर्शन आयोजन अत्यंत उत्कृष्ट झाल्याचे नोंदवहीमध्ये आपले अभिप्राय नोंदवले. तसेच अशा प्रकारची प्रदर्शने जिल्हास्तरावर आयोजित करण्याबाबत सूचित केले.

शासनाच्या प्रसिद्धी मोहिमेचे सातत्य राखण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यातील महासंचालनालयाच्या मालकीच्या सुमारे ८०० जाहिरात फलक तसेच मुंबईतील बस शेल्टरद्वारे प्रसिद्धी करून जनतेशी प्रभावी संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात आला..

– टीम लोकराज्य



महामानवाला विनम्र अभिवादन...

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष

१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. या प्रज्ञासूर्यामुळे देशाला सर्वसमावेशक संविधान मिळाले. ज्यामुळे सर्वांना व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य मिळाले, समान न्यायाची हमी मिळाली, वंचितांना शिक्षण मिळाले, मागासवर्गीयांना आरक्षण मिळाले. देशाची घडी नीट बसवण्याचे काम संविधानाने केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त लोकराज्यच्या या अंकात विशेष विभाग समाविष्ट करण्यात आला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख सर्वसाधारणपणे राज्यघटनाकार अशी आहे. या अतिशय महत्त्वाच्या कामाबरोबरच त्यांच्या इतर कार्यक्षेत्राचा आवाका पाहिला, तर त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व लक्षात येते. यातही एक पैलू ज्याविषयी फारशी चर्चा होत नाही तो म्हणजे त्यांची जलनीती. पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित ठेवून दूरदृष्टीची अनुभूती दिली.

डॉ. बाबासाहेबांची जलनीती

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारतातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. बाबासाहेबांचे विविध क्षेत्रातील कार्य सर्वसामान्य नागरिकांचे जीवन घडवण्यात मोलाची भूमिका बजावणारे होते. त्यांच्या कार्याची महती त्यांच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशेषणांवरून लक्षात येते. महत्त्वाकांक्षी, निश्चयी, अभ्यासू, कार्यकुशल, अत्युच्च्य पदव्यांचा साधक, बहुज्ञानी, मानवतावादी, उपेक्षितांचा उद्धारक, दलितांचा भाग्यविधाता, अन्यायकारी परंपरांच्या विरूद्ध धैर्याने लढणारा प्रबळ समर्थक, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांचे समर्थक, भारताच्या राज्यघटनेचे श्रेष्ठ शिल्पकार, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, थोर ग्रंथलेखक अशा बहुविध गुणरूपी अलंकारांनी विभूषित बॅरिस्टर डॉ. भीमराव आंबेडकर अर्थात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक असामान्य, अलौकिक, लोकोत्तर आणि जगाला प्रेरणा देणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे.

पदव्या, उपाधींच्या पलीकडे

डॉ. बाबासाहेबांची प्रचंड ज्ञानलालसा, त्यांचा वाचन, चिंतन, लेखन आणि वक्तृत्वामधील विविधांगी व्यासंग बघितल्यावर त्यांच्या तोडीचा असा चौफेर बुद्धिमान माणूस विरळाच, याची खात्री पटते. त्यांचे सर्व संशोधनात्मक लेखन जागतिक पातळीवर गौरवले गेले आहे. त्यांचा वारसा विश्वाने घ्यावा असा आहे. आज आपल्या देशात 'गुणवत्तेचा ऱ्हास होत आहे', अशी जी ओरड होते, त्याला पर्याय देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांसारखी ज्ञानलालसा वृद्धिंगत करणे हाच त्यावरचा मार्ग आहे. ते दिवसाचे अठरा-वीस तास स्वत:ला अभ्यासामध्ये गुंतवून घेत असत. प्रचंड वाचन, प्रत्येक क्षण हा ज्ञानग्रहणासाठीच असला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. शेवटपर्यंत ज्ञानाचे उपासक राहिल्याने ते पदव्या आणि उपाधींच्या पुढे होते. याबरोबरच बाबासाहेबांच्या जीवनातील आणखी एक आणि महत्त्वाचा पैलू, ज्यावर फारसा प्रकाशझोत टाकला गेला नाही, तो म्हणजे त्यांची जलनीती.

पाणी हा विषय केंद्राच्या अधिकाराखाली

भारत हा खंडप्राय देश आहे. प्रत्येक राज्याची भौगोलिक परिस्थिती, तेथील हवामान, पीक परिस्थिती भिन्न आहे. त्यामुळे तेथील शेती व भविष्यात होणारे शहरीकरण यासाठी पिण्याचे आणि अन्य वापरासाठी नदीचे पाणी तसेच मोठ्या प्रकल्पांतील पाणी वाटपावरून भविष्यात राज्या-राज्यांमध्ये वाद उद्भवू शकतात, हे डॉ. आंबेडकर यांच्या लक्षात आले. असे प्रसंग उद्भवल्यास त्यात केंद्र सरकारला हस्तक्षेप करावा लागेल याची जाणीव त्यांना होती, म्हणूनच त्यांनी पाणी हा विषय केंद्राच्या अखत्यारित ठेवला.

डॉ. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी युरोप-अमेरिकेमध्ये गेले होते. त्या वेळी कृषी, ऊर्जा, औद्योगिकीकरण, नियोजनबद्ध शहरांचा विकास व प्रगती याचा त्यांनी अभ्यास केला होता. आर्थिक प्रगतीशिवाय यातील कोणत्याच गोष्टी शक्य होणार नाहीत, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे १९४२ मध्ये मंत्रिपदावर असताना देशाच्या विकासासाठी, औद्योगिकीकरणासाठी, शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी त्यांनी आवश्यक ती पावले उचलली.

हरित क्रांतीचा पाया रचला

भारतातील ब्रिटिश सरकार केवळ स्वत:चे आर्थिक हित जोपासत होते. त्यांच्या काळात या देशातील शेतकऱ्यांना जल सिंचनाची सुविधा उपलब्ध होत नव्हती. ब्रिटिश कालखंडामध्ये व स्वातंत्र्यानंतर मंत्रिपदी असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गंगा, यमुना, सतलज, ब्रम्हपुत्रा यांसह इतर महत्त्वाच्या नद्यांच्या पाण्याचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा, शेतीमध्ये प्रगती व्हावी यासाठी भविष्यात धरणे बांधून कालव्याद्वारे सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठीच आणि देशातील सर्व नदी खोऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी इरिगेशन ॲण्ड नेव्हिगेशन कमिशनची स्थापना करून हरित क्रांतीचा पाया रचला. इरिगेशन ॲण्ड नेव्हिगेशन कमिशनच्या अभ्यासाअंती अनेक धरणांची पायाभरणी झाली. यातूनच पुढे उत्तर भारतामध्ये व दक्षिण भारतामध्ये मोठ-मोठे सिंचन प्रकल्प उभारता आले.

जलसिंचनात क्रांती

भारतातील जलनीतीचा पाया रचण्यापूर्वी डॉ. बाबासाहेबांनी अमेरिकेतील टेनेसी व्हॅली धरणाचा स्वत: सखोल अभ्यास केला. त्यानंतर येथील सतलज, दामोदर, महानदी, सोन, ब्रम्हपूत्रा नद्यांवर कशा प्रकारचे तंत्रज्ञान यशस्वी होईल, याचा तुलनात्मक अभ्यास करून योजना आखली आणि मध्यवर्ती सरकार (केंद्र शासन) कडून मान्यता घेऊन कामाला सुरुवात केली. यातून पुढे सतलज, दामोदर दरी, सोन नदी, महानदी व कोसी, चंबल या नद्यांच्या खोऱ्यातील योजना यशस्वी होऊन जलसिंचनामध्ये क्रांती घडून आली. उत्तर भारतामध्ये आज मोठ्या प्रमाणात गव्हाचे व भाताचे उत्पादन होते, देशाची वाढती लोकसंख्या व त्यासाठी मुबलक प्रमाणात धान्य उत्पादन होऊन शेवटच्या घटकापर्यंत अन्नाची गरज भागवण्याचे काम उत्तर भारतातील राज्ये करतात. याचे श्रेय नक्कीच डॉ. बाबासाहेबांच्या जलनीतीला द्यावे लागेल.

महत्त्वपूर्ण प्रकल्प

डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे ज्या प्रकल्पांची कामे झाली त्यांच्यापैकी काहींची माहिती घेतली तर त्याची व्याप्ती लक्षात येईल.

दामोदर प्रकल्प : दामोदर नदीची एकूण लांबी ७९० कि.मी. एवढी असून एकूण लाभक्षेत्र २४,२३५ चौ.मी. इतके आहे. नदीला दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे बिहार, पश्चिम बंगालमधील हजारो नागरिक मृत्युमुखी पडत. तसेच जमिनीची धूप होऊन जमिनी नापिक होत. दामोदर नदीवर बांधलेल्या महाकाय धरणामुळे व उप खोऱ्यातील नद्यांवर बांधलेल्या छोट्या-छोट्या धरणांमुळे पिण्यासाठी तसेच शेतीसाठी पाणी उपलब्ध झालेच, शिवाय जीवित, वित्त व पर्यावरणीय हानी थांबली. याचे श्रेय डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीला द्यावे लागेल.

महानदी व हिराकूड धरण : ओरिसा हा मागास प्रांत म्हणून ओळखला जात असे. तसेच दरवर्षी महापुरामुळे जीवित व वित्तहानी होत असे. गरिबी, दारिद्र्य, पुरामुळे उद्‌भवणारी रोगराई तसेच हजारो लोक औषधांअभावी मृत्युमुखी पडत. प्रचंड

हिराकूड प्रकल्प

जलसंपत्ती असूनही शेतीचा विकास झाला नव्हता. डॉ. बाबासाहेबांनी या परिसराचाही अभ्यास करून हिराकूड धरणाचा पाया रचला. या धरणाचा लाभ ३,२४,००० हेक्टर क्षेत्राला होऊन शेतीचाही विकास होऊ शकला. या धरणामुळे परिसराचा कायापालट झाला. याचे श्रेयदेखील डॉ. बाबासाहेबांच्या कल्पक नेतृत्वाला द्यावेच लागेल.

सोन नदी प्रकल्प : मध्य प्रांतामध्ये उगम पावणारी सुमारे ७८४ कि.मी. वाहणारी सोन नदी पुढे उत्तर प्रदेशात गंगेला मिळते. या नदी खोऱ्यामधील सुपीक जमिनी, लोकसंख्या, जंगले व आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी पार्श्वभूमी डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीतून सुटली नाही. त्यांनी तत्काळ सोन नदीवर धरण बांधण्याचा निर्णय घेतला. आज उत्तर प्रदेशातील औद्योगिक व कृषी विकासामध्ये या प्रकल्पाचे मोठे योगदान आहे.

भाक्रा-नानगल प्रकल्प : पंजाब आणि हिमाचल प्रदेशच्या किनाऱ्यावरील या धरणाची उंची २०७ मीटरहून अधिक असून लांबी ५१८ मीटर आणि रुंदी ९ मीटर आहे. आशियातील दुसऱ्या सर्वाधिक उंचीच्या

भाक्रा-नानगल प्रकल्प

भाक्रा-नानगल या प्रकल्पातून त्या काळी सुमारे १५०० मे.वॅ. वीजनिर्मिती होत असे. स्वतंत्र भारतातील सुरुवातीच्या काळात विकसित झालेल्या प्रकल्पांमधील हा एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे.

नदी जोड प्रकल्पाचे उद्‌गाते

ब्रिटिश काळातील केंद्र सरकारच्या १९३५ च्या कायद्यामध्ये नद्यांवरील हक्क व पाणी याचे अधिकार तत्कालीन प्रांत सरकारांना होते. डॉ. बाबासाहेबांनी १९४२ मध्ये मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, बऱ्याच नद्या या दोन, तीन किंवा अधिक प्रांतांमधून वाहतात. त्यामुळे एखाद्या नदीवरील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नदीमार्गातील अन्य राज्यांची संमती आवश्यक होती. दामोदर, ब्रम्हपुत्रा, भाक्रा-नानगल आदी बहुराज्य प्रकल्प राबवण्यासाठी त्यांनी संबंधित प्रांतांची सहमती घडवून आणली. पुढे नदीजोड प्रकल्प ही संकल्पना यशस्वी होण्यासाठी हे प्रकल्प पथदर्शी ठरले. त्यामुळेच त्यांना नदीजोड प्रकल्पाचे उद्‌गाते संबोधले जाते.

यावरून डॉ. बाबासाहेबांच्या बहुआयामी व बहुपेढी व्यक्तिमत्वाचा परिचय होतो. तसेच त्यांचा केवळ घटनाकार म्हणूनच परिचय त्यांच्या सर्वव्यापी व्यक्तिमत्त्वावर अन्याय करणारा आहे, हे निदर्शनास येते. सर्वसामान्यांना तसेच शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठीच्या डॉ. बाबासाहेबांच्या कार्यामुळे त्यांचे देशप्रेम आणि शेतकऱ्यांवरील प्रेम सिद्ध होते.

देशाच्या विकासासाठी बाबासाहेब शिक्षण व पायाभूत सुविधांसाठीही आग्रही होते. कृषी विकासाची पुढील पायरी म्हणजेच औद्योगिक विकास, यातूनच रोजगार निर्मिती होऊन खेड्यांचा व शहरांचा समतोल विकास होईल. यातूच दारिद्र्य नष्ट होऊन मनुष्याला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त होईल, याची त्यांना जाणीव होती. यासाठीच त्यांनी कृषी, ऊर्जा, जल, जंगल संवर्धन, कामगार व महिला यांच्या मूळ समस्यांना हात घालून समतोल विकासाची पायाभरणी केली आणि देशाला आर्थिक प्रगतीची वाट तयार करून दिली. अशा या थोर महामानवास विनम्र अभिवादन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रकारच्या वर्चस्ववादाविरुद्ध पुकारलेला पहिला जनलढा म्हणजे महाडच्या चवदार तळ्यावरील रणसंग्राम. बोले ठरावानुसार हा लढा बाबासाहेबांनी यशस्वी केला खरा मात्र हा लढा पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांना मोठा न्यायिक लढाही द्यावा लागाला. हा न्यायिक लढा जेवढा महत्त्वपूर्ण तेवढाच रंजकही होता.

बाबासाहेबांचा न्यायिक लढा

ज. वि. पवार

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे १८ फेब्रुवारी १९२७ रोजी तत्कालीन मुंबई राज्य लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य झाले होते. या सभागृहात लालबहादूर सीताराम केशव बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ रोजी शासकीय अनुदानातून सार्वजनिक पाणवठ्यावर अस्पृश्यांना पाणी प्राशन करता येईल, असा ठराव मांडला होता. या ठरावात सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे अंगभूत सामर्थ्य होते. याची जाण डॉ. आंबेडकरांना होती आणि म्हणूनच त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची नैतिक जबाबदारी त्याच सभागृहाचे सदस्य म्हणून बाबासाहेबांवर येऊन ठेवली. डॉ. आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून मुंबई जवळ असलेले महाड येथील चवदार तळे मुक्रर केले. याचे एक कारण म्हणजे या परिसरातले डॉ. आंबेडकरांचे स्पृश्य सहकारी आणि लष्करातील निवृत्त अस्पृश्य शिपाई व अधिकारी हा जनलढा दि. १९/२० मार्च १९२७ या दिवशी पुकारण्यात आला होता. बोले ठरावाची अंमलबजावणी म्हणजे स्वहस्ते चवदार तळ्यातील जनसमुदयासह पाणी प्राशन करणे.

चवदार तळ्याला स्पर्श

वर्णव्यवस्थांतर्गत दिलेल्या वर्चस्ववादाला हे आव्हान होते. डॉ. आंबेडकर हे उच्च विद्याविभूषित होते. साहजिकच या लढ्याचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. ते स्वतः आमदार असल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही सुद्धा डॉ. आंबेडकरांचीच जबाबदारी होती. हा अस्पृश्यांच्या अधिकारांसाठी होत असलेला सार्वजनिक लढा असल्यामुळे हजारो सत्याग्रही सामील झाले होते. महाडच्या ब्रह्मवृदांना हा हिंदुधर्मावरील घाला असल्याचे वाटल्याने अस्पृश्य जमाव तळे बाटवण्याबरोबरच देव आणि देवळेही बाटवणार असल्याची खोटी बातमी पसरवली गेली. २० मार्च १९२७ रोजी चवदार तळ्याला स्पर्श करताच जो वडवानळ निर्माण झाला त्याने आसमंत अक्राळविक्राळ झाला. पाण्यात उठलेल्या तरंगामुळे आसापासच्या अस्पृश्यांचे डोळे लालीलाल झाले.



न्यायिक लढ्याचा पेच

डॉ. आंबेडकर आणि त्यांचे सहकारी यांनी बोले ठरावाची अंमलबजावणी केली होती. महाडच्या स्पृश्यांना मात्र हे धर्मसंकट वाटल्यामुळे त्यानी धर्माची वाट चोखळली. त्यातच महाडकरांनी चवदार तळे हे चौधरी नावाच्या माणसाचे खासगी तळे असल्यामुळे बोले ठरावाची या तळ्यावर अंमलबजावणी बेकायदेशीर आहे असे म्हणत कोर्टाचे दरवाजे ठोठावले. डॉ. आंबेडकरांचा हा लढा एका बाजूला मानव्याची प्रस्थापना करणारा होता, तर दुसऱ्या बाजूला बेकायदेशीर ठरवला जात होता. डॉ. आंबेडकरांना न्यायिक लढा जिंकणे महत्त्वाचे होते.

वैचारिक लढा

डॉ. आंबेडकरांचे महत्त्वाचे सहकारी स्पृश्य हिंदू होते. अस्पृश्य सहकारीसुद्धा हिंदुच होते. डॉ. आंबेडकर स्वत:ला अहिंदूच म्हणवीत होते. हा लढा आता धार्मिकस्तरांवर आला होता. हिंदुधर्माने अस्पृश्यांना मंदिराच्या बाहेर जसे ठेवले होते तसेच त्यांना ग्रंथाबाहेरही ठेवले होते. ज्या ग्रंथाबाहेतर अस्पृश्यांना ठेवण्यात आले होते त्याच ग्रंथानुसार वर्चस्ववाद जोपासला जात होता आणि म्हणूनच हे धर्मग्रंथ नाकारणे अत्यावश्यक ठरले. यातील प्रमुख ग्रंथराज म्हणजे मनुस्मृती.

मनुस्मृतीतील कायद्यानुसारच अस्पृश्यांना आणि महिलांना शृंखलाबद्ध करण्यात आले होते. अस्पृश्यांच्या समस्त महिलांच्या पायातल्या शृंखला तोडण्यासाठी कार्यक्रम ठरवण्यात आला तो मनुस्मृती दहनाचा. हा कार्यक्रम महाडच्या परिसरात होऊच नये म्हणून जंगजंग पछाडण्यात आले. मोठ्या परिश्रमानंतर परिषदेच्या मंडपासाठी जागा मिळाली परंतु परिषदेची पाणी, धान्य यांची कोंडी करण्यात आली. २५ डिसेंबर १९२७ या दिवशी सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते मनुस्मृतीचे दहन केले. त्यामुळे वैचारिक वादळ निर्माण झाले. या वादळातील लढवय्ये होते एकटे डॉ. भीमराव आंबेडकर. या वैचारिक वादाला बाबासाहेबांनी बहिष्कृत भारत या शस्त्राने सडेतोड उत्तर दिले.

न्यायिक लढा यशस्वी

डॉ. भीमराव आंबेडकर रस्त्यात लढत होते, सभागृहात लढत होते. कोर्टात लढत होते अन्, आता माध्यमाच्या शस्त्रानेही लढू लागले. या लढ्यात त्यांना मदत झाली ती 'बेन आणि पेन' यांची. या वादळाची सुरुवात झाली होती ती चवदार तळ्याच्या काठावर. सगळ्यात महत्त्वाचा न्यायिक लढा होता तो बोले ठरावांतर्गत चवदार तळे सार्वजनिक आहे की खासगी. याबाबत कोर्टात दावा चालू होता. हा दावा यशस्वी झाला तर ठरावाची अंमलबजावणी हीच मुळी बेकायदेशीर ठरली असती. डॉ. आंबेडकरांनी हे तळे सार्वजनिक असल्याचे काही पुरावे दिले होते परंतु कोर्टाला मान्य होईल असा पुरावा नानासाहेब टिपणीस यांनी पुरवला. न्यायमूर्ती सराफ यांनी तो मान्य केला. महाडच्या ब्राह्मवृंदांचा दावा खोटा ठरला, डॉ. आंबेडकरांचा न्यायिक लढा यशस्वी झाला. तो यशस्वी झाला नसता तर आंबेडकरी चळवळ गर्भातच मारली गेली असती. या न्यायिक लढ्याने आंबेडकरी चळवळीच्या मुकुटात यशाचे मोरपिस खोवले. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीची सुरुवात यशाने झाली अन् पुढे ती उत्तरोत्तर यशाचीच ठरली.

तळे सार्वजनिक; अस्सल पुरावा

चवदार तळे खासगी नसून ते सार्वजनिक आहे, त्याची देखरेख, बांधणी पुनर्बांधणी ही सगळी शासकीय खर्चाने होत होती हे स्पष्ट करणारे ब्रिटिश सरकारचे ९ जून १८४३ चे पत्रक प्राप्त झाले आणि दावा निकाली निघाला. या पत्रकाचा इतिहासही तेवढाच रंजक आहे. एके दिवशी डॉ. आंबेडकरांचे सहकारी सुरेंद्रनाथ तथा नानासाहेब टिपणीस यांना मुंबईवरून पांडुरंग देशपांडे यांची तार आली व त्यात टिपणीसांनी तत्काळ मुंबईला येऊन देशपांडे यांना भेटावे असा मजकूर होता. देशपांडे तेव्हा ब्रिटिश अमलाखालील महसूल खात्यात कामाला होते. टिपणीस मुंबईला गेले व त्यांनी देशपांडे यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. या भेटीत देशपांडे यांनी एक पत्र दाखवले ते पत्र कोर्टासमोर सादर केले की, डॉ. आंबेडकरांचे म्हणणे ग्राह्य ठरले जाईल हे नानासाहेबांना कळत असल्यामुळे त्या पत्राची मागणी केली. हे सरकारी पत्र असल्यामुळे ते देता येत नाही असे देशपांडे यांनी नानासाहेबांना सांगितले. नानांनी खूप आग्रह केला, परंतु देशपांडे काही ते पत्र देईनात. वरिष्ठ अधिकाऱ्याने बोलावले म्हणून देशपांडे हे साहेबांना भेटायला गेले. तेवढ्यात टिपणीसांनी त्या फाईलमधील पत्र फाडले आणि आपल्या छत्रीत कोंबले. सुरक्षारक्षकाला ते मिळाले असते तर नानांना शिक्षा तर झालीच असती पण देशपांडेनासुद्धा नोकरीस मुकावे लागले असते. नानांनी कशाचीही तमा न बाळगता ते पत्र डॉ. आंबेडकरांच्या हवाली केले. त्या पत्रानुसार ९ जून १८४३ ला ब्रिटिश सरकारने एक टेंडर काढले होते. ते टेंडर महाडच्या चवदार तळ्याची डागडुजी आणि गाळ उपसण्यासंदर्भात. हे टेंडर टिपणीसांचे आजोबा गोपाळ सायरो टिपणीस यांनी भरले. त्यांनी अपेक्षित काम केले. परंतु त्यांना पूर्ण मोबदला देण्यात आला नव्हता म्हणून गोपाळ सायरो टिपणीस यांनी स्मरणपत्र १५ ऑगस्ट १८६७ रोजी लिहिले अन् केलेल्या कामाचे १०,८५५/- रुपये आणि १५ आणे मिळण्याची विनंती केली. हे स्मरणपत्र मोठ्या शिताफीने नानांनी मिळवले. डॉ. आंबेडकरांनी ते पत्र न्यायपत्रात रेकॉर्डवर आणले. त्यामुळे हे तळे खासगी नसून सरकारी वा सार्वजनिक असल्याचे सिद्ध झाले.

न्या. सराफ यांनी हा तलाव सरकारी असल्याचा निकाल दिला. त्या निकालानुसार अनेक स्तरांवर आव्हाने देण्यात आली, परंतु अखेर मुंबई उच्च न्यायालयाने न्या. सराफांचा निकाल कायम केला. परिणामी न्या. सराफांवर सामाजिक बहिष्कार टाकाण्यात आला. न्या. सराफ त्यांना बधले नाहीत. न्यायालये सामाजिक उत्थानाला कशी मदतनीस ठरतात याचा नमुना.

(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)

माणसांमधील परस्पर उपकारक, परस्पर संवर्धक आणि परस्पर सन्मानदायी संबंधांचे व्याकरण म्हणजे नीती! परस्पर हितमय, सर्वमानवसमभावी आणि परस्परांना निरंतर अर्थपूर्ण करत जाणारा मूल्यदंड म्हणजे नीती! बाबासाहेबांनी शुद्ध मानवी सन्मानाची इहवादी नीती सांगितली. ही निरंतर नवनवी होत जाणारीच नीती आहे. बाबासाहेबांची नीती माणूस या महानायकाला जीवनाचा सर्वेसर्वा करणारी आणि प्रत्येकच माणसाला समान प्रतिष्ठा देणारी नीती आहे. या वैश्विक नीतीला आता आंबेडकरनीती म्हणायला हवे.

विश्वनीती बाबासाहेबांची

यशवंत मनोहर

माणूस निसर्गसुत आहे. निसर्गात विविधता आहे, पण विषमता नाही. भेद आहेत, पण भेदभाव नाही. निसर्ग म्हणजे स्वातंत्र्याचा सोहळा! या सोहळ्याच्या पोटी स्वतंत्र माणूस जन्माला येतो. मनाच्या या स्वातंत्र्याला समाजातील वर्चस्वी हितसंबंधांमुळे तो पारखा होतो. इथे सभ्यतेची नीती संपते आणि विषमतेची वा शोषणाची अनीती तयार केली जाते. या अनीतीच्या तुरुंगातून मानवी संबंध मुक्त करते, तिला नीती म्हटले जाते.

व्यक्तीचे हित आणि इतरांचे हित यातील अंतर नष्ट करून टाकते, या हितांची एकमयता प्रस्थापित करते तिला आपण नीती म्हणतो. सर्वांचे समान हित, सर्वांना समान मूल्य आणि सर्वांना समान सन्मान हेच नीतीचे खरे रूप असते. ही नीती माणसाला जीवनाचा एकमेव महानायक मानते. त्याला जीवनाचे परमसाध्य मानते. त्याच्या बुद्धिमत्तेला ही नीती जीवनातली सर्वश्रेष्ठ सर्जनशील संपदा मानते. माणसाच्या या विधायक संगोपनाला आणि विकासमयतेला खरी नीती मानले जाते. या नीतीच्या विरोधात बाकी सर्वच गोष्टींना अनीती हाच अन्वर्थक शब्द आहे.

मानवी जीवनासाठी योग्य काय वा अयोग्य काय, सत्य काय वा असत्य काय, उपकारक काय वा विनाशक काय हे ठरवून देणारे प्रमाण म्हणजे नीती! म्हणून नीतीला सदाचार, सभ्याचार वा निरामय मानवाचार म्हटले जाते.

बुद्धिप्रामाण्यवाद आणि सममूल्यता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि धम्म अशा सर्वच जीवनांगांसंबंधीची स्वतंत्र अशी तत्त्वज्ञाने आहेत. ही सर्वच तत्त्वज्ञाने नीती या केंद्रातूनच उगवलेली आहेत. इहजीवनाचे व्यवस्थापन करणारा बुद्धिप्रामाण्यवाद आणि सममूल्यता हीच बाबासाहेब आंबेडकरांची नीती आहे. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'मध्ये त्यांनी म्हटले आहे -'एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी संबंध येतो तेव्हा नीतीला प्रारंभ होतो. केवळ नीती पुरेशी नाही, ती शुद्ध आणि सर्वव्यापक असली पाहिजे. बंधुता म्हणजेच नीती.' (२४९, ५०-५२).

वैश्विक नीतिसंकल्पना

सर्वच सतत बदलत आहे हे सांगणारे बाबासाहेब नीतीलाही स्थिर मानत नाहीत. नीती कालमानाप्रमाणे बदलते. ती नुसती बदलतच नाही, तर प्रगतही होते. (मुंबई, १५ डिसेंबर १९५२) असे ते मानतात. असेच सत्याच्या आणि ज्ञानाच्याही संदर्भात ते म्हणतात. जीवनाला नवनवी विधायकता प्राप्त करून देण्यासाठी विचार, सत्य, ज्ञान वा नीती या सर्वच गोष्टी स्वतःची नवनवी जीवनोपकारक रचना करत राहतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही नीतिसंकल्पना पूर्णतः वैश्विकच आहे आणि तिची मांडणी त्यांच्या सर्वच ग्रंथांमधून झालेली आहे, पण प्रामुख्याने ती त्यांच्या पाकिस्तान किंवा पार्टिशन ऑफ इंडिया आणि 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथांमधून व्यक्त झाली आणि भारतीय संविधानालाही त्यांनी याच नीतीचे केंद्र प्राप्त करून दिले.

प्रथम भारतीय, शेवटीही भारतीय

१९३८ मध्ये कर्नाटक राज्याच्या स्वतंत्र रचनेवर बोलताना त्यांनी 'मी कोणत्याही प्रकारचा प्रांतभेद मानत नाही, इतकेच नव्हे तर महाराष्ट्रीयन म्हणून घेण्यास भूषण मानत नाही. तसेच भाषा, प्रांतभेद, संस्कृती वगैरे भेदभाव मी कधीच पाळू इच्छित नाही. प्रथम हिंदी, नंतर हिंदू किंवा मुसलमान हेही तत्त्व मला पटत नाही. सर्वांनी प्रथम भारतीय, शेवटी भारतीय, भारतीय पलीकडे काही नको हीच भूमिका घ्यावी.' (खंड १८, भाग-२, पृ. १३७) ही भारताच्या सलोखापूर्ण ऐक्याची प्रज्ञानी नीती त्यांनी मांडली.

विश्वकुटुंबाची नीती

पाकिस्तानवरील ग्रंथात (पृ. ३५४ ते ३५८) वैश्विक समाजाच्या बांधणीची नीती त्यांनी सांगितली आहे. त्यांनी म्हटले आहे - 'कॅनडा, आफ्रिका, फ्रान्स, इंग्लंड, डच, इटालियन ही राष्ट्रे आणि त्या वंशांचे नागरिक कम्युनल विरोधाकडे दुर्लक्ष करून राजकीय एकोप्याने राहतात.' या ग्रंथात संपूर्ण जगालाच एकसंध कसे करता येईल याचे प्रारूप त्यांनी दिलेले आहे. त्यांना भारताची फाळणी तर नको होतीच, पण एकूण विश्वाचीही कोणत्याही प्रकारची फाळणी त्यांना मान्य नव्हती. एकाच संविधानाच्या छताखाली जगातील सर्व राष्ट्रे एकत्र राहू शकतील, असे त्यांना वाटे. ही विश्वरचनेचीच नीती आहे. हा आंतरराष्ट्रीयवादच आहे. ही विविधतेला मानवी एकोप्याचे सूत्र देणारी विश्वकुटुंबाचीच नीती आहे.

ज्ञानाचे प्रतीक

बाबासाहेबांच्या नैतिकतेची तीन प्रमुख अधिष्ठाने आहेत. ही नीती पूर्ण इहवादी आहे. पूर्ण विज्ञाननिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी आणि निरंतर पुनर्रचनाशील आहे. ती पूर्ण समसन्मानवादी आहे आणि प्रकृतितः ती वैश्विकच आहे. या अर्थाने विश्वतत्त्वज्ञानी म्हणून, अव्वल दर्जाचे प्रज्ञावंत म्हणून ते विश्वाच्या चर्चाविश्वात प्रामुख्याने अभ्यासले जायला लागले आहेत. हे कोसीमो झेने यांनी संपादित केलेल्या 'पोलिटिकल फिलॉसॉफिज ऑफ अंतानिओ ग्राम्शी आणि बी.आर. आंबेडकर' या ग्रंथावरून लक्षात येते. जॉन रॉल्स, फूको, आगाम्बेन इत्यादी विचारवंतांच्या संदर्भातही बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास मांडला जातो आहे. दुनिया आता बाबासाहेबांना ज्ञानाचे प्रतीक मानते.

त्यांची नीतिसंकल्पना कोणत्याही एका जातीपुरती, धर्मापुरती, वर्गापुरती वा देशापुरती मर्यादित नाही. ती विविधतापूर्ण विश्वातील व्यक्तिहित आणि सकल मानवी समाजाचे हित यातील दोनता विसर्जित करणारीच नीतिसंकल्पना आहे.

ज्ञानाचे वैश्विक सरसेनापती

आज बाबासाहेब आंबेडकरांना क्रुसेडर वा धर्मभंजक मानले जाते. त्यांना ज्ञानाचे वैश्विक सरसेनापती मानले जाते. आपल्या देशातील जातिव्यवस्थेने त्यांना अमानुषपणे जाळले. धर्मव्यवस्थेने त्यांना नाना पद्धतींनी छळले. लहानपणापासून इथल्या धार्मिक आणि जातीय अर्थव्यवस्थेने त्यांचा सूड

घेतला. शिकताना त्यांना इथल्या विषमतासत्ताकाने कसे छळले हा तपशील सर्वांनाच माहीत आहे.

बडोद्याला सयाजीराव गायकवाड यांच्या कार्यालयात नोकरी करताना आणि पारशांच्या हॉटेलमध्ये राहताना जातीने त्यांना कसे रडवले हे आपल्याला माहीत आहे. मात्र या सर्व आगीला बाबासाहेबांनी आपल्या कर्तृत्वाने आगच लावली. बाबासाहेबांना जाळणारी आग मात्र पराभूत झाली. संकेश्वर पीठाच्या शंकराचार्यांनी हिंदुकोडबिलाच्या संदर्भाने बाबासाहेबांवर अत्यंत असभ्य टीका केली. स्त्रियांना समानाधिकार देणाऱ्या हिंदुकोडबिलाच्या विरोधात उच्चवर्णीय स्त्रियांनी मोर्चा काढला, पण बाबासाहेबांनी विषमतेचा पहाड उद्ध्वस्त करणे थांबवले नाही. आज बाबासाहेबांना छळणारे दुनियेच्या खिसगणतीतही नाहीत, पण दुनिया बाबासाहेबांना ज्ञानाचा महासूर्य मानते किंवा साऱ्या दुनियेला सलोख्याच्या उजेडसूत्रात बांधणारे महाकारुणिक मानते.

परंतु ज्या परंपरादासांनी त्यांना छळले त्यांनाही आणि या दासांच्या मालकांनाही त्यांनी आपल्या गगनभेदी माणुसकीचीच नक्षत्रे वाटली. भारतीय संविधानातून हेच समान मानवाधिकाराचे चांदणे त्यांनी मांडून ठेवले. धम्माच्या पुनर्रचनेतून हाच सर्वमानवसमभाव त्यांनी चितारून ठेवला. माणुसकीच्या या असीम अंतरिक्षाने समन्यायाच्या समसन्मानाच्या, शहाण्या आणि निष्पक्षपाती नीतीची रचना केली. या नीतीची भाषा केवळ करुणेची आहे. जाती इतर जातींना परके मानतात. धर्म इतर धर्मांना परके मानतात, पण आंबेडकर नावाच्या सर्वहिताय, सर्वव्यापी आणि असीम नीतीने कोणालाही परके मानले नाही. हे त्यांच्या राज्य समाजवादातून, भारतीय संविधानातून आणि धम्माच्या विज्ञाननिष्ठ मानवतावादातूनही दिसते. विचार, तत्त्वज्ञाने आणि राजकारणे छोट्या छोट्या हितसंबंधांच्या पालख्या वाहतात, तर बाबासाहेबांची निती सर्वांच्याच समान हितसंबंधांचा वैश्विक प्रकल्प मांडते. बाबासाहेब त्यांच्या छळाचे म्हणणे ऐकत नाहीत. बाबासाहेब त्यांच्यातील निरामय माणसाचे म्हणणे ऐकतात आणि माणसांमधील संबंधांना सभ्य सौंदर्याचे व्याकरण देतात. ही बाबासाहेबांची नीती किनारेविहीनच आहे.

बाबासाहेबांच्या नीतीचे जीवनमर्म

क्रांती ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ती समाजाला नवनव्याने अन्वर्थक, अद्ययावत आणि सर्वहितमयच करत राहते. अशी क्रांती आणि नीती या संकल्पना समानार्थीच असतात. संस्कृती स्वतःत संस्करण करते, स्वतःचे सतत निर्दोषीकरण करते. नवनव्या अर्थांनी ती मोहोरत राहते. संस्कृती थांबली की, ती संस्कृती राहत नाही. ती विकृती होते. तिचे मूलतत्त्ववादात रूपांतर होते. म्हणून स्वतःचेही आणि जीवनाचेही सतत निर्दोषीकरण करत राहणाऱ्या संस्कृती, क्रांती आणि नीती या संकल्पना जीवनाला नवनव्याने प्रस्तुत करणाऱ्याच संकल्पना असतात. त्यामुळेच विघातक जुन्याचा निरोप घ्या आणि विधायक नव्याचा उत्सव सतत साजरा करा हेच जीवनमर्म बाबासाहेबांची नीती सांगते.

जातींची वा वर्णांची विषमता निर्माण करणारे कोणीही असोत ते अमानुषतेचे म्हणजे अनीतीचेच शिल्पकार असतात.

अनीती म्हणजे असभ्यता! ही अनीती सर्वांना पोटाशी घेत नाही. एखाद्याच गटाला डोक्यावर बसवते. मानवी प्रतिष्ठेची हत्या करणाऱ्या कोणत्याही शब्दाला, कृतीला वा हेतुला नीती म्हणता येत नाही. समान मानवाधिकाराकडे पाठ फिरवणाऱ्या कोणत्याही योजनेला नीती म्हणता येत नाही. विषमताविहीन आणि शोषणविहीन मानवी संबंधानाच नीती म्हणता येते.

स्वतंत्र मानवी अस्तित्वाचा शोध

माणूस हेच जीवनाचे साध्य आहे. माणूसच जीवनाचा मूल्यदंडही आहे. या मुक्त माणसाला समाजातील शोषणसत्ताकांनी वेगवेगळ्या बंधनांमध्ये अडकवले आहे. बाबासाहेब आंबेडकरांची नीती माणसाला या सर्व अनैतिक बंधनांपासून मुक्त करणारी नीती आहे. माणसाला एलिनेशनमुक्त वा निरामय करणाऱ्या नीतीचा शोध बाबासाहेबांनी घेतला. हा स्वतंत्र मानवी अस्तित्वाचाच शोध होता.

नीतीचे तत्त्वज्ञान क्रांतिकारक

रिझन आणि मोरॅलिटी, बुद्धिप्रामाण्यवाद आणि नीती यांची अविभाज्यता बाबासाहेब सांगतात. हाच माणसाच्या प्रतिष्ठेचा मार्ग आहे. समाजातील वर्णांच्या आणि जातींच्या उतरंडीला पवित्र, चिरंतन आणि आदर्श मानणाऱ्या चैतन्यवादात समतेच्या नीतीला कुठेच जागा नाही. चैतन्यवाद वर्णांचे आणि जातींचे काटेकोर पालन मोक्षासाठी आवश्यक मानतो. बाबासाहेबांची नीती स्वर्ग, परलोक, मोक्ष, पुनर्जन्म अशी कोणतीही अंधश्रद्धाच मानत नाही. बाबासाहेबांची ही नीती इहलोकनिष्ठ समतेची, स्वातंत्र्याची आणि बंधुत्वाची नीती आहे. योग्यतम आणि सर्वोत्तम यापैकी बाबासाहेबांची नीती सर्वोत्तमला प्रमाण मानते. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांना जगणे मानते, ती व्यक्तीच सर्वोत्तम होय. अशा सर्वोत्तमांची प्रस्थापना हे बाबासाहेबांच्या नीतीचे ध्येय आहे.

या निकषावरच विषमतेचे समर्थन करणारी रिस्टॉटलसारख्या तत्त्वज्ञांची नीती बाबासाहेब नीती म्हणून मान्य करत नाहीत. माझे नीतीचे तत्त्वज्ञान क्रांतिकारक आहे, असे बाबासाहेब सांगतात. बाबासाहेब आपल्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्याला स्थान देतात पण अनिर्बंध स्वातंत्र्य समतेला मारक असते असे सांगतात. त्यांच्या तत्त्वज्ञानात समतेला स्वातंत्र्यापेक्षा अधिक महत्त्व आहे पण संपूर्ण समतेलाही त्यात वाव नाही. अमर्याद समता स्वातंत्र्याची गळचेपी करते आणि स्वातंत्र्य तर अपरिहार्य आहे. स्वातंत्र्य आणि समता यांच्या अतिक्रमणापासून जीवन वाचवण्यासाठी ते कायदा गृहीत धरतात, पण कायद्याचे स्थानही ते गौणच मानतात. स्वातंत्र्य आणि समतेचा भंग होईल, तेव्हा कायदा त्यांना फार समर्थ ठरेल असे वाटत नाही. म्हणून त्यांच्या

तत्त्वज्ञानात तो बंधुभावाला (यात भगिनीभाव अंतर्भूत आहेच) सर्वोच्च स्थान देतात. स्वातंत्र्य आणि समता नाकारली जाईल तेव्हा या दोन्हींचे संरक्षण बंधुभावच करू शकेल, असे बाबासाहेबांना वाटते. सहभाव म्हणजे बंधुभाव आणि बंधुभाव म्हणजे मानवता असे ते याच भाषणात सांगतात (दिल्ली आकाशवाणी : १९५४) आणि या बंधुतेलाच बाबासाहेब नीती मानतात. ही नीती शुद्ध आणि सर्वव्यापकच असावी असाही त्यांचा आग्रह आहे. (बुद्ध आणि त्यांचा धम्म : २५०,२५२).

सर्वांच्या हिताची समाजरचना

वेद, मनुस्मृती, गीता या वैदिक परंपरेतील चातुर्वर्ण्याला त्यांनी आपल्या इहनिष्ठ समतेच्या नीतीत स्थान दिले नाही. वरील परंपरा ईश्वराच्या नावाने चातुर्वर्ण्य सांगते, त्यामुळे या मूलतत्त्ववादी परंपरेला बदल मान्य होत नाही. ही परंपरा वर्णव्यवस्थेतील सर्वोच्च वर्णाच्या हिताची रचना करते. बाबासाहेब आंबेडकरांची नीती सर्वांच्याच हिताची समाजरचना प्रत्यक्षात आणू इच्छिते. वैदिक परंपरा चातुर्वर्ण्याच्या पालनासाठी माणसाला वेठीला धरतात. बाबासाहेबांची नीती नियमांना माणसासाठी सतत अद्ययावत करायला सांगते.

बाबासाहेब आंबेडकरांची नीती उथळ मनोरंजनवादी नाही. भोगवादी तर अजिबात नाही. जीवनावर प्रेम करा आणि प्रेम करण्यासाठी जीवन नवनव्याने सुंदर करा असे सांगणारी ही नीती आहे. मनुस्मृतीमधील विषमता संविधानातील इहवादाला आणि समता-बंधुत्वाला विरोध करते. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' हा आदर्श सांगणारी मनुस्मृती संविधानातील आणि बाबासाहेबांच्या हिंदुकोडबिलातील समतेला आणि भगिनीत्वालाही विरोध करते. म्हणून समता निर्माण करू पाहणाऱ्या कोणालाही संविधान आणि मनुस्मृती एकत्र नेता येणार नाही, असे बाबासाहेब सांगतात.

चैतन्यवादी परंपरेने समान न्यायाला, सममूल्यतेला आणि सर्वमानवसमभावाला कधीही मान्यता दिली नाही. विषमता आणि शोषण निर्माण करणारी आणि त्यांची पवित्र म्हणून जतन करणारी कोणतीही परंपरा समतेशी, विज्ञाननिष्ठेशी, चिकित्सेशी आणि सर्वांना समान मानवी प्रतिष्ठा देणाऱ्या मानवतावादाशी नाते जोडूच शकत नाही. माणसाशी माणसासारखे वागण्याचे वा सभ्यतेचे व्याकरण सांगितले जात नाही, तिथे नीती नसते. बाबासाहेब आंबेडकरांनी ही संपूर्ण नीतीविहीनता कटाक्षाने नाकारली आहे. बाबासाहेबांनी शुद्ध मानवी सन्मानाची इहवादी नीती सांगितली. ही निरंतर नवनवी होत जाणारीच नीती आहे. आपल्या इतिहासात केंद्रवर्ती झगडा नीती आणि अनिती यांच्यातलाच आहे आणि बाबासाहेबांची नीती माणूस या महानायकाला जीवनाचा सर्वेसर्वा करणारी आणि प्रत्येकच माणसाला समान प्रतिष्ठा देणारी नीती आहे. या वैश्विक नितीला आता आंबेडकरनीती म्हणायला हवे.

(लेखक प्रख्यात साहित्यिक, कवी, कादंबरीकार, समीक्षक आणि अभ्यासक आहेत.)

सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन

ग्राहक म्हणून आपल्या हक्कांबाबत जागरूक रहा

ग्राहकराजा जागा हो

ग्राहक हक्कांमध्ये खालील हक्कांचा समावेश आहे :

- तक्रार निवारण्याचा हक्क
- निवड करण्याचा हक्क
- ग्राहक जागृतीचा हक्क
- वस्तू अथवा सेवा यासंबंधी माहिती घेण्याचा हक्क
- बाजू ऐकूण घेतली जाण्याचा हक्क
- सुरक्षिततेचा हक्क

दिनांक १५ मार्च
जागतिक ग्राहक हक्क दिन

वस्तू व सेवा खरेदी करतांना या गोष्टी नीट तपासून पहा :

- छापील किंमत/वैधता/वजन व माप
- गॅरंटी/वॉरंटी
- हॉलमार्क/एग्मार्क/आयएसआय मार्क

याबाबत ग्राहक आयोगात edakhil.nic.in वर तक्रार दाखल करता येईल. तसेच वजनमापासंदर्भात ०२२-२२६२२०२२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा dclmms_complaints@yahoo.com या ईमेलवर तक्रार करता येईल.

अधिक मार्गदर्शनासाठी : राज्य ग्राहक हेल्पलाईन १८०० २२ २२६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधा.

श्री. उद्धव ठाकरे	श्री. अजित पवार	श्री. बाळासाहेब थोरात	श्री. छगन भुजबळ	डॉ. विश्वजीत कदम
मा. मुख्यमंत्री	मा. उपमुख्यमंत्री	मा. मंत्री, महसूल	मा. मंत्री अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण	मा. राज्यमंत्री अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: दीपक कपूर